# स्फुलिंग

अंक - 3, जून 2018

रू. 30/-

- कर्नाटक विधानसभा निवडणुक निकालः भांडवली लोकशाहीच्या दिखाव्याचं नग्न प्रहसन
- देशात भयंकर वाढती बेरोजगारी!
- वेदांता कंपनीच्या नफ्यासाठी तुतिकोरीन मध्ये पोलिसांकडून गोळीबार
- जनतेसाठी बनवलेल्या कायद्यांना दुरुपयोगाच्या बहाण्याने कमजोर करण्याचे षडयंत्र
- महाराष्ट्रात शेतकरी आणि आदिवासींचा लाँग मार्च - आंदोलनाचे मुद्दे, परिणाम, आणि शिकवण
- जाती प्रश्न, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांचा राजकीय वारसा : सुधीर ढवळे यांना एक उत्तर
- फेक न्यूजः डिजीटल माध्यमांमधून समाजाच्या नसांमध्ये भिनणारे द्वेषाचे विष
- गांधी - एक पुनर्मूल्यांकन

# एस.ए.[†] सैनिकाचे गीत

बेर्टोल्ट ब्रेष्ट ( अनुवादः अभिजित )

भुकेनं बेहाल झोपलो मी
घेऊन पोटात कळ,
तेवढ्यात ऐकू पडले आवाज
उठ, जर्मनी उठ!

मग दिसली लोकांची गर्दी मार्च करताना
थर्ड राईख[††] कडे, ऐकले मी त्यांना म्हणताना,
मी म्हटले माझ्याकडे जगायला नाही काही
तर मी पण का न जावे त्यांच्या सोबत,

आणि मार्च करत होता माझ्यासोबत सामील
जो होता त्यांच्यामध्ये सर्वांत जाड
आणि जेव्हा मी ओरडलो 'अन्न द्या, काम द्या'
तेव्हा तो जाडाही ओरडला,

तुकडीच्या नेत्याच्या पायांवर होते बूट
जेव्हा माझे पाय होते ओले
पण आम्ही दोघेही करत होतो मार्च
पाय जुळवत जोशाने,

मी विचार केला, डावा रस्ता  घेऊन जाईल पुढे
त्याने म्हटले मी होतो चूक
मी ऐकला आदेश त्याचा
आणि डोळे मिटून राहिलो चालत मागे,

आणि जे होते भुकेने कमजोर
पिवळे-जर्द चेहरे घेऊन राहिले चालत
भरल्या पोटावाल्यांसोबत करत कदमताल
थर्ड राईखच्या दिशेने,

आता माहित आहे मला, तिथे उभा आहे माझा भाऊ
भूकच आहे जी जोडते आम्हाला
जेव्हा की मी मार्च करतो त्यांच्यासोबत
जे शत्रू आहेत माझे आणि भावाचेही,

आणि आता मरतोय माझा भाऊ
माझ्याचा हातांनी मारले त्याला
जाणतो जरी की तो हारला तर
वाचणार नाही मी सुद्धा.



[†] एस.ए. : जर्मनी मध्ये नाझी पक्षाद्वारे उभ्या केलेल्या फॅसिस्ट बळाचे संक्षिप्त नाव. उग्र फॅसिस्ट प्रचाराद्वारे यामध्ये मोठ्या संख्येने बेरोजगार तरुण आणि कामगारांची भरती करण्यात आली त्यांचे मुख्य काम होते ज्यू आणि विरोधी पक्षांवर विशेषतः कम्युनिस्टांवर हल्ले करणे आणि दहशत पसरवणे

[††] थर्ड राइख़ : 1933 ते 1945 दरम्यान नाझी पार्टी शासित जर्मनीलाच थर्ड राइख़ म्हटले जात होते

## स्फुलिंग बाबत

☞स्फुलिंग प्रतिकुलतेच्या या कठीण अंधकारमय समयी क्रांतीच्या नवीन अध्यायांच्या तयारीसाठी युवक वर्गाला आवाहन करत आहे. स्फुलिंग एका नवीन क्रांतिकारी नवजागरणाचा आणि प्रबोधनाचा शंखनाद करत आहे. नवीन क्रांतीची नेतृत्वकारी शक्ती निर्माण करण्यासाठी, तिची मार्गदर्शक वैज्ञानिक जीवनदृष्टी अणि इतिहासबोधाची समजदारी स्थापित करण्यासाठी आणि भारतीय क्रांतीच्या मार्गाची योग्य समजदारी विकसित करण्याच्या उद्देशाने विचार-विनिमय आणि वाद-विवादासाठी सामान्य जनतेच्या विवेकशील, वीर युवक युवतींना आमंत्रित करत आहे. स्फुलिंग क्रांतीच्या आत्म्याला जागृत करण्याच्या गरजेची जाणीव आहे. एक नवीन क्रांतिकारक चेतना निर्माण करण्याच्या आसक्तीची अभिव्यक्ती आहे. जर लोक लोखंडाच्या भिंतींमध्ये कैद, गुंगीच्या गाढ झोपेतही असतील तरीही आपल्याला सतत आवाज द्यावाच लागेल. झोपेत घुसमटणाऱ्या जीवांच्या कानापर्यंत सतत जाणारा आपला आवाज कधीतरी त्यांना नक्कीच जागवेल. विसरता कामा नये की एक ठिणगी सुद्धा संपूर्ण जंगलात आग लावू शकते.

☞स्फुलिंग जीवनाच्या अशाच घुसमटणाऱ्या परिस्थितीला बदलण्यासाठी सर्व जिवंत लोकांना आवाहन करत आहे. आम्ही त्या सर्व लोकांना आवाहन करत आहोत जे खऱ्या अर्थाने तरूण आहेत. ज्यांच्यामध्ये व्यक्तिगत स्वार्थ, भित्रेपणा, दुनियादारी, धनपिपासू वृत्ती, करियरवाद आणि पद-मान-सन्मानाच्या गळाकाटू स्पर्धेशी लढण्याची तयारी आणि जिद्द आहे, ज्यांच्या धमण्यांमध्ये उष्ण रक्त वाहत आहे. जे न्याय, सौंदर्य, प्रगती आणि शौर्याचे पुजारी आहेत. स्फुलिंग जनतेच्या सेवेत लागण्यासाठी कष्टकरी जनतेमध्ये मिसळून त्यांच्या मुक्तीचा झेंडा हातात घेण्यासाठी अशाच तरुणांना आवाहन करत आहे. सामाजिक क्रांत्यांची सुरूवातीची कठीण आव्हाने स्विकारण्यासाठी अगोदर जनतेचे शूर तरूण-तरूणीच पुढे येतात. इतिहासाच्या रथाची चाकं तरुणांच्या उष्ण रक्तानेच लथपथ असतात.


# स्फुलिंग

**अंक - 3, जून 2018**

एक अनियतकालिक पत्र

**संपादक मंडळ**
अभिजित, सत्यनारायण

संपादन पूर्णतः अवैतनिक व अव्यावसायिक


## अंतरंग


●**संपादकीय**
कर्नाटक विधानसभा निवडणुक निकाल: भांडवली लोकशाहीच्या दिखाव्याचं नग्न प्रहसन 3
●**शिक्षण आणि रोजगार**
देशात भयंकर वाढती बेरोजगारी! 5
●**प्रासंगिक**
वेदांता कंपनीच्या नफ्यासाठी तुतिकोरीन मध्ये पोलिसांकडून गोळीबार 9
जनतेसाठी बनवलेल्या कायद्यांना दुरुपयोगाच्या बहाण्याने कमजोर करण्याचे षडयंत्र 15
त्रिपुरा विधानसभा निवडणुकीचे निकाल आणि संसदीय डाव्यांचे संकट 50
●**आंदोलन : समीक्षा-समालोचन**
महाराष्ट्रात शेतकरी आणि आदिवासींचा लाँग मार्च - आंदोलनाचे मुद्दे, परिणाम, आणि शिकवण 11
●**अर्थकारण**
नेहमीप्रमाणे जनतेच्या तोंडाला पाने पुसणारे केंद्रीय अंदाजपत्रक(बजेट) 2018 19
●**जगाच्या पाठीवर**
अमेरिकेच्या पाठिंब्याने इस्त्रायली झायोनिस्टांकडून निर्दोष पॅलेस्तिनींची हत्या 23
●**वाद-संवाद**
जाती प्रश्न, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांचा राजकीय वारसा : सुधीर ढवळे यांना एक उत्तर 30
●**समाज**
केवळ आसाराम नाही तर संपूर्ण धर्माची लुटारू वृत्ती ओळखा 41
कुपोषणाच्या नावाने कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचा धंदा 43
महिलांवरील वाढते अत्याचार 45
●**मीडिया**
फेक न्यूजः डिजीटल माध्यमांमधून समाजाच्या नसांमध्ये भिनणारे द्वेषाचे विष 48
●**तत्त्वज्ञान**
गांधी - एक पुनर्मूल्यांकन 54
●**साहित्य**
कथा: करोडपती कसे असतात!! 59
●**वारसा**
वाचनालयांची संस्कृती - कष्टकऱ्यांच्या आणि नफेखोरांच्या शासनामधील फरक 64




**संपादकीय कार्यालय** - रूम न. 204, हिरानंदानी बिल्डिंग - 7बी, लल्लूभाई कंपाऊंड, मानखुर्द (प.), मुंबई
**फोन नं.** – 9422308125, 9619039793
**ईमेल** - sfuling.mag@gmail.com
**वेबसाइट** - www.sfuling.com



हे अनियतकालिक मुद्रक आणि संपादक सत्यनारायण यांनी आर.एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे-३० येथे मुद्रित करून शहीद भगतसिंह पुस्तकालय, रूम २०४, हिरानंदानी बिल्डींग, लल्लूभाई कंपाऊंड, मानखुर्द (प), मुंबई येथे प्रकाशित केले.

# नारायण सुर्वे यांच्या दोन कविता



## *त्याने यावे*

असेल हिम्मत लढणारांची
आणि सुळावर चढणारांची
निर्भय निधड्या छातीवरती
जुलूम रगडीत जाणारांची
त्याने यावे-

कसले भेद अन खुरटे वारे
मोजीत बसला वरचे तारे
चुलीत ज्यांच्या विस्तव नाही
तेथे फुलतील कसे निखारे
उगा रुसावे-

रोज बडविती नवेच ढोल
हवेत जिरती फुसके बोल
थंडे ताबूत झाले तरीही
उगाच बसले घालीत घोळ
किती दळावे-


हरला असेल त्याने यावे
अन्यायावर तुटून पडावे
पीडला असेल त्याने यावे
आणि व्यथेवर औषध न्यावे

खचला असेल त्याने यावे
बोल धीराचे मनन करावे
वंचीत असेल त्याने यावे
स्वत:स फूंकून पावन व्हावे

लखलखत्या पात्यांनी यावे
घरघरत्या जात्यांनी यावे
अणुअणूच्या कणाकणांतून
उसळत धुमसत पेटत यावे

जाळीत जावे; घडवीत यावे
संहारावे; उभवीत यावे
विराट श्रमसूर्याच्या कक्षेत
स्वत:स उजळीत मुक्त फिरावे.





## *लेनिन*

अजुन मी तुझ्यावर काही लिहिले नाही
ही खंत नाही;
एक कमालीची जबाबदारी वाटते
जेव्हा मी हात ठेवतो हृदयावर लेनिन,

मध्यान्ह रात्र आणि -
एक घुम्मसा आवाज शहरात घुमतोय
वरचा पोल खाली ओढून
खडखडत ट्रॅम उभी राहते,
तेव्हा डकवीत असतो पोष्टर किंवा;
दिव्याखाली बसून वादविवाद करतो आम्ही.

फारच सुखाचे हे दिवस,
अगदी धगीजवळच्या उंबेसारखे.
खरेखुरे जगत आहोत
असे वाटू देणारे सोनेरी दिवस.

मोठे लोभसवाणे हे शहर
कोट्यवधी व्होल्ट्सचा एक तारा.
थंड होते एक दिवस
गपगार होते, थांबताच चाके,
माणसे रस्त्यावर येतात
जळत राहतात भर दिवसा दिवे
पुरासम रस्त्यावर माणसांचे थवे
शर्थ होते चौकाचौकात
घणवाले; रणवाले होतात.
जिंकतात; ठिणग्या पेटवतात छावे
अशा वेळी कुणीही इथे नतमस्तक व्हावे.

जेव्हा ते आम्हाला घेऊन गेले
'साले! लेनिनवाले दिसतात' म्हणाले,
कानशिले तापली, पण बरेही वाटले
राक्षसांनी आता तरी आम्हाला नीटसे ओळखले

'हे आता जागे झालेत
रूपच बदलणार आहेत पृथ्वीचे' तू लिहिलेस.

अजून शबद आम्ही पुरा करू शकलो
नाही.
अजून तुझ्यावर मी काही लिहू धजलो नाही.

संपादकीय

# कर्नाटक विधानसभा निवडणुक निकाल: भांडवली लोकशाहीच्या दिखाव्याचं नग्न प्रहसन

भारतातील लोकशाही व्यवस्था ही एक आदर्श व्यवस्था आहे, पण भ्रष्ट नेतृत्वामुळे, भ्रष्ट पक्षांमुळे, राजकारणतील अनैतिकतेमुळे ती योग्यरित्या राबवली जात नाही असा एक मोठा भ्रम सतत तयार केला जातो. कागदावर ही व्यवस्था स्वतंत्र निवडणुक आयोग, स्वतंत्र न्याययंत्रणा, निष्पक्ष राज्यपाल, आणि तात्विकदृष्ट्या भिन्न राजकीय पक्ष असा दिखावा करत असते. खरेतर हा भ्रमाचा भोपळा फोडू शकणाऱ्या शेकडो घटना स्वातंत्र्यानंतर मोजल्या जाऊ शकतात आणि कर्नाटकातील निवडणुक निकालांनी पुन्हा या व्यवस्थेचे वाभाडे काढले; पण तरीही निर्लज्जपणे भांडवली मीडिया काही ना काही बहाणे बनवून सगळे कसे आलबेल आहे असेच चित्र रंगवत आहे. वास्तव हे नाहीये की ही व्यवस्था ठिक आहे आणि तिची अंमलबजावणी ठिक होत नाही, वास्तव हे आहे की ही व्यवस्थाच लोकांना न्याय देऊ शकत नाही. कर्नाटक निवडणुकांच्या निकालातून हे पुन्हा एकदा दिसून आले आहे.

कर्नाटक निवडणूकांचा निकाल जाहीर झाला आणि भारतातील अनेक उदारवादी लोकांचा जीव भांड्यात पडला. भाजपला पूर्ण बहुमत न मिळाल्यामुळे आणि काँग्रेसने अल्पमतातील जनता दल(धर्मनिरपेक्ष)ला पाठिंबा दिल्यामुळे तर ते अजूनच खुश झाले. भाजपचा घोडेबाजार यशस्वी झाला नाही, त्यांचा चेहरा उघडा पडला, सर्वोच्च न्यायालयाने रात्री सुनावणी करून एका दिवसात बहुमत सिद्ध करायला सांगितले, वगैरे गोष्टी म्हणजे लोकशाहीचा विजय आहे असा जल्लोष सुरू झाला. वास्तव हे आहे की गेल्या 70 वर्षांमध्ये भाजप असो वा काँग्रेस दोघांनीही या भांडवली लोकशाहीचा उरला सुरला दिखावटी चेहरा अनेकदा काळा करून टाकला आहे, आणि कर्नाटकात जे झाले तो लोकशाहीचा विजय नाही तर लोकशाहीच्या दिखाव्याचे नग्न प्रहसन आहे.

जेव्हा ईव्हीएम नव्हत्या तेव्हा मतदान केंद्रावर कब्जा करण्यापासून ते बोगस मतदान घडवण्यापर्यंत अनेक गैरप्रकार निवडणुकांमध्ये व्हायचे. आता इलेक्ट्रॉनिक यंत्रे आल्यानंतर सतत त्यांच्या विश्वासार्हतेवर आणि सत्ताधारी पक्षाकडून त्यांचा गैरवापर होत असल्याबद्दल ओरड होत आहे. निवडणुक आयोग सुद्धा निवडणुकीच्या तारखा जाहिर करण्यापासून इतर अनेक निर्णय घेताना सत्ताधारी पक्षाची बाजू घेऊन करत असतो हे भाजपच नाही तर काँग्रेसच्या काळापासून अनेकदा दिसून आले आहे. काही निष्पक्ष निवडणूक अधिकारी होऊन गेले तरी एकंदरीतच या व्यवस्थेवरही सत्तेचा असलेला प्रभाव लपलेला नाही.

राज्यपाल पदाचा राजकीय फायद्यांसाठी वापर करण्याची परंपरा भाजपने नाही, तर प्रामुख्याने इंदिरा गांधींच्या काळात काँग्रेसनेच चालू केली होती. भारतातील राज्य सरकारांची कागदावर असलेली स्वायतत्ता सुद्धा काढून घेऊन, भांडवलदारांच्या सोयीसाठी आणि एकाधिकारी सत्ता लागू करता यावी म्हणून एक अतिशय मजबूत केंद्र सरकार असावे म्हणून राज्यपाल पदाचा वापर करण्याचे धोरण या देशात अनेक दशके लागू आहे. या मुद्यावर देशातील सर्व प्रमुख पक्ष खरेतर एकमत आहेत, तेव्हा जे चालू आहे ते फक्त मगरीचे अश्रु ढाळण्याचे काम चालू आहे.

तसे तर भांडवली व्यवस्थेमध्ये न्याय कधीच कामगार वर्गाच्या आवाक्यात असू शकत नाही; कारण पदोपदी प्रचंड वेळ आणि पैसा खर्च करायला भाग पाडणारी न्यायव्यवस्था. न्याययंत्रणेच्या पारदर्शकतेबद्दल, भ्रष्टाचाराबद्दल या अगोदरही अनेकदा आवाज उठवले गेलेले आहेत; पण न्यायव्यवस्थेच्या निष्पक्षपणाबद्दल तर आता खुद्द न्यायपालिकेतूनच कितीतरी प्रश्नार्थक सूर निघताना दिसत आहेत. जस्टीस लोया खून प्रकरणी सुनावणी असो, कोणत्या न्यायमूर्तींकडे कोणते प्रकरण देण्यासंदर्भातील मुख्य न्यायमुर्तींचे निर्णय असोत, मुख्य न्यायमूर्तींच्या व्यवहाराबद्दल इतर चार वरिष्ठ न्यायमूर्तींनी जाहिरपणे उपस्थित केलेले प्रश्न असोत, सर्वोच्च न्यायालयामध्ये के. एम. जोसेफ यांच्या नियुक्तीचा प्रश्न असो, गेल्या काही महिन्यांमध्ये न्यायव्यवस्थेच्या स्वतंत्रतेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या इतक्या घटना घडलेल्या असतानाही न्यायव्यवस्था ही लोकशाहीची तारक असे तेच म्हणू शकतात ज्यांना या दिखाव्याच्या लोकशाहीचा दिखावा टिकवायचा आहे.

राहता राहिला प्रश्न घोडेबाजाराचा. भाजपने प्रत्येक आमदाराला 100 कोटी रुपये देऊ केल्याचे ऐकून अनेकांचे डोळे विस्फारले. एवढे पैसे कुठून आले, काळा पैसा कुठे गेला वगैरे योग्यच प्रश्न विचारले गेले. पण बहुतेक जनतेची स्मरणशक्ती कमजोर असते असे म्हणतात ते खरेच असावे. आजपर्यंत एखाद्या पक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नसताना, कोणत्या निवडणूकीत आमदार-खासदारांचा घोडाबाजार झालेला नाही? 1993 मध्ये नरसिंह राव पंतप्रधान असताना शिबू सोरेन यांना एक कोटी रुपये रोखीने बॅगेत भरून

दिल्याच्या किश्श्यापासून ते 2000 मध्ये महाराष्ट्रात नारायण राणेंनी काँग्रेसचे आमदार 'पळवल्याच्या' अनेक घटनांची यादीच होईल. आता जेव्हा भांडवलशाहीमध्ये शिक्षणापासून आरोग्यापर्यंत प्रत्येक वस्तूच विकाऊ झाली आहे तिथे आमदार-खासदारांची काय घेऊन बसलात?

मुळात पक्ष बदल वगैरे अतिशय सामान्य आणि नेहमीच्या गोष्टी आहेत कारण सर्व आमदार-खासदारांना माहित आहे की संसदेत/विधानसभेत जाऊन मोठमोठ्या उद्योगपतींच्या सेवेसाठीच काम करायचे आहे, आणि निर्णय उद्योगपतींच्या सोईचेच घेतले जातात् तेव्हा हा पक्ष काय आणि तो काय, सत्ता-संपत्तीत वाटा मिळण्याशी मतलब. त्यामुळेच आज काँग्रेससारख्या पक्षात धर्मनिरपेक्षतेचा चेहरा घेतलेले लोक उद्या भाजपमध्ये जातात आणि आज फॅसिस्ट भाजपमधले उद्या सत्ता दिसल्यावर काँग्रेसकडे. पक्षांनाही माहित आहे की संपत्ती आणि जातीच्या गणितात बसणारे 'नेते' निवडणुकीच्या बाजारात फार कामाचे असतात, त्यामुळेच शिवसेना ते काँग्रेस ते भाजप असा प्रवेश करणारे राणेंसारखे नेते सर्व पक्षांना चालतात. हे नेते कधी कट्टर हिंदुत्ववादी बनतात, तर कधी धर्मनिरपेक्ष, कधी आंबेडकरवादी, तर कधी विकासाचे तारणहार; वास्तवात ते असतात भांडवली व्यवस्थेचे सरावलेले प्रतिनिधी!

वास्तव हे आहे की देशातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांची ध्येय-धोरणे एकसारखीच आहेत. जागतिकीकरणाची आणि भांडवलदारांच्या हिताची धोरणे राबवण्याबद्दल सर्वांचे एकमत आहे. वेगवेगळे पक्ष फक्त वेगवेगळ्या भांडवली गटांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्या आपापसातील स्पर्धेमध्ये आपल्या गटाचे हित जोपासतात. सत्तेचे घोषित उद्दिष्टच बहुसंख्या कामगारांची लूट आणि मुठभरांचे मालकवर्गाचे हित आहे, तेव्हा ती सत्ता राबवणाऱ्या नेत्यांनाही लुटीतील वाटा मिळवावा वाटणारच ना! मुठभर नेते भ्रष्ट नसून, ही नफाकेंद्रीत व्यवस्थाच भ्रष्टाचारी निर्माण करणारी आहे. म्हणूनच सत्तेत येण्यासाठी कोण कशा लबाड्या करतो याने या पक्षांना फरक पडत नाही, कारण सगळे एकाच माळेचे मणी आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या नावाने कर्नाटकमध्ये, गोव्यामध्ये, मणीपुर मध्ये किंवा बिहार मध्ये जे काही झाले ते नवीनही नव्हते आणि धक्कादायकही. फक्त सत्तेतील आपापल्या वाट्यासाठी गळे काढण्याचे काम सर्व पक्षांनी नेहमीप्रमाणे चालवले. हे प्रकार धक्कादायक होते ते फक्त त्या मूठभर उदारमतवाद्यांसाठी जे या लोकशाहीला आणि तिच्या भांडवली चरित्राला न समजता तिच्या नावाने मनामध्येच स्वप्नांचे इमले बांधत असतात. त्यांनी लवकर जागे व्हावे हीच सदिच्छा.

ही लोकशाही, 'भांडवली लोकशाही' आहे ती यामुळेच. इथली सर्व सत्ताप्रणाली मोठमोठ्या भांडवलदारांच्या हितासाठीच काम करते. ज्या पक्षाच्या मागे भांडवली शक्ती उभ्या आहेत, त्यालाच मोठ्या प्रमाणात निवडणुकीमध्ये पैसा पुरवला जातो आणि प्रचंड जाहिरातबाजीच्या जोरावर त्या पक्षासाठी वातावरणनिर्मिती केली जाते. निवडणुकीचा निकाल आल्यानंतरही धनबळाचा पूर्ण जोर लावून लोकप्रतिनिधींच्या घोडे बाजारासाठी पैसा पुरवतात ते मोठमोठे भांडवलदारच. त्यामुळे सत्ता येते ती दिसायला एखाद्या पक्षाची असते, पण वास्तवात ती राबवतात ते भांडवलदारच.

आज देशातीलच नव्हे तर जगातील भांडवलशाही व्यवस्था आर्थिक संकटात सापडलेली आहे. जगाच्या स्तरावर आणि भारतातही नफ्याच्या वाढीचा दर घसरत आहे आणि एका आर्थिक महामंदीचे संकट डोक्यावर आहे. अशावेळी बेरोजगारी, महागाई, उपासमारीने त्रस्त जनतेत वाढत असलेल्या असंतोषाला दुसरीकडे वळवण्यासाठी आणि व्यवस्थेविरोधात एल्गार पुकारणाऱ्यांची दडपशाही करण्यासाठी दक्षिणपंथी, प्रतिक्रियावादी, कट्टर उजव्या विचारसरणीच्या, धर्मवादी, जातीयवादी किंवा फॅसिस्ट अशा शक्तींना खतपाणी घालण्याचे काम जागतिक भांडवलदार सर्वत्र करत आहेत. भारतातील मोदी सरकार, अमेरिकेतील ट्रंप, फिलीपीन्समधील दुतेर्ते किंवा युरोपातील अनेक देशांमध्ये पुन्हा उभार घेत असलेले नव-नाझी पक्ष हे याच परिघटनेची विविध रुपं आहेत. या सर्वांमध्ये समान आहे ते कामगार वर्गाच्या शोषण आणि दमनाची निती आणि भांडवलदार वर्गाची जी-हुजूरी. एका बाजूला सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये भांडवलधार्जिणी धोरणं राबवण्याबद्दल एकमत आहे आणि दुसरीकडे याच राजकारणाची अतिशय जनविरोधी, जातीयवादी, द्वेषमूलक पद्धतीने अंमलबजावणी करणारे भाजप सारखे पक्ष भांडवलदारांचे सर्वात लाडके पक्ष आहेत.

तेव्हा कर्नाटकमध्ये जद-काँग्रेसचे सरकार आले म्हणून फार फरक पडत नाही. देशाचे खरे सत्ताधारी असलेले भांडवलदार जाणतातच की हे सरकारही तीच धोरणे लागू करेल जी भाजप करणार होते आणि गरज पडलीच तर पुन्हा फोडाफोडीचे राजकारण करून सत्ताबदलासाठी पैशांच्या थैल्या तयार आहेतच. भाजप आजही त्यांचा सर्वाधिक लाडका पक्ष आहेच आणि भांडवलच्या सत्तेच्या पाठिंब्याने संघपरिवाराच्या विखारी प्रचाराची धार तशीच राहणार आहे.

**सत्याचा प्रकाश त्या लोकांना त्रासदायक आहे,ज्यांना अंधार सवयीचा झालाय. त्यांना ज्ञानाचा प्रकाश दाखवणे म्हणजे वटवाघुळांच्या घरट्यात सुर्याचा एक किरण सोडणे, ज्याने त्यांच्या डोळ्यांना त्रास होतो व ते चीं-चीं करू लागतात.**

**देनी दिदेरो**

# देशात भयंकर वाढती बेरोजगारी!

## रोजगाराच्या अधिकाराला मुलभूत अधिकार करण्यासाठी तरूण आणि कामगारांना पुढाकार घ्यावाच लागेल.!

✍'भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायद्या' अभियान

रोजगाराचा हक्क म्हणजे जगण्याचा हक्क म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. पण देशात बऱ्याच काळापासून बेरोजगारीचे संकट वाढतच चाललं आहे. एका बाजूला देश विकास करत असल्याच्या प्रचंड वल्गना केल्या जात आहेत आणि वास्तवात दुसरीकडे देशातील रोजगाराच्या समस्येने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. मूठभर व्यावसायिक सोडले तर इंजिनिअर, डॉक्टरांसहीत कोट्यवधी लायक तरुण आज रोजगारासाठी वणवण भटकत आहेत. गाव असो की शहर आज कुठेही रोजगार सहजरित्या उपलब्ध नाही. **रोजगार निर्मितीचे आश्वासन प्रत्येक राजकीय पक्ष देताना दिसतो, पण सगळ्या थापा! अनेक सरकारं आली आणि गेली रोजगार कमीच होत गेलेत.** सरकारी भरत्या खुंटीला टांगून ठेवल्या आहेत, नोकरीच्या परिक्षा पास झाल्यावरही सरकार पास झालेल्या उमेदवारांना नोकरी देत नाहीये. परिक्षा आणि इंटरव्ह्यू देण्यामध्ये युवकांचा वेळ, आरोग्य आणि पैसे वाया जात आहेत आणि पार कंबर मोडायची वेळ आली आहे. **नवीन रोजगार तर दूरच, सरकार रिक्त असलेल्या लाखो जागा सुद्धा भरत नाहीये. रोजगार म्हणजे एक दुःस्वप्नच बनले आहे.** रोजगारापाई तरुणांच्या आत्महत्या, आंदोलने या रोजच्या बातम्या बनल्या आहेत. दुसरीकडे प्रत्येक रोजगारासाठी प्रचंड स्पर्धेची निर्मिती करून रोजगार न मिळण्याचे खापर तरुणांच्याच माथ्यावर फोडणारी एक विचारयंत्रणा तरुणांच्या मनात स्वतःबद्दल न्यूनगंड तयार करत आहे. वरताण म्हणून सत्ताधाऱ्यांनी निर्दयपणे बेरोजगारीच्या जखमेला कोरून कोरून चिघळवले आहे आणि 200 रुपये रोज कमावून बेरोजगारांनी भजी तळावीत असे म्हणत पंतप्रधान जखमेवर मीठ चोळत आहेत!

### बेरोजगारी: भांडवलशाहीची निर्मिती

थोडा जरी विचार केला तरी आपण समजू शकतो की रोजगार निर्माण करण्यासाठी तीन गोष्टी पाहिजेत (1) **काम करू शकणारे हात (2) लोकांची गरज (3) नैसर्गिक साधने.** भारतात या तीनपैकी काहीही कमी आहे का? नाही! ज्या देशामध्ये अब्जावधी लोकांच्या अब्जावधी गरजा आहेत, अफाट नैसर्गिक संपदा आहे, काम करायला उत्सुक कोट्यवधी हात आहेत अशा देशामध्ये बेरोजगारी निर्माण होणे हा फक्त शोषणकारी भांडवली आर्थिक व्यवस्थेचाच परिणाम आहे.

आज भारतात रोजगाराचे प्रचंड अंतर्विरोध दिसून येतात. एका बाजूला कोट्यवधी अशिक्षित लोक आहेत, म्हणजे शाळेपासून कॉलेजपर्यंत शिक्षणाची प्रचंड गरज आहे आणि दुसरीकडे कोट्यवधी सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणी आहेत ज्यांना शिक्षणाच्या नोकरीची आवश्यकता आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला बारावीपर्यंतच खऱ्या अर्थाने शिक्षणाचा अधिकार द्यायचा तर आज एकट्या महाराष्ट्रातच जवळपास 20 लाख शिक्षकांची गरज आहे. एका बाजूला बहुसंख्या जनता आरोग्यसेवांपासून वंचित आहे, पुरेसे वैद्यकीय शिक्षणही निर्माण झालेले नाही आणि दुसरीकडे आरोग्यसेवेचे प्रशिक्षण घेतलेले लाखो तरुण बेरोजगार आहेत; अशाच प्रकारे रेल्वे असो किंवा पोस्ट, वीजनिर्मिती असो किंवा पोलाद-सिमेंट, प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनतेची गरजही आहे आणि त्यामुळेच रोजगाराचीही. यासाठी लागणारी साधनसंपत्ती देशात मुबलक आहे. मग रोजगार निर्माण का होत नाहीत. याचे उत्तर आहे: भांडवलशाही.

**बेरोजगारीचे संकट हे भांडवली व्यवस्थेचा परिणाम आहे. भांडवलशाही व्यवस्थेत सर्व उत्पादनावर ताबा आहे खाजगी मालकांचा आणि या व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे मालकांचा नफा वाढवणे.** मालकाचा नफा वाढतोच मुळात कमी कामगारांकडून जास्त श्रम करून घेऊन आणि कामगारांऐवजी मशिनचा वापर करून. कोणताही उद्योगपती, ठेकेदार रोजगार देण्यासाठी धंदा करत नाही, तर स्वतःचा नफा वाढवण्यासाठी करतो. खरेतर **बेरोजगारांची संख्या जास्त असल्यामुळेच कामगारांना कमी पगारात राबवून मालक आपला नफा वाढवतात.** त्यामुळेच मूठभरांच्या नफ्यासाठी चालणाऱ्या भांडवली व्यवस्थेत फार नोकऱ्या निर्माण होऊच शकत नाही कारण नोकऱ्या कमी करण्यातच या व्यवस्थेचा फायदा आहे. त्यामुळे फक्त एवढीच आशा बाळगणे की अनके कंपन्या येतील, उद्योग येतील तर रोजगार वाढतील हे मूर्खपणाचेच ठरेल.

### बेरोजगारीची भीषणता: आकड्यांमध्ये

यु.पी.एस.सी. परिक्षा देणाऱ्यांचा आकडा 10 वर्षात 3 लाखांवरून 10 लाखावर गेला आहे; महाराष्ट्रात एम.पी. एस.सी. च्या फक्त 69 जागा आहेत आणि नोंदणी झालेल्या

विद्यार्थ्यांची संख्या 22 लाख आहे. 2015 साली उत्तरप्रदेशात शिपायाच्या 368 जागांसाठी 255 पीएचडी, आणि 2.22 लाख इंजिनिअर धरून 23 लाख अर्ज गेले. जून 2016 मध्ये मुंबईत हमालांच्या 5 जागांसाठी 2424 अर्ज आले, ज्यात 984 पदवीधर होते! जून 2016 मध्ये मध्य प्रदेशात 14,000 कॉंस्टेबलच्या जागांसाठी 9 लाख उमेदवारांनी अर्ज भरला, यात सुद्धा 14,562 पोस्ट ग्रॅज्युएट आणि 9,629 इंजिनिअर सामील होते. जानेवारी 2017 मध्ये पश्चिम बंगालमध्ये 6,000 पदांसाठी 25 लाख अर्ज आले. फेब्रुवारी 2017 मध्ये रेल्वे भरतीमध्ये 18,000 जागांसाठी 92 लाख लोक परिक्षेला बसले! यातून बेरोजगारीचा आवाका लक्षात यावा.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जनतेसाठी विविध कल्याणकारी योजना राबवणारे सरकार म्हणजे कल्याणकारी सरकार. मुळातच मोठमोठ्या भांडवलदारांचा कब्जा असलेल्या अर्थव्यवस्थेवर सरकारचा ताबाच नसल्यामुळे असे सरकार थोड्याफारच नोकऱ्या निर्माण करू शकते. आज जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या युगात सर्व पक्षांची सरकारं या जबाबदारीपासून सुद्धा अंग काढून घेत आहेत.

सरकार कोणाकोणाला नोकरी देईल असा बाळबोध प्रश्न विचारणाऱ्यांनी लक्षात घ्यावे की क्रांतीकारी परिवर्तन झालेल्या समाजवादी सोवियत रशिया आणि चीनने तर बेरोजगारी पूर्णत: नष्ट केली, पण भांडवली अर्थव्यवस्था असलेले अनेक देश सुद्धा भारतापेक्षा खूप जास्त सरकारी नोकऱ्या देतात! दर लाख लोकसंख्येमागे स्वीडन मध्ये 15,070 नोकऱ्या आहेत; फ्रान्स मध्ये 8,760; अमेरिकेत 7,220 तर भारतात फक्त 1,430! इतक्या कमी नोकऱ्या असून सुद्धा भारतात तेवढाही जागा भरल्या जात नाहीयेत!

| बेरोजगारीची भीषणता: आकड्यांमध्ये | |
|---|---|
| विभाग | रिक्त जागा |
| केंद्र सरकार | 4 लाख |
| प्राथमिक-माध्यमिक शिक्षक | 10 लाख |
| पोलिस | 5.5 लाख |
| सरकारी डॉक्टर | 2 लाख |
| राज्यांमधील कॉलेजं | 63 हजार |
| रेल्वे | 2.25 लाख |
| पोस्ट | 49 हजार |

**शेजारच्या चौकटीतील आकडे पहा.** केंद्र आणि राज्यांच्या स्तरावर विविध प्रकारची 20 लाख पदं रिक्त आहेत. 'विश्वगुरू' बनू पाहणाऱ्या देशात शिक्षणसंस्था, दवाखान्यांमध्ये निम्याहून जास्त जागा खाली आहेत. बेरोजगारीचा दर 2012 मधील 3.8 टक्क्यांवरून 2015-16 मध्ये 5 टक्क्यांवर पोहोचला. श्रम ब्युरोच्या 2013-14 आणि 2015-16 च्या सर्वे नुसार 37.4 लाख नोकऱ्यांची कमतरता आहे. इपीडब्ल्यू साप्ताहिकातील एका लेखानुसार रोजगाराची कमतरता 53 लाखावर पोहोचली आहे. केन्द्रीय श्रम मंत्रालयाच्या आकड्यांनुसार वर्ष 2015 आणि 2016 मध्ये क्रमश: फक्त 1.55 लाख और 2.31 लाख नवीन नोकऱ्या तयार झाल्या. भाजपच्या लफ्फेबाज नेत्यांनी निवडणुकांमध्ये कधी एक कोटी तर कधी दोन कोटी नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते पण साडेतीन वर्षे गेल्यानंतर श्रम ब्युरोच्या माहितीनुसार फक्त 5 लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. मनमोहन सिंह सरकारच्या कार्यकाळात सुद्धा 2009 साली फक्त 10 लाख नोकऱ्या निर्माण झाल्या होत्या. 125 कोटी लोकसंख्येच्या देशात इतक्या कमी नोकऱ्या म्हणजे जणू उंटाच्या तोंडात जीरा! मोदींच्या राज्यात संघटीत-असंघटीत क्षेत्रातील 2 कोटी नोकऱ्या नष्ट झाल्या आहेत. यातच केंद्र सरकार 5 वर्षे न भरलेली जवळपास 5 लाख पदं रद्द करू पहातेय. नोटबंदी आणि जीएसटीने तर भारतातील लाखो लोकांच्या तोंडचा घास काढून घेतला.

दिल्लीमध्ये 2013 साली 9.13 लाख बेरोजगार होते. ही संख्या 2014 साली वाढून 10.97 लाख आणि 2015 साली 12.22 लाख झाली. आम आदमी पक्षाने 55,000 रिकाम्या जागा भरण्याची आणि ठेकेदारी प्रथा रद्द करण्याची घोषणा केली होती पण त्यांनीही जनतेला धोकाच दिला. या बाबतीत सर्व प्रस्थापित राजकीय पक्ष एकाच माळेचे मणी आहेत.

**ज्याला चांगला रोजगार म्हणता येईल, म्हणजे कामाची सुरक्षितता, किमान वेतन, आरोग्य रजा, इजा झाल्यास नुकसान भरपाई, संघटनेचा हक्क अशा बाबींबी कायदेशीर हमी असलेले औपचारिक रोजगार भारतात फक्त 7.2 टक्के आहेत.** भारतात बहुसंख्य म्हणजे 92.8 टक्के रोजगार हे अनौपचारिक आहेत!

महाराष्ट्रात मान्य जागांपैकी जवळपास 35% जागा रिकाम्या आहेत. महाराष्ट्रात सरकारने यापैकी जवळपास 5 लाख सरकारी नोकऱ्या रद्द करण्याचे नियोजन केले आहे. शाळांमध्ये जवळपास 30 हजार जागा रिक्त आहेत; शिक्षक पात्रता परिक्षा पास झालेल्या बेरोजगारांची संख्या लाखावर आहे; लाखो रुपये खर्च करून डी.एड., बी.एड करून वर्षानुवर्षे

नोकरी शोधणाऱ्यांची संख्या लाखोंमध्ये आहे; चतुर्थश्रेणीच्या सर्व जागा भरणे सरकारने बंद केले आहे आणि 2015 सालापासूनच जवळपास 40 हजार पदे टप्प्याटप्प्याने रद्द करण्याकडे वाटचाल चालू आहे.

**कोट्यवधी लोकांना रोजगार देण्याचे आश्वासन देणारी ही सरकारं कधी जातीयवाद तर कधी आरक्षणाचा धुरळा उडवत असतात; ते कधी गाईचे शेपूट धरतात; तर कधी नकली देशभक्तीच्या नावाने गळे काढत बसतात.** नोकऱ्यांची खोटी आश्वासनं देण्यात काँग्रेस, भाजप आणि त्यांचे सर्व मित्र पक्ष जणू स्पर्धाच करत आहेत! भांडवलदारांची सेवा करणाऱ्या या ढोंगी पक्षांचा खरा चेहरा आजच्या तरुणाईने ओळखला पाहिजे!

### बेरोजगारी बद्दलचे भ्रामक समज

बेरोजगारीचे कारण आहे भांडवलशाही अर्थव्यवस्था, पण हे खरे कारण लपवण्यासाठी अनेक वैचारिक भ्रम तयार करून त्यांचा प्रचार सुव्यवस्थितपणे केला जातो.

मशिनमुळे बेरोजगारी होते या भ्रमात काहीजण जगतात. फावड्यापासून ते सूक्ष्मदर्शकापर्यंत (मायक्रोस्कोप) अनेक मशिन्सचा माणसाने शोध लावला. यापैकी काही मशिन असे काम करतात जे माणूस करूच शकत नाही, उदाहरणार्थ सूक्ष्मदर्शक. माणूस मशिनचा शोध यामुळेही लावतो कारण मशिन काम हलकं करतात, उदाहरणार्थ मिक्सर. पण भांडवलशाहीमध्ये उप्तादन करणाऱ्या मशिनवर मालकांचा ताबा असतो. त्यामुळे **मालकवर्ग मशिनचा वापर कामगारांचे श्रम हलके करण्यासाठी नाही करत तर कामगारांनाच कमी करून, आणि मूठभर कामगारांकडून जास्त श्रम करवून घेऊन नफा वाढवण्यासाठी करतो. दोष मशिनचा नाही, मशिनच्या मालकीचा आहे.**

काही जणांना वाटते की लोकसंख्या खुप आहे म्हणून रोजगार मिळत नाही. यात पहिली गोष्ट म्हणजे लोकसंख्येचा आकडा न पहाता देशाचा आकार आणि त्या तुलनेत लोकसंख्या, म्हणजे लोकसंख्येची घनता, पाहिली पाहिजे. घनतेच्या तुलनेत तैवान, दक्षिण कोरिया सारखे देश भारतापेक्षा जास्त लोकसंख्या असूनही जास्त रोजगार निर्माण करतात; तर ब्राझीलसारख्या देशांमध्ये घनता कमी असूनही बेरोजगारी जास्त आहे! रोजगार निर्माण होणे हे साधनसंपत्ती आणि राज्यसत्तेच्या राजकीय-आर्थिक धोरणांवर अवलंबून असते. खरेतर **जितकी लोकसंख्या जास्त, तितकी उत्पादनाची गरजही जास्त, म्हणजे रोजगार जास्त उपलब्ध झाले पाहिजेत!**

आरक्षणामुळे नोकऱ्या मिळत नाहीयेत असा एक पूर्णत: निरर्थक तर्क बहुतेक वेळा उच्चवर्णीयांकडून दिला हा तर्क कसा चुकीचा आहे यावर आम्ही सविस्तर लेख पुढे देत राहू. सध्या इतकेच सांगणे पुरेसे आहे की **भारतात एकूण कामगार फौज जवळपास 56 कोटी लोकांची असावी. आरक्षण फक्त सरकारी नोकऱ्यांमध्येच आहे. राज्य, केंद्र, स्थानिक अशा सर्व सरकारी नोकऱ्यांची संख्याच एकूण 2012 मध्ये 1.7 कोटी होती. ही संख्या 1991 मध्ये 1.9 कोटी होती, म्हणजे सरकारी नोकऱ्याच कमी होत आहेत. थोडक्यात ज्या भाकरीच्या तुकड्यासाठी भांडण आहे, ती भाकरीच अस्तित्वात नाहीये!**

अनेक पुरूषांना वाटते की महिलांमुळे नोकऱ्या मिळत नाहीयेत. स्त्री स्वातंत्र्य विरोधी या दृष्टीकोणाला विरोध तर झालाच पाहिजे कारण या दृष्टीकोनात हे मत अंतर्भुत आहे की नोकऱ्यांची गरज फक्त पुरूषांना आहे!

**बिहारी, तामिळी असे इतर राज्यातील 'बाहेरचे' लोक तुमच्या नोकऱ्या काढून घेत आहेत या प्रचाराला तर अनेक लोक बळी पडतात.** वास्तव तर असे आहे की मुंबई, पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरांमध्ये 'बाहेरून' येणारे 85 टक्के बहुसंख्य लोक त्याच राज्यातील खेड्यापाड्यांमधून विस्थापित होऊन येत आहेत. यात महत्वाची गोष्ट ही की असे कोणतेही विस्थापन होते कारण विकासाची असमानता. भांडवलशाही मध्ये विकास असमानच होत असतो! मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये सर्व औद्योगिक विकास होतो आणि लातूर, सोलापुर, धुळे, यवतमाळ, भंडारा सारख्या ठिकाणी होत नाही हे भांडवलशाहीत होतच असते कारण भांडवलदार नफ्याकडे धावतात, लोकांच्या विकासाकडे नाही!

तेव्हा या सर्व गफलतींना बळी न पडता मुळात भांडवली व्यवस्था पुरेश्या नोकऱ्या निर्माण करूच शकत नाही हे लक्षात घेतले पाहिजे!

### तुम्ही नाही, ही व्यवस्थाच नालायक आहे!

तुम्हाला नोकरी मिळत नाही कारण तुम्ही अभ्यासात कमी पडलात, तुम्हाला कमी मार्क पडले; कंपन्या नोकऱ्या देत नाहीत कारण 'लायक' उमेदवार मिळत नाहीत; आजचे शिक्षणच नोकरीलायक नाही, वगैरे **वैचारिक भ्रम निर्माण करून तुमच्यातच काहीतरी कमी आहे असे ही व्यवस्था शिकवते आणि बेरोजगारीचा दोष तुमच्याच माथी मारते.** या प्रचाराला बळी पडून रोजगार मिळत नाही म्हणून स्वत:लाच दोष देणाऱ्या युवकांची आज कमतरता नाही! 'एम.पी.एस.सी. ला 69 जागा आहेत, 3 लाख लोक परिक्षेला बसणार आहेत पण अभ्यास करणाऱ्यालाच नोकरी मिळेल ' असा तर्क देणाऱ्या सुशिक्षित तरुणांची कीव येते. कितीही जणांनी कितीही अभ्यास केला तरी 69 जणांनाच नोकरी मिळणार आहे हे वास्तव आहे! वास्तव हे आहे की लाखो तरुण जीवापाड मेहनत घेऊन, कर्ज काढून, रात्रंदिवस जागून, आपल्या आर्थिक परिस्थितीच्या सर्व मर्यादांना तोंड देऊन, वेळप्रसंगी अनेक मैल पायी चालून आणि एक वेळ जेवून नोकरीसाठी धडपडताहेत आणि ही व्यवस्था त्यांना

काय देत आहे? लांछन!

या लांछनापाईच आज अनेक तरुण हताश होत आहेत. आयुष्यातील ऐन उमेदीच्या काळातच संधी नसल्यामुळे तरुणांच्या आकांक्षांना वाव मिळत नाहीये आणि ते निराश होत आहेत. अनेक तर आत्महत्येकडे वळत आहेत. 2011-15 या काळात 40,000 विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झाल्या, यापैकी अनेक बेरोजगारीमुळे होत्या. स्वत:चा जीव घेण्यापेक्षा या व्यवस्थेला जाब विचारून व्यवस्था बदलण्याच्या कामी आपली जीवन उर्जा अर्पण करणाऱ्या तरुणांची आज देशाला आवश्यकता आहे.

मुळातच स्पर्धा परिक्षा, प्रवेश परिक्षा या 'निवडण्याच्या' प्रक्रिया नसून त्या 'नाकारण्याच्या' प्रक्रिया आहेत. संधी नाहीत म्हणूनच अशा प्रकारच्या परिक्षा घेतल्या जातात. अर्ध्या मार्काने संधी हुकली अशी हळहळ करण्यापेक्षा संधी कमी का आहेत हा प्रश्न राज्यसत्तेला विचारणे ही आपली जबाबदारी आहे. मेहनत करण्याची तयारी असणारी प्रत्येक व्यक्ती लायक आहे! तुम्ही नाही, ही व्यवस्थाच नालायक आहे!

**स्वयंरोजगाराचे मिथक**

200 रुपये रोजावर भजी तळणे हा सुद्धा रोजगार आहे असे निर्लज्ज आणि संतापजनक वक्तव्य मोदींनी केले. देशातील किमान मजुरीपेक्षाही कमी उत्पन्नाचे मोदी यांनी रोजगार म्हणून समर्थन केले! त्यावर लोकांच्या तीव्र प्रतिक्रिया आल्या, अनेकांनी खिल्ली उडवली, निषेध आणि संताप व्यक्त केला. त्यावर कहर म्हणून भाजपचे अध्यक्ष यांनी संसदेत भजी विकणे हा रोजगारच आहे आणि सन्मानाची गोष्ट आहे असे जाहीर केले. काहींना वाटते की यात चूक काय? स्वयंरोजगार सुद्धा एक 'रोजगार' आहे असे अनेकांना वाटते.

रोजगार त्यालाच म्हणतात जो 'रोज' केला जाईल, आणि ज्यामध्ये उत्पन्नाची काहीतरी हमी, सुरक्षितता असेल. भजी तळणे असो, किंवा भाजी विकणे हे कमी भांडवलावर केले जाणारे उद्योग आहेत. आता कोणालाही समजू शकते की धंद्यामध्ये मोठ्या व्यापाऱ्याच्या तुलनेत छोटा व्यापारी अतिशय असुरक्षिततेत काम करत असतो आणि स्पर्धेतही त्याची बाजू कमजोरच असते. असा व्यवसाय करणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींचा धंदा कधी बसेल आणि रस्त्यावर कधी येतील याचा काहीच भरवसा नसतो. स्पर्धा आणि नफ्यावर चालणाऱ्या भांडवली व्यवस्थेत अतिशय छोटा उद्योग नेहमीच धोक्यात असतो. त्यामुळेच कोणत्याही तरुणाला भजी तळणे हा पर्याय लागलीच आकर्षक वाटत नाही.

'श्रम' या अर्थाने भाजी विकणे असो किंवा भजी, समाजाची गरज पूर्ण करणारी निर्मिती करणारे प्रत्येक काम हे गौरवास्पदच असते, आणि श्रम करणारा व्यक्तीच खऱ्या अर्थाने मनुष्य असतो. व्यक्तींच्या विकासाला वाव देणाऱ्या समाजात प्रत्येक माणसाला त्याच्या क्षमतांच्या अनुरूप काम मिळणे ही समाजाचीच गरज असली पाहिजे. भांडवली व्यवस्था हे करूच शकत नाही! त्यामुळेच आज वेगवेगळे शिक्षण घेतलेल्या लाखो तरुणांना प्रचंड बेरोजगारीमुळेच नाईलाजास्तव भाजी विकणे, वडापावची गाडी टाकणे, भजी विकणे असे अत्यंत असुरक्षित आणि त्यांच्या कौशल्याचा योग्य वापर न करणारे उद्योग करावे लागतात. वर उल्लेखल्याप्रमाणे आज भारतातील 92.3 टक्के जनता असे अनौपचारिक श्रम नाईलाजाने करत आहे. याला स्वयंरोजगार असे फसवे नाव देणे ही जनतेशी केलेली दगाबाजी आहे ! रोजगार प्रत्येकाने स्वत:च निर्माण करायचा असेल तर सरकारचे कामंच काय?

**भारतीय राज्यसत्तेची देशातील जनतेशी दगाबाजी**

भारतातील राज्यसत्ता आणि सरकारं राज्यघटनेला घेऊन मोठमोठ्या बाता मारत असतात. घटनेच्या कलम 14 नुसार 'सर्वांना समान नागरिक अधिकार' मिळाले पाहिजेत आणि कलम 21 नुसार 'सन्मानाने जगण्याचा अधिकार' सर्वांना आहे. परंतु हे अधिकार देशातील मोठ्या लोकसंख्येपासून अनेक कोस दूर आहेत. कारण ना देशाच्या स्तरावर समान शिक्षण व्यवस्था आहे ना देशातील कोट्यवधी लोकांसाठी रोजगाराची हमी. 'मनरेगा' योजनेत सरकारने सर्वात पहिल्यांदा मानले होते की रोजगाराची हमी देणे त्यांचे काम आहे. पण फक्त ग्रामीण भागापुरती असलेली ही योजना फक्त 100 दिवसांच्याच रोजगाराचे आश्वासन देते! भांडवलशाहीत गरीबांसाठीच्या योजनाही गरीबच असतात! मुळातच तोकडी असलेल्या या योजनेला सुद्धा भ्रष्टाचाराने पार गारद केले. **काम करू शकणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला रोजगाराचा अधिकार मिळणे हाच खऱ्या अर्थाने 'जगण्याचा अधिकार'आहे. फक्त ग्रामीण भागात नाही आणि 100 दिवस नाही, तर प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्यासाठी पक्क्या रोजगाराची व्यवस्था करणे ही सरकारांची जबाबदारी आहे. हा आपला न्याय्य अधिकार आहे.**

सरकारी खजिन्यात मोठा हिस्सा जनतेकडून आलेल्या अप्रत्यक्ष करांद्वारे भरला जातो. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेल वर आणि प्रत्येक वस्तू वरचा कर सरकार वाढवतच आहे. अप्रत्यक्ष करांच्या माध्यमातून देशातील भिकारी सुद्धा कर भरतो. जनतेच्याच पैशातून सरकार जनतेला शिक्षण-रोजगार-आरोग्या सारख्या मुलभूत सुविधा देऊ शकत नाही तर मग सरकार आहेच कशाला? भांडवलदारांना तर कोट्यवधी-अब्जावधी रुपये आणि सुविधांचे दान दिले जाते, त्यांची कोटी-कोटींची कर्ज माफ केली जातात; त्यांना लाखो-कोटी रुपयांची कर माफी दरवर्षी दिली जाते; बँकांमध्ये असलेले लाखो-कोटी रुपये धनदांडगे विनाढेकर पचवतात

**(पान 14 वर)**

## प्रासंगिक

# वेदांता कंपनीच्या नफ्यासाठी तुतिकोरीन मध्ये पोलिसांकडून गोळीबार
# नफेखोर व्यवस्था मानव आणि निसर्ग दोघांचाही करतेय विनाश

✎राहूल

22 मे रोजी तामिळनाडू मधील तुतिकोरीन येथे वेदांता ग्रुपची कंपनी असलेल्या स्टरलाईट कॉपर कंपनीच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या 13 लोकांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या प्रकल्पाला लोकांनी विरोध करण्याचे मुख्य कारण होते या प्रकल्पातून निघणाऱ्या सल्फर डायऑक्साईड वायूमुळे निर्माण झालेली आरोग्याची भयंकर समस्या. याला सन 2013 पासून लोकांचा विरोध होत होता. विरोध करणाऱ्या लोकांवर निशाणेबाज (स्नायपर्स) वापरून गोळ्या घालण्यात आल्या. या प्रसंगानंतर तामिळनाडू सरकारने वेदांता कंपनीच्या या प्रकल्पावर बंदी घातली आहे. काहीजणांना यामुळे 'लोकशाहीचा विजय' म्हणुन हर्षवायू सुद्धा होतो, परंतू प्रश्न आहे की स्थिती इथपर्यंत बिघडलीच कशी? काही जणांचे जीव घेऊनच जर सरकार कारवाई करणार असेल तर सरकार कोणाचे आहे? जर कंपनी प्रदुषण करत होती तर लोकांच्या अगोदर सरकारला माहित नव्हते का, आणि लोक आंदोलनाला उतरल्यावरही सरकारला जाग आली नव्हती का? खरेतर गोळीबारानंतर देशव्यापी निषेध झाल्यामुळेच आणि कुठेही तोंड लपवायला जागा उरली नसल्यामुळेच सरकारला ही बंदी आणावी लागली. जर सरकार खरोखर जनतेच्या हितासाठी काम करणारे असते तर हा प्रदुषणकरी प्रकल्प कधीच बंद केला असता. वास्तव हे आहे की वेदांता कंपनीची दलाली करण्यात भारत आणि तामिळनाडू सरकारने अशाप्रकारे कोणतीही कसर सोडलेली नाही.

कंपन्यांच्या रक्षणासाठी जनतेवर गोळ्या घालण्याच्या असंख्य घटना भारतात घडल्या आहेत. 2006 साली काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारांकडून पुण्याजवळ हिंजवडीजवळ व्हिडीओकॉनच्या एस.ई.झेड. करिता माण गावातील लोकांवर असो, 2011 साली जैतापुर प्रकल्पाविरोधातील साखरी-नाटे गावातील लोकांवर असो; बंगाल मध्ये सिंगुर किंवा नंदीग्राम मध्ये सीपीएम कडून असो; तामिळनाडूतील मंजोलाई येथे 1999 साली चहा कामगारांवर चालवलेल्या गोळ्या असोत; किंवा 2011 साली फोर्ब्सगंज येथे भाजप नेत्यांकडून जमिन बळकावण्यासाठी केलेला गोळीबार असो; जेव्हा धनदांडग्यांचे, मोठमोठ्या कंपन्यांचे हितसंबंध धोक्यात येतात तेव्हा भारतातील हे सर्व भांडवली पक्ष जनतेवर गोळ्या चालवण्यात आणि दमन करण्यात हयगय करत नाहीत. थोडा विचार करा, जेव्हा जेव्हा लोक एखाद्या अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरतात तेव्हा शासन यंत्रणा नेहमीच मालकांच्या बाजूने का असते? कामगार जेव्हा संप करतात, तेव्हा शासन नेहमीच कारखानदारांच्या बाजूने का असते? जर सरकार जनतेचे आहे, तर जेव्हा जनता रस्त्यावर उतरते, तेव्हा शासन जनतेच्या विरोधात लाठ्या, बंदूका घेऊन का उभे असते?

वेदांता ही लंडन मध्ये स्थित असलेली बहुराष्ट्रीय कंपनी आहे आणि प्रदुषण करण्यासाठी जगभरात कुख्यात आहे. या कंपनी विरोधात हवा, पाणी आणि आसपासचे वातावरण प्रदूषित करण्याविरोधात झांबिया देशातील 2000 गावांनी सुध्दा केस ठोकली आहे. तेव्हा अशा प्रदूषणासाठी कुख्यात असलेल्या कंपनीला भारतात परवानगीच का दिली जाते हा प्रश्न मात्र विचारण्याची सोय नाही. प्रदूषणा विरोधात आंदोलनावर झालेल्या गोळीबारात मेलेले आणि प्रदूषणाने मेलेले सर्व लोक भारतीयच होते, पण त्यांच्यासाठी आता भाजपाई आणि संघी लोकांना भारतमाता आठवणार नाही कारण वेदांताची 'देणगी' यांच्यापर्यंत पोहोचलेली आहे. खरंतर भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांना वेदांताने अधिकृतरित्या कोट्यवधी रुपयांची देणगी अगोदरच दिलेली आहे.

जगाच्या पातळीवर भांडवली अर्थव्यवस्था संकटात आहे. हे संकट एक स्थायी संकट आहे. युरोपसहित अमेरिका आणि जपानसारख्या विकसित देशांचा वृद्धीदर एक, दोन टक्क्यांवर पोहोचला आहे आणि जपानमध्ये तर ऋणात्मक आहे. आर्थिक संकटात सापडलेली भांडवलशाही व्यवस्था आता लोकशाहीचा दिखावा सुद्धा नीटसा करू शकत नाही आणि सर्व नियम धाब्यावर बसवून लुटीसाठी पुढे सरसावत आहे. पुरेसा नफ्याचा दर मिळू न शकल्यामुळे एका बाजूला जगातील कंपन्या कामगारांचे शोषण वाढवून नफा कमावू पाहत आहेत तर दुसरीकडे कच्च्या मालासाठी आणि गुंतवणुक कमी करण्यासाठी पर्यावरण सुद्धा नष्ट करायला तयार आहेत. स्पर्धेत टिकण्यासाठी, आपली गुंतवणुक कमी करून नफा कमावण्यासाठी एका बाजूला कंपन्या मजूरांच्या श्रमाचे शोषण करतात, आणि दुसरीकडे सर्व कायद्यांना धाब्यावर बसवून कचरा, गॅस, इत्यादींना खुलेआम नद्या, उलटे-बोरिंग द्वारे जमिनीच्या आत, हवेत सोडतात. यामुळेच आपल्या नद्या, पाण्याचे स्रोत, जंगलं, जीव-जंतू, शेती, हवा, इत्यादी सगळे प्रचंड प्रदुषणाचे शिकार होत आहेत. कॅंसर, टीबी, दम्यासारखे अनेक आजार महामारीप्रमाणे पसरत आहेत. निसर्गाच्या विनाशाचा अपराध अत्यंत भयानक अपराध आहे. या अपराधामध्ये जगभरातील भांडवलदार,

निवडणूकबाज पक्ष, आणि सगळी भांडवली मशिनरी सामील आहे. आपले सरकार स्वतंत्र असते आणि जनतेचे प्रतिनिधित्व करते या भ्रमात अनेक लोक जगतात. वास्तव हे आहे की मोठमोठे भांडवलदार सरकारांना खिशात घेऊन फिरतात. तुतिकोरीन सारख्या घटना दाखवतात की भांडवली लोकशाही मध्ये सरकारी मशिनरी भांडवलदारांपासून स्वत:ला जितके वेगळे दाखवण्याचे नाटक करत होती, तितके सुद्धा आता शक्य नाही. ही दिसायला 'भांडवली लोकशाही' आहे, पण वास्तवात 'भांडवली हुकूमशाही' आहे.

तुतिकोरीन येथील हत्येमध्ये दिसलेले पोलिसांचे तांडव आजच्या व्यवस्थेचे नरभक्षी आणि फॅसिस्ट चरित्र ठळकपणे दाखवते. ही घटना दाखवते की तथाकथित विकासाचे हे ढोंग मुळात माणसांचे मृतदेह आणि निसर्गाच्या बरबादीवर टिकलेल्या नफ्याच्या हावेला पुरे करण्यासाठी केले जात आहे. भांडवली दानवी व्यवस्था नफ्याच्या हावेपोटी इतकी वेडी झाली आहे की कष्टकऱ्यांचे जीवन आणि संपूर्ण पृथ्वीच गिळून घ्यायला निघाली आहे.

आज शासन, सरकारी यंत्रणा, न्यायव्यवस्था, मीडीया हे सर्व निर्लज्जपणे भांडवलदारांच्या सोबत उभे आहेत. वास्तवात पाहिले तर सर्व जगामध्ये भांडवली लूटीतून निर्माण झालेल्या आर्थिक संकटाने सर्व जगालाच आपल्या जबड्यात पकडले आहे. यातून बाहेर निघण्याचा त्यांच्याकडे कोणताही मार्ग नाही. आपला नफ्याचा दर कायम ठेवण्यासाठी ते मनुष्य आणि प्रकृतीच्या रक्षणासाठी बनलेल्या प्रदूषणाच्या मर्यादित कायद्यांनाही मानण्यास तयार नाहीत. मूठभर भांडवलदारांना फायदा पोहोचवण्यासाठी सरकार एका बाजूला 'श्रम सुधार' सारख्या भ्रामक शब्दांचे खेळ करत श्रम कायदेच संपवत आहेत आणि दुसरीकडे आपले दमनतंत्र मजबूत करत आहे. स्टरलाईटच्या बाबतीत तर भांडवलदार आणि सत्ताधाऱ्यांची मिलीभगत इतकी तगडी आहे की विरोध होऊन एकदा प्रकल्प बंद होऊनही नंतर काँग्रेस आणि भाजपला पैसे खाऊ घालून कंपनीने प्रकल्प पुन्हा चालू करवला. भारतातील तथाकथित डाव्या संघटनांना कमीत कमी या घटनेनंतर भाजप विरोधाच्या नावावर काँग्रेसच्या शेपटाला भांग पाडणे किंवा मानवविरोधी विकासाच्या फॅसिस्ट रथाला थांबवण्यासाठी लालू-मुलायम मध्ये शक्यता शोधणे बंद केले पाहिजे. वास्तव हेच आहे की उदारीकरण-खाजगीकरणाच्या धोरणांवर, भांडवली विकासावर या सर्वांमध्ये सर्वसाधारण सहमती आहे.

भारतात व्हॉट्सएप, फेसबुक वरून ज्ञान प्राप्त करणारा मध्यमवर्गाचा एक हिस्सा मोदींच्या 'विकासाचे' गाणे गात आहे. खरेतर या विकासाची सगळी मलाई मोठमोठे भांडवलदार, नेते, ठेकेदार, अधिकारीच खातील आणि या मध्यमवर्गातील एका हिश्श्याला रस्त्यावर येण्यावाचून पर्याय उरणार नाही. या फॅसिस्टांच्या विकासामध्ये बेरोजगारी वाढते, सुरक्षेच्या उपकरणांविना कष्टकरी प्रत्येक दिवशी मरतात, आपले पोट भरण्यासाठी कष्टकऱ्यांना 12 ते 14 तास जनावरांसारखे राबावे लागते, पृथ्वीचा विनाश केला जातो, ज्यामध्ये महागाई-भूकबळी वाढतात, ज्यामध्ये शिक्षण, आरोग्यासारख्या सुविधांनाही विकाऊ माल बनवले जाते, ज्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या सुविधा हिसकावून घेतल्या जातात, ज्यामध्ये वरचे 10 टक्के लोक 80 टक्के संपत्तीवर कब्जा करतात, ज्यामध्ये लोकशाहीच्या नावाने गाजावाजा केला जातो आणि तुतिकोरीन मध्ये केल्याप्रमाणे हक्क मागणाऱ्या लोकांच्या तोंडात बंदुकीची नळी घालून मारले जाते.

नफ्याची स्पर्धा काहीच बघत नाही - ना मानवी जीवन, ना निसर्ग. आज जे चालू आहे तो विकास नाही, भांडवलदारांद्वारे धरतीवर मानव जीवनाचा आणि निसर्गाचा विनाश आहे. जर या भांडवली व्यवस्थेला इतिहासाच्या दफनभूमीत गाडण्यासाठी नाही उतरलो, तर आपणही या अपराधामध्ये भागीदार असू.



**पॉल रॉबसन (प्रसिद्ध क्रांतिकारी अमेरिकी अश्वेत गायक आणि राजकीय कार्यकर्ता)**

**प्रत्येक कलाकाराला,प्रत्येक वैज्ञानिकाला व प्रत्येक लेखकाला आता निर्णय घ्यावाच लागेल की तो कुठे उभा आहे. संघर्षांच्या पलीकडे ,ओलंपियन उंचीवर उभं राहण्याची कुठलीच जागा असत नाही. तटस्थ प्रेक्षक असा कुणी नसतो...युद्धाची आघाडी प्रत्येक जागी आहे. सुरक्षित आश्रयच्या रूपात कुठलाच पृष्ठभाग उपलब्ध नाही...कलाकाराला बाजू निवडावीच लागेल. स्वातंत्र्यासाठी संघर्ष की मग गुलामी-त्याला कुणा एकाची निवड करावीच लागेल. मी निवड केली आहे. माझ्याकडे अजून कुठलाच पर्याय नाही.**

## आंदोलन : समीक्षा-समालोचन

# महाराष्ट्रात शेतकरी आणि आदिवासींचा लाँग मार्च आंदोलनाचे मुद्दे, परिणाम, आणि शिकवण

✍ इंद्रजित

*(अनुवादक: काही शब्दांचा अर्थ*

***'लाभकारक मूल्य': साधारणत: मराठीत शेतमालाला 'किमान हमी भावाची' मागणी केली जाते, म्हणजे शेतमालाला कमीत कमी किंमत काय असावी हे सरकार जाहीर करते. यामध्ये ही कल्पना समाविष्ट आहे की किमान हमी भाव हा शेतकऱ्याला काहीतरी नफा (लाभ) नक्कीच देईल. याच कल्पनेला 'लाभकारक मूल्य' म्हटले आहे.***

***'गुंतवणूकीचा खर्च कमी करणे': खते, बियाणे इत्यादींच्या किमती कमी करवून किंवा त्यावर सबसिडी/अनुदान देऊन शेतकऱ्याचा गुंतवणूकीचा खर्च कमी करणे असा येथे अर्थ आहे.)***

मार्च महिन्यात महाराष्ट्रात शेतकरी आणि आदिवासींचा मोठा मोर्चा झाला, परंतु त्याच्या प्रचारात आणि नावामध्ये आदिवासींचे नाव वेगळे उल्लेखलेले नव्हते. नाशिक पासून हजारो लोक 9 मार्च रोजी विधानसभेला घेराव घालण्यासाठी पायी चालत निघाले. या जथ्थ्यामध्ये महिला, लहान मुले, वृद्ध आणि तरुण असे सर्वच सामील होते. मुंबईला पोहोचेपर्यंत जथ्थ्यामध्ये अनेक लोक सामील होत गेले. 12 तारखेला शेतकरी आणि आदिवासी मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानात पोहोचले. वेगवेगळ्या रिपोर्टनुसार या आंदोलनात 35-40 हजार पासून 50 हजार पर्यंत शेतकरी आणि आदिवासी सामील होते. फोड आलेल्या पायांनी शेकडो किलोमीटर यात्रा करून जेव्हा उपाशी, धैर्यवान आणि आशादायी चेहऱ्यांनी मुंबईत प्रवेश केला तेव्हा विविध प्रकारच्या प्रतिक्रिया समोर आल्या. शासनात असलेल्या भाजपाच्या एका महिला नेत्याने या आंदोलनाला पूर्णतः पुरस्कृत आंदोलन संबोधले आणि म्हटले की या मागे शहरी माओवादी सक्रिय आहेत! शिवसेना, काँग्रेस आणि मनसे हे लगेच आंदोलनाच्या समर्थनार्थ उतरले आणि सर्वांमध्येच शेतकऱ्यांचे हितेच्छू बनण्याची स्पर्धा चालू झाली. दुसरीकडे **मुंबई आणि महाराष्ट्रातील सामान्य जनतेने शेतकरी आणि आदिवासींसोबत आपली एकता जाहीर केली. काही ठिकाणी तर चांगलेच मार्मिक दृश्य दिसून आले. सामाजिक, धार्मिक समूहांपासून सामान्य लोकांनी जात-धर्म-क्षेत्र-भाषा यांच्या भिंती तोडून मनापासून शेतकरी आदिवासींची म्हणजे गरीब कष्टकऱ्यांची मदत केली.** खाण्यापिण्याच्या सामानापासून औषधे, चप्पल, कपडे अशा प्रकारची सामग्री आंदोलनाच्या जागेपर्यंत आणि पुढे चाललेल्या जथ्थ्यापर्यंत पोहोचवली. आंदोलनाच्या मागण्यांबद्दल जास्त माहीत नसताना सुद्धा लोकांकडून अशाप्रकारे त्यांच्या सामर्थ्यानुसार मदत, सहयोग आणि समर्थन नक्कीच स्तुतियोग्य आहे.

हे आंदोलन 'अखिल भारतीय किसान सभे'च्या नेतृत्वात झाले, जी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी (सीपीएम) संबंधित शेतकरी संघटना आहे. सीपीएम किंवा त्यांच्या जनसंघटनांच्या नेतृत्वात नुकत्याच झालेल्या शेतकरी आणि कर्मचाऱ्यांच्या आंदोलनांमधून सुद्धा अनेक निष्कर्ष निघतात जे नेतृत्वाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करतात. पहिला हा की यांना आंदोलनाला तेवढेच पुढे जाऊ द्यायचे असते जितकी यांची मतपेढीची रणनीती परवानगी देते. दुसरे हे की आंदोलनादरम्यान सामान्य जनतेला वर्ग सचेत केले जात नाही आणि संपादरम्यान—ज्याला मजुरांचे महान नेते लेनिन यांनी मजूरवर्गाची प्राथमिक पाठशाळा म्हटले आहे—राज्यसत्तेचे चरित्र लोकांसमोर आणले जात नाही. तिसरे असे की आपल्या दुरुस्तीवादी राजकारणानुसार आंदोलनांमध्ये मजूर-गरिब शेतकरी-कर्मचाऱ्यांना अर्थवादाच्या घेऱ्यात गोल गोल फिरवले जाते. भारतात दुरुस्तीवादी राजकारण आणि दुरुस्तीवाद्यांच्या वर्ग सहयोगाच्या कौशल्यात्मक कारवायांचा मोठा इतिहास आहे, जो वेगळ्या चर्चेचा विषय आहे. ह्या लाँगमार्चच्या बहुतेक मागण्यांना महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने मान्य केले आहे, परंतु ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की अशा मागण्या महाराष्ट्र सरकारने अगोदरसुद्धा मान्य केल्या आहेत. आंदोलनाच्या वर्ग चरित्रावर आम्ही पुढे येऊच पण लक्षात घेतले पाहिजे की सर्व जागी चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही आंदोलनाला त्याच्या अंतिम परिणामापर्यंत पोहोचवण्याऐवजी अगोदरच आपले हात मागे खेचणे ही सीपीएमची जुनीच तऱ्हा आहे. हरियाणामध्ये आशा कर्मचारी आणि अंगणवाडी आंदोलनांमध्ये ठीक हीच गोष्ट बघायला मिळाली. राजस्थानातील सीकर पासून सुरू झालेल्या शेतकरी आंदोलनामध्ये सुद्धा हेच झाले. आंदोलन स्थगित झाले परंतु मागण्या लागू न झाल्यामुळे त्याच मुद्द्यांवर पुन्हा जयपूर विधानसभेला घेराव घालण्याची घोषणा केली गेली. सीपीएमचे आमदार अमराराम यांना अटक झाली, पुन्हा सुटले आणि काहीच दिवसांनंतर महाराणी वसुंधरा राजे यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट आमदाराचा पुरस्कार घेताना दिसले. सध्या आम्ही याच (लाँग मार्च) आंदोलनावर आपले लक्ष केंद्रित करत आहोत.

लाँग मार्च या नावाने चाललेल्या या आंदोलनाच्या

मागण्यासुद्धा जवळपास तशाच आहेत, जशा गेल्या अनेक काळापासून चालत आलेल्या शेतकरी आंदोलनाच्या मागण्या राहिल्या आहेत. म्हणजे पूर्ण कर्जमाफी, वीजबिल माफी, पिकाच्या लाभकारक मूल्यात वाढ, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींना लागू करणे, इत्यादी. याशिवाय अजून एक मागणी जी लक्ष देण्यासारखी होती ती मागणी खरतर शेतकऱ्यांची नाही तर आदिवासी समुदायाशी जोडलेली आहे: 'वन जमीन कायदा 2006' लागू करणे आणि त्यायोगे पिढ्यान-पिढ्या जंगलातील साधनांचा सामूहिक वापर करणाऱ्या आदिवासींना वन जमिनीवर मालकी हक्क देणे, अशी ही मागणी. आदिवासींशी जोडलेल्या मागणीवर आम्ही पुढे कधी विस्ताराने आपले मत ठेवू. थोडक्यात सांगायचे तर आदिवासींच्या वन जमिनी आणि संसाधनांच्या सामूहिक भोगाच्या अधिकाराचे कम्युनिस्ट क्रांतिकारक समर्थन निश्चितपणे करू शकतात, परंतु मालकीची मागणी भांडवली व्यवस्थेच्या हितामध्ये जाऊन उभी राहते. भांडवलशाही प्रत्येक गोष्टीला खरेदी-विक्री होऊ शकणाऱ्या मालामध्ये परिवर्तित करते. हेच पाहिले तर लक्षात येईल की जमिनीच्या छोट्या-छोट्या तुकड्यांची अशीच स्थिती अनेक दिवस राहणार नाही, तर येणाऱ्या दिवसांमध्ये ध्रुवीकरण होणे निश्चित आहे. देशाची भांडवली व्यवस्था आपल्या हितांना लक्षात घेऊन अशा प्रकारचे कायदे पास करत असते ज्यांच्याद्वारे सामूहिक किंवा सामुदायिक मालकीच्या जागी खाजगी मालकीला प्रोत्साहन दिले जाईल.आदिवासी लोकसमुदाय ज्या रूपात जमिनीशी जोडलेल्या मागण्या उचलतात आणि अखिल भारतीय किसान सभा (एआयकेएस) कोणत्या रूपात प्रस्तुत करते हा एका वेगळ्या चर्चेचा विषय आहे; यावर आम्ही स्वतंत्ररित्या विस्तृतपणे मत मांडू.

**शेतकरी आंदोलनांमध्ये गेल्या दोन-तीन दशकांमध्ये उचलल्या जाणाऱ्या दोन प्रमुख मागण्या: पहिली आहे पिकाचे लाभकारक मूल्य वाढवण्याची मागणी आणि दुसरी आहे शेतीमध्ये होणाऱ्या गुंतवणुकीचा खर्च कमी करण्याची मागणी.** स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींमध्ये सुद्धा या दोन मागण्या अभिव्यक्त झाल्या आहेत. सन 2004 मध्ये तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या कार्यकाळात मोनकोम्पू सांबशिवन (एम एस) स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली, शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था चांगली करण्याच्या उद्दिष्टाने बनलेल्या, 'नॅशनल कमिशन ऑन फार्मर्स'ने आपले पाच अहवाल सरकारसमोर सादर केले होते. आयोगाद्वारे शेवटचा आणि पाचवा अहवाल 4 ऑक्टोबर 2006 रोजी सोपवला गेला. सरकार द्वारे 'किमान हमी भाव' (मिनिमम सपोर्ट प्राईस, एम एस पी) सरासरीपेक्षा पन्नास टक्के अधिक करणे, कर्जमाफी व गुंतवणूक खर्चाला कमी करण्याच्या शिफारशींसोबतच आयोगाद्वारे केलेल्या शिफारशींमध्ये भुमी सुधार, सिंचन, खाद्य सुरक्षा, शेतकरी आत्महत्यांपासून सुटका, राज्यस्तरीय शेतकरी आयोग बनवणे, आरोग्य सुविधांपासून ते वित्त-विमा स्थिती सुनिश्चित करण्यावर जोर दिला होता.

नक्कीच देशातील मोठी लोकसंख्या शेतीशी जुळलेली आहे, पण सरासरी जमीनधारणा छोटी असल्यामुळे प्रतिव्यक्ती उत्पादकता अतिशय कमी आहे. खूप मोठी लोकसंख्या तर नाईलाजाने शेतीमध्ये अडकून पडली आहे कारण कोणताच पर्यायी रोजगार नाहीये. देशाच्या स्तरावर पाहिले तर 2011चे सामाजिक आर्थिक सर्वेक्षण व 2011-12 च्या कृषी जनगणनेनुसार गावांमध्ये जवळपास 18 कोटी कुटुंबांपैकी 54 टक्के श्रमिक आहेत, 30 टक्के शेती, 14 टक्के सरकारी/गैरसरकारी नोकरी आणि 1.6 टक्के अकृषी व्यवसायांशी जोडलेले आहेत. फक्त शेतीवर अवलंबून असलेल्या 30 टक्के लोकसंख्येपैकी 85 टक्के हे सीमांत आणि छोटे शेतकरी आहेत ज्यांच्याकडे क्रमशः 1 ते 2 हेक्टर आणि 1 हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. वरच्या मध्यम आणि मोठ्या 15 टक्के शेतकऱ्यांकडे कृषियोग्य जमिनीच्या जवळपास 56 टक्के जमीन आहे. आपण फक्त शेतकऱ्यांचीच गोष्ट केली तर स्पष्ट दिसून येते की त्यांचा खूप मोठा हिस्सा रसातळात आहे; जमीनधारणा लहान असल्यामुळे या हिश्श्याची गुंतवणूक सरासरीपेक्षा अधिक येते आणि भांडवलाच्या अभावी हाच हिस्सा कर्जाच्या बोजाखाली दबलेला असतो. 2013 चा नमुना सर्वेक्षणानुसार फक्त 13 टक्के शेतकरीच किमान हमी भावाचा, लाभकारक मूल्याचा फायदा घेऊ शकतात आणि भाजप आल्यानंतर हा आकडा 6 टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. याचे कारण अजून काही नाही तर सरासरी उत्पादन गुंतवणुकीत आलेल्या खर्चाचा फरक आहे. जाहीर आहे की **मशीन-उपकरणे, मोठी जमीन आणि धनबळाच्या आधारावर केलेल्या प्रभावी खाजगी शेतीमुळे धनिक शेतकऱ्यांची गुंतवणूक सुद्धा कमी असेल; उलट नेहमीच कर्जाच्या बोज्याखाली दबलेल्या आणि भाड्याने उपकरणे-मशीन घेऊन शेती करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांची गुंतवणूक अधिक असेल.** नीट पडताळणी केली तर ही गोष्ट सुद्धा स्पष्ट आहे की सीमांत आणि छोट्या शेतकऱ्यांसाठी फक्त शेतीवर अवलंबून राहून आपली आजीविका कमावणे खूपच कठीण काम आहे. त्यामुळे परिवारातील कोणत्या-ना-कोणत्या सदस्याला गैर-शेती व्यवसाय किंवा नोकरी-चाकरी करणे भाग पडते. दुसऱ्या दृष्टिकोनातून पाहिले तर साधारणपणे **सीमांत आणि छोटा शेतकरी जेवढे कृषी उत्पादन बाजारात विकतो त्यापेक्षा बरेच जास्त वर्षभरात विकत घेतो.** उदाहरणार्थ एखादा छोटा आणि सीमांत शेतकरी गहू, तीळ, तांदूळ यांसारखी पिके आपल्या गरजेपुरती ठेवल्यानंतर एक हिस्सा बाजारात विकतही असेल पण त्याला वर्षभर इतर कृषी उत्पादन, जसे साखर, गूळ, चहा, तांदूळ, तेल, तंबाखू, पशूंसाठी पशुखाद्य, फळं, भाज्या आणि अशा गोष्टी

ज्यांच्यामध्ये कच्चामाल म्हणून कृषी उत्पादनांचा वापर होतो, त्या विकत घ्याव्या लागतीलच. म्हणजेच समजा पिकांच्या किंमती गुंतवणुक खर्चाच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त ठरवल्या तर फक्त त्याच पिकांच्या किमती नाही वाढणार ज्यांना लहान शेतकऱ्यांचा 85 टक्के हिस्सा बाजारापर्यंत पोहोचवतो. उलट हे वाढलेले "लाभकारक" भाव तर सर्वच पिकांना लागू होतील. नाही का? तर आता प्रश्न हा विचारला गेला पाहिजे की पिकांचे लाभकारक भाव वाढवण्याची मागणी कोणाच्या हितामध्ये जाते. नक्कीच ही **महागाई वाढवण्यामध्ये सहाय्यक भूमिका असणारी मागणी शेतमजूर, सोबतच इतर मजूर, आणि शहरी गरीबांच्या विरोधात आहेच आणि ही मागणी करत खुद्द गरीब शेतकऱ्यांच्या हिताच्याही विरुद्ध आहे.** उगीचच नाही की काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने जेव्हा हमीभावामध्ये तुलनात्मकरीत्या वाढ केली तेंव्हा प्रचंड वाढलेल्या महागाईने गरीब लोकसंख्येची कंबर मोडण्याचेच काम केले. दुसरीकडे 2003 ते 2013 या 10 वर्षांमध्ये कृषी उत्पादनात 13 टक्के वाढ तर झाली पण याच काळात शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा 24 टक्के वाढला.

शेती व्यवसायात गुंतवणुकीचा खर्च कमी करण्याच्या मागणीला पाहिले तर ही गोष्ट स्पष्ट आहे की धनिक आणि गरीब शेतकरी दोघांचाही सरासरी खर्च म्हणजे गुंतवणूक वेगवेगळी असते, ज्यावर आपण वर थोडेसे बोललो आहोत. दुसरं गुंतवणूक खर्चाचा एक महत्वपूर्ण हिस्सा मजुरी पण असते. धनिक शेतकरी आणि कृषी उद्योग कंपन्या मजुरांच्या श्रमशक्तीचा सरळ वापर करतात आणि कृषी मशिनरीच्या निर्मितीमध्ये लागलेली श्रमिक लोकसंख्या सुद्धा श्रमशक्ती विकूनच जिवंत राहते. अर्थशास्त्राचे प्राथमिक ज्ञान असलेला व्यक्ती सुद्धा या गोष्टीला सहज समजू शकतो की कृषीमध्ये गुंतवणूक खर्च तेव्हाच कमी केला जाऊ शकतो जेव्हा शेतीमधील आदान गुंतवणूक (इनपुट कॉस्ट) कमी केली जाईल आणि साधारणपणे ही किंमत कमी तेव्हाच होऊ शकते जेव्हा कृषी आणि संबंधित उद्योगांमध्ये लागलेल्या श्रमिकांची मजुरी कमी केली जाईल किंवा तेवढ्याच मजुरीत अधिक तास काम करवले जाईल किंवा श्रमाची सघनता वाढवली जाईल. सरकार सोबत हातमिळवणी करून कृषी क्षेत्रात लागलेल्या बी-बियाणे, ॲग्रो कंपन्या, बँका आणि विमा कंपन्या स्वत:च धनिक शेतकऱ्यांच्या भांडवली गुंतवणुकीचे एक माध्यम आहेत. नक्कीच यांच्या लूटीवर आणि अनागोंदीवर सरकारं गदा येऊ देणार नाहीत. ही गोष्ट पण स्पष्ट आहे की शेतीमध्ये मशीनचा जास्त वापर एकतर धनिक शेतकरी म्हणजे 'कुलक फार्मर' करतात आणि छोटे शेतकरी तर उपकरणं आणि मशिन भाड्याने घेतात. अशा प्रकारे गुंतवणूक खर्चामध्ये घट करण्याची मागणी समाजातील 'कोणत्या घटकाच्या बाजूने' जाईल आणि 'कोणत्या घटकाच्या विरोधात' हे पण स्पष्ट आहे.

शेतकरी आंदोलनांच्या घोषणापत्रामध्ये एक मागणी कर्जमाफीची सुद्धा असते. इतकेच नाही विविध निवडणूकबाज मदारी पक्ष कर्जमाफीचा मुद्दा उचलत शेतकऱ्यांची मतं घेतच राहतात. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींनंतर पाहिले तर अनेक वेळा वेगवेगळ्या काळात वीज बिलापासून विविध कर्ज माफ होत आली आहेत. पण गरीब शेतकरी सतत कर्जाच्या ओझ्याखालीच दबलेला दिसतो. यामुळे समस्येचं खरं कारण दुसरीकडेच आहे. शिवाय कर्ज फक्त गरीब शेतकरीच नाही घेत तर धनिक शेतकरीसुद्धा घेतात, ज्याला ते कर्जमाफीच्या काळात सरळ गिळून टाकतात आणि शुद्ध नफा कमावतात. कर्ज माफीचं थोटूक आणि दिखावा तात्कालिक थोडा दिलासा देताना दिसतो, परंतु दूरगामी विचार करता तो फक्त एक धोकाच आहे. भांडवली व्यवस्थेची गतिकीच अशी आहे की या व्यवस्थेत गरीब शेतकऱ्यांची अवस्था वाईटच होत जाते आणि त्यांचा एक हिस्सा सतत बरबाद होऊन म्हणजे आपली मेहनत विकून जिवंत राहणाऱ्या मजूर वर्गात सामील होत राहतो. शिवाय कर्जात दिली जाणारी राशी सुध्दा सरकार जनतेपासूनच तर वसूल करत असते.

आजच्या काळात विशेषतः लाभकारक मूल्य वाढवण्याच्या आणि गुंतवणूक खर्च घटवण्याच्या मागणीच्या समर्थनात विरोधी पक्ष, निवडणूकबाज आणि दुरुस्तीवादी डाव्या पक्षांशी जोडलेल्या शेतकरी संघटना, एनजीओंचे राजकारण करणारे, शेतकरी जातींमध्ये मतपेढी शोधणारे क्षेत्रीय गट, भारतातील क्रांतीचा टप्पा लोकशाही आणि नवलोकशाही आहे असे मानणाऱ्या डाव्या संघटना आणि 'ग्रामीण जीवनाच्या रम्यतेची' रट लावणारे बुद्धिजीवी हे सगळे एकजूट आहेत. शेतकरी आंदोलनाची सद्यस्थिती आणि त्यांच्या मागण्यांचे वर्गचरित्र नक्कीच समाजातील प्रबुद्ध, चिंतनशील आणि प्रगतिशील तत्त्वांना विचार करण्यासाठी प्रवृत्त करतात. **गरीब शेतकऱ्यांच्या वेदनेने पघळून जाणे, त्यांच्या पायातील फोड बघून गळा भरून येणे एक गोष्ट आहे, पण त्यांच्या खऱ्या मागण्यांना समजणे आणि त्या आधारावर त्यांना संघटित करणे वेगळी गोष्ट आहे.**

छोट्या शेतकऱ्यांचं खरं हीत आज पूर्णपणे मजूर कष्टकऱ्यांच्या हितासोबत जोडलं गेलं आहे. एक अशी समाजव्यवस्थाच त्यांना आज दुःखांपासून सुटका देऊ शकते जिच्यामध्ये उत्पादनाच्या साधनांवर कष्टकऱ्यांचं नियंत्रण असेल आणि उत्पादन समाजाच्या गरजांना ध्यानात घेऊन होईल, खाजगी नफ्याला केंद्रस्थानी ठेवून नाही. छोटा वाटणारा कोणताही रस्ता उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याच्या मार्गाची लांबी अजूनच वाढवू शकतो. ही गोष्ट आम्ही तथ्यांच्या माध्यमातून स्पष्ट केली आहे की लाभकारक मूल्य वाढवणे आणि गुंतवणूक खर्च कमी करण्याची मागणी खरंतरं गरीब शेतकरी लोकसंख्येची खरी आर्थिक-राजकीय मागणी होऊच शकत नाही.

थोड्याशा चर्चेनंतरच गरीब शेतकरी ही गोष्ट सहज समजू शकतात की **प्रत्येक पीकासोबत दोन-चार हजार रुपये जास्त मिळाले तरी त्यांच्या स्थितीमध्ये कोणताच गुणात्मक फरक पडणार नाही, उलट महागाई वाढून व्याजासोबत त्यांच्या खिशातूनच हे पैसे परत काढले जातील. बेरोजगारीचा मार सहन करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचा निर्वाह थोड्याश्या जमिनीतून होऊ शकणार नाही ही गोष्ट स्पष्ट आहे.** त्यामुळे तर्काच्या आधारावर विचार केला गेला पाहिजे आणि आपल्या खऱ्या वर्ग हितांची ओळख जाणली पाहिजे. बेरोजगारी, वाढती महागाई, सर्वांसाठी शिक्षण आणि आरोग्य सुविधा, भांडवली लुटीचा नाश, दमन-शोषणाचा नाश हे ते मुद्दे असतील ज्यांच्या आधारावर व्यापक जनतेला एकजूट केले जाऊ शकते. इतकेच नाही या मागण्यांच्या आधारावरच इतर जातीतील गरिबांसोबत, वंशपरंपरागत पद्धतीने शेती सोबत जोडलेल्या जातींमधील बहुसंख्याकांची एकजुटता सुद्धा बनेल. अस्मितेचे राजकारण करणाऱ्या, अस्मितावादी एनजीओ छाप धंदेबाज आणि धनिक शेतकऱ्यांच्या मागण्यांना घेऊन पूर्ण जोर लावणाऱ्या शेतकरी युनियन्सकडून गरीब शेतकऱ्यांचं कोणतंच भलं होणार नाही. या गोष्टीला जितक्या लवकर समजले जाईल तितके न फक्त समाजासाठी चांगले असेल, तर खुद्द गरीब शेतकऱ्यांसाठी सुध्दा चांगले असेल.

**अनुवाद: अभिजित**

## देशात भयंकर वाढती बेरोजगारी!

**(पान 8 वरून)**

आणि दुसरीकडे सामान्य गरीब लोक व्यवस्थेचे शिकार होऊन बरबाद होत आहेत. **जनतेच्या जीवनात खऱ्या अर्थाने बदल घडवू शकणारा रोजगाराचा अधिकारच राज्यघटनेत मुलभूत अधिकार म्हणून नाही! हा अधिकार मुलभूत अधिकार व्हावा ही मागणी आम्ही करत आहोत.**

**प्रत्येक हाताला काम द्या,**
**नाहीतर खुर्च्या खाली करा!**

प्रश्न तरुणांनी मेहनत करण्याचा किंवा लायकीचा नाही, खरा प्रश्न सरकारच्या इमानाचा आहे. भांडवली, रोजगार संपवणाऱ्या आणि लोकविरोधी धोरणांना लागू करण्यात काँग्रेस-भाजप आणि सर्व रंगांच्या झेंड्यांच्या निवडणुकबाज पक्षांचे एकमत आहे. या सगळ्या चोरांपैकी आज भांडवलदारांचा लाडका पक्ष भाजपच आहे आणि सर्वात विश्वासू पक्ष म्हणून स्वत:ला सिद्ध केलेल्या काँग्रेसचा पर्याय तर त्यांनी जपून ठेवलेलाच आहे. धर्म, जातीवाद आणि प्रांतवादाचे राजकारण करणारे हे पक्ष फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्याला आपापसात लढवतात. यांचे कोणी सख्खे नाही, नाहीतर यांनी रिकामी पदं भरण्यासाठी आणि शिक्षण-रोजगार-आरोग्य देण्यासाठी धोरणे बनवली असती. स्वत:ला डावे म्हणवणारे आणि भ्रष्टाचाराविरोधात रणशिंग फुंकणारे 'आप' सारखे अनेक पक्ष सुद्धा आज तीच भांडवली, नवउदारवादी धोरणे लागू करत आहेत जी काँग्रेस-भाजप लागू करत आली.

साथींनो, प्रश्न आपल्यावर पण आहे की या अंधारयुगालाच आपण आपली नियती मानून गप्प बसणार का? सरकारी अन्याय, बेबंदशाही विरुद्ध आपण नाही बोलणार तर कोण? आपण फक्त एकजुटतेच्या आधारावर शिक्षण-आरोग्य-रोजगाराचे हक्क मिळवू शकतो. विद्यार्थी-तरुणांना ही गोष्ट गांभीर्याने समजून घ्यावी लागेल. आपल्याला विभागणाऱ्या प्रश्नांवर झगडे-दंगे करून काहीच फायदा होणार नाही हे आपण जितके लवकर समजू तितके चांगले, नाहीतर येणाऱ्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत! आपली जबाबदारी समजून नौजवान भारत सभा, क्रांतिकारी मजदूर मोर्चा आणि दिशा विद्यार्थी संघटनेने 'भगत सिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा' बनावा आणि लागू व्हावा यासाठी देशव्यापी अभियानाला सुरूवात केली आहे. ज्याचा भाग म्हणून 25 मार्च 2018 रोजी दिल्ली मध्ये रामलीला मैदान ते जंतर मंतर एक भव्य मोर्चा काढण्यात आला, ज्यामध्ये हजारो मजूर आणि तरूण सामील झाले. या मोर्चामधील मुख्य मागण्या खालीलप्रमाणे होत्या.

- प्रत्येक काम करू शकणाऱ्या नागरिकाला कायम रोजगार आणि सर्वांना समान व मोफत शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकार करण्यात यावा.
- केंद्र व राज्य स्तरावर ज्या पदांच्या परिक्षा झाल्या आहेत त्यातील उत्तीर्ण उमेदवारांना तात्काळ नियुक्त्या द्या.
- केंद्र आणि राज्यांच्या स्तरावर लगेचच आवश्यक त्या परिक्षा घेऊन सर्व रिकामी पदं लगेच भरा.
- 'भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा' लागू करा. गाव-शहरांच्या स्तरावर 365 दिवस पक्क्या रोजगाराची हमी द्या, रोजगार न मिळाल्यास सर्वांना कमीतकमी रुपये 10,000 प्रति महिना निर्वाहभत्ता द्या.
- नियमित स्वरूपाच्या कामांमध्ये ठेकेदारी प्रथा तात्काळ बंद करा, सरकारी विभागांमध्ये नियमितपणे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना लगेच कायम करा आणि अशा सर्व पदांवर कायमस्वरूपी भरती करा.

**आज देशातील प्रत्येक तरूणाचे कर्तव्य आहे की त्याने रोजगाराच्या अधिकाराला मुलभूत अधिकार बनवण्यासाठी पुढे यावे आणि यासाठी सर्व संभाव्य संघर्ष करावा.**

**प्रासंगिक**

# जनतेसाठी बनवलेल्या कायद्यांना दुरुपयोगाच्या बहाण्याने कमजोर करण्याचे षडयंत्र

अभिजित

ॲट्रोसिटी कायदा कमजोर करण्याच्या मुद्यावर मार्च 2018 मध्ये देशभरात प्रचंड निदर्शने झाली. खरेतर **ॲट्रोसिटी कायदा असो किंवा कामगार कायदे, लोकशाही अधिकार असोत किंवा महिलांच्या संरक्षणाचे कायदे - जनतेच्या अधिकारांच्या रक्षणासाठी बनवलेले कायदे कमजोर करण्याचे काम मोदी सरकार अतिशय वेगाने करत आहे.** हे षडयंत्र वेळीच ओळखले पाहिजे आणि आपल्या अधिकारांच्या रक्षणासाठी वेळीच एकजूट झाले पाहिजे.

### ॲट्रोसिटी कायद्या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

दलित लोकसंख्येवरील अत्याचाराविरुद्ध बनलेल्या 1989च्या ॲट्रोसिटी कायद्याला कमजोर करण्याचा निर्णय 20 मार्च 2018 रोजी सुप्रीम कोर्टाने सुनावला. कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार ॲट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत कुठल्याही तक्रारीवर लगेच अटक करण्याचे बंधन हटवण्यात आले आहे आणि अटकपूर्व जामीनावर असलेली बंदी सुद्धा हटवण्यात आली आहे. ॲट्रोसिटी कायद्याचा गैरवापर होतो असा दावा करून या कायद्याला कमजोर करण्याची मागणी विविध सवर्ण जातीगटांकडून पूर्वीपासूनच होत आहे. भाजप-संघ परिवारातील, आणि इतर संघटनाही हा मुद्दा उचलत राहिल्या आहेत. अशामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा एकदा वादाला तोंड फोडले आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय दर्शवतो की मोदी सरकारने आकड्यांकडे दुर्लक्ष करून कोर्टासमोर कमजोर दावा ठेवला होता. फॅसिस्ट-मनुवादी मोदी सरकारचे या प्रश्नावर आत्तापर्यंतचे दुर्लक्ष याकडेच संकेत करत आहे. खरेतर भाजप आणि आरएसएस या कायद्याला निष्प्रभावी बनवू इच्छित आहेत. तेव्हा या कायद्याची पार्श्वभूमी, सद्यस्थिती आणि त्याबद्दलचे राजकारण समजून घेणे आवश्यक आहे.

### ॲट्रोसिटी कायदा निर्मितीचा इतिहास

स्वातंत्र्यानंतर भारतातील सर्व जनतेला काही मुलभूत अधिकार कागदावर मिळाले. भांडवली व्यवस्थेने व्यवसाय स्वातंत्र्य दिले आणि जातीव्यवस्थेच्या आधाराचा हा एक महत्वाचा स्तंभ कमजोर झाला. पण जातीय मानसिकता तर कायमच होत्या. ग्रामीण भागात भूस्वामी उच्च जाती आणि भूमीहिन दलित जातींमधील वर्गीय-जातीय तणावांचा परिणाम दलित उत्पीडनात होणे पूर्वीपासूनच चालू आहे. 70-80च्या दशकात जातीय अत्याचाराच्या घटनांची अनेक उदाहरणे प्रकर्षाने समोर आली. यात तामिळनाडू मध्ये किलवनमणी येथे 1968 साली 42 दलितांची हत्या, आंध्रप्रदेशात 1969 साली कन्चिकचर्ला येथे कोतेसू याची हत्या, आंध्रप्रदेशातच 1978 साली इंद्रवल्ली येथे जमिनीच्या वादावरून पोलिसांकडून 10 मागासवर्गीय जमातीतील व्यक्तींची हत्या अशा अनेक घटनांनी देश हादरलेला होता. महाराष्ट्रात दलित पँथरची स्थापना सुद्धा जातीय अत्याचार वाढण्याच्या स्थितीतच झाली. जनतेच्या वाढत्या दबावामुळेच दलित जनतेसंदर्भात खून, बलात्कार, जाळपोळ आणि गंभीर इजेच्या घटनांवर लक्ष्य ठेवण्याचे काम 1974 पासून सरकारने चालू केले. पण घटना घडतच राहिल्या. 1979 साली बिहारमधील बेलची येथे आणि 1980 मध्ये पिपरा येथे झालेली हत्याकांड, उत्तर प्रदेशात एका दलित वराने घोड्यावर बसल्यामुळे काफाल्ता येथे 1980 साली झालेली हत्या, मध्य प्रदेशात मांडसर जिल्ह्यात 1982 साली बच्चदास याची हत्या, बिहार मध्ये 1985 साली साहिबगंज जिल्ह्यात बांझी येथे 15 दलितांची पोलिस गोळीबारात झालेली हत्या अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सर्व पार्श्वभूमीवर दलितांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध बसावा म्हणून 1989 साली ॲट्रोसिटी कायदा बनवण्यात आला. त्यानंतरच्या इतिहासाकडे नजर टाकली तर लक्षात येते की अशाप्रकारची हत्याकांड आणि अत्याचार थांबवण्यात हा कायदा अतिशय अपयशी ठरला आहे.

### ॲट्रोसिटी कायद्याची 'परिणामकारकता'

प्रत्येक कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये वर्गीय-जातीय बाजू समाविष्ट असतेच. दलितांमधील **सर्वात शोषित घटकांसाठी त्यांची आर्थिक परिस्थिती न्यायालय आणि प्रशासनाचे दरवाजे अगोदरच बंद करते.** देशभरात ॲट्रॉसिटी कायद्या अंतर्गत अत्याचारांच्या मामल्यांमध्ये एफआयआर दाखल करणे सुद्धा सर्वात अवघड काम आहे. काही करून अत्याचाराविरोधात न्याय मागायला पुढे जावेच तर व्यवस्थेतील प्रत्येक घटक पावलोपावली अडथळे उभे करतो. आजपर्यंत अनेक क्रूर अशा गुन्हांमध्येही ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत कोणालाच शिक्षा होऊ शकली नाही. पोलिस-तपास यंत्रणांचा, शासनाचा, अधिकारी वर्गाचा नाकर्तेपणा

आणि जातीय पूर्वाग्रह सतत शोषित-दमित जनतेविरुद्ध काम करत असतो. ॲट्रोसिटी कायदा झाल्यानंतरची खालील मोजकीच उदाहरणे स्पष्ट करतात की कायदा असूनही अत्याचार चालूच आहेत आणि गुन्हेगार मोकाट आहेत.

- ***13 दलितांची हत्या, चुंदुर, आन्ध्रप्रदेश, 6 ऑगस्ट 1991, न्यायालयाचा निकाल - 2014 साली सर्व आरोपींना सोडले***
- ***10 दलितांची हत्या, नागरी, बिहार, 11 नोव्हेंबर 1998, न्यायालयाचा निकाल - मार्च 2013 मध्ये सर्व आरोपींना सोडून दिले***
- ***22 दलितांची हत्या, शंकर बीघा गाव, बिहार, 25 जानेवारी 1999, न्यायालयाचा निकाल - जानेवारी 2015 मध्ये सर्व आरोपी निर्दोष मुक्त***
- ***21 दलितांची हत्या, बथानी टोला, बिहार, 11 जुलै 1996, न्यायालयाचा निकाल - एप्रिल 2012 मध्ये सर्व आरोपींना सोडून दिले***
- ***32 दलितांची हत्या, मियापुर बिहार, सन 2000, न्यायालयाचा निकाल - 2013 मध्ये सर्वांना सोडून दिले***
- ***58 दलितांची हत्या, लक्ष्मणपूर बाथे, 1 डिसेंबर 1997, न्यायालयाचा निकाल - 2013 मध्ये सर्वांना सोडले***
- ***महाराष्ट्रातील कुप्रसिद्ध नितीन आगे खटला ज्यामध्ये 28 एप्रिल 2014 रोजी एका दलित तरुणाला गावासमोर ठार मारले. न्यायालयाचा निकाल - 23 नोव्हेंबर 2017 रोजी सर्वांना निर्दोष मुक्त केले***
- ***ह्या निकाल आल्यानंतर काही दिवसातच 29 मार्च रोजी गुजरातमध्ये एका दलित युवकाची हत्या फक्त या कारणाने करण्यात आली की त्याच्याकडे घोडा होता.***

वर दिलेली उदाहरणे म्हणजे फक्त हिमनगाचे टोक आहे. ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत विशेष न्यायालये स्थापन करण्याची तरतूद असली तरी दाखल झालेल्या दाव्यांपैकी प्रलंबित दाव्यांची संख्या सुद्धा 80 टक्क्यांवर आहे. एकूण दाव्यांपैकी शिक्षा होण्याचे प्रमाण 2 ते 3 टक्के इतके कमी आहे. बलात्काराच्या दाव्यांमध्ये तर हे प्रमाण 2 टक्केच आहे. खरेतर ॲट्रोसिटी कायदा असूनही देशभरात प्रत्येक तासाला दलितांविरोधात पाच पेक्षा जास्त गुन्ह्यांची नोंद केली जाते. दलित महिलांची स्थिती तर यापेक्षाही भयानक आहे. दररोज सरासरी 6 महिलांवर बलात्कार होतो. गेल्या दहा वर्षांमध्ये 2007-2017 या काळात दलित विरोधी अत्याचारांमध्ये 66 टक्के वाढ झाली आहे. 2016 मध्ये 48,000 पेक्षा जास्त खटले दाखल झाले आहेत. वर दिलेल्या यादीवरून हे सुद्धा स्पष्ट आहे की दलितांच्या विरोधातील गंभीर पेक्षा गंभीर गुन्ह्यांमध्येही शिक्षा अजिबात झाल्या नाहीत. हे थोडेसे आकडे सुद्धा स्पष्ट दाखवतात की 70 वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही दलित लोकसंख्या आपल्या किमान लोकशाही हक्क अधिकारापासून वंचित आहे.

महाराष्ट्र सुद्धा दलितविरोधी अत्याचारांमध्ये बराच पुढे आहे. अलिकडच्या काळातील खैरलांजी पासून नितीन आगे प्रकरणात पर्यंतच्या घटना याच गोष्टीची साक्ष देतात. पाशवी जातीय अत्याचाराच्या घटना सरकारच्या दलितविरोधी चेहऱ्याचा पर्दाफाश करतातच.

### ॲट्रोसिटी कायद्याच्या गैरवापराचा मुद्दा

तसा गैरवापर तर कोणत्याही कायद्याचा होतच असतो. तो जनतेच्या एका हिश्श्याकडूनही होऊ शकतो आणि कायदायंत्रणेकडूनही. एका बाजूला कायद्याचा गैरवापर करून समाजातील काही व्यक्ती कायदा चुकीच्या मार्गाने स्वतःच्या हितासाठी राबवण्याचा प्रयत्न करतच असतात. यात प्रामुख्याने ज्यांची वर्गीय बाजू मजबूत आहे असेच लोक हा दुरूपयोग करण्याचा स्थितीत असू शकतात. दुसरीकडे कायदा राबवणाऱ्या यंत्रणेचे विविध घटक म्हणजे मुख्यत्वे पोलिस, वकील, न्यायालये, इत्यादी 100 टक्के पूर्णतः निष्पक्ष असतात हे मानणेच अज्ञानीपणाचेच लक्षण ठरेल. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांकडून राजकीय, वैयक्तिक, आर्थिक कारणांनी जवळपास सर्वच कायद्यांचा गैरवापर होत असतो. मग काही कायद्यांसंदर्भातच गैरवापराची हाळी का दिली जाते? ॲट्रोसिटी कायद्या संदर्भात अशी मागणी करणाऱ्या लोकांचे वर्गीय-जातीय पूर्वाग्रहच या मागणीमागे असतात.

दुसरे ॲट्रोसिटी कायद्यामध्येच चुकीची केस दाखल केल्यास पीडित व्यक्ती विरुद्ध आयपीसी कलम 180 अंतर्गत केस दाखल करून शिक्षा देण्याची तरतूद आहे. तरीही कायदा ढिला करण्याची मागणी का? खरेतर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार अटकपूर्व जामीन मिळण्याची सूट आणि उच्च अधिकाऱ्यांच्या परवानगीनेच अटक करण्याच्या आदेशाची गरज या कायद्याच्या (अगोदरच कमी असलेल्या) भीतीला पूर्णपणे संपवून टाकेल.

ॲट्रोसिटी कायद्यात होत असलेले हे बदल निराळी घटना नाही. जनतेच्या हितांच्या रक्षणासाठी बनवलेले विविध कायदे ढिले करण्याचे काम भारतीय राज्यसत्ता करत आहे. ॲट्रोसिटी कायद्यातील बदल याचाच एक भाग आहे.

### दोन प्रकारचे कायदे

देशातील कायदे दोन प्रकारचे असतात. एक ते कायदे जे देशातील जनतेच्या एका घटकाच्या किंवा सर्व घटकांच्या हक्क अधिकाराशी संबंधित असतात. उदाहरणार्थ

महिलांवरील अत्याचाराविरुद्ध बनलेले कायदे, मजुरांच्या हक्क अधिकारांसाठी बनलेले कायदे, दलितांवरील अत्याचार थांबवण्यासाठी बनवलेले कायदे, इत्यादी. दुसरे ते कायदे असतात जे जनतेचे दमन-शोषण करण्यासाठी सरकार आणि प्रशासनाला ताकद देतात. जसे पोलिसांना एन्काऊंटर करण्याची सूट देणे, फौजेला काही भागांमध्ये विशेषाधिकार देऊन एन्काऊंटर आणि अटक करण्याची परवानगी देणे, इत्यादी. आपल्या देशातील सरकार मग ते काँग्रेसचे असो किंवा भाजपचे, अगदी स्पष्टपणे भांडवलदारांच्या हितांचे प्रतिनिधित्व करते. त्यांच्या हितासाठी एका बाजूला ही सरकारे मजुरांच्या, दलितांच्या, जनतेच्या लोकशाही अधिकारांना सतत कमी करत आहे आणि दुसरीकडे सरकारचे दमन करण्याचे अधिकार वाढवत आहे.

**कामगार कायद्यांवर हल्ला**

केंद्र सरकारने जानेवारी 2018 मध्ये एक मसुदा अधिसूचना प्रकाशित केली. याद्वारे औद्योगिक विवाद कायदा आणि मॉडेल स्टँडींग ऑर्डरच्या नियमांमध्ये बदल करून उद्योगांमध्ये 'फिक्स टर्म नियुक्ती' म्हणजे 'विशिष्ट मुदतीसाठी नियुक्ती'ला मंजूरी मिळेल. याशिवाय काही राज्यांमध्ये 300 पर्यंत मजूर ठेवणाऱ्या कंपन्यांना सरकारी परवानगी शिवाय आणि विना नोटीस कामगारांना काढून टाकण्याचे किंवा कंपनी बंद करण्याचे अधिकार देण्याचे निर्णय घेण्यात आले आहेत. अनेक राज्यांमध्ये तर ही मर्यादा 100 कामगारांपर्यंत कमी करण्यात आली आहे. या तरतूदीमुळे कंपन्या कोणत्याही ठेकेदाराशिवाय सरळ कामगारांना थोड्या मुदतीसाठी कामावर ठेवू शकतील. कॉंट्रॅक्ट संपल्यावर मजूरांना परत कामावर न घेण्याचे कोणतेही बंधन मालकावर नसेल. कायद्यात म्हटले आहे की अशा कामगारांना नियमित कामगारांसारख्याच सुविधा दिल्या जाव्यात, पण अशा तरतूदी फक्त कागदावरच राहणार हे तर कोणीही समजू शकते. कामगार चळवळ अतिशय कमजोर असल्यामुळे, भांडवली धोरणे आणि नव-उदारवादी धोरणे आता इतकी निर्लज्जपणे लागू केली जात आहेत की 'विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी' हे पाउल उचलल्याचे सरकारनेही बिनदिक्कतपणे जाहीर केले आहे. **भारतातील कामगारांच्या श्रमाची खुली लूट करू देण्यासाठी लोकांनी निवडलेले हे सरकार किती उतावीळ आहे!**

कामगारांचा, ट्रेड युनियन्सचा आणि विरोधी पक्षांचा विरोध असेल तिथे केंद्र सरकार सरळ काही बदल न घडवता, चोरमार्गाने काम करत आहे. जिथेही शक्य आहे तिथे वेगवेगळ्या अधिसूचना काढून नियम बदलवले जात आहेत. जिथे केंद्र सरकारला अवघड वाटत आहे, तिथे राज्य सरकारांद्वारे असे बदल घडवले जात आहेत. राजस्थान, मध्यप्रदेश आणि आसाम सारख्या राज्यांमध्ये अगोदरच औद्योगिक विवाद कायद्यात्त बदल करून मजूरांना कामावरून काढणे, ताळेबंदी किंवा कंपनी बंद करणे सोपे केले आहे. महाराष्ट्रात अशाच कायद्याची तयारी पूर्ण झाली आहे आणि गुजरात, हरियाणा, उत्तरप्रदेशात तयारी चालू आहे. देशातील बहुतेक राज्यांमध्ये भाजपचे सरकार असल्यामुले हे काम अजून सोपे झाले आहे.

याशिवाय गंभीर नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे ऑगस्ट 2017 मध्ये लोकसभेत सादर केलेले 'कोड ऑफ व्हेजेस बील, 2017' (मजूरीसंदर्भातील नियमांचे विधेयक, 2017). सध्या देशात लागू असलेल्या चार कामगार कायद्यांमधील नियमांचे 'सरळीकरण' आणि 'एकीकरण' करण्याच्या उद्दिष्टाने हे विधेयक मांडण्यात आले आहे. यामुळे (1) पेमेंट ऑफ व्हेजेस ॲक्ट, 1936 (मजूरी देयक कायदा, 1936) (2) मिनिमन व्हेजेस ॲक्ट, 1948 (किमान वेतन कायदा, 1948) (3) पेमेंट ऑफ बोनस ॲक्ट, 1965 (बोनस देयक कायदा, 1965) (4) इक्वल रिम्युनरेशन ॲक्ट, 1976 (समान वेतन कायदा, 1976) या चार कायद्यांचे एकत्रीकरण होणार आहे. या कायद्यामुळे खालील बदल होतील:

- ***श्रमिकांना कुशल, अर्ध-कुशल, अकुशल अशा श्रेणीत वाटणे बंद होईल. यामुळे कुशल आणि अर्ध-कुशल कामगारांना जास्त वेतन मिळण्यावर परिणाम होणार.***
- ***किमान वेतन ठरवताना वेळ आणि कामाची मात्रा, तसेच कौशल्य, काठिण्य, कामाच्या ठिकाणाचे अंतर, इत्यादी लक्षात घेऊन ठरवले जाईल. असे करताना आजपर्यंत स्थापित असलेला सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेला नियम धाब्यावर बसवला जाईल. आजपर्यंत देशामध्ये किमान वेतन मजूरांचे आहार-पोषण, वस्त, निवारा, इलाज, शिक्षण, इंधन, वीज, म्हातारपण, सण, इत्यादी लक्षात घेऊन ठरवले जात होते. असे असूनही किमान वेतन फारच कमी ठरवले जाई. नवीन कायद्यामुळे तर मालकांना मोकळे रानच मिळणार आहे.***
- ***बोनस देण्यासंदर्भात कंपन्यांना अधिक सूट देण्यात आली आहे***
- ***कोणत्याही कामगाराचे वेतन 'असमाधानकारक' कामाच्या नावाने कापण्याची सूट मालकांना देण्यात आली आहे.***
- ***महिलांच्या वेतनामधील असमानतेविरोधात असलेल्या समान वेतन कायदा, 1976 मधील तरतूदी काढून टाकण्यात आल्या आहेत.***
- ***ट्रेड युनियनच्या कामांमध्ये मजूरांच्या सहभागावर सुद्धा बंधने आणली आहेत.***

- ***अगोदर किमान वेतन न दिल्यास मालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद होती. आता फक्त दिवाणी दावा दाखल केला जाऊ शकेल. म्हणजे मालकांना अटक होऊच शकणार नाही.***
- ***सध्याच्या नियमांनुसार 5 वर्षे किंवा अगोदर किमान वेतनामध्ये सुधार करण्याची तरतूद आहे. नवीन नियमांनुसार पाच वर्षांनंतरच सरकार किमान वेतनाची समीक्षा किंवा सुधार करेल. समीक्षेची तरतूद म्हणजे सुधाराची हमी काढून घेणेच आहे.***

**इतर घटना**

मारूती सुझुकी कंपनीतील कामगारांनी अतिशय झुंझार असे आंदोलन उभे केल्यानंतर खोट्या खटल्यांमध्ये मारुतीच्या कामगारांना चार वर्षे तुरुंगात ठेवणे, देशाच्या तुरुंगांमध्ये खोट्या आरोपाखाली अनेक वर्ष मुस्लिम तरुणांना तुरुंगात ठेवणे आणि नंतर त्यांची निर्दोष म्हणून सुटका करणे, खोट्या एन्काऊंटरमध्ये लोकांना मारणे अशा सर्व घटना याचीच उदाहरणे आहेत की सरकार जनतेच्या लोकशाही अधिकारांना अधिकाधिक संकुचित करत आहे. आता तर आधार कार्डाची सक्ती करून, ज्याद्वारे प्रत्येक व्यक्तीच्या सर्व हालचालींवर नजर आणि नियंत्रण ठेवता येईल, सरकार आणि प्रशासन आपल्या दमन यंत्रणेची व्याप्ती अजून वाढवण्याची योजना बनवत आहे.

**बाल मजूर कायद्यात बदल**

भारतीय राज्यसत्तेचे चरित्र आता इतके निर्दय होत चालले आहे की अगदी लहान मुलांनाही तिने सोडलेले नाही. 2016 साली संसदेत बालमजूरीच्या संदर्भात कायद्यात 'सुधार' करण्यात आले. वरवर, एका बाजूला, पुरोगामी वाटणाऱ्या या कायद्यात लहान मुलांना कामावर ठेवल्यास शिक्षेची तरतूद आहे; पण वास्तवात, दुसऱ्या बाजूला, या कायद्याने धोकादायक व्यवसायांमध्ये लहान मुलांच्या कामावर बंदी आणताना 83 धोकादायक उद्योगांची यादी 3 वर आणली. असे करताना बॅटरीचे कारखाने, विटांच्या भट्ट्या, केमिकल मिक्स करणारे उद्योग असे उद्योग यातून वगळले. इतकेच नाही तर 'कुटुंबामध्ये किंवा कौटुंबिक उद्योगांमध्ये' मुलांना काम करण्याची परवानगी दिली. या कायद्यावर गदारोळ झाला, तेव्हा सुधारित नियमांच्या नावाने 2017 साली काही नियम बनवण्यात आले ज्यांनी 'काही' कौटुंबिक उद्योगांमध्येच कामाची परवानगी दिली आणि शाळेनंतर 3 तास कामाची परवानगी दिली. म्हणजे लहान मुलांनी काम करण्यास तत्वत: मान्यता अजूनही दिलेलीच आहे. समाजातील गरिबांच्या कष्टकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण-विकासासाठी पूर्ण वेळ न देता काही वेळ तरी काम करावे हीच राज्यसत्तेची मानसिकता आहे.

**फॅसिझमचे स्वरुप आणि त्याच्या कारवाया**

लोकांच्या हक्कांसाठी असलेल्या कायद्यांच्या स्वरूपात होत असलेले हे बदल देशातील फॅसिस्ट राजकारणाचा भाग आहेत. त्यामुळे फॅसिझम म्हणजे काय हे समजणे आवश्यक आहे. एका बाजूला अव्याहत वाढणाऱ्या नफ्याची आस, आणि दुसरीकडे कामगारांना कमीत कमी वेतन देऊनच वाढणारा नफा हा भांडवलशाहीचा नियम. यातूनच एका बाजूला प्रचंड उत्पादन तर दुसरीकडे विकत घेऊ शकणाऱ्यांच्या संख्येत घट व त्यामुळे मंदी हा अंतर्विरोध निर्माण होतो. भांडवलशाही अर्थव्यवस्था या स्वत:च्या अंतर्विरोधांमुळे संकटात येतच असते आणि मंदीकडे जात असते. 70च्या दशकापासून ते 2008 च्या आर्थिक मंदीपर्यंत याची विविध उदाहरणे सतत समोर आली आहेत. **मंदीच्या काळात जनतेचा असंतोष तीव्र होत जातो. जेव्हा हे संकट गंभीर रुपात येते तेव्हा कामगारवर्गाचे अजून दमन करण्यासाठी, जनतेमध्ये वाढत असलेल्या असंतोषाला दडपण्यासाठी आणि त्याला दुसरीकडे वळवण्यासाठी एकीकडे वंश-जात-धर्म-पंथ अशा नावांनी उग्र राष्ट्रवादाच्या रुपात विचारधारेला समोर आणले जाते; दुसरीकडे आपला उदारमतवादी चेहरा टाकून देऊन विविध मार्गांनी जनतेचे दमन करण्यासाठी पावले उचलली जातात.** आजचे जागतिक स्तरावरील अर्थव्यवस्थेचे संकट स्थायी स्वरूपाचे आहे आणि त्यामुळेच फॅसिझमचे संकटही स्थायी स्वरूपाचे झालेले आहे. भारतात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात संघाचे फॅसिस्ट सरकार सत्तेत आल्यावर जनविरोधी कायद्यांचे प्रमाण वाढले आहे, ते यामुळेच. एका बाजूला हे लोक गोमाता, राममंदिर, मुस्लिम दहशतवाद, आरक्षण असे मुद्दे उकरत आहेत तर दुसरीकडे जनतेच्या लोकशाही अधिकारांवर नग्न हल्ला चढवलेला आहे.

**खरे प्रश्न ओळखा**

आज देशभरात बेरोजगारी अभूतपूर्व स्तरावर आहे. शेतीमध्ये मशीन आल्यामुळे मोठ्या प्रमाणात ग्रामीण मजूर बाहेर पडत आहेत तर दुसरीकडे भांडवली आर्थिक संकटामुळे उद्योगांमध्येही नवीन रोजगार निर्माण होत नाहीयेत. शिक्षण, आरोग्य सुविधा अतिशय महागड्या झाल्या आहेत आणि बहुतांश जनतेच्या आवाक्याबाहेर जाऊन पोहोचल्या आहेत. महागाई आकाशाला भिडली आहे. पेट्रोल-डिझेलचे दर सुद्धा जनतेचा खिसा जाळतच आहेत. जीएसटी आणि नोटबंदीसारख्या पावलांनी तर गरिब, कष्टकरी वर्गाला देशोधडीला लावले आहे. अशावेळीच देशभरामध्ये जातीय आणि धार्मिक तणाव वाढवले जात आहेत आणि सामान्य

**(पान 22 वर)**

अर्थकारण

# नेहमीप्रमाणे जनतेच्या तोंडाला पाने पुसणारे केंद्रीय अंदाजपत्रक(बजेट) 2018 आणि जनतेच्या दैन्यावस्थेवर पांघरूण घालणारे आर्थिक सर्वेक्षण

✍राहूल

सर्वसामान्य माणुस जसा आपल्या घरच्या खर्चासाठी एक अंदाजपत्रक बनवतो तसेच सरकार सुद्धा स्वत:चे अंदाजपत्रक बनवत असते. नेमेची येतो पावसाळा प्रमाणे दरवर्षी केंद्र सरकारचे अंदाजपत्रक प्रस्तुत केले जाते. नेहमीप्रमाणे मीडीयामध्ये मोठमोठ्या चर्चा घडवल्या जातात, रुपया आला कसा, गेला कसा यावर चर्चा होतात; बजेटमध्ये सामान्य माणसासाठी काय-काय आहे यावर मोठमोठ्या बातम्या दिल्या जातात. अनेक वर्षे हे असेच चालू आहे. पण खरंच जीवनात फरक पडतो का? कष्टकरी गरीब माणसाने स्वत:ला हा प्रश्न विचारलाच पाहिजे. प्रत्येक बजेटनंतर महागाई वाढतच जाते; शाळांची फी, दवाखान्याचा खर्च, गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढतच जातात. दरवर्षी बजेटमध्ये अनेक सरकारी योजना जाहीर होतात असे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात किती योजनांचा लाभ तुम्हाला मिळतो हे तुम्ही स्वत:लाच विचारा.

बजेटच्या अगोदर सरकारतर्फे देशाच्या आर्थिक स्थितीबद्दल मांडणी करणारे आर्थिक सर्वेक्षण प्रस्तुत केले जाते. देशाची खरी आर्थिक स्थिती मांडण्याचा हा अहवाल दावा करतो, पण देशातील गरिब, कष्टकरी जनतेच्या खऱ्या स्थितीवर पांघरूण घालणे आणि देशात कसे सगळे आलबेल आहे हे सांगणे या अहवालाचे मुख्य काम आहे. आता यावर्षीच्या बजेट आणि आर्थिक सर्वेक्षणाकडे वळूयात.

खरेतर सर्व बजेटप्रमाणे हे बजेटही धनाढ्यांचे बजेट आहे. पण बजेट जाहीर झाल्यावर लगेचच मोठमोठे उद्योगपती, बिल्डर, बँकचालक यांनी सांगणे चालू केले की हे सामान्य माणसाचे बजेट आहे. आता या मंडळींना इतर वेळी सामान्य माणसाचे काहीएक पडलेले नसते, कारण ही सर्व मंडळी आपापले नफे कमावण्यात गुंतलेली असतात. हे बजेट आमच्यासाठी नाही असेही त्यांनी म्हटले असते तरी त्यांचे (नसलेले) दु:ख समजू शकलो असतो. पण रेटून खोटं बोलण्यात ही मंडळी आर.एस.एस.च्या मागे नाहीत. या मंडळींना आनंद का झाला आहे हे पुढे या लेखात समजेलच.

बजेटचे दोन हिस्से असतात. जमा आणि खर्च. याबद्दल थोडक्यात सांगायचे तर एका 'चांगल्या' भांडवलदारी देशाप्रमाणे भारतातही सरकार प्रत्येक माणसाकडून कर घेते, पण प्रमाण पाहिले तर श्रीमंतांकडून कमी आणि गरिबांकडून जास्त घेते. खर्च करताना मात्र गरिबांसाठी कमी आणि श्रीमंतांसाठी जास्त खर्च करते.

**बजेट: जमेचा भाग**

सरकारकडे पैसे जमा होतात ते मुख्यत्वे करांमधून, आणि कर्जामधून. तुमच्या आमच्या आणि सरकारच्या बजेट मध्ये हा फरक असतो. तुम्ही-आम्ही काम करून पैसे कमावतो आणि सरकार कर लावून पैसे कमावते. सरकार नोटा सुद्धा छापू शकते, पण खूप नोटा छापल्या तर नोटांचीच किंमत कमी होते म्हणून या मार्गाला मर्यादा असतात.

**करांचे दोन मुख्य प्रकार म्हणजे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर. प्रत्यक्ष कर म्हणजे तुमच्या हातातून प्रत्यक्ष सरकारच्या हातात जातो तो कर. उत्पन्नवर असलेला कर (इन्कम टॅक्स), कंपन्यांच्या नफ्यावर कर, इत्यादी. अप्रत्यक्ष कर म्हणजे जो कर आपल्याच खिशातून जातो, पण सरळ सरकारच्या हातात जात नाही, तर अप्रत्यक्षपणे जातो. उदाहरणार्थ: जीएसटी. तुम्ही-आम्ही बाजारातून मीठ घेतो, तेव्हा मिठाच्या किमतीत त्यावर असलेला जीएसटी पण धरलेला असतो. हा कर आपणच भरतो.**

यापैकी अप्रत्यक्ष कर जास्त वाईट कर आहे कारण तो सर्वांना समान आहे. तुम्ही-आम्ही मीठ घेतले आणि अंबानीने मीठ घेतले तरी सारखाच कर बसतो. आता महिना 5 लाख रुपये कमावणाऱ्याने मीठावर 2 रु. कर भरला आणि महिना 5000 कमावणाऱ्याने 2 रु. कर भरला, तर जास्त कोणाला सोसावे लागेल? अर्थातच गरिबाला.

उप्तन्न करासारखा प्रत्यक्ष कर उत्पन्नावर असतो आणि उत्पन्नाच्या प्रमाणात वाढतो. म्हणजे रु. 5 लाख उत्पन्नापर्यंत 10 टक्के, 5 ते 10 लाख उत्पन्नावर 20 टक्के, आणि त्यावरील उत्पन्नावर 30 टक्के. या करामुळे विषमता संपत नाही, पण थोडीशी कमी होते. त्यामुळे अशा करांना प्रागतिक (प्रोगेसिव्ह) कर असेही म्हणतात.

भारत सरकारच्या उत्पन्नाचा प्रमुख भाग आहे अप्रत्यक्ष कर. आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारी नुसार जवळपास 70% कर हा अप्रत्यक्ष कर आहे. म्हणजे देशातील बहुतांश कर हा सर्वसामान्य, गरिब माणसांच्या खिशातून वसूल केला जातो. **जीएसटी लागू झाल्यानंतर तर या कराची व्याप्ती प्रचंड वाढली आहे आणि कर वसूलीची सक्तीही वाढली आहे.** दुसरीकडे पेट्रोल, डिझेल वर असणारे कर काही कमी

होण्याचे नाव नाही. भारतात जर तुम्ही 80 रुपये लिटर पेट्रोल भरत असाल, तर त्यात जवळपास 40 ते 45 रुपये हे सरकारला कर म्हणूनच जात असतात!

दुसऱ्या बाजूला उत्पन्न कर आणि कंपन्यांवरचा कॉर्पोरेट कर सतत कमी केले जात आहेत. काँग्रेस सरकारच्या काळातच 10 लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या लोकांवरचा कर 30 % वरून 20% वर आणला गेला होता. भाजपही मागे नाही. कॉर्पोरेट कर 30% वरून 25% वर आणण्याचे त्यांनी जाहीर केले आहे. तसेही 30% दर असूनही कंपन्या अगोदर 21-22% च कर भरत होत्या, तो आता अजून कमी होईल.

याशिवाय सरकार विविध मार्गांनी कंपन्यांना कर सवलत देत असते. उदाहरणार्थ निर्यातीवर करात सूट, किंवा एस.ई.झेड मध्ये (विशेष आर्थिक क्षेत्र) कंपन्यांना कर माफी, किंवा 100 कोटी पर्यंतच्या कारभारावर कृषी कंपन्यांना कर माफी, वगैरे. 2005-06 ते 2016-17 या काळात विविध कंपन्यांना देण्यात आलेल्या अशा कर सवलतींची एकूण किंमतच होते 53.1 लाख कोटी रुपये (53 वर बारा शून्य)!! केंद्रीय बजेटच्या दुपटीहून जास्त ही रक्कम आहे.

### बजेट: खर्चाचा भाग

अशाप्रकारे श्रीमंतांना भरपूर सवलती देत, आणि गरिबांच्या खिशातून शेवटचा पैसा हिसकावून घेत जमा केलेल्या पैसाचे काय केले जाते ते पाहूयात. यावर्षीच्या बजेटमध्ये जाहीर झालेल्या विविध योजनांकडे आणि खर्चाच्या तरतूदींकडे एक नजर टाकूयात.

### आरोग्य विमा योजना

यावर्षीच्या बजेटमध्ये सगळ्यात गाजावाजा करण्यात आलेली घोषणा म्हणजे गरीब लोकांसाठी आरोग्य विम्याची योजना. या योजनेबद्दल थोडे सविस्तर समजून घेतले पाहिजे.

देशातील 10 कोटी कुटुंबांना 5 लाख रुपयांचे विमा संरक्षण देणारी योजना घोषित केली गेली. जगातील सर्वात मोठी विमा योजना असे या योजेनेचे कौतुक अर्थमंत्र्यांनी केले. आता या योजनेचे वास्तव काय? या योजनेसाठी फक्त 2000 कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. **सर्वसामान्य माणसाला कोटी मधला कोणताही आकडा मोठा वाटतो. पण देशाच्या स्तरावर 2000 कोटी रुपये फार लहान रक्कम आहे. 10 कोटी कुटुंबांमध्ये 50 कोटी लोक आहेत असे मोजले, तर प्रत्येक माणसाच्या वाट्याला फक्त 40 रुपये येतात. आता 40 रुपयात काय इलाज होऊ शकतो?**

यातून काही जणांना वाटते की काही नसल्यापेक्षा 'काहीतरी' असलेले काय वाईट? **'काहीतरी', 'कमीतकमी' ही भाषा त्या लोकांची भाषा असते, ज्यांना वाटते की गरीबांनी 'कसेबसे' जगले तरी चालू शकते.** असो. आरोग्य विम्याच्या नावाने ठेवलेली रक्कम गरिबांना मिळेल असे वाटत असेल तर तो भ्रम आहे. खरेतर ही रक्कम सुद्धा मोठमोठ्या विमा कंपन्यांसाठी ठेवलेली रक्कम आहे! या रकमेतून सरकारी दवाखाने, इस्पितळांमध्ये चांगल्या सुविधा निर्माण होतील आणि गरिबांना त्या सेवा मोफत मिळतील अशी अपेक्षा असेल तर ती कल्पनाच आहे! लोकांनी आपला इलाज खाजगी विमा कंपन्यांच्या माध्यमातून करून घ्यायचा, आणि सरकारने आणि लोकांनी मिळून हप्त्याची रक्कम विमा कंपन्यांना द्यायची अशी ही योजना आहे.

**खाजगी विमा कंपन्यांच्या माध्यमातून मिळणारी आरोग्यसेवा महागडी आणि अपुरीच असते कारण विमा कंपन्या नफ्यासाठी काम करतात.** उदाहरणार्थ आरोग्याच्या नावाने युरोपपेक्षा जास्त खर्च अमेरिका करते, पण अमेरिका विम्याच्या माध्यमातून आणि युरोपातील अनेक देश सरकारी आरोग्य सेवेच्या माध्यमातून खर्च करतात. तरीही युरोपातील आरोग्य सेवा अमेरिकेपेक्षा खुप चांगली आहे. गरिबांच्या दृष्टीकोणातून अमेरिकेतील आरोग्य सेवा सर्वात वाईट आहे.

विमा योजना शक्यतेवर चालतात. कोट्यवधी लोकांपैकी थोडेच लोक दरवर्षी आजारी पडतात. त्यामुळे विमा योजनांमध्ये दरवर्षी एक छोटी रक्कम प्रिमीयम (हप्ता) म्हणून विमा कंपनीला दिली जाते आणि त्याबदल्यात मोठ्या रकमेचा विमा मिळतो. हिशोब केला तर असे दिसते की रु. 5 लाख विमा द्यायचा असेल तर प्रीमीयम कमीत कमी रु. 8300 येईल आणि केंद्र सरकारला कमीतकमी रु. 50,000 कोटी या योजनेसाठी द्यावे लागतील. सरकारने फक्त 2000 कोटी रक्कम ठेवली आहे यातूनच स्पष्ट होते की सर्व लोकांपर्यंत योजना पोहोचवण्याचे सरकारचे नियोजनच नाहीये.

**कॉर्पोरेट हॉस्पिटल्सच्या मालकांनी या योजनेचे स्वागत केले आहे. यातच तिचे रहस्य दडलेले आहे.** 5 लाख रुपये अशा मोठ्या रकमेच्या निमित्ताने आता गरिबांनाही या हॉस्पिटल्समध्ये ओढता येईल आणि त्यांचे ग्राहक वाढतील. अशा हॉस्पिटल्समध्ये जे गैरप्रकार चालतात त्याबद्दल तर मध्यमवर्गही बऱ्यापैकी जागरूक आहे. लुटण्यासाठी आता गरिब वर्गाचाही एक हिस्सा उपलब्ध झाल्यामुळे या हॉस्पिटल्सला तर आनंदच झाला आहे. विम्याची रक्कम 25-30 हजार असताना कर्नाटक, बिहार येथे गरीब महिलांना फसवून त्यांचे गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन करण्याच्या घटना झाल्या आहेत. 5 लाख रुपये किमतीच्या विम्यात काय काय होईल याची कल्पनाच नको.

खरेतर सर्वसामान्य लोकांचा आरोग्यावरचा सर्वात मोठा, जवळपास 70%, खर्च ऑपरेशनवर नाही तर दैनंदिन औषधांवर (ओपीडी) होतो. कोणतीही सरकारी योजना हा खर्च देतच नाही! **मोठमोठ्या खाजगी हॉस्पिटल्सचा धंदा होईल अशाच योजना आखल्या जातात. खरेतर सरकारने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'राष्ट्रीय आरोग्य मिशन'च्या अर्थसंकल्पात 670 कोटी रुपयांची कपात केली आहे आणि लसीकरणासाठीच्या निधीमध्ये तब्बल 2292 कोटी रुपयांची कपात केली आहे.** मरत चाललेल्या सरकारी दवाखाने, हॉस्पिटलांना सुधारण्याऐवजी सरकार या दरोडेखोर खाजगी हॉस्पिटल्सच्या तुंबड्या भरत आहे.

### शेतकऱ्यांसाठी तरतूदी, उत्पन्न दुप्पट करण्याचा ढोंगीपणा

या बजेट मध्ये गाजावाजा करण्यात आलेली दुसरी गोष्ट म्हणजे शेतीकरिता तरतूद. शेतीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जरकमेत रु. 10 लाख कोटीवरून रु. 11 लाख कोटी वाढ करण्यात आली आहे. आता कर्ज तर बँका देतात, त्यामुळे सरकारने ही घोषणा करण्यात सरकारचे काय कर्तुत्व? दुसरी गोष्ट अशी की शेतीसाठी असलेली तरतूद शेतकऱ्यासाठी असतेच असे मानणे चूक आहे. या कर्जाऊ रकमेपैकी 'शेती क्षेत्राच्या' नावाने अनेक कर्ज मोठमोठ्या कंपन्यांना दिली जातात. कृषी क्षेत्राला सुद्धा वीमा योजना लागू आहे. या योजनेत गेल्या वर्षी 22,000 कोटी रुपये प्रीमीयम जमा झाला आणि फक्त 8,000 कोटींचे दावे देण्यात आले. म्हणजे **खाजगी विमा कंपन्यांना सरळ 14,000 कोटींना नफा झाला!**

शेतकऱ्यांना उत्पादन किमतीच्या 50% जास्त किंमत देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. ते वचन पुन्हा एकदा देण्यात आले. पण ही किंमत मोजण्याचे सूत्र स्वामिनाथन आयोगाने दिलेले नवे सूत्र नसून (ज्यात गुंतवलेल्या भांडवलावरचे व्या आणि जमिनीचे भाडेही सामील आहे) जुन्याच सुत्रानुसार किंमत मोजली जाईल. हे लक्षात घेतले पाहिजे अशा घोषणांचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांनाच होतो. किमान मूल्य देताना पिकाची सरासरी किंमत काढून दर ठरवले जातात. आर्थिक सर्वेक्षणानुसार आता शेतीमध्ये 90% पेक्षा जास्त बळाचा वापर यंत्रांद्वारे होतो. म्हणजे छोटे शेतकरी सुद्धा यंत्र भाड्याने घेऊन शेती करतात. परंतु भांडवल कमी असल्यामुळे ते पूर्ण यांत्रिकीकरण करूच शकत नाही आणि त्यामुळे त्यांची उत्पादकता कमीच ठरते. देशातील बहुतेक शेतकरी हे लहान-मध्यम शेतकरी आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. मोठे शेतकरी भरपूर यांत्रिकीकरण करत असल्यामुळे त्यांची गुंतवणूक सरासरी कमी भरते. त्यामुळे एकच किंमत दोघांच्याही पिकांनी दिली तर त्या किमान किमतीचा फायदा 5-6 % श्रीमंत शेतकऱ्यांनाच होतो. दुसरीकडे हवामान बदलांमुळे शेतीचे नुकसानही वाढले आहे आणि 25% पर्यंत नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा बदलांचा फटकाही निश्चितपणे लहान शेतकऱ्यांनाच जास्त बसतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची सरकारी घोषणा सुद्धा खरेतर फक्त श्रीमंत शेतकऱ्यांच्याच हितासाठी आहे!

ग्रामीण भागातील जनतेला तुटपुंजा रोजगार मिळावा म्हणून 'मनरेगा' ही योजना मनमोहन सिंह सरकारच्या काळापासून राबवली जात आहे. वर्षातील फक्त 100 दिवस रोजगाराची हमी या योजनेत आहे. या योजनेत काम केलेल्या अनेक लोकांचे पगार गेल्या वर्षीपासूनच थकलेले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत महागाई वाढली आहे आणि सरकारच्या बजेटचा आकारही जवळपास 9 टक्के वाढला आहे. तरीही या योजनेसाठीची तरतूद मात्र तेवढीच ठेवण्यात आली आहे. ग्रामीण मजूरांचे थकलेले पगार देण्याची किंवा जास्त रोजगार निर्माण करण्याची सरकारची इच्छा नाहीये हे स्पष्ट आहे.

### इतर योजना आणि खर्चाच्या तरतूदी

'पेयजल आणि स्वच्छता मंत्रालया'कडून गेल्या वर्षी 24,011 कोटी रुपये खर्च झाल्याचा अंदाज आहे. तरीही या वर्षी या विभागाचे बजेट कमी करून 22,357 कोटींवर आणले आहे. बहुतेक देशातील जनतेने स्वच्छ पाणी न पिता अजून आजारी पडावे आणि मग खाजगी विमा कंपन्यांसाठी बनवलेल्या आरोग्य विमा योजनेते खेटा घालून मरावे असे नियोजन असावे.

बजेटमध्ये संरक्षणाच्या बजेट मध्ये भरघोस वाढ करण्यात आली आहे. संरक्षणावरचा खर्च 8 टक्के वाढला आहे आणि तो 4.04 लाख कोटींवर गेला आहे. इथेही विसरता कामा नये एका बाजूला सेनेतील जवान व्हिडिओ बनवून सांगत आहेत की किती निकृष्ठ दर्जाचे जेवण त्यांना पुरवले जाते आणि दुसरीकडे **राफायेल विमानाच्या घोटाळ्याची चर्चा होत आहे. 54,000 कोटींची विमान खरेदी होत आहे. सरकार 'संरक्षणाचे' कारण देत विमानाची किंमत सांगायला तयार नाहीये. वाढलेले बजेट कुठे जात आहे हे सांगायला नको.**

खर्चात सर्वाधिक वाढ झालेल्या विभागांमध्ये आहे रस्ते आणि महामार्ग बांधणी. 61,000 कोटींवरून 71,000 कोटींवर या विभागाचे उड्डाण चालू आहे. आज रस्ते बांधणीचे बहुतांश काम खाजगीकरणाच्या माध्यमातूनच होत आहे. त्यामुळे देशातील हजारो कोटींचे मालक असलेले मोठमोठे बिल्डर, ठेकेदार, बांधकाम क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्याच खिशात हे पैसे जाणार आहेत. या खर्चात

तर वाढ झालीच पाहिजे नाही का? आरोग्य योजनेला 2,000 कोटी आणि रस्ते बांधणीत 10,000 कोटींची वाढ. यातूनच सरकारचा प्राधान्यक्रम लक्षात येतो.

मध्यमवर्गीय महिलांसाठी घोषणा करताना जेटलींनी म्हटले की त्यांच्या उत्पन्नाच्या 12 टक्के रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जाण्याऐवजी फक्त 8 टक्के रक्कम घेतली जाईल जेणेकरून त्यांच्या हातात जास्त पगार पडेल. थोडक्यात सरकारने स्वत:च्या खिशातून काहीही न देता, तुमचेच पैसे तुमच्या हातात ठेवले आहेत आणि स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे!

या वर्षी देशातील महिलांच्या स्थितीचा 'गौरव' करण्यासाठी आर्थिक सर्वेक्षण अहवाल गुलाबी रंगाच्या कव्हरसह छापण्यात आला आहे. 17 पैकी 12 निकषांवर महिलांची स्थिती कशी सुधारली आहे याचे अहवाल गौरवगान गातो. पण महिलांच्या स्वावलंबनासाठी आवश्यक असलेल्या सर्वात महत्वाच्या घटकात, म्हणजे रोजगारात घट झाली आहे. 2005-06 मधील 36.3 टक्क्यांवरून 2015-16 पर्यंत 24 टक्यांवर हा आकडा आला आहे. थोडक्यात घरात बांधल्या जाणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ झाली आहे. पण हा आकडा बेरोजगारी मध्ये मोजलाच जात नाही कारण सरकार बेरोजगार त्यांनाच मानते जे रोजगार 'शोधत' आहेत.

जनतेसाठी सर्वात जिव्हाळ्याचा अजून एक विषय म्हणजे शिक्षण. शिक्षणावर सर्वात कमी सरकारी खर्च करणाऱ्या देशांमध्ये भारत आहे. 1966 सालापासून कोठारी आयोगाची शिफारस आहे की सरकारने राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6 टक्के शिक्षणावर केला पाहिजे (राष्ट्रीय उत्पन्न हे बजेटच्या जवळपास 7 ते 8 पट जास्त आहे). आजपर्यंत बजेटचा 3 ते 4 टक्क्याच्या वर हा खर्च कधीच गेला नाही. बजेटचा आकार 8 टक्के वाढलाय, पण शिक्षणावरील खर्चात फक्त 3.8 कोटींची वाढ झाली आहे. यातही गोम अशी की भाजप सरकार 2014 साली सत्तेवर आले. त्यांनी पहिल्याच बजेट मध्ये शिक्षणावरील खर्चात 16.6 टक्के कपात केली होती! त्यांनी 82,771 कोटींचे शिक्षण बजेट अचानक 69,075 कोटींवर नेऊन ठेवले होते. त्यानंतर थोडे थोडे वाढवत आता पूर्वीच्या स्तराला बजेट आले आहे. **अगोदर तुमच्या खिशातला रुपया मारला, आणि आता चार आणे खिशात टाकून काहीतरी दिल्याचा आव सरकार आणत आहे.**

थोडक्यात, बजेटबद्दल काही सोपी तथ्य आपण समजून घेतली पाहिजेत. पहिली ही की, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये सरकारं भांडवलदारांची सेवा करण्यासाठीच असतात, त्यामुळे प्रत्येक बजेट हे श्रीमंत, मध्यम वर्गासाठीच असते, गरीबांसाठी नाही. दुसरी ही की गरीबांसाठी म्हणून आखल्या जाणाऱ्या योजनासुद्धा गरीबच असतात. गरीबांनी गरीब रहावे, मरू नये एवढ्यासाठीच त्या योजना असतात. तिसरी ही की योजना असली तरी सरकार ती तुमच्या पर्यंत पोहोचावी म्हणून काहीच करत नाही, कारण गरीबांसाठी काही करावे असे वरपासून खालपर्यंत कोणालाच वाटत नाही. आता एवढे असूनही तुमच्यापर्यंत अशा भंगार योजनांची माहिती पोहोचली तरी सरकारी ऑफिसपर्यंत खेटा मारून तुमचा जीव निघून जातो आणि डोंगर पोखरून उंदीर सापडावा एवढे पैसे तुम्हाला मिळतात. **जनतेच्या खिशातून वसूली करून कल्याणकारी योजनांच्या नावाने जनतेच्याच तोंडाला पाने पुसण्याचे आणि मोठमोठ्या कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचे काम बजेटमधून केले जाते. देशाचे खरे मालक कोण आहेत हे समजायचे असेल तर बजेट नक्कीच समजून घ्यायला पाहिजे.**

# जनतेसाठी बनवलेल्या कायद्यांना कमजोर करण्याचे षडयंत्र

**(पान 18 वरून)**

जनतेचे अधिकार हिसकावून घेतले जात आहेत.

सरकार आणि प्रशासन हे सुद्धा जाणतात की सर्व अधिकार एकदम हिरावून घेतले तर लोक बंड करतील म्हणून ते अधिकार हळूहळू काढून घेतात आणि अधिकार काढताना सुद्धा जनतेमध्ये जातीय आणि धार्मिक भांडणं लावून देतात. जसे आता अॅट्रोसिटी कायद्यासंदर्भात होत आहे. जनतेला दलित आणि गैर-दलितांमध्ये वाटले जात आहे. आजही अॅट्रोसिटी होतात त्यात सर्वाधिक आणि सर्वात क्रूर अत्याचार भूमिहीन, गरिबांवरच जास्त होतात. अॅट्रोसिटी कायद्यात होत असलेले बदल हे फक्त दलितांविरोधातील बदल नसून त्यांचे एक वर्गीय चरित्र सुद्धा आहे. भांडवलशाही नग्नपणे कामगारांचे अधिकार तुडवत असताना अॅट्रोसिटी कायद्यात बदल होणे आवश्यकच ठरते. हे लक्षात ठेवले पाहिजे की जर ते आज जनतेच्या एका हिश्श्यासाठी आले असतील तर उद्या आपल्यासाठी सुद्धा नक्की येतील. भारतातील भांडवली राज्यसत्ता (सरकार आणि पोलीस-प्रशासन) अगदी स्पष्टपणे गरीब विरोधी, दलित विरोधी आणि महिला विरोधी आहेत. म्हणजे या भांडवली राज्यसत्तेचे एक जातीय चरित्र आहे आणि लैंगिक चरित्र आहे. आता तर या व्यवस्थेवर फॅसिस्ट राज्य करत आहेत. तेव्हा जनतेचे अधिकार काढून घेणाऱ्या सर्व बदलांना त्यामुळेच आपण सर्वांनी एकजुटीने विरोध करणे आवश्यक आहे.

## जगाच्या पाठीवर

### अमेरिकेच्या पाठिंब्याने इस्त्रायली झायोनिस्टांकडून निर्दोष पॅलेस्तिनींची हत्या

# पॅलेस्तिनी लोकांचा झंझार स्वातंत्र्यलढा चालूच!

✍ अभिजित

जगाच्या विरोधाकडे दुर्लक्ष करत 14 मे 2018 रोजी अमेरिकेने आपला दूतावास जेरुसलेमला हलवला. यावेळी निशस्त्र पॅलेस्तिनी लोक आपल्या भूभागातून निदर्शने करत होते. ज्यावेळी दुतावासाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम धुमधडाक्यात चालू होता, त्याच वेळी इस्त्रायली फौज निर्दोष पॅलेस्तिनी लोकांवर नेम धरून गोळ्या चालवत होती. 14 मे रोजी 50 पेक्षा जास्त पॅलेस्तिनी नागरिक मारले गेले आणि शेकडो घायाळ झाले. गेली अनेक वर्षे अशाच प्रकारे अमेरिकेच्या पाठिंब्याने इस्त्रायली सैन्याने हजारो पॅलेस्तिनींना मारून टाकले आहे. हे सर्व चालू आहे ते साम्राज्यवादी अमेरिकेच्या पाठिंब्यानेच. त्यामुळेच जगातील सर्व न्यायप्रिय व्यक्ती, देश पॅलेस्तिनी जनतेच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा देतात. संयुक्त राष्ट्रांनी अमेरिकेच्या दुतावास हलवण्याच्या निर्णयाचा सुद्धा निषेध केला आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून जगभरामध्ये उजव्या आणि फॅसिस्ट विचाराच्या लोकांची वाढती साथ इस्त्रायलला मिळत आहे, ज्यामध्ये भारताचे मोदी सरकारही सामील आहे. पॅलेस्तिनी स्वातंत्र्याचा प्रश्न आज जगभरातील सर्व क्रांतिकारकांसाठी एक महत्वाचा प्रश्न आहे.

**काय आहे इस्त्रायल-पॅलेस्ताईनचा प्रश्न आणि जगाच्या राजकारणात तो इतका महत्वाचा का आहे? जगभरातील भांडवलदारांच्या ताब्यातील मुख्य प्रसारमाध्यमे सतत इस्त्रायलच्या बाजूने लिहिण्याचा किंवा पॅलेस्तिनी बाजू लपवण्याचा प्रयत्न करत असतात. खरेतर जगातील सर्वाधिक हिंमती आणि चिवट असा स्वातंत्र्यलढा पॅलेस्ताईनमधील लोक गेली सात दशके लढत आहेत.**

### पॅलेस्ताईनच्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सध्या ज्या भागाला इस्त्रायल-पॅलेस्ताईन म्हणून ओळखले जाते, त्याला गेल्या 2,000 वर्षांपेक्षा जास्त काळ (1949 पर्यंत) पॅलेस्ताईन या नावानेच ओळखले जात होते. आज इस्त्रायली ज्यू आणि पॅलेस्तिनी अरब (यांच्यामध्ये प्रामुख्याने मुस्लिम, आणि शिवाय ख्रिश्चन व ड्रुझे अशा तीन धर्मांचे लोक सामील आहेत) दोन्ही या भागावर आपला दावा सांगत आहेत. येथील सर्वात महत्वाचे असलेले जेरुसलेम (आणि बेथलहम सुद्धा) हे शहर ऐतिहासिकरित्या जगातील ख्रिश्चन, ज्यू आणि मुस्लिम या तीन एकेश्वरवादी धर्मांसाठी 'पवित्र भूमी' मानले जाते आणि तिन्ही धर्मांचे लोक या शहरावर दावा करतात. या दाव्याची धार्मिक बाजू अशी की बायबल मध्ये अब्राहम आणि त्याच्या वंशजांना दिलेल्या वचनाच्या आधारे आणि इस्त्रायल व ज्युडीया या प्राचीन ज्यू साम्राज्याची ही भूमी असल्याचा दाखला देत ज्यू लोक या जमिनीवर दावा सांगतात. पॅलेस्तिनी अरब शेकडो वर्षांपासून येथे रहात आलेत आणि 1948 पर्यंत या भागात त्यांच्याच लोकसंख्येचे बहुमत होते, या आधारावर तेही आपला दावा सांगतात. अरबांचे असे म्हणणे आहे की अब्राहमचा मुलगा इश्माईल हा अरबांचा मूळ पुरुष आहे आणि त्यामुळे देवाने अब्राहमच्या मुलांना दिलेले वचन अरबांना सुद्धा लागू होते. धार्मिक बाजू असली आणि ज्यू धर्माचा उदय पॅलेस्ताईनच्या भूमीवर झालेला असला तरी ज्यू लोक व्यापार-उदिमामुळे गेल्या 2,000 वर्षांमध्ये जगभरात विविध ठिकाणी पसरले आणि तेथेच स्थायिकही झाले. मोठ्या प्रमाणात ते युरोपातही गेले. **पॅलेस्ताईनमध्ये बहुसंख्य अरबच गेली 2,000 वर्षे रहात आले आहेत. तेथे राहणाऱ्या थोड्या ज्यू लोकांचा जमिनीशी असलेला लगाव हा धार्मिक होता, राष्ट्रीय नाही. विसाव्या शतकात जेव्हा जगभरात 'राष्ट्र' संकल्पना विकसित होत होती, तेव्हा ज्यू लोकांचे स्वतंत्र राष्ट्र असावे या कल्पनेला धरून झायोनिस्ट चळवळीचा उगम युरोपात झाला. ज्यू धर्माचा उदय पॅलेस्ताईनमध्ये झाला त्यामुळे तेथेच हे राष्ट्र वसवले जावे अशी त्यांची मागणी बनली. झायोनिझमच्या विचाराला जगभरात पसरलेल्या ज्यू जनतेकडून खूप काळापर्यंत मोठा पाठींबा नव्हता.**

### पॅलेस्ताईनमध्ये ब्रिटीश राज्य

पॅलेस्ताईनचे भौगोलिक स्थान पाहता, खनिज तेल बहुल अशा मध्यपूर्व आशियातील तेलाच्या साठ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जगभरातील साम्राज्यवादी देशांचा या भागामध्ये नेहमीच स्वार्थी रस राहिला आहे. पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटनने आपल्या साम्राज्यवादी धोरणांना अनुसरून ऑटोमन साम्राज्यातील अरबांच्या एका गटाला खोटे आश्वासन देऊन आपल्या बाजूने लढवले, पण युद्धानंतर फ्रांस सोबत हातमिळवणी करून पॅलेस्ताईनच्या भूमीवर आपला कब्जा स्थापित केला. याचवेळी आपल्या साम्राज्यवादी हितांसाठी फोडा आणि राज्य करा नितीचा अवलंब करत 1917 मध्ये ब्रिटीश विदेशमंत्री लॉर्ड आर्थर बाल्फोर यांनी एक घोषणापत्र (बाल्फोर्ड घोषणापत्र) प्रकाशित केले. ज्यामध्ये 'पॅलेस्ताईनमध्ये स्वतंत्र ज्यू राष्ट्राची स्थापना' करण्यास समर्थन देण्यात आले. **याच काळात युरोपातून ज्यूंचे हळूहळू**

**पॅलेस्ताईनमध्ये स्थलांतर चालू झाले व जमिन खरेदी वाढत गेली. त्यांच्या स्थायिक होण्याला पॅलेस्ताईनमधील शेतकरी, पत्रकार आणि राजकीय व्यक्तींचा विरोध वाढत होता.** यानंतर 1948 पर्यंत लोकसंख्या वाढत असलेल्या ज्यू आणि पॅलेस्तिनी लोकांमध्ये काही संघर्ष चालूच राहिले, ज्यात दोन्ही बाजूच्या लोकांचे बळी गेले.

### इस्रायलची स्थापना

जर्मनीमध्ये 1933 मध्ये हिटलर सत्तेवर आल्यानंतर त्याने ज्यूंचे हत्याकांड चालू केले. यामुळे ज्यूंचे पॅलेस्ताईनमध्ये देशांतर, जमीन खरेदी आणि स्थायिक होणे मोठ्या प्रमाणात वाढले. 1936-39 दरम्यान ब्रिटिश ताबा आणि झायोनिस्ट वसाहतींच्या विरोधात अरबांचा उठाव झाला. या उठावाला ब्रिटिशांनी झायोनिस्ट लोकसेनेच्या मदतीने आणि शेजारील अरब राष्ट्रांच्या निष्क्रियतेच्या सहाय्याने मोडून काढले. अरब बंडाला मोडून काढल्यानंतर, वाढत्या तणावाच्या वातावरणात व्यवस्था चालू ठेवण्यासाठी, ब्रिटिशांनी आपल्या धोरणांचा पुनर्विचार केला व 1939 मध्ये एक श्वेतपत्रिका प्रकाशित केली. त्यांनी श्वेतपत्रिकेद्वारे भविष्यात ज्यूंचे देशांतर आणि जमिन खरेदीवर मर्यादा आणण्याची, तसेच दहा वर्षांमध्ये (पॅलेस्तिनी) स्वातंत्र्याची घोषणा केली. यामुळे अरब-बहुल स्वतंत्र पॅलेस्ताईन देश बनला असता.

1946 साली ब्रिटिश ताब्यातील पॅलेस्ताईनमध्ये 12,69,000 अरब आणि 6,08,000 ज्यू रहात होते. ज्यूंकडे खरेदीच्या मार्गाने एकून जमिनीच्या 7% आणि शेतीयोग्य जमिनीच्या 20% जमिन होती. म्हणजे 2/3 लोक अरब होते आणि ते बहुसंख्य जमिनीचे मालक होते. दुसऱ्या महायुध्दानंतर ब्रिटीशांनी पुन्हा एकदा धोका देत पॅलेस्ताईन वरचा अधिकार सोडून देण्याचे ठरवले आणि नुकत्याच बनलेल्या संयुक्त राष्ट्रांवर पॅलेस्ताईनचे भविष्य ठरवण्याची जबाबदारी सोपवली. संयुक्त राष्ट्रामध्ये तोपर्यंत जगातील महासत्ता बनलेल्या अमेरिकेचे वर्चस्व स्थापन झालेले होते आणि अमेरिकेला आपल्या साम्राज्यवादी हितांच्या रक्षणासाठी अरब राष्ट्रांवर नियंत्रण ठेवू शकेल अशा निष्ठावान सत्तेची गरज निर्माण झाली होती. या राजकारणातून 29 नोव्हेंबर 1947 रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने पॅलेस्ताइनची ज्यू आणि अरब देशांमध्ये फाळणी करण्याचा निर्णय घेतला. फाळणी अशा पद्धतीने करण्यात आली की प्रत्येक देशात तेथील लोकांचे बहुमत असेल, परंतु अरब राष्ट्रामध्ये काही ज्यू वसाहती राहतील आणि प्रस्तावित ज्यू राष्ट्रामध्ये मात्र शेकडो हजार अरब राहतील. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेनुसार जेरुसलेम आणि बेथलहम हे आंतरराष्ट्रीय प्रभाग बनणार होते. **पॅलेस्तिनी अरबांकडून त्यांचा देश काढून घेण्याचाच हा ठराव होता आणि पॅलेस्तिनी जनतेला तो नक्कीच मान्य नव्हता.**

झायोनिस्ट नेतृत्वाने सार्वजनिकरित्या तरी संयुक्त राष्ट्रांची योजना मान्य केली, परंतु काही करुन ज्यू राष्ट्राच्या सीमा वाढवता येतील अशी ते आशा ठेवून होते. पॅलेस्तिनी लोकांनी आणि आसपासच्या अरब देशांनी संयुक्त राष्ट्रांची योजना नाकारली आणि संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेतील मतदानाला आंतरराष्ट्रीय विश्वासघात मानले. संयुक्त राष्ट्रांची फाळणी योजना लागू झाल्याच्या काही दिवसातच पॅलेस्ताईनच्या अरब आणि ज्यू रहिवाशांमध्ये लढाई चालू झाली. अरबांच्या लष्करी शक्तीचे संघटन, प्रशिक्षण आणि शस्त्रसज्जता कमजोर होती. याउलट झायोनिस्ट लष्कर संख्येने लहान असले तरी अमेरिका आणि ब्रिटनच्या मदतीने सुसंघटीत, प्रशिक्षित आणि शस्त्रसज्ज होते. **एप्रिल 1948 पर्यंत झायोनिस्ट सेनेने संयुक्त राष्ट्रांनी दिलेल्या जवळपास सर्व भूमीवर कब्जा केला होता आणि अनेक ठिकाणी फाळणीने आखलेल्या सीमेपलीकडे जाऊन भूभाग ताब्यात घेणे त्यांनी चालू केले होते.**

15 मे 1948 रोजी ब्रिटीशांनी पॅलेस्ताईन सोडले आणि झायोनिस्ट नेत्यांनी इस्रायल राष्ट्राची घोषणा केली. शेजारच्या अरब राष्ट्रांनी (इजिप्त, सिरिया, जॉर्डन आणि इराक) पॅलेस्ताईनचे झायोनिस्टांपासून "रक्षण" करण्याच्या नावाखाली इस्रायलवर हल्ला केला. यात त्यांचेही भू-आर्थिक स्वार्थ गुंतलेलेच होते. परंतु शस्त्रांच्या पुरवठ्याच्या जोरावर इस्रायली सैन्याने आपले प्रभुत्व स्थापन केले आणि संयुक्त राष्ट्रांच्या योजनेने आखून दिलेल्या सीमारेषेपलीकडे जाऊन भूभाग ताब्यात घेतला. 1949 साली तह झाला आणि युद्ध संपले. पॅलेस्ताईनच्या प्राचीन भूमीचे आता तीन तुकडे झाले होते. इस्रायलकडे जवळपास 77% भूभाग आला. जॉर्डनने पूर्व जेरुसलेम आणि मध्य पॅलेस्ताईनचा टेकडी प्रदेश म्हणजे वेस्ट बँक व्यापला. इजिप्तने गाझा शहराभोवतालच्या किनारी प्रदेशावर (गाझा पट्टी) नियंत्रण कायम केले. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेत कल्पिलेले 'पॅलेस्तिनी अरब राष्ट्र' कधीच अस्तित्वात आले नाही. युद्धादरम्यान जवळपास 7 लाख पॅलेस्तिनी लोक शेजारील विविध अरब देशांमध्ये निर्वासित झाले.

1949 च्या शस्त्रसंधी मुळे इस्रायल, आणि ब्रिटीश ताब्यातील पॅलेस्ताईनचे वेस्ट बँक व गाझापट्टी हे भाग, राजकीय दृष्ट्या वेगळे झाले. 1948-1967 दरम्यान जेरुसलेम सहीत वेस्ट बँकवर जॉर्डनचे राज्य होते. जॉर्डनने या भागाला 1950 मध्ये स्वत:मध्ये समाविष्ट केले आणि तेथे राहणाऱ्या पॅलेस्तिनी नागरिकांना जॉर्डनचे नागरिकत्व दिले. याच काळात गाझापट्टी इजिप्तच्या लष्करी प्रशासनाखाली होती.

### जून 1967 चे युद्ध

सिरिया, इजिप्त, लेबनन अशा अरब राष्ट्रांचा पॅलेस्तिनी लोकांच्या लढ्याला काही प्रमाणात पाठींबा राहिला आहे. यात काही प्रमाणात अरब राष्ट्रवादाचा प्रभाव आहे तर काही प्रमाणात या अरब राष्ट्रांचे स्वत:चे हितसंबंधही आहेत. 1956 साली इजिप्तने (ब्रिटनच्या ताब्यातील) सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर इस्त्रायलने ब्रिटनला साथ देत इजिप्तवर हल्ला केला आणि गाझापट्टी ताब्यात घेतली, पण आंतरराष्ट्रीय दबावामुळे इस्त्रायलला शस्त्रसंधी रेषेपर्यंत माघार घ्यावी लागली. 1960च्या सुरुवातीच्या काळात मात्र अमेरिका आणि सोविएत रशियामधील जागतिक सत्ता आणि प्रभावाच्या स्पर्धेत हा भाग शितयुद्धाचे महत्वाचे केंद्र बनला होता.

सिरिया सोबत असलेला सैनिकी आणि राजनैतिक संघर्ष वाढत गेला आणि 5 जून 1967 रोजी इस्त्रायलने इजिप्त व सिरियावर हल्ला चढवला आणि काही तासातच त्यांच्या हवाई दलाचा जमिनीवरच नाश केला. थोड्या उशिराने जॉर्डन सुद्धा युद्धात सामील झाले आणि त्यामुळे इस्त्रायलने त्याच्यावर सुद्धा हल्ला चढवला. सहा दिवसांच्या युद्धात इजिप्त, जॉर्डन आणि सिरीयन सैन्याचा निर्णायक पराभव झाला आणि इस्त्रायलने पॅलेस्ताईनचा भाग असलेले वेस्ट बँक (जॉर्डनकडून ), सिनाई द्वीपकल्प व गाझा पट्टी (इजिप्तकडून), आणि गोलन हाईट्स (सिरीयाकडून) जिंकून घेतले.

## संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा ठराव 242

1967 च्या युद्धानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेने ठराव 242 मंजूर केला. या ठरावाने अतिशय संदिग्ध भाषेमध्ये इस्त्रायलला "ताकदीच्या जोराने भूमीवर कब्जा करण्यास मनाई" केली, इस्त्रायलने युद्धात बळकावलेल्या भूमीवरचा ताबा सोडावा अशी मागणी केली. पॅलेस्तिनी लोकांनी अनेक वर्षे ठराव 242 नाकारला कारण या ठरावाने त्यांच्या राष्ट्रीय स्वनिर्णयाच्या अधिकाराला आणि मायदेशी परतण्याला मान्यता मिळत नाही. ठरावाने फक्त निर्वासितांच्या "योग्य पुनर्वसनाचे" आवाहन केले, म्हणजे पॅलेस्तिनी लोकांना निर्वासित ठरवले, एक वसाहतिक राष्ट्र नाही. ठराव 242ने या भागातील सर्व देशांच्या अस्तित्वाला मान्यता देताना इस्त्रायलला पॅलेस्तिनी मान्यता असल्याचे तर मानले, परंतु पॅलेस्तिनी राष्ट्रीय हक्कांना मान्यता मात्र दिली नाही.

## 1967 ते कॅंप डेव्हिड

1967 नंतर, विविध राजकीय आणि सैनिक गटांनी बनलेल्या पॅलेस्ताईन स्वतंत्रता संघटनेच्या (पॅलेस्ताईन लिबरेशन ऑर्गनायझेशन, पीएलओ) रुपाने पॅलेस्तिनी राष्ट्रीय चळवळ एक प्रमुख शक्ती म्हणून समोर आली. यासर अराफत हे 1968 पासून ते 2004 मध्ये मृत्यू होईपर्यंत पीएलओचे अध्यक्ष होते. ते फताह या सर्वात मोठ्या गटाचेही नेते होते. इतर मुख्य गटांमध्ये पॅलेस्ताईनच्या मुक्तीसाठी लोकप्रिय आघाडी (पॉप्युलर फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्ताईन, पीएफएलपी), पॅलेस्ताईनच्या मुक्तीसाठी लोकशाही आघाडी (डेमोक्रॅटीक फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्ताईन, डीएफएलपी), आणि इस्त्रायलने कब्जा केलेल्या प्रदेशामध्ये पॅलेस्ताईन जनता पक्ष (पॅलेस्ताईन पिपल्स पार्टी, पीपीपी, पूर्वीचा कम्युनिस्ट पक्ष) यांचा समावेश होतो.

1967 नंतर जवळपास 2-3 दशके जॉर्डन, लेबनन, ट्युनिशिया येथून पीएलओने आपल्या कारवाया चालू ठेवल्या. 1993 पर्यंत इस्त्रायलने पीएलओ सोबत बोलणी करण्यास नकार दिला. या दरम्यान 1973 साली इजिप्त आणि इस्त्रायलमध्ये झालेल्या छोट्या युद्धानंतर गोलन हाईट्स व सिनाई द्वीपकल्पातून, अमेरिकेच्या मध्यस्तीने इस्त्रायलने माघार घेतली. यानंतर कॅंप डेव्हिड येथे चर्चा होऊन 1979 साली शांतता तह झाला, ज्यात गाझापट्टीतील पॅलेस्तिनींना 5 वर्षे स्वायतत्ता देण्याचे व नंतर अंतिम बोलणी करण्याचे ठरले; पण यावर काही अंमलबजावणी झाली नाही. इजिप्तला दिलेली आश्वासने इस्त्रायलने पाळली, पण पॅलेस्तिनींच्या तोंडाला मात्र पाने पुसली.

## पहिला इंतिफादा

डिसेंबर 1987 मध्ये वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तिनी लोकांनी इस्त्रायली कब्जाविरोधात प्रचंड मोठा उठाव केला. हा उठाव, किंवा इंतिफादा (ज्याचा अरबी भाषेतील अर्थ 'हलवून टाकणे' असा आहे) पीएलओने चालू केलेला किंवा घडवून आणलेला नव्हता. हा जनतेचा स्वत:स्फूर्त उठाव होता. इंतिफादा मध्ये आंदोलनाचा अनुभव नसलेले अनेक लोक, लहान मुलं आणि कुमारवयीनांसहित लाखो लोक सामील होते. **लोकांनी मोठमोठी निदर्शने, सार्वत्रिक संप, कर भरण्यास नकार, इस्त्रायली उत्पादनांचा बहिष्कार, राजकीय भित्तीचित्रे आणि भूमिगत 'स्वातंत्र्य शाळांची' स्थापना (कारण चळवळीला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने नियमित शाळा बंद करुन टाकल्या होत्या), दगड फेकणे, पेट्रोल बॉंब (मोलोटोव्ह कॉकटेल), आणि इस्त्रायली सैन्याच्या हालचालींना अडथळे निर्माण करणे असे मार्ग अवलंबले.** व्यापक आधारावर उभ्या असलेल्या चळवळीमुळे वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तीनींकडे अभूतपूर्व असे आंतरराष्ट्रीय लक्ष वेधले गेले आणि इस्त्रायलने केलेल्या कब्जाला अगोदर कधी नव्हे असे कडवे आव्हान उभे राहिले.

संरक्षण मंत्री यित्झाक राबीन यांच्या नेतृत्वाखाली इस्त्रायलने "सक्ती, शक्ती आणि हल्ले" यांच्या सहाय्याने इंतिफादाला चिरडून टाकण्याचे पूर्ण प्रयत्न केले. सैन्याच्या अधिकाऱ्यांनी

जवानांना निदर्शकांची हाडं तोडण्याचे आदेश दिले. 1987 ते 1991 या काळात इस्त्रायली सैन्याने 1,000च्या वर पॅलेस्तिनींना ठार केले, ज्यामध्ये 200 जण 16 वर्षाखालील होते. इस्त्रायलने मोठया प्रमाणात अटकसत्रही आरंभले. या काळात जगातील दरमाणशी सर्वाधिक कैदी इस्त्रायलमध्ये होते. या दरम्यान इस्त्रायलने एकेका माणसाला हेरून गुप्तपणे खून करण्याचेही मोठे सत्र चालवले.

इंतिफादाने हे तर स्पष्ट केले की 'जैसे थे' स्थिती चालणार नाही. यानंतर पॅलेस्ताईन राष्ट्रीय समितीने (पॅलेस्ताईन नॅशनल कौन्सिल, पीएलओचे नेतृत्व करणारा गट) अल्जिरियात 1988 मध्ये बैठक केली, वेस्ट बँक आणि गाझापट्टीमध्ये पॅलेस्ताइनचे स्वतंत्र राष्ट्र घोषित केले, पण यासोबतच इस्त्रायलचे अस्तित्व मान्य केले आणि सशस्त्र लढ्याचा त्याग केला. पीएलओने द्विराष्ट्र सिद्धांत मान्य करून केलेली ही ऐतिहासिक तडजोड होती. यानंतर 1991 साली झालेल्या आखाती युद्धात पीएलओने इराकला साथ दिली आणि इतर अरब राष्ट्रांना स्वत:पासून अजून दूर लोटत स्वत:ची स्थिती अधिक कमजोर करून घेतली.

यानंतर काही वॉशिंग्टन वाटाघाटी झाल्या, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. याच काळात फताहच्या विरोधात इस्लामिक मूलतत्ववादी हमास या संघटनेचा उदय पॅलेस्ताईनमध्ये झाला, ज्यांनी आक्रमक भुमिका घेत आत्मघाती हल्ले चालू केले.



***इस्त्रायल जगातील एकमेव देश आहे जो लहान मुलांविरुद्धही सैनिकी कायदा आणि शासन लागू करतो. दरवर्षी वय वर्षे 12 पासूनच्या जवळपास 500 ते 700 मुलांवर सैनिकी कोर्टांमध्ये खटले चालवले जातात***

**ऑस्लो करार**

जहालमतवादी इस्लामची भिती आणि वॉशिंग्टन वाटाघाटींच्या अनिर्णायक वाटचालीमुळे राबीन सरकारने पीएलओ सोबत वाटाघाटी न करण्याचे अनेक वर्षांचे धोरण बदलले. सप्टेंबर 1993 मध्ये वॉशिंग्टन येथे इस्त्रायल-पीएलओ तत्वांच्या घोषणापत्रावर सह्या झाल्या.

हा तत्वांचा जाहीरनामा इस्त्रायल आणि पीएलओने परस्परांना मान्यता देण्यावर आधारित होता. जाहीरनाम्यानुसार इस्त्रायलने गाझा पट्टी आणि जेरिको शहरातून माघार घेण्याचे कबूल केले आणि पाच वर्षांच्या अंतरिम काळात वेस्ट बँकच्या अनिर्देशित भागांमधून सुद्धा माघार घेण्याचे जाहीर केले. कळीचे मुद्दे — जसे इस्त्रायल किती भूभागावर कब्जा सोडेल, बनत असलेल्या पॅलेस्ताईनचे स्वरुप, इस्त्रायली वसाहती आणि तेथील नागरिकांचे भविष्य, पाण्यावरील हक्क, निर्वासितांच्या प्रश्नावर उपाय आणि जेरुसलेमची स्थिती — भविष्यातील अंतिम स्थितीच्या वाटाघाटींवर सोडण्यात आले. पॅलेस्तिनी जनतेसाठी कळीचे मुद्दे वगळणारा पण इस्त्रायलच्या अस्तित्वाला पुन्हा मान्यता देणारा ऑस्लो करार हे पीएलओने केलेल्या तडजोडींमधले पुढचे पाऊल होते.

इस्त्रायलने ज्या भागांमधून सैन्य हलवले त्या भागांमध्ये 1994 साली पीएलओने स्वयंशासनाचे (म्हणजे नगरपालिकेचे) अधिकार असलेल्या पॅलेस्तिनी प्राधिकरणाची (पॅलेस्तिनिअन अथोरिटी, पीए) स्थापना केली; पण या भागांवर सैनिकी नियंत्रण इस्त्रायलचेच राहिले. जानेवारी 1996 मध्ये पॅलेस्तिनी विधानसभा आणि पीएच्या अध्यक्षपदासाठी निवडणुका झाल्या, ज्या अनुक्रमे फताह आणि यासर अराफत यांनी सहज जिंकल्या. इस्लामिक जहालवादी आणि वेस्ट बँक व गाझा पट्टीतील काही स्थानिक नेत्यांनी अराफत यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करत या वाटाघाटींना नाकारले. हमासने आपले आत्मघाती हल्ल्यांचे सत्र चालू केले.

ऑस्लो प्रक्रियेच्या अंतरिम काळात इस्त्रायलच्या लिकुड आणि मजूर पक्षांच्या सरकारांनी इस्त्रायलव्याप्त प्रदेशामध्ये रस्त्यांचे जाळे विणण्याचे काम वेगाने पुढे नेले. या रस्त्यांमुळे इस्त्रायली वसाहतिकांना त्यांच्या वसाहतींमधून पॅलेस्ताईनमध्ये न जाता इस्त्रायलमध्ये जाणे शक्य होणार होते पण पॅलेस्तिनी जनतेचे जीवन आणि दैनंदिन प्रवास मात्र असह्य करून टाकला.

2000 सालापर्यंत इस्त्रायलने क्रमाक्रमाने घेतलेल्या

अंतरिम माघारीमुळे पॅलेस्तिनी प्राधिकरणाला 40% वेस्ट बँकवर आणि 65% गाझापट्टीवर पूर्ण किंवा अंशत: ताबा मिळालेला होता. पॅलेस्तिनी भूभाग हे इस्त्रायली भूभागांनी वेढलेले होते आणि प्रवेश व निकासावर इस्त्रायलचेच नियंत्रण होते.

जुलै 2000 मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी बराक आणि अराफत यांना कँप डेविड येथे खूप काळापासून अनिर्णित असलेल्या अंतिम स्थिती कराराला निष्कर्षाप्रत आणण्यासाठी आमंत्रित केले. परंतु पूर्व जेरुसलेम आणि गाझापट्टीच्या प्रश्नावर एकमत होऊ शकले नाही.

### दुसरा इंतिफादा (अल-अक्सा)

सप्टेंबर 2000 मध्ये दुसऱ्या इंतिफादाची ठिणगी पडली. निदर्शने, दगडफेक, आणि गोळीबाराच्या काही घटनांनंतर संपूर्ण वेस्ट बँक आणि गाझा पट्टीमध्ये निदर्शने आणि झडपांचे सत्रच चालू झाले.

दुसरा इंतिफादा पहिल्या पेक्षा जास्त रक्तरंजित होता. उठावाच्या पहिल्या तीन आठवड्यांमध्ये **इस्त्रायली पोलिसांनी निशस्त्र पॅलेस्तिनी निदर्शकांवर 10 लाख जिवंत काडतुसे डागली.** काही काळातच इस्त्रायलने बळाच्या वापरामध्ये रणगाडे, हेलिकॉप्टरभेदी बंदुका, आणि अगदी एफ-16 विमानेही सामील केली. इस्त्रायली सैन्याने पॅलेस्तिनी प्राधिकरणाच्या रामाल्लाह, गाझा आणि इतर ठिकाणी असलेल्या तळांवर हल्ले चढवले. नागरी वस्त्यांवर तोफगोळ्यांचा प्रहार आणि हवाई बाँबहल्ले करण्यात आले.

नोव्हेंबर 2000 मध्ये हमास व इस्लामिक जिहाद आणि नंतर पीएफएलपी व फताहशी संलग्न अल-अक्सा शहीद ब्रिगेडने आत्मघाती बाँबहल्ले व इतर लष्करी कारवाया चालू केल्या. ऑस्लो प्रक्रियेला विरोध असणाऱ्या इस्लामिक विरोधकांकडून 1993 ते 1999 च्या काळातील 22 घटनांच्या तुलनेत 2000 ते 2005 या काळात 150 च्या वर हल्ले झाले. यानंतर 2001 साली पॅलेस्तिनी-इस्त्रायली वाटाघाटी सुद्धा यशस्वी झाल्या नाहीत.

पुढील दशकात लिकुड पक्षाने इस्त्रायली राजकारणावर वर्चस्व गाजवले. या पक्षाच्या उदयामुळे ऑस्लो 'शांतता प्रक्रिया' व्यावहारिक दृष्ट्या पूर्णपणे थांबली कारण लिकुड पक्षाने ठामपणे पॅलेस्ताईन देशाचे अस्तित्व नाकारले आणि "भूप्रदेशीय तडजोड" करण्यास नकार दिला.

### 2002 ची अरब शांती योजना

2002 साली बैरुत येथे अरब लीगच्या संमेलनात लिबिया सोडून सर्व अरब देशांनी सौदी अरेबिया प्रस्तावित एका शांती योजनेचा प्रस्ताव दिला. अरब देशांनी इस्त्रायलचे अस्तित्व या योजनेद्वारे मान्य केले पण इस्त्रायलने या योजनेलाही भीक घातली नाही आणि वेस्ट बँक, गाझापट्टी व पूर्व जेरुसलेमसह पॅलेस्ताईनच्या प्रस्तावाला ठोकरून लावले.

### दुभाजक कुंपण

2002 साली इस्त्रायली पंतप्रधान शेरॉन यांनी इस्त्रायल आणि वेस्ट बँकला वेगळे करणाऱ्या एका कुंपणाच्या बांधकामाला परवानगी दिली. पॅलेस्तिनी लोक या कुंपणाला 'वर्णद्वेषी भिंत' म्हणतात. या कुंपणामुळे समुदायांचे दोन भागांमध्ये तुकडे झाले आहेत, अगदी एकाच गावातले किंवा शहरातले प्रवासाचे मार्गही बंद झाले आहेत आणि वेस्ट बँकचा भूगोल पूर्णत: बदलून गेला आहे. या कुंपणाचा 95 टक्के भाग हा इलेक्ट्रॉनिक तारा, गस्तीपथकांचे रस्ते आणि 300 मीटर पर्यंत रुंद असलेल्या रस्त्यांवर उभारलेले टेहळणी मनोरे आहेत. 5 टक्के भागावर 8 मीटर उंच काँक्रीटची भिंत आहे.

वेस्ट बँकमधील डझनावरी गावांनी त्यांची शेतजमीन इस्त्रायलने ताब्यात घेतल्याच्या विरोधात लोकलढा उभारला आहे. गावकऱ्यांनी निदर्शने चालू केली आणि बुलडोझर्सनी भिंतीचा पाया खणू नये म्हणूनही प्रयत्न चालू केले. त्यांनी झाडे तोडली जाऊ नयेत म्हणून स्वत:ला ओलिव्हच्या झाडांना साखळीने बांधून घेतले. जिथेजिथे तारांच्या स्वरुपात अडथळा होता तिथे तो तोडून टाकला, आणि जिथे भिंत होती तिथे भित्तीचित्रांच्या माध्यमातून विरोध प्रकट केला.

### 2006 मधील पॅलेस्तिनी निवडणूका आणि हमासचा उदय

जानेवारी 2005 मध्ये यासर अराफात यांच्या मृत्यूनंतर महमुद अब्बास यांची फताह पक्षाच्या समर्थनाने पॅलेस्तिनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. जानेवारी 2006च्या पॅलेस्तिनी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये हमासला 122 पैकी 77 जागा मिळून बहुमत मिळाले. दुसऱ्या जागी फताह होती. फताहच्या 41.43 टक्के मतांच्या तुलनेत हमासला 44.45 टक्के इतक्या कमी फरकाचे मताधिक्य होते.

हमासच्या विजयाच्या प्रत्युत्तरादाखल अमेरिका व इतर 3 बलाढ्य राष्ट्रांच्या चौकडीने पॅलेस्तिनी प्राधिकरणाची आर्थिक मदत बंद केली. इस्त्रायलने पी.ए.तर्फे वसूल केलेला कर-महसूल रोखून धरणे चालू केले. हा कर पीएच्या अंदाजपत्रकाच्या निम्म्या रक्कमेपेक्षा जास्त होता. त्यामुळे अगोदरच कमजोर असलेल्या पॅलेस्तिनी अर्थव्यवस्थेची स्थिती अजूनच बिघडली. वेस्ट बँकमधील 1,50,000 पेक्षा जास्त पॅलेस्तिनी लोक पीएच्या वेतनपटावर आहेत आणि हजारो निवृतांचे निवृत्तीवेतनही पीए कडूनच येते. 2006 नंतर अनेकदा पीए वेळेवर किंवा पूर्ण पगार देऊ शकलेली नाही.

निर्विवादपणे मुक्त वातावरणात झालेल्या निवडणुकांमध्ये

हमासला मिळालेल्या विजयाच्या वैधतेकडे दुर्लक्ष करत, अमेरिकेने महमुद अब्बास यांच्याशी एकनिष्ठ अध्यक्षीय रक्षकांची (प्रेसिडेंशीयल गार्ड) लढण्याची क्षमता वाढवण्याकरिता 8.4 कोटी डॉलर्सची मदत पुरवली. यानंतरच्या काळात अब्बास यांनी अनेकदा उघडपणे अमेरिका-इस्त्रायल धार्जिण्या भुमिका घेत व त्यांच्या मदतीने हमासची सत्ता पालटविण्याचे प्रयत्न केले आहेत.

**जेरुसलेम शहराचा प्रश्न**

संयुक्त राष्ट्रांच्या 1947च्या फाळणी योजनेने जेरुसलेमला आंतराष्ट्रीय क्षेत्र म्हणून प्रस्तावित केले. 1948 सालच्या अरब-इस्त्रायली युद्धामध्ये इस्त्रायलने पश्चिम जेरुसलेमचा ताबा घेतला आणि जॉर्डनने (ज्यू,मुस्लिम व ख्रिश्चन धर्मस्थळांचा समावेश असलेल्या) जुन्या शहरासहीत पूर्व जेरुसलेमचा. 1949 च्या शस्त्रसंधी रेषेने शहराचे दोन भाग केले.

जून 1967 मध्ये इस्त्रायलने जॉर्डनपासून पूर्व जेरुसलेम जिंकून घेतले आणि लगेचच इस्त्रायलमध्ये सामील केल्याची घोषणा केली. इस्त्रायलच्या दृष्टीने जेरुसलेम ही इस्त्रायलची 'कायमस्वरुपी राजधानी' आहे, पण आंतरराष्ट्रीय समुदायापैकी बहुसंख्येच्या दृष्टीने पूर्व जेरुसलेम इस्त्रायली कब्जा असलेल्या वेस्ट बँकचा भाग आहे आणि पॅलेस्तिनींच्या दृष्टीने पूर्व जेरुसलेम भविष्यातील पॅलेस्ताईन देशाची राजधानी आहे. त्यामुळेच अमेरिकेने जेरुसलेम मध्ये आपली राजधानी हलवण्याच्या निर्णयाचा जागतिक समुदायाने तीव्र निषेध केला.

**इस्त्रायलने बळकावलेल्या पॅलेस्तिनी प्रदेशातील स्थिती**

कब्जा केलेल्या वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तिनी नागरिकांवर शासन करण्यासाठी इस्त्रायलने लष्करी प्रशासनाची स्थापना केली. पॅलेस्तिनी लोकांना अनेक मुलभूत राजकीय अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटनेचे आणि प्रकाशनाचे असे अनेक नागरी स्वातंत्र्य नाकारण्यात आले. पॅलेस्तिनी राष्ट्रवाद हा इस्त्रायलच्या सुरक्षेला धोका आहे असे जाहीर करण्यात आले आणि अगदी पॅलेस्तिनी झेंडा फडकवणे सुद्धा शिक्षेस पात्र गुन्हा ठरवला गेला. पॅलेस्तिनी जीवनाच्या सर्व अंगांवर नियंत्रण आणि अनेकदा बंधने आली. हजारो एकर पॅलेस्तिनी जमिनींवर कब्जा करण्यात आला आहे आणि हजारो झाडे तोडण्यात आली आहेत.

वेस्ट बँक व गाझापट्टीत इस्त्रायली धोरणे आणि कृतींमध्ये संचारबंदी, घरे उध्वस्त करणे, रस्ते-शाळा-सामुदायिक संस्था बंद करणे अशा सामूहिक शिक्षांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला आहे. शेकडो पॅलेस्तिनी राजकीय कार्यकर्त्यांना जॉर्डन किंवा लेबननमध्ये निष्कासित करण्यात आले आहे. 1967 नंतर इस्त्रायलने कैद केलेल्या पॅलेस्तिनींची संख्या आता जवळपास 10 लाख झाली आहे. लाखो कैद्यांना तुरुंगात डांबले गेले आहे, काहींना खटल्याशिवाय (प्रशासकीय स्थानबद्धता), आणि बहुतेक जणांना इस्त्रायली लष्करी न्यायालयांकडून. 40% पेक्षा जास्त पॅलेस्तिनी पुरूष एकदातरी कैद झाले आहेत. 1971 नंतर पॅलेस्तिनी कैद्यांचा छळ नित्यनियमाचा झाला आहे. छळ किंवा दुर्लक्षामुळे डझनावरी लोकांचा कैदेत मृत्यू झाला आहे. इस्त्रायली अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की दहशतवादाला आळा घालण्यासाठी कडक कारवाई आणि मोठ्या प्रमाणात तुरुंगवास आवश्यक आहेत. इस्त्रायल जगातील एकमेव देश आहे जो जवळपास 500 ते 700 लहान पॅलेस्तिनी मुलांनाही सैनिकी शासन करतो!

2013 च्या पूर्वाधापर्यंत इस्त्रायलने पूर्व जेरुसलेम आणि वेस्ट बँकमध्ये 145 अधिकृत आणि जवळपास 100 अनधिकृत वसाहती 'आऊटपोस्ट' स्थापल्या आहेत आणि 5,60,000 ज्यू नागरिकांना तेथे वसवले आहे. परकीय भूमीच्या लष्करी कब्जासंदर्भात असलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांचे आणि चौथ्या जिन्हीवा कराराचे हे सरळ उल्लंघन आहे. अनेक वसाहती तर खाजगी मालकीच्या पॅलेस्तिनी जमिनींवर कब्जा करुन स्थापल्या आहेत.

1948 साली निम्यापेक्षा जास्त अरब लोकांनी पॅलेस्ताईन सोडण्याच्या घटनेला नक्बा म्हणतात. अलिकडच्या काळात इस्त्रायलमध्ये नक्बाचे स्मरण करणे बेकायदेशीर ठरवण्यात आले आहे

आंतरराष्ट्रीय दबावामुळे 2005 साली इस्त्रायली सरकारने गाझापट्टी रिकामी करण्याचा निर्णय घेतला आणि जवळपास 7,800 ज्यू स्थायिकांना इस्त्रायलमध्ये परत आणले. पण यानंतरही इस्त्रायलने गाझापट्टीमध्ये मालवाहतूक आणि लोकांच्या येण्याजाण्यावर, तसेच किनारपट्टी आणि हवाई क्षेत्रावर नियंत्रण कायम ठेवले आहे.

आज पॅलेस्तिनी नागरिक त्यांच्याच देशात निर्वासित आहेत. पॅलेस्तिनी भूमीची अवस्था नकाशात (2009 सालचा भाग) दाखवल्याप्रमाणे अतिशय छिन्नविछिन्न- इस्त्रायली भूमीतील काही तुकडे- अशी झाली आहे. देशातील एका भूभागातून दुसरीकडे जाण्यासाठी त्यांना इस्त्रायलचे परवाने काढावे लागतात.

आज जवळपास 14 लाख पॅलेस्तिनी लोक इस्त्रायलचे नागरिक आहेत आणि 1949 सालच्या शस्त्रसंधी सीमेच्या आत रहातात. हे पॅलेस्तिनी लोक इस्त्रायली लोकसंख्येच्या 20 टक्के भाग आहेत. इस्त्रायलमधील अरब लोकांचे स्थान हे दुय्यम नागरिकाचे आहे कारण इस्त्रायल स्वत:ची ओळख ज्यू-राष्ट्र व ज्यूंचे राष्ट्र म्हणून करुन देतो. 26 लाख लोक वेस्ट बँक मध्ये राहतात (यात पूर्व जेरुसलेम मधील 2 लाख सामील आहेत) आणि 16 लाख गाझा पट्टी मध्ये राहतात.

राहिलेले जवळपास इतर 56 लाख विस्थापित पॅलेस्तिनी लोक त्यांनी मानलेल्या पॅलेस्ताईनच्या राष्ट्रीय भूमीला सोडून इतर देशांमध्ये राहतात.

**पॅलेस्तिनी प्रश्नाची वर्गीय बाजू**

पॅलेस्तिनी लोकांची बाजू घेणारी माध्यमे सुद्धा पॅलेस्तिनी प्रश्नाला असलेली वर्गीय बाजू विसरतात. पॅलेस्तिनी लोकांमध्ये सुद्धा कष्टकरी आणि उत्पादन साधनांच्या मालकांमध्ये वर्ग-विग्रह झालेला आहे आणि तो राजकारणात स्पष्ट दिसून येतो.

इस्त्रायलच्या कब्जाचा सर्वाधिक त्रास जर कोणाला होत असेल तर तो गाझा, वेस्ट बँक, इतर अरब देशांमध्ये असणाऱ्या बहुसंख्य कष्टकरी लोकांना. दैनंदिन कामासाठी जेव्हा इस्त्रायली सैन्याकडून अवहेलना होते किंवा हल्ले होतात तेव्हा सर्वाधिक बळी जातात ते गरीब वर्गातील लोकांचेच. इस्त्रायली कब्जामुळे रोजगाराची निर्मिती अतिशय कमी आहे. सर्व दैनंदिन गरजांसाठी इस्त्रायलच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागते. जागतिक बँकेच्या एका अहवालानुसार गाझापट्टीमध्ये (इस्त्रायलच्या वेढ्यामुळे) बेरोजगारीचा दर जगातील सर्वाधिक असा 43% आहे.

पॅलेस्ताईन मध्ये मात्र एक असाही लोकसमुह आहे ज्याच्याकडे संपत्ती आहे, तो व्यापार करतो आणि जगाशी संबंध ठेऊन असतो. व्यापारी, छोटे उद्योगपती, जमीनदार आणि मध्य-पूर्वेतील देशांमध्ये व्यापार असलेल्या पॅलेस्तिनी बुर्झ्वा वर्गाने इस्त्रायली वसाहतवाद्यांशी तडजोड करून आपल्या हितांचे रक्षण करण्याचे काम चालवले आहे. त्यांना व्यापारासाठी इस्त्रायलकडून हवे असलेले परवाने, सरकारी ठेके आणि सुविधा मिळवण्यासाठी ही तडजोड कामी येते. अर्थातच याच्या बदल्यात इस्त्रायली कब्जाला ते एकाप्रकारे मजबूतही करतात.

पीएलओमधील फताह या गटाने प्रचंड तडजोडी केल्या आहेत आणि मवाळ भुमिका घेतल्या आहेत. फताहला तर इस्त्रायलचे पिल्लू म्हटले जाते आणि त्यांच्या कमजोरीसाठी नेते महमूद अब्बास आणि भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरवले जात आहे. परंतु असे म्हटल्याने फताहच्या सामाजिक आधाराकडे दुर्लक्ष केले जाते. वस्तुस्थिती ही आहे की फताह आणि अबास हे पॅलेस्तिनी बुर्झ्वांचे प्रतिनिधित्व करतात. इस्त्रायली झायोनिस्टांना हवी असलेली मैत्री ते करत आहेत. ऑस्लो करार करण्यामागे इस्त्रायलचा डावही हाच होता की पॅलेस्तिनी अर्थव्यवस्थेवर ताबा मिळवावा, आणि पॅलेस्तिनी बुर्झ्वा वर्गाला नाममात्र स्वायतत्ता देऊन त्यांच्याशी नाते जोडले जावे. स्थानिक धनिकांनी इस्त्रायली आणि इतर विदेशी भांडवलदारांसोबत हात मिळवून इस्त्रायल-व्याप्त पॅलेस्तिनी भूमीमध्ये सुद्धा नव-उदारवादी आर्थिक धोरणे राबवणे गेली काही वर्षे चालू आहे. यातून पॅलेस्तिनी बुर्झ्वा श्रीमंत होत आहेत.

पॅलेस्ताईन मध्ये डाव्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारी पिपल्स फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्ताईन (पीएफएलपी) नेहमीच वैचारिकदृष्ट्या कमजोर राहिली आहे. मार्क्सवाद-लेनिनवादापासून प्रेरणा घेणारी ही संघटना कधी काळी फताहच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाची ताकद होती. परंतु वैचारिक कमजोरींमुळे ते आपला आधार वाढवू शकले नाहीत. काळाच्या ओघात त्यांच्यात फूटी पडल्या आणि संघटना जवळपास नामशेष झाली आहे. पीएलओच्या तडजोडवादी भुमिका, हमास या इस्लामिक मूलतत्ववादी संघटनेच्या वाढीचे एक कारण डाव्या चळवळीचा आधार कमजोर असणे हे पण आहे.

अरब राष्ट्रांनीही पॅलेस्तिनी चळवळीमध्ये आपले हित पाहिले आहे. यापैकी अनेक राष्ट्रे तर आज अमेरिका आणि इस्त्रायलसोबत व्यापारी संबंध जपण्याकडे जास्त लक्ष देत आहेत. या देशांमधील राज्यकर्ता वर्ग सुद्धा आता जागतिक साम्राज्यवादाचा साथीदार बनला आहे आणि पॅलेस्तिनी जनतेच्या संघर्षाशी फक्त तोंडदेखले नाते तो सांगत आहे. जगातील भारतासारखे इतर देश ज्यांनी अनेक काळ पॅलेस्तिनी जनतेला मोठी साथ दिली, आज जागतिक साम्राज्यवादाशी हातमिळवणी करून इस्त्रायलसोबतही व्यवस्थित संधान साधून आहेत.

पॅलेस्तिनी लोकांच्या अतिशय पिचलेल्या स्थितीत, एका योग्य डाव्या पर्यायाच्या अभावी, हमास या मूलतत्ववादी चळवळीचा विस्तार झाला आहे. त्यांनी लोकांमध्ये शैक्षणिक, वैद्यकीय आणि कृपाळू संस्थांच्या माध्यमातून आपले एक जाळे विणले आहे. लोकांच्या मनातील पीएलओच्या दगाबाजीच्या रागाला कल्याणकारी काम आणि आक्रमक पविल्याने मोठ्या संख्येने हमासकडे वळवले आहे. एका खऱ्या क्रांतिकारक शक्तीच्या अभावामुळे पॅलेस्तिनी लोकांना हमास आणि हिजबोल्ला सारख्या संघटनांकडे वळण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. पहिल्या इंतिफादाच्या वेळी डाव्या शक्तींनी आपला आधार मजबूत न करणे हे पॅलेस्तिनी चळवळीसाठी मोठे अपयश राहिले आहे.

**पॅलेस्तिनी जनतेच्या लढ्याला पाठिंबा द्या!**

आज जागतिक स्तरावर पॅलेस्ताईन सहित सर्व राष्ट्रीय प्रश्न हे जागतिक साम्राज्यवादाशी जोडले गेले आहेत. आज सर्वच देशांतील बुर्झ्वा वर्गाने साम्राज्यवादाशी तडजोड केलेली असल्यामुळे राष्ट्रीयत्वाच्या मागणीला तो खऱ्या अर्थाने पुढे नेऊ शकत नाही. हे काम आता फक्त एका खऱ्या कामगारवर्गीय लढ्यातूनच होऊ शकते. पॅलेस्तिनी जनतेच्या धिरोदात्त लढ्याला जगातील कामगार वर्गाने नेहमीच भक्कम पाठिंबा दिलेला आहे आणि यापुढेही राहील!

**वाद-संवाद**

# जाती प्रश्न, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांचा राजकीय वारसा : सुधीर ढवळे यांना एक उत्तर

✍अभिनव

***नोव्हेंबर 2017 च्या समयांतर या हिंदीतून निघणाऱ्या अंकात सुधीर ढवळे यांचा जवळ-जवळ सात हजार शब्दांचा 'जाती प्रश्न आणि भारतीय इंकलाब' हा लेख प्रकाशित झाला होता. सुधीर ढवळे यांच्या लेखाला उत्तर या स्वरुपात हा लेख लिहिला आहे. याचे अगदी संक्षिप्त रूप (अंदाजे सव्वा पाच हजार शब्द) लेखकाने 'समयांतर'ला प्रकाशित करण्याच्या उद्देशाने पाठवला होते, पण जागेच्या अभावी त्याला अजून संक्षिप्त करण्याची मागणी करण्यात आली जे लेखकाला शक्य नव्हते. त्यामुळे हे उत्तर 'आह्वान' मॅगझिनच्या जानेवारी-फेब्रुवारी 2018 अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. आमच्या मते सुधीर ढवळेंनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा करणे गरजेचे आहे, म्हणून त्या लेखाचे विस्तृत रूप मराठीत अनुवाद करून इथे प्रकाशित करत आहोत. - संपादकीय टिपण***

*सत्य बोलणे क्रांतीकारी असते. -अंतोनियो ग्राम्शी*

नोव्हेंबर 2017 च्या 'समयांतर'च्या अंकात साथी सुधीर ढवळेंचा लेख 'जाती प्रश्न आणि इंकलाब' वाचण्याची संधी मिळाली. या लेखात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यांची उत्तरे ही जाती अंताच्या योजनेसाठी आणि भारतीय समाजाच्या सामाजिक-आर्थिक व राजकीय रचनेच्या क्रांतिकारी रुपांतरासाठी अनिवार्य आहेत. **ही स्वागताची गोष्ट आहे की भारतीय राजकीय-बौद्धिक वर्तुळात या प्रश्नावर गांभीर्याने विचार-विनिमय करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. श्री ढवळेंचा लेख असेच महत्वाचे प्रश्न उचलतो, त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.** मात्र खेद वाटतो की आमची सहमती एवढ्यावरच थांबते. याचे कारण त्यांनी आमच्या तर्कांच्या विरोधात (वा अनुकूल) तर्क दिले आहेत म्हणून नाही, तर **त्यांनी सातत्याने अंतर्विरोधी, अज्ञानपूर्ण व तथ्यत: चुकीच्या गोष्टी मांडल्या आहेत आणि तथ्य सुद्धा अगदी मनाने आणि सोयीने निवडून सादर करण्यात आले आहेत.**

दुसरी गोष्ट जी लेख वाचताच खटकते ती म्हणजे लेखक दोन स्टूलांवर बसण्याच्या प्रयत्नात त्याच्या मधोमध आपटतो. वास्तविक, परस्पर विरोधी विचारधारांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करू पाहणाऱ्या लोकांबाबत घडणारी ही सामान्य बाब आहे. या प्रयत्नात लेखकाने अगदी सोयीची तथ्ये व तर्क निवडलेत आणि डॉ. आंबेडकरांच्या राजकीय वारशावर कळत-नकळत अन्याय केला आहे. या साठी की त्यांना आंबेडकरांची राजकीय विचारधारा आणि मार्क्सवादात किमान अंशतः तरी एक समन्वय स्थापित करायचा आहे आणि 'निळ्या आकाशात लाल तारा' उगवायचा आहे म्हणून 'लाल सलाम'आणि 'जय भीम' चे मिश्रण करायच्या प्रयत्नात त्यांनी सोयीने डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार आणि प्रयोग या बाबतची तथ्य आणि तर्क निवडली हे स्पष्टच आहे.

एकंदरीत गोष्ट अशी की जाती व्यवस्थेच्या उगम आणि विकासा विषयी त्यांनी जो तपशील सादर केला आहे, त्यात इतक्या चुका आणि विरोधाभास आहेत की त्या सर्वांचे एकाच लेखात खंडन करणे शक्य नाही. **जाती अंताच्या प्रश्नाची नाळ ही जातींचा उगम आणि विकास ऐतिहासिकरित्या समजून घेण्याच्या प्रश्नाशी जोडली गेली आहे, म्हणून जातीचा उगम, विकास आणि गतीशिलतेच्या ऐतिहासिक तपशिला बाबत अचूकता आणि तथ्याशी प्रामाणिक राहण्यावर विशेष जोर दिला पाहिजे.**

उपरोक्त प्रश्नाना आज आम्ही फक्त एक बौद्धिक, अकादमिक प्रश्न म्हणून पाहत नाही. खरंतर हे प्रश्न आजच्या जाती अंताच्या संपूर्ण आंदोलनाचे केंद्रीय प्रश्न आहेत. थोडक्यात म्हणायचे तर, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांच्या संबंधाचा प्रश्न, जातिव्यवस्थेच्या आजवरच्या इतिहासाचा प्रश्न आणि आजच्या काळातील जातीविरोधी आंदोलनाचे स्वरूप, तात्कालिक उद्दिष्टे आणि दूरगामी उद्दिष्टांचा प्रश्न.

### वर्ण-जाती व्यवस्थेच्या इतिहासाविषयी श्री सुधीर ढवळेंचे विचार

*'जर तुम्ही इतिहासावर गोळ्या चालवाल तर भविष्य तुमच्या वर तोफा डागेल. '-रसूल हमजातोव*

ढवळेंच्या लेखात सुरुवातीलाच सांगितलेली एक गोष्ट व लेखाची अंतर्वस्तू यांचा अजिबात मेळ बसत नाही. "भारताची जाती व्यवस्था शेकडो वर्षानंतरही काही वरवरचे बदल सोडले तर जशीच्या तशी उभी आहे"(ढवळे, 'जाती आणि भारतीय इंकलाब', समयांतर. नोव्हे. 2017, पृ. 13) पण, पुढे इतिहासाविषयी चर्चा करताना जे चित्र उभ केलं जातं, त्यातल्या गंभीर चुका जरी सोडून दिल्या, तरी एवढं नक्कीच स्पष्ट होतं की जाती व्यवस्थेत गेल्या तीन हजार वर्षात जी परिवर्तने आली, ती केवळ 'वर-वरची' तर अजिबातच म्हणता

येण्यासारखी नाहीत. तुकड्या तुकड्यात इतर अनेक गोष्टीचा उल्लेख केला गेला आहे, ज्यांचं खंडन करणे गरजेचे आहे, पण जागेच्या अभावामुळे आम्हाला तसे करता येणे शक्य नाही. याची काही प्रातिनिधिक वक्तव्ये अशी : 'भारताची समाजव्यवस्था जातीवर आधारित आहे', 'दलितांच्या डोळ्यांनी जातीना पाहिले व समजून घेतले पाहिजे', इत्यादी. ही वक्तव्ये कमीतकमी त्रुटीपूर्ण तर मानावीच लागतील. पण आपण थेट जातीच्या इतिहासाविषयी सुधीर ढवळेंचे विवेचन पाहूयात.

जातीच्या इतिहासाविषयी आपल्याला सतत सांगितले जाते की प्राचीन भारतातील जातीचा इतिहास मिथकांच्या भेगांमध्ये गाडला गेला आहे, त्यामुळे तो आपल्याला 'जात' अचूक पद्धतीने समजू देत नाही. **जगातील प्रत्येक क्षेत्र/देशाचा इतिहास अशाच मिथकांतून व साहित्यिक स्त्रोतांमधूनच निसृत करावा लागतो. याचा अजिबात असा अर्थ होत नाही की तो अचूक नसतो. 'इतिहास लेखन' ही आधुनिक पद्धत आहे, जिची सुरुवातच मुळात आधुनिक युगात झाली आहे. यापूर्वी दरबारी लेखन, प्रवास वर्णने, साहित्यिक विवेचने होत असत. पद्धतशीर इतिहास लेखन मात्र आधुनिक युगातच सुरु होते. इतिहासकारांनी आधुनिक युगाच्या सुरुवाती पासून आजवर वेगवेगळ्या पद्धतीने भिन्नभिन्न प्रकारच्या स्त्रोतांना विनिर्मित(deconstruct) करणे शिकले आहे.** या स्त्रोतांमध्ये पुरातत्त्वशास्त्रीय व साहित्यिक स्त्रोतां पासून ते मुद्राशास्त्र (numismatic) पर्यन्तचे स्त्रोत समाविष्ट आहेत. या स्त्रोतांच्या विनिर्मितीतून आज आपल्याला वर्ण-जाती व्यवस्थेचा उगम, विकास आणि विस्ताराविषयी अधिक अचूक माहिती मिळत चालली आहे. याचा असा अर्थ नाही की याबाबत आपली समजदारी अजून विकसित होवू शकत नाही. **नवनवे स्रोत आणि नव्या वैज्ञानिक व्याख्याच्या आधारे आपली समजदारीही अधिक गहन होत आहे. पण वर्ण-जाती व्यवस्थेचा उगम आणि विकासाच्या काही पायाभूत पैलूंबाबत प्राचीन भारतातील आघाडीच्या इतिहासकारांमध्ये साधारण सहमती आहे.**

भारतीय जाती व्यवस्थेच्या वैशिष्ट्यांविषयी बोलताना ढवळे म्हणतात की सर्व समाजात सामाजिक स्तरीकरण अस्तित्वात होते पण भारताचे वैशिष्ट्य असे की इथे तीला धार्मिक मान्यता मिळाली. ही गोष्ट सुद्धा तितकीशी अचूक नाही. जगातील इतर ठिकाणीही प्राचीन धर्मांनी भिन्न प्रकारच्या सामाजिक असमानतेला मान्यताच दिली होती. अंतिम विश्लेषणात धर्माची ऐतिहासिक भूमिका नेहमी हीच तर राहिली आहे. उदाहरणार्थ, प्राचीन युनानी आणि रोमन धर्म, प्राचीन मिस्त्रचा धर्म आणि त्या काळातील अन्य बहुदेवतावादी धर्मात वा पंथात (cults) सामाजिक असमानतेचे वैधतीकरण करण्यात आले होते. भारताच्या बाबतीत वैशिष्ट्य असे की प्रारंभीच्या वैदिक समाजात निर्माण झालेल्या श्रम विभाजनाचे धार्मिक व कर्मकांडीय स्तरावर अस्थीभवन(ossify) केले गेले. ती फक्त एका तऱ्हेची धार्मिक मान्यताच नव्हती तर जीवाश्मीकरण (fossilization) होते. आणि या सर्व प्रक्रियेत कर्मकांडाचे प्रकार्य फार महत्वाची भूमिका पार पाडत होते. आपण जर असे म्हणू की जगातील इतर धर्मांनी सामाजिक असमानतेला मान्यता दिली नव्हती तर आपल्याला हेही सांगावे लागेल की हे धर्म कुठल्या सामाजिक व राजकीय प्रक्रियेच्या फलस्वरूप जन्माला आले होते आणि त्यांचे सामाजिक कार्य काय होते. स्पष्टच आहे की ढवळे अशा प्रकारच्या विशिष्ट धार्मिक मान्यतांचे चरित्र समजू शकले नाहीत आणि त्यामुळे बोलून बसले की सामाजिक असमानतेला अशी धार्मिक मान्यता केवळ भारतातच प्राप्त झाली.

पुढे ते असे म्हणतात की भारतात सजातीय विवाहावर आधारित जातीच्या स्थापनेच्या पायामध्ये सर्व प्रकारच्या जमातींचे अस्तीत्व होते. या जमाती भारतात मुबलक जलवायू व मृदा इत्यादी असल्याने वेगवेगळ्या आत्मनिर्भर जमातींच्या रुपात वसल्या; तर युरोपातल्या प्रतिकूल जल-वायू मध्ये असे होऊ शकले नाही, त्यामुळे तिथे श्रमिकांच्या एका मोठ्या संख्येद्वारे काम करवून घेणे ही बाध्यता बनली आणि त्यामुळे तिथे दास प्रथा अस्तित्वात आली. ढवळेंच्या मते, भारतात स्थिरस्थावर झालेल्या, कृषी जीवनशैली स्वीकारलेल्या वेगवेगळ्या जमाती आर्य संस्कृती द्वारे पराभूत होण्यामुळे जातीच्या रुपात हिंदू समाजात सामील झाल्या. **हा दावा कोणत्या ऐतिहासिक संशोधनाच्या आधारे केला गेलाय हा खरंतर स्वतःच एका संशोधनाचा विषय आहे.** वास्तविक पहाता, युरोपात मोठ्या प्रमाणात श्रमिकांना शासक वर्गाने शेतीच्या कामात लावल्याने दास प्रथा अस्तित्वात आली नाही, तर त्या काळात प्राचीन युनानी व नंतर रोमन समाजामध्ये उत्पादन संबंधातील परिवर्तनांसोबत दास प्रथा अस्तित्वात आल्यामुळेच मोठ्या प्रमाणात दासांना शेतीत लावले जाणे शक्य झाले. पण, ढवळें च्या लेखातील तथ्ये ही अशी डोक्यावर उभी राहतात. प्राचीन युनानी व दास व्यवस्थेविषयी पेरी अँन्डेरसन, मोजेज फिनले, जॉर्ज थॉमसन पासून ते पि ए ब्रट पर्यंतच्या सगळ्या प्रामाणिक इतिहास लेखनातून या गोष्टी सिद्ध केल्या जाऊ शकतात. सुधार ढवळेंच्या या तर्काचा असा परिणाम होईल की भारतात तर जाती व्यवस्था जन्माला येणारच होती, कारण जल-वायू आणि भौगोलिक परीस्थितीच तशी होती. पुढे याच तर्काच्या आधारे जाती व्यवस्था एका विशिष्ट रुपात घटीत होणाऱ्या सामाजिक संघर्षांचा परिणाम न राहता (ज्यात अपराहार्यता आणि आकस्मिकता यांमधील द्वंद्व कायम अस्तित्वात असते), भारतीय उप-खंडाचे वैशिष्ठ बनून जाईल.

आर्य व मूळ जमातीं मधील संघर्षाची वर्णने देत ढवळे म्हणतात की हा संघर्ष आणि सोबत होणारा शेतीचा विकास या मुळे वर्ग समाजाचा विकास झाला. या मांडणीतही अनेक चुका आहेत. आरंभी डी. डी. कोसंबीनी आणि नंतर इतर इतिहासकारांनी या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे की वैदिक आर्य इथे येण्यापूर्वीच काही आर्य प्रवास करत भारतीय उप-खंडात

उत्तर-पश्चिमी भागात वसले होते आणि ही प्रक्रिया टप्याटप्याने लाटांच्या रुपात झाली होती. हे वैदिकपूर्व आर्य इथल्या मूळ-निवासी (ज्यात शक्य आहे की लयाला गेलेल्या हडप्पा संस्कृतीचेही काही घटक सामील होते) लोकांसोबत मिसळले गेले होते. जेव्हा वैदिक आर्य आले तेव्हा त्यांचा संघर्ष अशा मिश्र लोकसंख्येशी झाला, फक्त मूळ-निवासी जमातींसोबत नाही. या मिश्रीत जमातींना आर्यांनी दीर्घ संघर्षाअंती पराभूत केले आणि काही जमाती विना संघर्ष, या वैदिक आर्यांच्या संस्कृतीत मिसळून गेल्या. पराभूत जमातीतून पुढे क्षुद्र वर्णाचा जन्म झाला, ज्यांमध्ये मिश्रित जमाती, आर्यांच्या जमाती, आणि मूळ निवासी जमाती या सगळ्यांचा समावेश होता. क्षुद्र वर्णाच्या उदया बरोबरच चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात आली, जिचा पहिला संदर्भ ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तातील दहाव्या मंडला मध्ये आढळतो. पण या वर्ण व्यवस्थे मध्ये आजच्या वर्ण-जाती व्यवस्थेची असलेली कुठलीच पायाभूत गुण-वैशिष्टे दिसत नाहीत, जसे की, अनुवांशिक श्रम विभाजन, सजातीय विवाह वा अस्पृश्यता. म्हणून कोसंबींनी या वर्ण व्यवस्थेला तिच्या उद्भव बिंदू वेळी असलेले वर्ग विभाजन असेच म्हटले आहे. हा काळ सुरुवातीच्या वैदिक काळाचा उत्तरार्ध होता. दुसरी गोष्ट अशी की या वर्ग समाजाच्या उदया मध्ये मूळनिवासी जमातीची भूमिका प्रमुख नव्हती, जसे की ढवळे सांगतात. वास्तविक, शेतीचा विकास अतिरिक्त उत्पादन करण्या इतका होत नाही तोपर्यंत वर्ग समाज अस्तित्वात येणे शक्य होत नाही. ते शक्य झालं, इ. स. वी. पूर्व सातव्या शतकात जेव्हा लोखंडाचा शोध लागला. आणि हेच कारण आहे की इ. स. वी. पूर्व सहावे ते पाचवे शतकाच्या दरम्यान गंगेच्या मैदानात वर्ग आणि राज्यसत्तेची उत्पत्ती होवू शकली. त्या सोबतच एका वर्ग समाजाने जन्म घेतला, जो पुरुषसुक्तात वर्णिलेल्या चातुर्वर्ण व्यवस्थेत प्रतिबिंबीत होतो. याच्या पूर्वी पराभूत जमाती समूहांना एक तर ठार केले जात होते, किंवा त्यांच्या स्त्रियांना दास बनवले जात होते(मात्र, या स्त्रियांपासून जन्माला आलेल्या मुलांना कुठल्याही भेदभावाशिवाय क्षत्रिय वा ब्राह्मण वर्णात समाविष्ट केले जाई, कारण अजून तरी श्रम विभाजनाचे कर्मकांडीय जीवाश्मीकरण पूर्ण झाले नव्हते.) वा त्यांना वैदिक समाजात समाविष्ट केले जात होते. पुरोहित ब्राह्मण स्तरात सामील होत, योध्ये राजन्य स्तरात आणि सामान्य श्रम-जीवी समूह वीश स्तरात. फक्त अतिरिक्त उत्पादन आणि वर्ग समाजाच्या आरंभानंतरच या पराभूत टोळ्यांना–जमातींना एका नव्या अधिनस्थ स्तरात क्षुद्रात समाविष्ट केले गेले. आणि मग चातुर्वर्ण्य व्यवस्था जन्माला आली, जी खरतर त्यावेळच्या वर्ग विभाजनाला प्रतिबिंबीत करत होती. कोसंबींच्या मते, आरंभ बिंदूपाशी वर्ण स्वतःच वर्ग होते जे पुढे धार्मिक कर्मकांडीय जीवाश्मीकरणा सोबत अनुवांशिक श्रम-विभाजन आणि सजातीय विवाहावर आधारित वर्ण व्यवस्थेच्या रुपात समोर आले. पण ढवळेंच्या एकूणच मांडणीत ही प्रक्रिया खूप त्रुटींसह आली आहे. थोडक्यात, अवघड अशा ऐतिहासिक प्रक्रियांचे वर्णन देणे हे स्वतःच एक अवघड कार्य असते, साथी ढवळेंना या उपक्रमात जरा अधिक सावधगिरी बाळगायची गरज होती. (जाती व्यवस्थेच्या इतिहास बाबत अधिक जाणू इच्छित असाल तर पहा, http://arvindtrust.org/archives/298)

हे चातुर्वर्ण्याचे विभाजन धार्मिक–कर्मकांडीय स्तरावर अश्मीभूत व जीवाश्मीकृत झाले ज्यामुळे, वर्ण आणि वर्गा मधील अतिव्यापन (overlap) एका संगती (करस्पाँडंस, correspondence ) मध्ये परावर्तीत होते. त्यानंतर, वसाहतवादी काळापर्यंत वर्ण-जाती समूहांत बराच प्रमाणात हे अतिव्यापन कायम होते, पण वर्ण-जाती आणि वर्गांमधील अतिव्यापन आता एका संगती आणि तंतूबद्धीकरणात परावर्तित झाले होते. या संगतीच्या संबंधांमुळे वर्ग व्यवस्थेत होणाऱ्या कुठल्याही मोठ्या परिवर्तनासोबत वर्ण-जाती व्यवस्थेच्या संरचनेमध्येही उलथापालथ आणि परिवर्तन होत राहते. धार्मिक संहिता वर्ण-जाती व्यवस्थेला निर्धारित करत नव्हत्या, उलट उत्पादन संबंध आणि वर्ग संबंधाद्वारे अती-निर्धारित होत असलेल्या वर्ण-जाती व्यवस्थाच धार्मिक संहितांना निर्धारित करत होत्या. याच्याच परिणामी सरंजामशाहीच्या उदया सोबत ब्राह्मण वर्ण-जाती मध्ये परिवर्तन आले आणि ज्या भूमीच्या स्वामित्वाला अगोदर धार्मिक ग्रंथांमध्ये त्यांच्यासाठी वर्ज्य ठरवले गेले होते, नव्या धार्मिक संहितामध्ये तेच भूमी स्वामित्व ब्राह्मणासाठी ऐच्छीक झाले. कारण, सरंजामशाही काळात झालेले नी-शहरीकरण, नी-मुद्रीकरण, आणि अर्थव्यवस्थेच्या स्थानिकीकरणामुळे पौरोहित्याच्या सेवेसाठी ब्राह्मणांना मुद्रा वा वस्तू ऐवजी भूमी अनुदान देणे क्षत्रिय व क्षत्रीयेतर शासकांना जास्त अनुकूल झाले, कारण 'जमीन' समृद्धीचं प्रमुख रूप बनली होती. सरंजामशाहीच्या उदया पूर्वीच्या धार्मिक संहितांमध्ये वस्तू व्यतिरिक्त इतर कुठलाही उपहार-भेट स्वीकारणे ब्राह्मणांना वर्ज्य होते. आता मात्र, वस्तूंच्या रुपात उपहार/भिक्षा स्वीकारणारा ब्राह्मण खालच्या दर्ज्याचा समजला जाऊ लागला, तर भू-स्वामी ब्राह्मण उच्च श्रेणीतले मानले जाऊ लागले. अशाच प्रकारे क्षुद्र आणि वैश्य वर्णातही सोळा जनपदांच्या व मौर्य शासनाच्या काळात परिवर्तने झाली. चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या बाहेर असणाऱ्या अनेक जमाती अंत्यज जातीच्या रुपात स्थापित होण्यासोबत आणि दुसऱ्या शहरीकरणाच्या (पहीले शहरीकरण हडप्पा संस्कृतीच्या काळात झाले) काळात वैश्य व्यापारात गेले, तर क्षुद्र अधिनस्थ शेतकरी वर्णाच्या रुपात स्थापित झाले. जे वैश्य व्यापारात गुंतले नाहीत, त्यांची जागा वर्णांच्या सोपानात क्षुद्रांची झाली आणि जे क्षुद्र शेतकी व्यवसायात नाही जाऊ शकले, ते हीन क्षुद्र जातींच्या रुपात नोंदवले गेले, जसे की चांडाळ जात. त्याच प्रकारे, पशुपालक समाजापासून कृषी समाजा पर्यंतच्या संक्रमणाच्या प्रक्रियेत चर्मकार जातींची जागा सुद्धा घसरली आणि त्या अंत्यज वा हीन-क्षुद्र मानल्या जाऊ लागल्या. वर्ग व्यवस्था आणि उत्पादन संबंधात होणाऱ्या

परिवर्तनांमुळे वर्ण-जाती व्यवस्थेतही परिवर्तने झाली, या गोष्टीचे शेकडो पुरावे दिले जाऊ शकतात. यासाठी सुवीरा जायसवाल व राम शरण शर्मा यांनी गृहपती, असुर, दास आणि दस्यु या शब्दांच्या बदलत गेलेल्या अर्थांची जी व्याख्या केली आहे, ती वाचनीय आहे.

सुधीर ढवळेंचे असे म्हणणे की सरंजामशाही व्यवस्था जाती व्यवस्थेवर आधारित होती, त्रुटीपूर्ण आहे. वास्तविक, सरंजामशाही व्यवस्थेने भारतीय उपखंडात वेगवेगळ्या भागात जे स्वरूप धारण केले, त्यानुसार तिने जातीव्यवस्थेला घडवले असे म्हणणे जास्त योग्य होईल. हेच कारण आहे की दक्षिण भारत आणि उत्तर भारतामध्ये सुरुवातीला जाती-वर्ण व्यवस्थेतील मधले दोन वर्ण, वैश्य आणि क्षत्रिय, नव्हतेच. या क्षेत्रांमध्ये जाती-वर्ण व्यवस्थेचा विस्तार तेव्हाच होतो, जेव्हा सरंजामशाही व्यवस्था अस्तित्वात येते. दक्षिण भारतात शेतकऱ्यांमधून एक शासक वर्ग जन्माला आला होता आणि शेतकऱ्यांचे राज्य अस्तित्वात आले होते. शेती तो पर्यंत जाती-वर्ण व्यवस्थेच्या उगम आणि विकासाच्या मूळ क्षेत्रात (गंगेच्या मैदानात आणि उत्तर –पश्चिम प्रांतात) क्षुद्र वर्णाचा व्यवसाय झाली होती. म्हणून, दक्षिण भारतातली शासक जात असलेल्या वेल्लाळांना ब्राह्मणांनी क्षुद्र वर्णात स्थापित तर केले, पण नव्याने रचलेल्या संहितांमध्ये असत-क्षुद्र आणि सत-क्षुद्र यात अंतर निर्माण केले आणि सत-शूद्रांना 'ब्राह्मणाचे रक्षक' या रुपात(जी उत्तर भारतात क्षत्रियासाठी वापरली जाणारी परिभाषा होती) व्याख्यांकित केले. इथेही आपण पाहू शकतो की सरंजामशाही उत्पादन व्यवस्थेने भारताच्या वेगवेगळ्या भागात तिथल्या वैविध्यांनुसार स्वरूप धारण केले. ब्राह्मणवाद सरंजामशाहीच्या काळात किंवा मनुस्मृती रचण्याच्या काळात अस्तित्वात आला असे नव्हते, उलट पवित्रता आणि विटाळाच्या सिद्धांतावर आधारित असणाऱ्या वर्ग विभाजनाला कर्मकांडीय रुपात जीवाश्मीकरण करणाऱ्या विचाराधारात्मक उपकरणाच्या रुपात अगोदर पासूनच हजर होता.

ढवळे, अस्पृश्यतेच्या उगमा विषयी एक रहस्य असल्याचे बोलतात आणि मग आंबेडकरांच्या 'ब्रोकन मेन'(दलित) च्या सिद्धांताचा निव्वळ उल्लेख करतात. या सिद्धांतानुसार बुद्ध काळात ज्या सर्व जमातींनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि गोमांस खायला सुरुवात केली व नंतर बौद्ध धर्माच्या हिंदूंच्या हातून झालेल्या पराभवानंतरही जे बौद्धच राहिले व गोमांस भक्षण करत राहिले, त्यांनी ब्राह्मणांना व ब्राह्मणांनी त्यांना बहिष्कृत केले; ब्राह्मणांनी त्यांच्यावर अस्पृश्यता लादली. या सिद्धांता बाबत ढवळे काहीच बोलत नाहीत. खरेतर अस्पृश्यतेचा उगम इतिहासकारांसाठी आज ना कोडे राहिलाय आणि ना आंबेडकरांचा सिद्धांतही बरोबर ठरला. वस्तुत: बौद्ध धर्माने गोमांस भक्षणाची तरफदारी केलीच नव्हती, उलट, त्याने तर जीव हत्येलाच चूक ठरवले आहे. दुसरी गोष्ट अशी की सरंजामशाहीच्या उदयापूर्वीच, खूप अगोदर, अस्पृश्य जातींच्या निर्माणाची प्रक्रिया सुरु झाली होती. अस्पृश्यता विषयावर ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या प्रा. विवेकानंद झा यांच्या म्हणण्यानुसार अस्पृश्यतेचे मूळ इसवी पूर्व सहाव्या आणि सातव्या शतकातच आढळून येते. इसवी दुसऱ्या शतकापासून इसवी सहाव्या शतकापर्यंत अस्पृश्य जातींच्या संख्येत वाढ होत राहिली आणि सहावे शतक ते तेरावे शतक या काळात तिने टोक गाठले. ती सरंजामशाही पूर्वीच अस्तित्वात आली होती आणि सरंजामशाहीच्या पतना नंतरही अस्तित्वमान राहिली. इथे ढवळेंच्या विवेचनावर अनुराधा गांधीच्या जाती प्रश्नावरच्या लेखनाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, ज्याच्यात जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेला सरंजामशाहीशी जोडले आहे.

आंबेडकरांच्या इतिहास लेखनाचे सुधीर ढवळेंनी योग्यरीत्या अध्ययन केले नाही. ते 'कास्ट: डेवलपमेन्ट, जेनिसिस अँन्ड मेकॅनीझ्म' नावाच्या आंबेडकरांच्या प्रबंधाचा संदर्भ देतात. त्यांचे म्हणणे असे की आंबेडकरांच्या मते ब्राह्मणांनी किंवा मनुने जाती व्यवस्थेला जन्माला घातले नव्हते, तर समाजाने स्वत:हून तिचा अंगीकार केला होता. पण हे विवेचन अचूक नाही. आंबेडकरांनी त्या प्रबंधामध्ये म्हटले आहे की जातीचा आधार सजातीय विवाहाची व्यवस्था आहे, जी मुळात ब्राह्मणांची परंपरा होती. ब्राह्मणांनी तिला समाजावर थोपवले नाही तर समाजात आपल्या परंपरांची आणि मुल्यांची श्रेष्ठता प्रस्थापित केली. ज्याच्या परिणामी इतर समाजही तिचे अनुकरण करू लागला. या प्रबंधात आंबेडकरांनी समाजशास्त्रज्ञ गैब्रीयाल टार्डेच्या 'सामाजिक अनुकरणा'च्या सिद्धांताला लागू करण्याचा प्रयत्न केला आहे. पण **मग प्रश्न असा उभा राहतो की जर ब्राह्मण जाती व्यवस्थेच्या विकासापुर्वी अस्तित्वात होते, तर मग ब्राह्मणांना कोणी जन्माला घातले होते? या प्रश्नाचे उत्तर ना आंबेडकरांनी 1916 ला दिले होते, ना सुधीर ढवळेंसारखे आंबेडकरांच्या या सिद्धांतांना सहमती दर्शवत उद्धृत करणारे इतर लोकही देण्याच्या भानगडीत पडतात.**

लेखात जाती व्यवस्थेवर पहिला प्रहार करणाऱ्यांच्या रुपात इस्लामिक शासनाला दाखवले गेले आहे. ही गोष्ट सुद्धा सत्यापासून कितीतरी दूर आहे. वस्तुत:, जाती व्यवस्थेला पहिल्यांदा दिल्ली सुलतानशाही आणि नंतर मोगलांनी स्वत:च्या सोयीनुसार सहयोजित केले. याचे अगदी प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे, चौदाव्या शतकातील दिल्ली सुलतानशाहीतील एका शासकाने बंगालातील एका क्षत्रिय जातीला पदावनती करत वैश्य जातीत ढकलले जाण्याचा आदेश दिला होता. एका मुसलमान शासकाला जातिव्यवस्थेच्या पदानुक्रमाशी काय देणे घेणे होते? जेव्हा अरब आक्रमकांच्या सेनापतीने सिंध मधल्या जाती व्यवस्थेला पाहिले तेव्हा तो म्हणाला होता की अशी गोष्ट आपल्याकडे असली पाहिजे होती! वस्तुत: ढवळेंचे हेही म्हणणे चुकीचे आहे की सुरुवातीला निम्न जाती इस्लाम मध्ये धर्मांतरित झाल्या व जेव्हा उच्च जातीचे लोकही राजकीय लाभाकरता मुसलमान

झाले तेव्हा इस्लाम मध्ये जाती व्यवस्था जन्माला आली. वस्तुत: उच्च व निम्न जातीं दोन्हीही जातीचे लोक (जरी निम्न जातींची संख्या जरा अधिक होती) सुरुवाती पासूनच स्वेच्छेने वा बल-प्रयोगातून धर्मांतरित झाले होते. आणि इस्लामी शासकांसाठीसुद्धा जाती व्यवस्था सुरुवातीपासूनच शोषण, उत्पीडन आणि दमनासाठी तितक्याच मजबूत हत्यारासारखी होती. या विषयावर इर्फान हबीब यांचा एक लेख 'भारतीय इतिहासात जाती' वाचनीय आहे.

ढवळे दावा करतात की इस्लामी शासन एक आधुनिक व्यवस्था घेवून आले, कारागिरांच्या संघाची(गिल्ड) व्यवस्था घेवून आले आणि त्यांनी शहरीकरण केले, ज्याच्या परिणामी जात खीळखिळी झाली. या पैकी पहिला दावा अंशत: खरा आहे, पण तिला आधुनिक सरंजामशाही व्यवस्थेऐवजी निरंकुश राजेशाही च्या सिद्धांतावर आधारित सरंजामशाही व्यवस्था म्हणणे अधिक योग्य होईल. पण दुसरा व तिसरा दावा अगदीच चुकीचा आहे. पहिली गोष्ट की कारागीर संघाच्या व्यवस्थेने जाती व्यवस्थेला कमजोर नाही केले, उलट मजबूत केले आणि नव्या कारागीर जातींना स्थापित आणि रूढ केले. दुसरी गोष्ट अशी की प्रत्येक शहरीकरण जाती व्यवस्थेला कमजोर करत नाही. फक्त भांडवली शहरीकरणरणच असे करू शकते. नाहीतर सोळा जनपदे वा मौर्य काळात झालेल्या शहरीकरणाच्या काळात जाती व्यवस्था कमजोर व्हायला हवी होती. उलट ती मजबूत झाली. इथे ढवळे डॉ. आंबेडकरांच्या शहरीकरणाच्या जाती व्यवस्थेवर पडणाऱ्या परिणामाच्या म्हणण्यालाही नीट समजू शकले नाहीत. औद्योगिकरण, रेल्वे आणि आधुनिकीकरणाच्या आधारावर होणारे शहरीकरणच जाती व्यवस्थेला कमजोर करु शकते, भांडवलशाही पूर्व कारागिरी उत्पादांवर आधारित होणारे शहरीकरण नाही.

सुधीर ढवळे पहिले तर इंग्रज शासनाला जाती व्यवस्थेवर सर्वात जोरदार आघात करणारे शासन म्हणून निर्वाळा देतात आणि पुन्हा लिहितात की इंग्रज शासनाने ना जाती व्यवस्थेला बदलले, ना तिला स्पर्शही केला! तुम्ही चक्रावून जाता. इंग्रज शासनाच्या तीन प्रभावांबाबत ते सांगतात: पहिला आहे, जाती आधारित जणगणना इत्यादी सुरु करून जातीला रूढ बनवणे; दुसरा आहे, नोकरशाही, शिक्षण, सैन्य, पोलीस इत्यादी मध्ये पाश्चिमात्य रचना लागू करून जातीला कमजोर करणे; आणि तिसरा, उद्योग आणि रेल्वे इत्यादी द्वारे कामगार वर्गाला जन्माला घालून जातींना कमजोर करणे. इंग्रज शासनाने दलित जनतेवर जो सर्वात मोठा प्रभाव पाडला त्याला मात्र सुधीर ढवळे विसरलेले दिसताहेत आणि तो म्हणजे इंग्रजांद्वारे लागू केलेल्या जमीन महसुलाच्या तीन पद्धती: कायमधारा, रयतवारी व जमीनदारी पद्धती. या पैकी पहिल्या प्रकारच्या पद्धतीने सवर्ण जमीनदारांना जमिनीचे कायदेशीर-वैध मालक बनवले, दुसरीने आणि तिसऱ्या पद्धतीने उच्च मध्यम व मध्यम शेतकरी जाती व सवर्णांना जमिनीचे मालक बनवले. पहिल्यांदा जमिनीला खाजगी संपत्तीचे औपचारिक कायदेशीर रूप दिले गेले आणि सोबत दलितांच्या भूमिहीनतेवर दीर्घ काळासाठी मोहर लावली. दलितांमध्ये आजवर असणाऱ्या भूमिहीनतेला सुदृढ संरचनात्मक रूप देण्याचे काम वस्तुत: इंग्रजांच्या जमीन महसुलाच्या तजवीजेने केले, जे वसाहतिक काळातील दलितांच्या सरंजामी शोषण-उत्पीडनाचा प्रमुख आधार बनला.

दुसरी गोष्ट, इंग्रजांच्या सैन्य आणि पोलिसांत दलितांच्या भरती विषयी. त्यावर तर 1893 मध्येच बंदी आणली गेली होती, कारण ब्राह्मणांनी तिचा विरोध केला होता; तसेही अशी भरती संपूर्ण भारतात नव्हे तर फक्त काही प्रेसिडेन्सींमधील काही भागातच होत होती. तीही बऱ्याच मर्यादित स्वरूपात होत असे. तिसरी गोष्ट ही की शिक्षणाचा दलितांना दिला गेलेला अधिकार. तो ही वस्तुत: पुढे हिसकावून घेतला गेला होता. हेच कारण होते की अयंकलींना केरळमध्ये दलितांच्या सरकारी शाळांसाठी आंदोलन करावे लागले. अगदी मोजक्या मर्यादित ठिकाणीच दलित मुलांना हा हक्क मिळाला होता आणि जिथे औपचारीकरीत्या मिळालाही होता तिथे ब्राह्मण व अन्य सवर्ण हिंदूंनी विरोध केल्याने खुद्द इंग्रज प्रशासन लागू करत नव्हते. मिशनरींच्या शिक्षणासंदर्भातील कामाचा परिणाम फारच मर्यादित होता. यासंदर्भात आनंद तेलतुंबडे यांचा दृष्टीकोण जास्त संतुलित आहे. खरोखरच याचा काही एक वास्तविक प्रभाव पडला असता तर 1947 ला जवळ जवळ 90 टक्के दलित अशिक्षित राहिले नसते. हो, इतके नक्की झाले की मर्यादित औद्योगिक विकास आणि रेल्वेमुळे जाती व्यवस्थेची दोन वैशिष्ट्ये म्हणजे अनुवांशिक श्रम विभागणी आणि स्पृश्यास्पृश्यता कमजोर पडली होती. पण हे इंग्रज शासनाने स्वत:च्या गरजे पोटी केलेल्या कामाचे उप-उत्पादन होते. एकूणच काय तर आंबेडकरांच्या दाव्याच्या विपरीत इंग्रज शासनाचा प्रभाव दलित समुहावर मुलत: आणि मुख्यत: नकारात्मक पडला होता. शेवटी शेवटी साथी ढवळे ही हेच म्हणतात. असे वाटते की डॉ. आंबेडकरांवर टीका करत असल्याचे न दाखवता टीका करण्याचा प्रयत्न केला आहे.

### डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचार आणि प्रयोगांविषयी साथी ढवळेंचे विचार:

*"कुठली एखादी चुक तिचे खंडन न करता सोडून देणे ही बौद्धिक बेइमानी आहे."- कार्ल मार्क्स*

पेरीयारांना सुधीर ढवळेंच्या लेखात 'ब्राह्मणवादाच्या विरोधातील मध्यमवर्गीय प्रतिक्रिया' म्हणत रद्द केले आहे. निश्चितच पेरीयारांच्या आंदोलनाचे वर्ग चरित्र प्रगतीशील मध्यम वर्गीयच होते आणि त्याच्याच परिणामी नंतर ते आंदोलन अनेक मूलगामी तत्व असूनही द्रविड अस्मितेच्या आंदोलनामध्ये परिणीत झाले. तसे पाहता आंबेडकरांचे आंदोलन देखील श्रमिक वर्गाचे आंदोलन असे म्हणता येऊ शकणार नाही. आंबेडकर आयुष्यभर ड्युईवादी व्यवहारवादावर अंमल करत राहिले, जी स्वतःच एक मध्यम

वर्गीय भांडवली विचारधारा होती. फुलेंच्या बाबत मात्र जास्त योग्यरित्या असे म्हणता येइल की त्यांचे आंदोलन एका निम्नवर्गाचे आणि शेतकरी-वर्गाचे जाती विरोधी आंदोलन म्हणता येण्याजोगे होते. म्हणूनच, ब्राह्मणवादावरील 'गुलामगिरी'त जबरदस्त व्यंगात्मक टीकेच्या शैलीत इंग्रजांना दलितांचा उद्धारकर्त्याच्या रुपात बघत आपली यात्रा सुरु करणारे ज्योतिबा फुले 1880 च्या दशकात 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये लिहितात की इंग्रज आणि ब्राह्मणांचे रक्त एकच आहे. व्यवहारातून फुले हे समजण्याच्या खूप जवळ येऊ लागले होते की इंग्रजांच्या वासाहतिक सत्तेचे चरित्र ब्राह्मणवादाशी जोडले गेले आहे. पण आंबेडकर मात्र अखेरपर्यंत कधीच या निष्कर्षाप्रत आले नाहीत. याचे मूळ त्यांच्या राजकीय विचारधारेत, म्हणजे व्यवहारवादात आहे.

सुधीर ढवळे लिहितात की आंबेडकर महाड आणि नाशिकच्या आंदोलनात सुधारवादाच्या पलीकडे गेले होते कारण आता ते हिंदूंशी थेट भिडण्यापर्यंत जाऊ लागले होते. या सोबत हेही सांगितले असते तर बरे झाले असते की महाडचा सत्याग्रह शेवटी सत्याग्रहाच्या रुपात झालाच नाही आणि नाशिक मध्येही आंबेडकर राज्यसत्तेशी कुठल्याही प्रकारची भिडंत टाळत राहिले. महाड आंदोलनात खरोखर काय झालं होत, हे जाणून घेण्यासाठी काही दिवसांपुर्वीच प्रकाशित झालेले आनंद तेलतुबडेचे पुस्तक 'महाड-द मेकिंग ऑफ फर्स्ट दलित रीवोल्ट' पहावे. या पुस्तकात नाशिकच्या आंदोलनाचे वर्णनही आहे, ज्याच्यात आंबेडकर पोलीस शिपायांकडून रथ ओढणाऱ्या दलितांवर झालेल्या हल्ल्यानंतर वसाहतिक प्रशासनाला पत्र लिहितात की ते त्यावेळी तिथे तैनात असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करत नाहीत तर फक्त हिंदू शिपायांवर कारवाई करण्याची मागणी करताहेत. स्पष्ट आहे की इंग्रज अधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय पोलीस शिपायांनी दलितांवर हल्ला केला नसता. पण सरकारशी संघर्ष कुठल्याही स्थितीत टाळलाच पाहिजे! हेच कारण होते की आंबेडकरांनी डिसेंबर 1927 ला महाड सत्याग्रह मागे घेतला. तेलतुंबडे दाखवून देतात की सत्याग्रहापूर्वीच कुलाबाच्या डी. एम. समक्ष सत्याग्रह न करण्याचे त्यांनी स्वीकारलं होतं. त्यानंतर सत्याग्रहात ते सत्याग्रह करण्याने होणाऱ्या प्रतिकूल परिणामांविषयी लोकाना वारंवार सांगत राहिले आणि शेवटी व्यापक जनसमुदायाच्या इच्छेच्या विपरीत आंदोलन मागे घेतले; कारण स्पष्ट होतं की सत्याग्रहाचा परिणाम सरकारशी थेट संघर्ष असणार होता. वास्तविक पाहता, **महाड मध्ये, तेलतुंबडेच्या शब्दात, एक दलित विद्रोहच झाला होता. या दलित विद्रोहाला सुधारवाद आणि व्यवहारवादाच्या परिघात मर्यादित करण्याचे काम आंबेडकरांनी केले होते.** आनंद तेलतुंबडेंचे हे म्हणणे अगदी योग्य आहे की जर पहिल्या महाड संमेलनाच्या (मार्च, 1927) वेळी दलितांवर झालेल्या हल्ल्याला त्यांनी उत्तर दिले असते तर दलित मुक्तीच्या उद्दीष्टाला दूरगामी स्वरूपात लाभच झाला असता आणि जर महाड सत्याग्रहाच्या (डिसेंबर, 1927) वेळी जर खरच सत्याग्रह झाला असता तरी सरकारने जास्तीत जास्त आंदोलकांना ताब्यात घेतले असते आणि मग त्यांना काही कलमे लावून सोडून देण्याशिवाय इंग्रजांकडे दुसरा कुठलाच मार्ग नव्हता. पण या दोन्हीही प्रसंगी व्यापक कष्टकरी दलितांच्या संख्येला 'रस्त्यावरच्या रॅडीकल लढाई'च्या (जिचा ढवळे सतत पुरस्कार करतात) दिशेने जाण्यापासून आंबेडकरांनीच रोखले. ढवळेंनी जर आनंद तेलतुंबडेंचं पुस्तकं (जो महाड आंदोलनावरील आत्तापर्यंतचा सर्वात चांगला शोध आहे) नीट वाचले असते तर महाड आणि नाशिक विषयी असा आधारहीन दावा केला नसता.

डॉ. आंबेडकरांना या ना त्या रुपात मार्क्सवादाच्या जवळ उभे करणे हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे होईल. जर ते जिवंत असते तर अशा उपक्रमाला विरोध करण्यात तेच सर्वात पुढे असते. त्यांची ड्युईवादी व्यवहारवादावर प्रचंड आस्था होती. या **ड्युईवादी व्यवहारवादाची मुलभूत वैशिष्टे अशी आहेत:** एक, प्रकृती आणि समाजात सगळी परिवर्तने ही क्रमिक होत असतात, त्यांच्यात कुठेही उडी नसते ; दुसरे प्रत्येक परिवर्तन सरकार मार्फत वरून केले जाते, कारण सरकार 'सर्वाधिक तार्किक अभिकर्ता' आणि 'महान मध्यस्त' असते; तिसरे, जनतेद्वारे 'खालून' बळाद्वारे केलेला कुठलाही प्रयोग व्यर्थ असतो कारण त्यात हिंसा होते; चौथे, सरकारद्वारे वरून केल्या जाणाऱ्या परिवर्तनांशिवाय समाजात माणसा माणसातील परात्मभाव आणि असमानता 'सोशल इंडोस्मोसीस' (ज्याचा अर्थ आहे परस्परातील समतापूर्ण आंतर्क्रिया) द्वारे समाप्त होऊ शकते, ज्याच्या साठी एका मानवतावादी धर्माची आवश्यकता असते, जो सामाजिक आचार संहितेचे कार्य करेल; पाचवे, सरकारच्या निर्णयाला प्रभावित करण्यासाठी बुद्धीजीवी वर्गाला सरकारच्या धोरण-निर्माणाला प्रभावित करावे लागते. ज्याने कोणी आंबेडकरांची प्रमुख पुस्तके वाचली असतील, तो ही पाच गुणवैशिष्ट्ये त्यांच्या विचारत पाहू शकतो. तुम्ही महाड संम्मेलनातील त्यांचे भाषण वाचा, वा नाशिकच्या आंदोलन काळातील प्रशासनाला लिहिलेली त्यांची पत्रे वाचा, वा संविधान सभेमधील त्यांची भाषणे वाचा, तुम्हाला ड्युईवादी व्यवहारवादाचा ध्वनी ऐकू येईल.

ढवळे म्हणतात की असे म्हणणे चुकीचे होईल की डॉ. आंबेडकर जातीअंताविषयी बोललेच नाहीत. पण असे कोण म्हणतंय, हे ते सांगत नाहीत! मूळ प्रश्न आहे की त्यांनी जाती अंताचा मार्ग सांगितला आहे की नाही. काय 'जाती विनाश' या पुस्तिकेत त्यांनी काहीएक मार्ग सांगितला आहे? ढवळे स्वत:च मान्य करतात की तसे नाहीये. या रचनेत आंबेडकर म्हणतात की प्रत्येक समाजातील बुद्धिजीवी वर्ग प्रमुख वर्ग असतो आणि हिंदु समाजात ब्राह्मण स्वत:च बुद्धिजीवी वर्गाची भूमिका निभावत आहे त्यामुळे ते जाती अंताची भूमिका कधीच स्वीकारणार नाहीत आणि इतर बिगर-दलित सुद्धा

जातीअंताला राजी होणार नाहीत. अशात त्यांच्या समोर धर्मांतराखेरीज दुसरा मार्ग शिल्लक राहत नाही. पण धर्मांतरा संबंधीच आंबेडकरांनी एके ठिकाणी दलितांना विचारले होते की काय तुम्हाला वाटते की तुमच्या ईसाइ होण्याने तुम्हाला गावच्या विहीरीचं पाणी प्यायला दिले जाईल? व स्वत:च उत्तरले की नाही देणार. म्हणजे ते सुद्धा हे जाणून होते की धर्मांतरानंतरही जाती पासून सुटका नाही. हेच कारण आहे की धर्मांतराचा विचार आणि निर्णय 1927 ते 1930 या दशकाच्या सुरुवातीला घेवून सुद्धा त्यांनी धर्मांतर 1956 साली, त्यांच्या मृत्युच्या ठीक पूर्वी केले, कारण ते त्यांचे शेवटचे हताश पाउल होते.

ढवळे हेही सांगत नाही की आंबेडकरांनी धर्मांतरासाठी ज्या पहिल्या धर्माचा विचार केला तो का? आणि कुणाच्या सल्ल्याने केला होता? तो त्यांनी हिंदू महासभेचा नेता असणाऱ्या मुंजेच्या सल्ल्यावर केला होता. यासाठी त्यांनी दलितांना असा तर्क दिला होता की शीख धर्म स्वीकारून ते फक्त हिंदू धर्माच्या परिघाबाहेर जातील पण हिंदू संस्कृतीच्या परिघाच्या आत राहतील, म्हणून त्यांनी शीख धर्म स्वीकारला पाहिजे. केवळ जेव्हा त्यांना स्पष्ट झाले की मास्टर तारा सिंहांच्या नेतृत्वातील जाट शीख दलितांच्या धर्मांतराच्या विरोधात आहेत व धर्मांतरित झालेल्या दलितांसोबत शीख धर्मातही क्रूर अत्याचार होत आहेत आणि जेव्हा ब्रिटीश सरकारने धर्मांतरित दलितांना स्वतंत्र धार्मिक समुदाय मानणे नाकारले, तेव्हा आंबेडकरांनी शीख धर्मात धर्मांतर करण्याचा विचार सोडला. याला ढवळेंद्वारे तथ्यांचे सोयीस्कर सादरीकरण मानायला नको का?

संविधाना विषयी सुधीर ढवळे एका ठिकाणी लिहितात की त्यांनी-आंबेडकरांनी- प्रगत लोकशाही मूल्य असणारे संविधान बनवले. अजून एका ठिकाणी ते लिहितात की संविधान बनवताना आंबेडकर त्यांना अभिप्रेत कार्य करू शकले नाहीत. दुसरी बाब अंशतः सत्य आहे. खरंतर आंबेडकरांद्वारे मंत्री पदाचा त्याग करण्याचे एकमात्र कारण हिंदू कोड बिलावर प्रतिक्रियावादी हिंदू नेत्यांचा विरोध एवढेच नव्हते, तर हेही एक कारण होते की आंबेडकरांना श्रम मंत्रालय हवे होते, जेणे करून बुर्जुआ लोकशाही सुधार करता येवू शकतील. पहिल्या बाबीवर निश्चित पणे संशयाला जागा आहे, कारण **संविधान 1935 च्या 'गवर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट'चेच दुरुस्त रूप होते आणि सर्व दमनकारी कलमांना त्याच्यात समाविष्ट केले गेले होते. हे विसरून चालणार नाही की आणीबाणी लागू करण्याची तरतूद संविधानात अगदी सुरुवाती पासूनच होती.** हेही विसरायला नको की संविधानातच सुरुवातीला संपत्तीचा अधिकार मुलभूत अधिकारांच्या रुपात समाविष्ट केला गेला होता, ज्याला नंतर मुलभूत अधिकारातून हटवले गेले. हे सगळ आंबेडकरांनी निर्मिलेल्या संविधाना मध्येच होते.

एके ठिकाणी, 'स्टेट अँड मायनोरीटी' संबंधी ढवळे लिहितात की या रचनेमध्ये 'राज्याद्वारे समर्थित समाजवादाचा' आंबेडकरांनी पुरस्कार केला आहे. पहिली गोष्ट अशी की 'राज्याद्वारे समर्थित समाजवाद' वा राजकीय समाजवाद' एक मिस्नॉमर (अंतर विरोधी संज्ञा) आहे. जो कार्यक्रम आंबेडकरांनी सादर केला होता तो बाकी काही नव्हता तर 'लेबर पार्टी ऑफ ब्रिटेन' व 'फेबियन पार्टी'च्या आर्थिक कार्यक्रमाची एक वाईट प्रतिलिपी होती आणि काही बाबतीत तर तिच्याहून मागासलेली होती. आंबेडकरांनी नंतर अनेक महत्वपूर्ण उद्योगांपैकी काहींना खाजगी हातात देण्याविषयी वकिली केली होती.

ढवळे म्हणतात की संविधानाने औपचारिकरित्या अस्पृश्यतेचा अंत करण्यात योगदान दिले, पण अस्पृश्यतेचे मूळ सामाजिक-आर्थिक सरंजामी व्यवस्थेत होते, तिला तडा जावा म्हणून मात्र संविधानात काहीही केले गेले नाही. ढवळेंनुसार, आंबेडकर या सरंजामशाही व्यवस्थेवर आघात करू इच्छित होते. हेही वाटेल तसे सोयीने तथ्यांचे सादरीकरण करणे आहे. हे खरं आहे की आंबेडकर सरंजामशाही व्यवस्थेचा विरोध करत होते. पण तिच्या विनाशासाठी सुद्धा एखादे क्रांतीकारी वा जहाल-आग्रही पाउल उचलण्याचे ते पुरस्कर्ते नव्हते. काय साथी ढवळेंना हे माहिती आहे का की **आंबेडकरांनी विना मोबदला जहागिरी आणि सरंजामी जमिनी जप्त करण्याला विरोध केला होता?** जर त्यांना माहिती नसेल, तर एक डावा आंबेडकरवादी म्हणून त्यांनी ही माहिती करून घेतली पाहिजे आणि जर त्यांना माहिती असेल तर त्याचा उल्लेख टाळणे बौद्धिक आचारानुसार योग्य ठरत नाही. **काय त्यांना माहिती आहे का की ज्या सरंजामदार राजे-रजवाड्यांना भारतात समाविष्ट केले गेले त्यांना प्रीवी पर्स देण्याचा सल्ला आंबेडकरांचा होता?** जर संविधान निर्माणातील आंबेडकरांच्या भूमिकेवर चर्चा व्हायला हवी तर मग ती संपूर्णपणे व्हायला हवी, फक्त हिंदू कोड बिलाला आधार बनून नाही झाली पाहिजे.

ढवळे आंबेडकरांची नवी वैचारिक ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करताहेत. त्यांचे म्हणणे आहे की फुले आणि आंबेडकर जातीय ओळखींचे पुरस्कर्ते नव्हते, पण 'वर्ग अंतर्विरोधाच्या संकल्पना निर्मितीच्या सुरुवातीच्या टप्प्यात' ते जातीच्या ओळखी पासून वाचू शकले नाहीत. पहिला मुद्दा असा की या विषयावर फुले व आंबेडकरांचे नाव सोबत नाही घेतले जाऊ शकत. दुसरे असे की फुलेंच्या बाबत अंशत:च ही गोष्ट लागू होते. तिसरे म्हणजे, आंबेडकरांना ही बाब लागूच होत नाही. ज्या वेळी, ढवळेंच्यामते, आंबेडकर वर्गीय राजकारणाच्या दिशेने संक्रमण करत होते, म्हणजे इंडीपेंडंट लेबर पार्टी च्या काळात, आंबेडकर आपल्या भाषणांमध्ये आणि मुलाखतींमध्ये परस्पर विरोधी वक्तव्य करत होते. कारण, इंडीपेंडंट लेबर पार्टी त्यांच्या साठी मुळात आणि मुख्यत:, पुणे करारानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीत लागू करावी लागणारी राजकीय रणनीती होती. उदाहरणार्थ, जर तुम्ही आंबेडकरांवरील क्रिस्टोफर जेफरलोटचे पुस्तक, 'डॉ.

आंबेडकर अँड अनटचेबिलीटी' वाचाल तर तुम्हाला आढळेल की 1937 मध्ये आंबेडकर म्हणतात की भारतीय समाजाच्या विश्लेषणात वर्ग ही उपयोगी श्रेणी नाही आणि जातीचे उत्पादन संबंधाशी काहीही देणे घेणे नाही. म्हणजे, आय.एल. पी चे घोषणा पत्र ते सांगत होते, जे पुणे करारानंतरच्या राजकीय डावपेचानुसार उपयोगी होते आणि आंबेडकर या वेळी सुद्धा जे सांगत होते त्याच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. म्हणून डॉ. आंबेडकरांना मार्क्सवादी किंवा अचेतन मार्क्सवादी बनवण्याचा प्रयत्न नाही केला पाहिजे. हा त्यांच्या राजकीय वारश्याशी सुद्धा अन्याय ठरेल.

आता आपण पाहू की आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष्याची' स्थापना का केली होती आणि 1935-36 मध्येच का, त्या पूर्वी का नाही? आणि काही काळानंतर या वर्गीय रणनीतीला तिलांजली देत त्यांनी अस्मितेवर आधारित रणनीती का स्वीकारली आणि 'शेड्युल कास्ट फेडरेशन' का बनवली. ढवळेंनुसार, स्वतंत्र मजूर पक्षाची निर्मिती वर्गीय राजकारणाच्या दिशेने त्यांचे शिफ्ट होणे होते. पण या विषयी झालेले अनेक शोध दाखवतात की पुणे करारात स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागांवर सहमत झाल्यानंतर ओळखीवर आधारित दलाच्या आधाराने निवडणूक लढण्यात काहीच हशील नव्हते. परिणामी एक मास-आधार असणारा पक्ष बनवण्याचा निर्णय घेतला गेला आणि त्यासाठी अंशतः ब्रिटीश लेबर पार्टीच्या नमुन्यावर आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष्याची स्थापना केली. पण जेव्हा पहिल्याच निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाचे प्रदर्शन खूप खराब ठरले, तेव्हा आंबेडकर पुन्हा एकदा दलित नेत्याच्या त्यांच्या ओळखीकडे परततात. याच काळात, क्रिप्स मिशन सुद्धा आपले काम करतच होते. आंबेडकरांनी पुन्हा एकवार फक्त स्वतंत्र मतदार संघच नव्हे तर दलितांची अशी स्वतंत्र गावे वसवण्याची मागणी केली जिथे अ-दलितांना प्रवेश करण्यावर शुल्क आकारले जाईल. इतकेच नाही, त्यांनी एक इंग्रज अधिकारी बेवरली निकोलसला पत्र लिहले की इंग्रजांनी जाण्यापूर्वी वेगळी गावे जरूर वसवावीत आणि त्यासाठी जर त्यांना दलितांचे बलपूर्वक स्थलांतर करावे लागले तरी त्यांनी ते केले पाहिजे. याच विचारांच्या आधारावर स्वतंत्र मजूर पक्ष सोडून डॉ. आंबेडकरांनी पुन्हा दलित ओळख असणारे संगठन एस.सी. एफ.बनवले, पुढे तेही अपयशी ठरले. त्याचे एक कारण हेही होते की **स्वातंत्र्याच्या ठीक अगोदर, वाईसरायच्या कौन्सिल मध्ये जाणे आणि ब्रिटीश सरकारच्या युद्ध प्रयत्नांना सहाय्य करणे या कारणाने ते सामान्य जनते पासून तुटले होते.** देश पातळीवर कुठल्याही मोजमापात, त्या वेळी आंबेडकरांपेक्षा काँग्रेस आणि कम्युनिस्टांसोबत दलितांची संख्या जास्त होती. या विषयी वाटल्यास कोणीही ऐतिहासिक स्त्रोतांची पडताळणी करू शकतो. पण ढवळे, डॉ. आंबेडकरांच्या बदलत जाणाऱ्या निवडणुकीच्या रणनीतीच्या खोलात जाणे आणि त्यांची कारणे सांगण्याऐवजी म्हणतात, "राजकीय अपरिहार्यते मुळे" वर्गीय राजकारणाच्या दिशेने त्यांचे होणारे संक्रमण आंबेडकरांनी सोडून दिले. त्या राजकीय अपरिहार्यता कुठल्या होत्या, या विषयी सुधीर ढवळे मौन बाळगतात. आंबेडकरांना मार्क्सवादाच्या जवळ आणण्याच्या या व्यर्थ प्रयत्नांचा लाभ ना आंबेडकरवादाला होणार, ना मार्क्सवादाला आणि तसंही असे करणे बौद्धिक इमानदारीचे लक्षणही नाही.

सुधीर ढवळेंच्या मते 'स्टेट अँड मायनोरीटी' च्या लेखनानंतर डॉ. आंबेडकरांना स्टेट्समनच्या रुपात पहिले जावू लागले आणि मग त्यांना संविधान निर्मितीची जवाबदारी दिली गेली. हा सुद्धा त्रुटीपूर्व तपशील आहे. काँग्रेस आणि इतर राजकीय प्रवाह अगोदर पासूनच आंबेडकरांना स्टेट्समनच्या रुपात पाहत होती. सत्य हे आहे की 1946 नंतर आंबेडकर मूळ प्रवाहातील राजकारणापासून दुरावले होते, कारण आय. एल. पी. आणि एस. सी. एफ. या दोन्हींची रणनीती वाईटरित्या अपयशी ठरली होती. एका प्रकारे पश्चिम बंगाल मधील स्वत:ची जागा रिकामी करून काँग्रेस त्यांना मुख्य प्रवाहात घेवून आली आणि संविधानाच्या मसुदा तयार करणाऱ्या समितीत सामील केले. त्यासाठी **आंबेडकर त्यांच्या संविधान सभेतील भाषणांमध्ये वारंवार काँग्रेसचे आभार मानताना आपण पाहतो, जरी याच काँग्रेस विषयी एकदा ते म्हणाले होते की कुणीही आत्मसम्मान असणारा व्यक्ती काँग्रेस सोबत सहयोग-सहकार नाही करू शकत.** आंबेडकरांनी कायम सरकारशी नेहमी सहकार-सहयोग करण्याची नीती स्वीकारली त्याचे कारण त्यांच्या ड्युईवादी व्यवहारवादी तत्वज्ञानानुसार तेच योग्य होते, त्यानुसार सरकारच सर्वात तार्किक अभिकर्ता आणि महान मध्यस्त असते. पहिल्या महाड संम्मेलनात **आंबेडकरांनी त्यांच्या भाषणात म्हटले होते की "सरकार सर्वात प्रमुख आणि ताकदवान संस्था असते. सरकार जसा विचार करते, गोष्टी तश्याच घडतात"(पहा. आनंद तेलतुंबडे, महाड : दी मेकिंग ऑफ फर्स्ट दलित रिवोल्ट' आकार प्रकाशन) म्हणून सरकारात इंग्रज असोत वा काँग्रेस, आंबेडकर त्यांच्याशी सहयोग करण्याच्या धोरणाचा अवलंब करतात.**

ढवळे दावा करतात की आंबेडकर मार्क्सवादाच्या मानवतावादाचा स्वीकार करतात, मग जरी त्यांची 'मार्क्सवादाच्या क्रांतीच्या मार्ग' बाबत हरकत असली तरी. हा दावा सुद्धा चुकीचा आहे. जर तुम्ही 'बुद्ध आणि मार्क्स' वाचाल तर दोन गोष्टी स्पष्ट होतील: **पहिली गोष्ट म्हणजे आंबेडकरांनी हे पुस्तकं लिहिण्यापूर्वी मार्क्सवादावरील एकाही मौलिक पुस्तकाचे अध्ययन केले नव्हते.** (उदाहरणासाठी, ते म्हणतात की मार्क्सचे म्हणणे होते की 'जगाची व्याख्या करण्याची काहीच गरज नाही, मुद्दा त्याला बदलण्याचा आहे.' आणि जसे की मार्क्सद्वारे 'भांडवल' लिहिण्याच्या सत्तर वर्षांनंतर रशियात क्रांती झाली; स्पष्ट आहे की आंबेडकर 'कम्युनिस्ट घोषणापत्रा'ची 'भांडवल' या ग्रंथाशी गफलत करत होते). **दुसरी गोष्ट अशी की आंबेडकर असे मानत की मार्क्सवादात**

**जे म्हणून योग्य आहे, ते बुद्धाने पूर्वीच सांगितले होते आणि जे म्हणून नवीन ते चुकीचे आहे** (जसे की वर्ग अधिनायकत्व आणि 'हिंसात्मक क्रांती'चा सिद्धांत, इत्यादी); म्हणून आंबेडकरांचा मार्क्सवादाविषयी एक प्रकारचा दुरावा होता. हेच कारण आहे की त्यांनी मार्क्सवादाला 'डुकराचे तत्वज्ञान' सुद्धा म्हटले होते. अशात, **जबरदस्तीने मार्क्सवादाला डॉ. आंबेडकरांवर लादणे फक्त चुकीचे नाही तर अनैतिक सुद्धा आहे.** शेवटची बाब अशी की डॉ. आंबेडकरांना 'क्रांतीच्या मार्क्सवादी मार्गावर' आपत्ती नव्हती, जसे की सुधीर ढवळे म्हणतात. उलट त्यांना क्रांतिकारी परिवर्तनाच्या संकल्पनेवरच आपत्ती होती. जे ते ड्युईवादी व्यवहारवादातून शिकले होते. कुठलाही व्यवहारवाद्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांमध्येही विचारधारे विषयी एक प्रकारची सामान्य शत्रुता अस्तित्वात होती. व्यवहारवाद असे मानतो की कुठलाही सामान्य सिद्धांत किंवा विचारधारा असू शकत नाही, केवळ वैज्ञानिक पद्धतीच असते; ड्युईंच्या मते, ती वैज्ञानिक पद्धत म्हणजे प्रगतीवादी प्रयोगवाद (प्रोग्रेसिवे एक्सपेरीमेंटेशन), दुसऱ्या शब्दात, ट्रायल अँड एरर. मागील प्रयोगाच्या अपयशाचे समीक्षात्मक मुल्यांकन करणे व्यर्थ आहे, कारण ड्युईंनुसार 'भूतकाळ वर्तमानाच्या निर्मितीत काही एक भूमिका बजावत नाही' आणि म्हणून आंबेडकर सुद्धा आयुष्यभर प्रयोग करत राहिले. पण त्यांचीही एक विचारधारा होतीच. मग जरी ते त्याच्या बाबत सजग असोत वा नसोत. ती विचारधारा म्हणजे व्यवहारवाद होय. जो एक प्रकारचा संविधानिक उदारवादी सुधारवाद आहे, बाकी काही नाही.

सुधीर ढवळेंनी आंबेडकरांच्या राजकीय विचारांचा आणि प्रयोगांचा जो लेखा-जोखा सादर केला आहे, तो तथ्यत: आणि तर्कश: तर चुकीचा आहेच, उलट तो आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्यासाठी आंबेडकरवादाचे मार्क्सवादीकरण आणि मार्क्सवादाचे आंबेडकरवादी विनियोजन करतो. जोपर्यंत विचारधारेचा प्रश्न आहे, मार्क्सवादी विचारधारा आणि आंबेडकरवादी विचारधारे मध्ये कुठलाच सेतू उभारता येणार नाही. **याचा अर्थ असा होत नाही की तमाम मार्क्सवादी संघटना आणि आंबेडकरवादी संघटनांमध्ये ठोस मुद्दावर आधारित एकजूट बनू शकत नाही. अशी एकजूट बनू शकतेच आणि बनायला ही हवी. पण हा संयुक्त मोर्चा एक मुद्द्यावर आधारित मोर्चा असणार, विचारधारात्मक समन्वय नाही.** असा समन्वय करणे म्हणजे दोन स्टूलांवर सोबत बसण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे; जो असे करेल तो दोन्ही स्टुलांच्या मधोमध पडल्या वाचून राहणार नाही.

### स्वातंत्र्योत्तर भारताबाबत सुधीर ढवळेंचे विचार : हाफ बेकेड, हाफ थॉट

*"कर्मठतावादी.... कुठल्याही गोष्टीवर ठोस रुपात विचार करायला स्वत:चं डोक वापरत नाहीत, आणि आपल्या लिखाणात आणि भाषणात नेहमी अंतर्वस्तु रिक्त नेहमीच्याच रटलेल्या शब्दावल्यांचा वापर करत असतात..." माओ*

स्वातंत्र्योत्तर भारताविषयी सुधीर ढवळेंचे विचार परस्पर विरोधी आहेत. कुठे कुठे ते भारताला अर्ध-सरंजामी अर्ध-वसाहती म्हणतात, तर कुठे त्याला भांडवली म्हणताना दिसतात. उदाहरणासाठी, ते लिहितात की दलाल भांडवलदार वर्गाचे भांडवल आणि साम्राज्यवादी भांडवलाच्या एकत्र येण्यातून भांडवली विकास झाला. हे एक भलतेच सुत्रीकरण आहे. दलाल भांडवलदार वर्ग स्वभावत:च वाणिज्यिक व नोकरशाह भांडवलदार वर्ग असतो. औद्योगिक व वित्तीय भांडवलदार वर्ग दलाल असूच शकत नाही, कारण त्याला स्वतःलाच बाजाराची आणि गुंतवणुकीची संधीची आवश्यकता असते. मग, दलाल भांडवलदार वर्ग साम्राज्यवादासोबत आघाडी बनवून भांडवली विकास करणार नाही, तर भांडवली विकासाला अवरोध निर्माण करेल. एखादा औद्योगिक-वित्तीय भांडवलदारी वर्गच साम्राज्यवादाचा जुनियर पार्टनर बनत भांडवली विकासाला फलद्रूप करू शकेल. मग अशा स्थितीत भारत अर्ध-सरंजामी व अर्ध-वसाहती देश राहत नाही. तुम्ही पाहू शकता, **ढवळेंच्या तर्क प्रणालीत भयंकर अंतर्विरोध आहेत.**

एका ठिकाणी ढवळे लिहितात, की भारतात भांडवली विकासाने जाती व्यवस्था संपवली नाही, कारण "विकृत भांडवलशाही"जिचा विकास ब्राह्मणवादाशी हात मिळवणी करून झाला आहे. म्हणजे, एखादी "निरोगी भांडवलशाही" असती तर तिने जाती व्यवस्थेचा अंत केला असता! 'सुदृढ हून सुदृढ भांडवलशाही' ने अमेरिका आणि युरोपात वंशवाद संपवला का? कुठल्याही शोषक अल्पसंख्य शासनाकडून अशी अपेक्षा करणे मुळातच व्यर्थ आहे की तो जाती व्यवस्थेचा नाश करेल. कारण **प्रत्येक शोषक अल्पसंख्या शोषित बहुसंख्येला तुकड्या तुकड्यात विभागून आणि त्यांचे पाशवी उत्पीडन करूनच आपले शासन दीर्घायुषी बनवू शकते आणि या कामात जाती व्यवस्थेने भारतातल्या सर्व राजवटींना अजोड हत्यार दिले आहे.** भारतात अल्पसंख्येचे कुठलेही शासन जाती व्यवस्थेचा अंत करू शकत नाही. केवळ कष्टकरी बहुसंखेचे शासनच जाती व्यवस्थेवर प्राणांतिक आघात करू शकते. जाती व्यवस्था स्वत:च एखादी सरंजामी गोष्ट नाही की तीला ढवळेंच्या निकोप भांडवलशाहीने संपवले असते. आपण सरंजामशाही पूर्व जाती व्यवस्था, सरंजामी जाती व्यवस्था आणि भांडवली जातीव्यवस्थे वर बोलू शकतो. कुठल्याही शोषक अल्पसंख्येच्या अधीन राहिलेल्या भारताच्या इतिहासात प्रत्येक नव्या उत्पादन व्यवस्थेने जाती व्यवस्थेला स्वत:च्या गरजे प्रमाणे घडवले, मग ते शासन हिंदूंचे असो, मुसलमानांचे असो वा ब्रिटीशांचे.

जाती व्यवस्थेच्या विशिष्टतेचा उल्लेख करत ढवळे लांबवर जातात आणि दावा करून मोकळे होतात की भारतातील कामगार वर्ग एकजीनशी नाही, जसा की युरोपचा कामगार

वर्ग होता. युरोपचा इतिहास वा आजच्या युरोपच्या स्थितीविषयी काहीएक समजदारी असणारा कुणीही असा बाष्कळ दावा करणार नाही. मार्क्सचे भांडवल जरी वाचले तरी स्पष्ट होते की युरोपचा कामगार वर्ग कधीच एकजीनशी नव्हता. तसेच जर तुम्ही युरोपच्या कामगार वर्गाचा इतिहास वाचाल तर दिसेल की संपूर्ण युरोपात प्रवासी कामगार, काळे कामगार, इत्यादी सोबत वांशिक वा प्रादेशिक अंतर्विरोधाच्या आधारावर नेहमीच तिथे अस्मितेचे राजकारण चेतवले गेले, **ढवळेंचा दावा फक्त त्यांचे अज्ञान दाखवतो आहे.**

**जयभीम आणि लाल सलाम च्या समन्वयाचा प्रश्न**

*'त्याना माहित नाही कुठे बसायला हवे, मग ते दोन्ही स्टुलावर बसण्याचा प्रयत्न करतात, एका वरून दुसऱ्या स्टुलावर उडी मारतात, आणि कधी डावीकडे तर कधी उजवी कडे पडतात'- लेनिन*

या नंतर ढवळे 'जय भीम' आणि 'लालसलाम'चे मिश्रण करण्याची घोषणा देतात आणि मग या दोन्ही बाजूंच्या पलीकडे जात एका शिक्षकाच्या स्थितीत जावून सल्ला देतात की दोन्ही बाजूंच्या झालेल्या चुका सुधारून 'रस्त्यावरच्या लढाई'साठी सज्ज झाले पाहिजे. जेव्हा एखादा 'जय भीम' अथवा 'लाल सलाम' ची घोषणा देतो तेव्हा ते केवळ शब्द राहत नाहीत तर विचारधारात्मक प्रतिक बनतात. एखादा 'जय भीम' म्हणतो तेव्हा त्याला फक्त आंबेडकरांचा जयघोष करायचा नसतो, त्याचा स्पष्टपणे अर्थ असा होतो की त्याने आंबेडकरांच्या विचारधारेला स्वीकारले आहे. त्याच प्रकारे जेव्हा कोणी 'लाल सलाम' म्हणतो तेव्हा तीही केवळ घोषणा नसते, त्याचा अर्थ मार्क्सवादी विचारधारेला आत्मसात करणे असतो. मग प्रश्न उभा राहतो की मार्क्सवादी विचारधारा आणि आंबेडकरांच्या राजकीय विचारधारेत काहीएक समन्वय शक्य आहे का? **आंबेडकरांचा ड्युईवादी व्यवहारवाद राज्यसत्तेच्या विरोधात जाणे कुठल्याही परीस्थितीत चुकीचे मानतो कारण राज्यसत्ता/सरकार समाजातील 'सर्वाधिक तार्किक अभिकर्ता' आहे.** ज्यांनी कोणी आंबेडकरांचे लेखन वाचले आहे आणि त्यांच्या राजकीय प्रयोगांशी परिचित आहेत, त्यांना हे ठावूक आहे की आंबेडकर या सिद्धांतापासून कधीही ढळले नाहीत. **त्याच्या विपरीत, मार्क्सवाद असे मानतो की समाजातील परिवर्तनाची प्रक्रिया क्रमिक विकास आणि गुणात्मक झेप अशा दोन्ही पद्धतीने होते. आणि समाजात कुठलेही क्रांतिकारी परिवर्तन विना बळप्रयोग होत नाही** (बळप्रयोगाचा सिद्धांत आणि 'हिंसेविषयी प्रेम' यात फरक आहे, ज्याच्या विस्तारात जाणे येथे शक्य नाही) आणि कुठलेही शोषणकारी उत्पीडनकारी सामाजिक-आर्थिक संबंध राज्यसत्ता आणि तिच्या बळप्रयोगाशिवाय टिकू शकत नाही. राज्यसत्ता एका वर्गाद्वारे दुसऱ्या वर्गावरील हिंसेचेच उपकरण आहे. पण हिंसेचा विरोध करणाऱ्या ड्युईवादी व्यवहारवादाला राज्यसत्तेची हिंसा दिसत नाही, त्याला फक्त जनतेद्वारे सामुहिकपणे स्वत:च्या मुक्तीसाठी केलेल्या बळप्रयोगावर हरकत आहे. आंबेडकर सुद्धा याच विचाराचे पुरस्कर्ते आहेत. एक उदारवादी बुर्जुआ तत्वज्ञान असल्याने ड्युईवादी व्यवहारवाद, म्हणजे आंबेडकरांची राजकीय विचारधारा, असे मानते यावर आम्हाला काहीच आश्चर्य नाही आणि ना कुठली तक्रार आहे. एकूणच काय की **विचारधारेच्या स्तरावर मार्क्सवाद आणि आंबेडकरवादात कुठलाच समन्वय शक्य नाही आणि म्हणून 'जय भीम' आणि 'लाल सलाम' चे मिश्रण होऊ शकत नाही.**

ढवळे असाही सल्ला देतात की दलितांना सोबत घेणे जरुरी आहे. (कदाचित, याच साठी ते 'जय भीम आणि 'लाल सलाम' एकत्रित करण्याची वकिली करताहेत) आम्हीही मानतो. पण त्यांना वैचारिक तडजोडी, खोटेपणा आणि तुष्टीकरणाच्या आधारावर नाही तर एका योग्य वर्गीय कार्यदिशेच्या आणि विचारधारेच्या आधारावर जागृत, गोलबंद, आणि संघटीत करणे गरजेचे आहे. 'जय भीम'आणि 'लाल सलाम'ला एकत्र करण्याच्या मधल्या मार्गाने, खोटेपणा आणि तुष्टीकरणाच्या सहाय्याने दलित समूह कुठल्या एखाद्या संघटनेसोबत गेल्याचे आजवर आम्ही तरी पहिले नाही. **जर एखाद्याला फक्त 'जय भीम' ऐकूनच सोबत जायचे असेल, तर तो आंबेडकरवादी संघटनांच्या 'जय भीम'ला ऐकून त्यांच्या सोबत जाईल, तुमच्या सोबत कशाला येईल? अशा प्रकारचा विचार फक्त विचारधारात्मक स्तरावर चुकीचा नाही तर व्यावहारिक स्तरावरील मूर्खपणा सुद्धा आहे.**

हे खरं आहे की आज एका योग्य वर्ग कार्यदिशेच्या आधारावर वर्ग आधारित जाती विरोधी आंदोलन उभे करण्याची आवश्यकता आहे. एका वैज्ञानिक दृष्टीकोणातून, साहसिकतेने डॉ. आंबेडकरांचे राजकीय तत्वज्ञान आणि विचारधारेची समीक्षा करायला हवी. जेणे करून जाती–विरोधी आंदोलनाला आतून पोखरत असणाऱ्या व्यवहारवादाला, अर्ज-विनंत्या आणि सुधारवादापासून सुटका करून घेता येणे शक्य होईल. पण असे करण्याचे साहस सुधीर ढवळे करत नाहीत. ते मधला मार्ग काढण्याच्या प्रयत्नात गोल-गोल फिरत आहेत. ते अस्मितावादाची टीका करतात, पण त्यांचेच संघटन रिपब्लिकन पँथर्स भीमा कोरेगावच्या 200 वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने दलित अस्मितेला प्रोत्साहन देण्यासाठी एक मिथक पेरते. तुम्ही म्हणाल की मार्क्सवादी तर असेच म्हणणार! पण आनंद तेलतुंबडेनी सुद्धा हीच गोष्ट म्हटली आहे आणि त्यांनी हे अगदी बरोबर म्हटले आहे की अशा प्रकारच्या अस्मितावादी मिथकांच्या निर्मितीतून आज दलित मुक्तीच्या योजनचे फक्त नुकसानच होत आहे.

आपल्या या मिथक निर्मितीच्या रणनीती अंतर्गत सुधीर ढवळे डॉ. आंबेडकरांबाबतही एक मिथक निर्माण करण्याच्या कामी लागले आहेत. उदाहरणार्थ, त्यांचा असा दावा आहे की आंबेडकर जाती अंतासाठी सरंजामशाही उपटून फेकण्यासाठी क्रांतिकारी वर्ग संघर्ष करण्याबाबत सांगत होते. हे म्हणजे

इतिहासाशी दुराचार करणे होय. आंबेडकरांच्या लेखनातून आणि त्यांच्या प्रयोगांतून कुणीही असा अर्थ काढू शकणार नाही. आम्ही या विषयी सुरुवातीला तथ्येही दिली आहेत.

सुधीर ढवळे एक डोळे उघडणारा खुलासा करतात की क्रांती कुठल्या एका तऱ्हेने होणार नाही! आम्हाला वाटतं की हे आकाशवाणी सारखे स्पष्ट तथ्य आहे. पण विडंबना अशी की सुधीर ढवळे राजकीयदृष्ट्या अशा राजकीय कार्यदिशेच्या जवळ आहेत जी भारतात चीनी क्रांती करण्यासाठी अडून बसलीये. ढवळेंची 'पूर्ण लोकशाही क्रांती' याच 'टाइम कप्सूल' मध्ये कैद झालेल्या क्रांतिकारकांच्या जवळ जाते. पण याहूनही महत्वाची बाब अशी की क्रांती मग ती कितीही भिन्नभिन्न रुपात समोर येवो, तिची एक सामान्यता (जनरलिटी) वा सार्वभौम गुण (युनिवर्सलिटी) हा असतोच. क्रांती तिच्या कुठल्याही स्वरूपात राज्यसत्तेचा ध्वंस आणि नव्या राज्यसत्तेचे निर्माणच असते. आणि त्यात बळप्रयोग (जो हिंसेचा समानार्थी शब्द नाही) होणे अपरिहार्य आहे, कारण एक वर्ग स्वेच्छेने सत्ता दुसऱ्या वर्गाच्या हाती देत नाही. या सार्वभौमिक अर्थाला गोल करून क्रांतीच्या संभावित वैविध्यपूर्ण रस्त्याची बात करणे भ्रामकता ठरेल. कदाचित ढवळेंच्या 'क्रांतीचा विशिष्ट मार्ग'चा अर्थ आहे की भारतात मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचा समन्वय करावा लागेल. खरंतर हे शक्य नाहीच पण असे करण्यासाठी द्रविडी प्राणायाम केले गेलेच तर क्रांतीचा हा सार्वभौमिक अर्थच लोप पावेल आणि परिणामी जन्माला येणाऱ्या क्रांतीत काहीही क्रांतिकारी असणार नाही.

शेवटी, सुधीर ढवळे डावे आंदोलन आणि दलित आंदोलनच्या एकजुटीची घोषणा देउन सुद्धा, त्यांच्या मध्ये भिंत उभी करतात, जणूकाही त्या दोन्ही वेगवेगळ्या, पृथक गोष्टी आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, कामगार आंदोलनात डावे नेतृत्व आणि दलित आंदोलनात आंबेडकरवादी नेतृत्व आणि या दोन्ही आंदोलनामध्ये एक योगात्मक एकता! आमचे म्हणणे आहे की आज दलित आंदोलन वा दलित संघटनेपेक्षा जाती-अंताचे आंदोलन आणि जाती-अंतक संघटने विषयी बोलायला हवे आणि या आंदोलनातही व्यवहारवाद आणि अस्मितावादा विरोधात अंतर्गत संघर्ष केला पाहिजे. दलित समूहांना ढवळे एक असे कार्यक्षेत्र (टेरीटरी) बनवतात की जिच्या पर्यंत क्रांतिकारी कम्युनिस्टांची पोहचेबाहेर आहे जिच्यावर आंबेडकरवाद्यांचा एकाधिकार आहे. अशा स्थितीत मग कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या हातात शिल्लक राहते फक्त आंबेडकरवादी दलित आंदोलनाशी योगात्मक एकता निर्माण करणे! **हि सुधीर ढवळेंची तडजोडवादी आणि संधिसाधू समजदारी आहे एवढेच नाही तर हे चूक आणि अव्यावहारिक सुद्धा आहे.**

आम्ही समजतो की आंबेडकरवादी दलित आंदोलनाशी एकता आणि संघर्ष दोन्ही होणार. विचारधारेच्या प्रश्नावर संघर्ष आणि ठोस मुद्यावर मुद्दा-आधारित एकजूट. सोबतच, कम्युनिस्टांना आपल्या जाती-विरोधी संघटना आणि आंदोलने उभी करावी लागतील, जी व्यवहारवाद आणि अस्मितावादावर नसतील तर एका क्रांतिकारक वर्गीय आधारावरील जाती-विरोधी आंदोलने असतील. ऐतिहासिकदृष्ट्या कम्युनिस्टांनी पोथीनिष्ठा आणि कर्मठपणामुळे जाती प्रश्नाला तिच्या ऐतिहासिकतेत समजून घेण्यात चूक केली, परिणामी, जातीप्रश्नाच्या सोडवणूकीसाठीचा कोणताच योग्य कार्यक्रमही ते सुचवू शकले नाहीत. त्यांचा हा वैचारिक कमकुवतपणा भारतातील क्रांतीचा एक योग्य कार्यक्रम सादर न करणे व डावा दुस्साहसवाद आणि उजव्या संधिसाधूवादातील वैचारिक भरकटलेपण, विचलने, आणि प्रस्थानांच्या रूपातही समोर येत राहिला आहे. **जातीप्रश्न एकमेव प्रश्न नव्हता ज्यावर भारतातले कम्युनिस्ट योग्य कार्यक्रम द्यायला अपयशी ठरले.** सांगायला नको की आम्ही 1925 ते 1951 ची भाकपा आणि 1967 पासून आजच्या मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट आंदोलनाबाबत बोलत आहोत, दुरुस्तीवादी भाकपा, माकपा आणि भाकपा माले(लिबरेशन) फक्त यांच्याबद्दल नव्हे. **इतक्या वैचारिक कमजोऱ्या असून देखील क्रांतिकारी कम्युनिस्ट आंदोलनाने 1951 पूर्वी आणि 1967 नंतर देखील भूमिहीन दलित समूहांना त्यांच्या सर्वात महत्वाच्या आणि ज्वलंत प्रश्नाभोवती संघटीत केले, जातीय अपमानाविरोधात लढे दिले आणि हर तऱ्हेचे बलिदान केले. तथ्यांच्या आधारे म्हणाल तर दलितांची मोठ्या संख्येने इतर कुठल्याही झेंड्याच्या तुलनेत लाल झेंड्याच्या नेतृत्वात लढे लढली आहेत आणि बलिदानही केले आहे.** असे असताना, 'दलित आंदोलन' आणि 'डावे आंदोलन' यांच्यात योगात्मक एकतेची बात करणे म्हणजे अस्मितावाद आणि अनैतिहासिक दृष्टीकोन नाही का?

नि:संशयपणे, क्रांतिकारी कम्युनिस्टांनी कुठल्याही वैचारिक तडजोडीविना आणि सरेंडरिज्मविना जाती प्रश्नाला मार्क्सवाद-लेनिनवादी दृष्टीकोणातून समजून घेतले पाहिजे आणि त्याच्या अंताचा एक लघुकालिक आणि दीर्घकालीन कार्यक्रम सादर करायला हवा. असे अनेक अर्थपूर्ण आणि रचनात्मक प्रयत्न झाले आहेत आणि होत आहेत, ज्यांना स्वीकारता येऊ शकेल. या प्रक्रियेत आपल्या मातीतली अशी अनेक प्रतीके आहेत, ज्यांना स्वीकारता येऊ शकेल. त्यासाठी **मापदंड केवळ आणि केवळ हाच असू शकतो की कोणते जाती-विरोधी योद्धे आणि आंदोलने व्यवस्था-विरोधाच्या दिशेने सरसावली; ज्यांना हे समजून आले की जाती अंताचा प्रश्न केवळ सामाजिक परिवर्तनाचा वा सामाजिक क्रांतीचा प्रश्न नाही, तर राज्यसत्तेचा प्रश्न आहे.** कारण राज्यसत्तेचा अवलंब केल्याशिवाय कुठलेही उत्पीडनकारी सामाजिक संबंध दीर्घकाळ टिकू शकत नाहीत. या श्रेणीत अयांकली अग्रणी व्यक्ती आहेत, ज्यांना आजच्या क्रांतिकारी जाती-विरोधी आंदोलनाच्या एका प्रतीकाच्या रुपात स्वीकारता येऊ शकेल, कारण ते राज्यसत्तेच्या विरोधात उभे राहिले आणि त्यांनी

**(पान 44 वर)**

समाज

# केवळ आसाराम नाही तर संपूर्ण धर्माची लुटारू वृत्ती ओळखा

✍लखविन्दर

***अखेर बलात्कारी बाबा आसाराम बापूला कोर्टाने एप्रिल 2018 मध्ये जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या निमित्ताने आसारामचा गोरखधंदा तर उघड झालाच आहे. खालील लेख आसाराम बापूला अटक झाल्यानंतर 2013 साली लिहिला गेला होता, आणि धर्माच्या नावाने लुटारू वृत्तीकडे, आसाराम बापू सारख्यांच्या राजकीय-आर्थिक संबंधांकडे तो लक्ष्य वेधतो आणि आजही अत्यंत प्रासंगिक आहे. त्यामुळे या लेखाचा मराठी अनुवाद प्रकाशित करत आहोत.***

***- संपादकीय टिपण***

आपण एक संत आहोत; असा दावा करून आपल्या भक्तांनी आपल्यावर जी श्रद्धा प्रकट केली आहे, तिचा गैरफायदा आसारामकडून उठवला गेला. आपल्या भक्तिणींवर बलात्कार करून त्यांना धमकावून गप्प करण्यात आले. यामधून भक्तांकडून अमाप संपत्ती (10,000 कोटी) गोळा करण्यात आली. अशी व्यक्ती संत असू शकत नाही, असेही या निमित्ताने म्हटले जात आहे. परंतु असे करताना एकंदरीत धर्म आणि संत यांच्या चारित्र्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रत्यक्षात एका बाजूला धर्म व साधुसंत, आणि दुसऱ्या बाजूला शोषणकारी भांडवलदारी अर्थव्यवस्था व राजकारण हे पूर्णपणे एकमेकात मिसळून गेलेले आहेत. ह्या लुटारू गटबंधनाला आपण नीटपणे ओळखले पाहिजे.

सर्वसामान्य लोकांमध्ये आज प्रचंड प्रमाणात सामाजिक आर्थिक असुरक्षा आहे. या व्यवस्थेबाबत तात्विक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन नसल्यामुळे देव, भूतबाधा, जादूटोणा, पूजापाठ यावर लोकांचा विश्वास आहे. विविध धर्मांमध्ये याबाबत विविध रीती-रिवाज आहेत. **शोषक वर्ग नेहमी जनतेच्या धार्मिक विश्वासांचा गैरफायदा उठवून त्यांचे आर्थिक-सामाजिक-राजकीय शोषण करीत आलेले आहेत. धर्म ही वास्तवात पारलौकिक गौष्ट नसून नेहमी लौकिक म्हणजे या जगाशी संबंधित अशीच आहे.** शोषक वर्ग हा नेहमी आपल्या सशस्त्र ताकदीच्या जोरावर राज्य करतो. सध्याच्या भांडवलदारी व्यवस्थेपूर्वी गुलामगिरीच्या काळात गुलाम आणि त्यांचे मालक, सरंजामशाहीच्या काळात राजे-राजवाडे हे धार्मिक विचारांचा आधार घेऊन राज्य करीत होते. राजा हा विष्णूचा अंश आहे, अशा प्रकारचे विचार वर्णव्यवस्थेत पसरवले जात. त्यामुळे संपूर्ण जनता त्यांची गुलामगिरी पत्करायला सहजपणे तयार होत असे. हेच या शोषणकारी व्यवस्थेचे दैवतीकरण होते. परंतु आज भांडवलदारी व्यवस्थेमध्ये अशी परिस्थिती नाहीये. या व्यवस्थेचे दैवतीकरण झालेले नाहीये. मात्र आजही धर्म हा भांडवलदारी वर्गाच्या हातात राज्य करण्याचे महत्त्वाचे हत्यार आहे.

**साधू, संत, पाद्री, मौलवी यांचा वापर नेहमीच शोषक वर्ग करीत आलेला आहे. यांच्या बदल्यात भांडवलदारी लुटीचा एक हिस्सा या धार्मिक गटाला मिळत आहे.** जसजशी सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थिती बदलते तसा धर्मातही बदल होत जातो. आज भांडवलदारी व्यवस्था कायम झाल्यासारखी दिसतेय आणि त्यामुळे धर्माचे रूपांतरही बाजारी व्यवस्थेत झालेले आहे. स्वतःला “देवदूत” किंवा “परमेश्वराचे रूप” मानणारे हे बाबा, संत हे स्वतःच भांडवलदार झालेले आहेत. ते खरे म्हणजे दलाल, भांडवलदार प्रथम आहेत आणि साधूसंत नंतर आहेत.

**नफा हे प्रत्येक भांडवलदाराचे एकमेव उद्दिष्ट असते. मग ते कोणत्याही प्रकारे, कितीही अमानवीय पद्धत वापरावी लागली तरी, भांडवलदार जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात. हे भांडवलदार आपले उत्पादन विकण्यासाठी जनतेतले अज्ञान, त्यांच्यातल्या विविध अंधश्रद्धा यांचा फायदा उठवून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात.** धर्माला राजकारणाशी जोडून हे काम ते अधिक चांगल्या प्रकारे करतात. धर्म आणि भांडवल यांचे हे एकत्रीकरण त्यांच्या अमाप नफ्याचा स्त्रोत आहे. म्हणूनच आपल्या देशामध्ये संत आणि भांडवलदार मोठ्या संख्येने एकमेकांच्या बरोबर आहेत.

निवडणूक लढविणारे सर्व भांडवलदारी पक्ष या साधुसंतांचे भक्त असतात. या संतांच्या भक्तांचे रूपांतर हे पक्ष आपल्या मतपेढीमध्ये करू इच्छित असतात. संत आपले भांडवल आणि सामाजिक आधार यांच्या मदतीने चांगल्यापैकी राजकीय स्थान स्वतःसाठी मिळवतात. संतांचा धर्माच्या नावावर उभा असलेला कारोबार आणि भांडवलदारी राजकारण हे अशा रीतीने एकमेकांना पूरक आहे. हे संत आपले गुन्हे, गैरव्यवहार लपविण्यासाठी याच राजकारण्यांचा आधार घेतात.

आसाराम हा भांडवलदारी संतांपैकी एक आहे. त्याची एकूण संपत्ती 10,000 कोटी रु. आहे. “संत आसाराम बापू ट्रस्ट” या नावाच्या संस्थेचे एकंदर 425 आश्रम आहेत. यातील काही परदेशात सुद्धा आहेत. औषधे, रुग्णालये, शाळा, पुस्तके, मासिके यातून नफा तर येतोच. शिवाय भक्तांनी दिलेल्या देणग्या वेगळ्याच. श्री. श्री. रविशंकर, गुरमीत राम रहीम, बाबा रामदेव यांच्या सारख्या भांडवलदारी संतांची संख्या भारतात बरीच आहे. सन 2011 मध्ये बाबा रामदेव हे 1100 कोटी रु. चे मालक होते. देशाच्या उत्तराखंड या राज्यात 250 चौ. मीटरपेक्षा जास्त जमीन राज्याच्या बाहेरची व्यक्ती खरेदी करू शकत नाही. त्या ठिकाणी रामदेव 2000 एकरचे मालक आहेत, आमच्या या स्वदेशी बाबाने अमेरिकेतील ह्युस्टन येथे

100 एकर जमीन व स्कॉटलंड मध्येही बरीचशी जमीन खरेदी केली आहे. भांडवलदारी धर्म हा किती नफेखोर धंदा आहे, हे आपण बघताय.

आसाराम यांची बरीचशी मालमत्ता सरकारने अनुदानाच्या रूपाने दिलेल्या जमिनीवर उभी आहे. या जमिनीबरोबरच सरकारी-बिगरसरकारी जमिनींवर अतिक्रमण करूनही त्या ताब्यात त्यांनी घेतल्या आहेत. गुजरात सरकारच्या म्हणण्यानुसार आसारामच्या आश्रमांनी 67,099 एकर जमिनीवर कब्जा केलेला होता. अशाच प्रकारचे आरोप त्याच्यावर मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान मध्येसुद्धा झाले आहेत. 2010 साली जेव्हा आसारामच्या मठामध्ये चार मुलांचा रहस्यमय मृत्यू झाला होता, तेव्हा आपल्या अशाच राजकीय संबंधांमधून आसाराम तुरुंगांत जाता जाता वाचला होता. याबाबत गुजरात सरकारने अत्यंत नाईलाजाने या प्रकरणाची जी चौकशी त्यावेळेला केली होती, ती आजतागायत लोकांसमोर आलेली नाही. गुजरातमध्ये भाजपाची सत्ता असेल, नाहीतर धर्मनिरपेक्ष काँग्रेसची, आसाराम हा अघोषित राजगुरु होता. खास करून भाजपच्या नेतृत्वाखालची राज्य सरकारे आसाराम सारख्या बाबांना अगदी उघडपणे साथ देत होती, आणि त्याची मदतही घेत होती. हा सरळसरळ देवाणघेवाणीचा प्रकार होता. उमा भारती जेव्हा मध्यप्रदेशची मुख्यमंत्री होत्या, तेव्हा आसारामचे विधानसभेत प्रवचन ठेवण्यात आले होते. भाजपचे आडवाणी आणि काँग्रेसचे दिग्विजयसिंह सारख्या मोठ्या नेत्यांचे आसारामचे फार जुने संबंध होते. मात्र आता एका अल्पवयीन मुलीवरच्या बलात्काराचे प्रकरण घडले तेव्हा मात्र हे सर्व भक्तगण बाजूला झाले आहेत. अर्थात आसारामला वाचवण्याचे आतून भरपूर प्रयत्न झालेच. यावेळेला आसारामच्या विरोधात पुरावा एवढा भक्कम होता की, भांडवलदार वर्गातील अंतर्गत झगडे, या प्रकरणांचा टीआरपी वाढविण्यासाठी मिडीयामध्ये झालेली जबरदस्त स्पर्धा, समाजाच्या लोकशाहीवादी -परिवर्तनवादी विभागाकडून आसारामच्या विरोधात उठलेला आवाज इत्यादी कारणांमुळे आसारामला तुरुंगात जावे लागले. देशातील भांडवलदारी न्यायव्यवस्थेला अखेर याही गोष्टींचा विचार करावा लागला. यामुळे दुसऱ्या बुवांना जरा सावधगिरीने वागण्याचा धडा मिळेल. यापेक्षा अधिक काही फरक पडणार नाही.

इतर साधूंच्या राजकीय लागेबांध्याची उदारणेही बघावी लागतील. श्री. श्री. रविशंकरच्या आर्ट ऑफ लिव्हिंगच्या मुख्यालयासाठी कर्नाटक सरकारने 99 वर्षाच्या कराराने जमीन दिली आहे. ओडिसा सरकारनेही या संस्थेला 200 एकर जमीन अनुदान या स्वरूपात दिली आहे. या जमिनीवर मागच्या वर्षी प्राचीन मूल्ययुक्त आधुनिक शिक्षणाचे एक विद्यापीठ सुरू करण्यात आले. मध्यप्रदेशामध्ये महर्षी महेश योगी या साधूला एका विश्वविद्यालयासाठी जमीन देण्यात आली. बाबा रामदेवलाही विविध सरकारंनी स्वस्तात जमीन दिली आहे. त्यात महाराष्ट्राचाही समावेश आहे.

नवउदारीकरण, खाजगीकरणाच्या या जमान्यात सरकार जनतेची मालमत्ता आणि विविध स्त्रोत देशी-विदेशी भांडवलदारांच्या ताब्यात देत आहे. खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या नावावर जनतेचे पैसे आणि मालमत्ता या भांडवलदारांच्या तिजोरीत भरले जात आहेत. या सरकारी धोरणाचा हे साधू भांडवलदार भरपूर फायदा उठवीत आहेत.

**हे साधू अतिशय सनातनी, परिवर्तनविरोधी, जनताविरोधी आणि फॅसिस्ट (भांडवलदारी हुकूमशाहीवादी) शक्तींचा एक भाग आहेत.** आसारामने आपला पहिला आश्रम 1970 मध्ये गुजरातच्या अहमदाबादमध्ये सुरू केला. परंतु त्याला 1980 नंतरच प्रसिद्धी मिळाली. याच काळात भारतात उदारमतवादी आर्थिक धोरणे सुरू झाली होती. उदारमतवाद याचा अर्थ भांडवलदार वर्गावरची सर्व कायदेशीर व आर्थिक बंधने हळूहळू काढून टाकून मुक्त अर्थव्यवस्थेला उत्तेजन देणे. याच काळात कडव्या हिंदुत्ववादाच्या जोरदार प्रचाराला भाजपाच्या लालकृष्ण आडवाणी यांच्या नेतृत्वाखाली सुरवात झाली होती. आसारामचा उदय हा सुद्धा कडव्या हिंदुत्ववादाच्या उदयाचा एक भाग आहे. आसाराम हा आत्मसुधाराच्या प्रवचनांच्या नावाखाली कडवा हिंदुत्ववाद आणि रूढीप्रिय संस्कृती यांचा प्रचार करीत असे. स्त्री स्वातंत्र्याला त्याचा प्रखर विरोध आहे. ख्रिश्चन आणि मुसलमान यांच्या विरोधात हिन्दु जनमानसात विष कालवायचे आणि लोकांना हिंसक कारवाईला तयार करायचे हा अशा संस्थांचा एक विशेष भाग होता. आसारामवर बलात्काराचा आरोप ठेवल्यानंतर विश्व हिंदू परिषदेच्या अशोक सिंघल यांनी एक पत्रकार परिषद घेऊन मत्याच्यावर बलात्काराचा आरोप लावणे हा हिंदू संस्कृतीवर हल्ला आहे.फ असे उद्गार काढले होते. केवढा हा बलात्कारी साधूची बाजू घेण्याचा भयंकर हिंदुत्ववादी प्रयत्न!

हे अतिशय रुढीवादी साधू कष्टकरी जनतेचे कट्टर शत्रू आहेत. कष्टकरी जनतेने भांडवलदारी व्यवस्थेच्या विरोधात क्रांतीकारी एकजूट करावी, अशी त्यांची कधीच इच्छा नसते.

**धर्माच्या नावाने हे साधू लोकांना आत्मसुधाराची प्रवचने देतात; परंतु ही प्रवचने ते स्वतःला लागू करत नाहीत.** इतर भांडवलदारांप्रमाणे हे भांडवलदारी संतही नफ्याच्या मागे असतात आणि भक्तांची लूट करून बांडगुळासारखे ऐशोरामात राहतात. जनतेच्या दुःखाला कष्टकऱ्यांची भांडवलदार वर्गाकडून होणारी लूट जबाबदार आहे, हे ते आपल्या प्रवचनातून कधीही सांगत नाहीत. परंतु त्यांच्या दुःखाला मागच्या जन्मात त्यांनी केलेले पाप जबाबदार आहे, असे खोटेच सांगतात. सत्य काय आहे, ते सांगून ते समस्त भांडवलदारी वर्गाच्या विरुद्ध जाऊ इच्छित नाहीत. जनतेला अंधश्रद्ध करून ही व्यवस्था टिकविण्याचाच प्रयत्न ते करतात. **धर्म हा नेहमीच शोषकांची सेवा करीत आला आहे. आज तो भांडवलदार वर्गाची सेवा करीत आहे.**

**अनुवाद : डॉ. सुरेश बेरी**

समाज

# मुलांच्या कुपोषणाला सरकारच लावतंय हातभार
# कुपोषणाच्या नावाने कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचा धंदा

✍तृप्ती

भारतात जवळपास 70% जनता गरिबी आणि बेरोजगारीने त्रासलेली आहे. पोटभर अन्न न मिळाल्यामुळे देशात कुपोषणाचे प्रमाण सतत वाढताना दिसते. 52% प्रजननक्षम स्त्रियांमध्ये रक्ताची कमतरता आहे. देशातील जवळपास 44% मुले कुपोषित आहेत तर 6 वर्षाच्या आतील मुलांमध्ये 72% मुले ही कमी वजनाची आहेत. ही आकडेवारी आपल्याला काय सांगते? **पोटभर खायला नसल्यामुळे आईचे कुपोषण होते, अशा आईला होणारे मुल कमी वजनाचे असते, म्हणजेच कुपोषित.** आता हा सगळा विषय एवढा संवेदनशील का आहे हे समजून घेऊया. जेव्हा आपण म्हणतो 42% मुले कुपोषित आहेत याचा अर्थ जन्मलेल्या 100 मुलांपैकी 42 मुले कुपोषित आहेत आणि ती आयुष्यभर कुपोषित राहणार. म्हणजे जेव्हा ही मुले तरुण होतील तेव्हाही ती कुपोषित असतील.

याचा आपल्या देशावर आणि समाजावर काय परिणाम होतो? **मुलांचा शारीरिक आणि बौद्धिक विकास हा सहा वर्षापर्यंत होत असतो, त्यातील पहिली तीन वर्ष ही मुलाच्या वाढीसाठी अतिशय महत्वाची असतात, कारण याच काळात बाळाच्या मेंदूचा विकास होत असतो म्हणजे त्याच्या वैचारिक क्षमतेचा, प्रश्न विचारण्याच्या, गोष्टी पटकन समजून घेण्याच्या क्षमतेचा विकास होत असतो.** जर या काळात बाळाला आवश्यक आहार मिळाला नाही तर मुलांच्या मेंदूचा विकास खुंटतो आणि कुपोषणाचा धोका वाढतो. त्यामुळे जेव्हा आपण म्हणतो की 42% मुले कुपोषित आहेत त्याचा अर्थ देशातील जवळपास निम्म्या मुलांच्या मेंदूचा विकास खुंटला आहे आणि देशाच्या विकासाच्या प्रक्रियेमधील त्यांचा सहभाग थांबवला जात आहे. ही मुले पुढे जाऊन देशाच्या बौद्धिक विकास प्रक्रियेत फारसे योगदान देऊ शकत नाहीत. अशा मुलांना जाणून बुजून कामगार/ मजूर होण्याकडे ढकलले जात आहे कारण जर तुमच्याकडे पैसा नसेल आणि बौद्धिक क्षमताही नसेल तर सध्याची समाजरचना तुम्हांला शिक्षण घेण्यापासून रोखणार आणि अशा सगळ्या मुलांना अकुशल कामगार/ मजूर होण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. हे कुपोषण भांडवली व्यवस्थेद्वारे निर्मित आणि नियंत्रित आहे हे समजून घेतले पाहिजे. इतकंच नाही तर **कुपोषणाचा वापर करून मोठमोठ्या कंपन्यांच्या तुंबड्या भरायचेच काम सरकार करत आहे.**

गाव शहरांमध्ये चालवल्या जाणाऱ्या अंगणवाड्यांची देशाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची भुमिका असली पाहिजे. पण भांडवली देशांमध्ये गरिबांसाठीच्या योजना सुद्धा गरिबच असतात. सरकार तर्फे या अंगणवाडीमध्ये 6 वर्षाच्या आतील सर्व मुलांसाठी आणि गरोदर स्त्रिया आणि 6 महिन्यापर्यंतच्या स्तनदा मातांना आहार देण्याची योजना आहे. हा कार्यक्रम राबवण्यामागे अशी भूमिका असते की किमान दोन वेळचा आहार या मुलांना मिळावा. त्यामुळे गरिब मुलांना किमान काही प्रमाणात तरी याचा आधार मिळेल. अंगणवाडीमध्ये नॉर्मल आणि कुपोषित सर्व मुलांसाठी दिला जाणारा आहार हा बचतगटाच्या महिलांकडून बनवून घेतला जातो. हा आहार बनवण्यासाठी प्रत्येक मुलामागे 5 रु.92 पैसे एवढी रक्कम सरकारकडून देण्यात येते. या रकमेमध्ये सुरुवातीचा कोरडा खाऊ आणि जेवणाच्या वेळी खिचडी/ उसळ असा आहार मुलांना देणे अपेक्षित असते. आता **ही रक्कम इतकी कमी आहे की मुलाला गुणवत्तापूर्ण आहार देण्याची इच्छा असेल तरीही बचतगटाच्या महिलांना शक्य नाही.** याशिवाय आय.सी.डी.एस. विभाग बचतगटांची बिले सहा-सहा ते नऊ महिने देत नाही असा अनुभव आहे त्यामुळे बचतगट आधीच कंटाळलेले आहेत, त्यामुळे काहीतरी नवे, चांगले करावे याची उर्जा त्यांनाही कुठून मिळणार? त्यामुळे या सगळ्याचा परिणाम मुलांना मिळणाऱ्या आहाराच्या गुणवत्तेवर होतो. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचीही तीच परिस्थिती आहे त्यांनाही मिळणारे मानधन हे सहा-सहा महिने रखडवले जाते आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस सरकारच्या या सगळ्या भोंगळ कारभाराबद्दल जेव्हा संप पुकारतात त्यावेळी कुपोषणाच्या प्रश्नाला त्यांना जबाबदार धरून सरकार मेस्मा कायदा त्यांना लावण्याचा प्रयत्न करते. म्हणजे **आधी स्वत: यंत्रणेचे खच्चीकरण करायचे आणि नंतर कर्मचाऱ्यांना नीट काम जमत नाही या नावाखाली त्याचे खाजगीकरण करायचे ही जुनीच पद्धत सरकारने अवलंबली आहे.** आणि अंगणवाड्यांच्या बाबतीत म्हणायचे झाले तर ही यंत्रणाच सरकारला बंद करायची आहे की असे दिसते.

### अंगणवाडीमधून दिल्या जाणाऱ्या आहाराबाबत सरकारची धोरणे

अंगणवाडीमधून सर्व मुलांना जसा नियमित आहार दिला जातो तसेच कुपोषित मुलांसाठी विशेष योजना राबवल्या जातात. मुल कुपोषणातून बाहेर आणण्यासाठी त्याला दिवसातून चार ते सहा वेळा आहार खायला देणे आवश्यक

असते. कारण बाळाच्या पोटाचा आकार लहान असल्यामुळे त्यांना थोड्या प्रमाणात पण पाच ते सहा वेळा अन्न खाऊ घालावे लागते. अंगणवाडीतील कुपोषित मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या कार्यक्रमाला "बाल विकास केंद" असे म्हटले जाते. साधारणपणे कुपोषित मुलांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी किमान एक महिन्यासाठी "बाल विकास केंद्र" अंगणवाडीमध्ये सुरु केले जाते. अंगणवाडी सेविकेने हे केंद्र चालवणे अपेक्षित असते. बरेचदा बाळाची आई रोजगारासाठी घराबाहेर जात असते, अशा वेळी मुलाला दिवसातून सहावेळा खायला घालणे शक्य नसते, त्यामुळे अंगणवाडी सेविका दिवसभर या मुलांचा संभाळ करतात. हे केंद्र चालवणे, कुपोषित मुलांना पोषक आहार देणे यासाठी एका मुलामागे सरकारकडून रु.1200 देण्यात येतात. पण सध्या हि योजना सरकारने बंद केली आहे. त्या ऐवजी सरकारने आर. यु. टी. एफ. (RUTF, Ready to use therapeutic paste) ही पोषक घटक असलेली पेस्ट मुलांना देण्याचा निर्णय घेतला आहे. या पेस्टची एका दिवसाची किंमत रु.25 आहे, दिवसातून 3 वेळा ही पोषक पदार्थ असलेली पेस्ट दिली जाणार असून प्रत्येक मुलावर रु.75 सरकार खर्च करणार. एका कुपोषित मुलासाठी सरकार एका महिन्याला रु.2250 खर्च करणार आहे. ही पेस्ट गी.सी. रायबेर कॉंपॅक्ट या बहुद्देशीय कंपनीकडून खरेदी केली जाणार आहे. म्हणजे सरकारकडे कुपोषित मुलावर खर्च करायला 1200रु. नाहीत पण कंपनीकडून पेस्ट खरेदी करायला 2250रु. आहेत. याचा स्पष्ट अर्थ असा की **कुपोषित मुलांच्या नावाखाली बहुद्देशीय कंपनीचे खिसे कसे भरायचे हे सरकारने ठरवून ठेवले आहे.** पैसे गेले तरी त्या कुपोषित मुलाला काय मिळेल तर ही पेस्ट. म्हणजे दोन तीन महिने पेस्ट खायला घालून त्याचे कुपोषण जाईल पण त्यानंतर त्या पेस्टची सवय लागली तर मुल आपले घरचे अन्न खाईल का? आपण जे जेवण रोज घेतो त्याची टेस्ट मुलामध्ये कशी तयार होणार? शिवाय मुलांनी नंतर हट्ट केला तर गरीब आई वडिलांनी कुठून ही रु.75 ची पेस्ट मुलांना खाऊ घालायची? आणि पुन्हा मुलांनी काही खाल्लं नाही की ती परत कुपोषित, अशा दुष्टचक्रात ही मुल आणि त्यांचे पालक अडकवले जात आहेत. गरीब आईबापांना आपण पोराला हवं ते खाऊ घालू शकत नाही ही अपराधीपणाची भावना देऊन बहुद्देशीय कंपनीसाठी बाजारपेठही तयार करणे ही रणनीती.

पण सरळ मार्गाने घास घेईल ते सरकार कसले. **कुपोषणाचा प्रश्न तसाच राहिला पाहिजे आणि कंपनीचा नफा चालू राहिला पाहिजे यासाठी सरकारची सगळी धडपड.** हे सरकाचे कंपन्यांच्या नफ्याचे राजकारण वेळीच ओळखून याला विरोध केला पाहिजे आणि असंघटीत कामगार म्हणून लढणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या लढ्यामध्ये सामील झाले पाहिजे.

# जाती प्रश्न, मार्क्सवाद आणि डॉ. आंबेडकरांचा राजकीय वारसा

**(पान 40 वरून)**

जातीं अंताच्या लढाईत कधी राजकीय वैधतेची पर्वा केली नाही. फुले सुद्धा त्यांच्या शेवटच्या दिवसात अधिकाधिक सत्ता विरोधाची दिशा स्वीकारू लागले होते. ते समजून घ्यायला, हंटर आयोगापुढील साक्ष आणि 'शेतकऱ्याचा आसूड' विशेष करून वाचायला हवे. या शिवाय, दलित आणि आदिवासींचे असे अनेक विद्रोह झालेत ज्यांनी जोरदार ताकदीने व्यवस्थेवर आघात केला. अशा विद्रोहाच्या नायकांना आज जाती-विरोधी आंदोलनाच्या प्रतीकांच्या रुपात स्वीकारले जाऊ शकते.

**डॉ. आंबेडकरांची दोन महत्वाची योगदाने होती : दलित समूहात आत्मभान आणि स्वाभिमान जागा करणे आणि दलित प्रश्न राष्ट्रीय आंदोलनाच्या एजेन्ड्यावर एक प्रमुख प्रश्न म्हणून स्थापित करणे. पण त्यांची व्यवहारवादी विचारसरणी त्यांना कधीच राज्यसत्तेच्या विरुद्ध जाण्याची आज्ञा देत नाही.** ते कधीच जनतेद्वारे सामुहिक बलप्रयोग करण्याचे समर्थन करत नव्हते. हे विचारधारात्मक दृष्ट्या त्यांना निषिद्ध होते. अशा स्थितीत, आजच्या काळात, त्यांचे योगदान मान्य करूनही त्यांची विचारधारा जाती विरोधी आंदोलनासाठी उपयोगी ठरेल काय? राज्यसत्ता आणि सरकारच्या विरुद्ध गेल्याशिवाय जातीवाद आणि ब्राह्मणवादविरोधी संघर्ष करता येवू शकेल काय? असे फक्त तेच लोक म्हणतील जे राज्यसत्तेला वर्गेतर मानतात आणि म्हणून जाती पासून वेगळे समजतात. आम्हाला नाही वाटत की असे आहे. (आंबेडकरांचे योगदान आणि मूल्यमापनासाठी पहा: https://redpolemique.wordpress.com/2017/05/04/caste-question-marxism-and-the-political-legacy-of-b-r-ambedkar/)

शेवटी फक्त एवढेच म्हणता येईल की जातीचा प्रश्न समजून घेणे आणि त्याच्या सोडवणुकीचा मार्ग शोधणे भारतात क्रांतीसाठी मुलभूत प्रश्न आहे. मात्र त्यासाठी वैचारिक स्पष्टता आणि दृढतेची आवश्यकता आहे, सुधीर ढवळे-ब्रान्ड वैचारिक सारसंग्रहवाद, संधिसाधुपणा आणि तुष्टीकरण अजिबात कामाचे नाही. लेनिनच्या शब्दात सांगायचे तर 'दोन स्टुलावर सोबतच बसण्याच्या प्रयत्नात त्याच्या मधोमध पडणे' ना केवळ अवांछनीय आहे, तर मूर्खपणा सुद्धा आहे. या मधून आजवर काही मिळाले तर नाहीच उलट नुकसानच झाले आहे.

**अनुवादः सोमनाथ केंजळे**

समाज

# महिलांवरील वाढते अत्याचार: भांडवली, फॅसिस्ट आणि पुरुषसत्ताक विचारांविरुध्द लढण्याची गरज

✍नागेश

गेल्या काही वर्षांपासून महिला अत्याचारांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. एवढेच नाही तर लहान, कोवळी, निर्दोष बालके सुद्धा असुरक्षित आहेत. हे अत्याचार दिवसेंदिवस क्रौर्याची परिसीमा गाठणारे ठरत आहेत. **समाजात अशी परिस्थिती उद्भवली आहे की स्त्रिया असो किंवा लहान मुले, मोकळेपणाने श्वास घेणे देखील मुश्कील झाले आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या बलात्काराच्या घटना, स्त्रियांवर ॲसिड फेकण्याच्या घटना, बलात्कारानंतर अंगावर काटा आणणाऱ्या हत्या अशा घटना आता नेहमीच्या झाल्या आहेत.** हे पुन्हा एकदा 'उत्तर प्रदेश' येथील '**उन्नाव**', जम्मू कश्मीर येथील '**कथुआ**' आणि गुजरात येथील **सुरत** बलात्कार प्रकरणानंतर सिद्ध झाले आहे. समस्या खूप गंभीर आहे; पण समस्या पूर्णपणे नीट समजल्याशिवाय या समस्येचा उपाय करणे देखील अशक्य आहे. आपल्याकडे नेहमीच स्त्रियांविरोधात होणाऱ्या अपराधांचा तसेच त्याच्या कारणांचा सखोल विचार न करता वरवरचा विचार केला गेला आहे आणि केला जातोय. खरेतर आजची व्यवस्था अशा घटनांना रोखण्यास असमर्थच ठरत आहे.

**भांडवली व्यवस्थेत काही कडक कायदे, अपराध्यांना कठोरातील कठोर फाशीची शिक्षा इत्यादी उपायांनी ही समस्या संपेल असे समजून अनेक कायदे केले जातात.** नुकतेच केंद्रीय मंत्रिमंडळाने 12 वर्षाखालील बालिकांवर बलात्कार करणाऱ्या गुन्हेगारांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद असलेल्या अध्यादेशास मंजुरी दिली आहे. यामुळे या संदर्भातील कायद्यात अनेक बदल केले जाणार आहेत. पण ही नुसती वरवरची मलमपट्टी आहे. एका रिपोर्टनुसार **स्त्रियांवर अत्याचार करणारे बहुतेक जण ओळखीचे, नातेवाईक, शेजारी असतात ज्याची टक्केवारी 90.3 टक्के आहे.** अशी अनेक प्रकरणे दाबली जातात किंवा लाजेखातर लपवली जातात त्यामुळे तिथे कायद्याचा काहीएक उपयोग होत नाही. न्यायालयीन व्यवस्थेचा फोलपणा देखील नेहमीच समोर आलेला आहे. म्हणून आपल्याला या प्रश्नाशी संबंधित राजकीय ,सामाजिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक बाबींचा सखोल विचार करावा लागेल. तेव्हाच आपण या समस्येच्या निदानाकडे जाऊ शकतो.

दिवसेंदिवस आपला समाज संवेदनहीन होत चालला आहे. आठ वर्षांच्या चिमुकलीवर अनेक वेळा अनेक दिवस सामूहिक बलात्कार केला जातो. नंतर तिची निर्घृण हत्या केली जाते. दुसरीकडे उन्नाव येथील एका मुलीवर आठवड्याहून अधिक काळ सामूहिक बलात्कार केला जातो. न्याय मिळवण्याच्या संघर्षात त्या मुलीच्या वडिलांचा पोलिसांच्या ताब्यात असताना मारहाणीमुळे मृत्यू होतो. इतकेच नाही तर त्या मुलीसह तिच्या कुटुंबावर अनेक अत्याचार केले जातात. एवढे सगळे होऊन देखील आरोपींना अटक व्हावी म्हणून या मुलीला वर्षभर जंग जंग पछाडावे लागते. यापेक्षा मोठी शोकांतिका कोणते असू शकेल? या दोन्ही प्रकरणात निर्दयीपणाचा कळस गाठला गेला. **संपूर्ण प्रकरण चर्चेत आल्यापासून ज्या पद्धतीने आरोपींना वाचवण्यासाठी एका विशिष्ट विचारधारेचे लोक रस्त्यावर उतरतात यावरून आपल्या लक्षात येईल की आपला समाज कोणत्या दिशेने चालला आहे.** सरकार कोणाचेही असो आपल्या देशात मुली व महिला सुरक्षित नाहीत हे पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. पण आपल्या देशात पहिल्यांदाच असं घडलं की, जाती-धर्माचे राजकारण करून भारत माता की जय, वंदे मातरम, आणि जय श्रीराम च्या घोषणा देत आठ वर्षाच्या चिमुकलीवर बलात्कार करणाऱ्या आणि तिची निर्घृण हत्येचा आरोप असणाऱ्या आरोपींच्या समर्थनार्थ जम्मू आणि काश्मीर येथील 'कथुआ' येथे मोर्चा काढण्यात आला. एवढेच नाही तर 'हिंदू एकता मंच' स्थापन करण्यात आला. तेथील वकिलांनी याला समर्थन करीत संप देखील केला. असिफाची केस लढत असलेल्या महिला वकीलाला खालच्या पातळीवर जाऊन धमक्या देखील देण्यात आल्या. हे कमी होते म्हणून, भाजपच्या दोन मंत्र्यांनी आरोपींच्या समर्थनात वक्तव्य केली. अर्थात आता त्यांना प्रकरण अंगलट येतेय असे दिसताच त्यांनी राजीनामा दिला. या नीच प्रवृत्तीच्या लोकांना इतके सगळं आरामात करणं कसं शक्य झालं? हा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. पण देशातील गेल्या चार-पाच वर्षातील परिस्थिती पाहता याचे अजिबात आश्चर्य वाटत नाही. त्यात असिफा मुसलमान समाजाची आणि आरोपी हिंदु समाजाचे आहेत आणि प्रकरण जम्मू कश्मीर मधील असल्यामुळे या प्रकरणाला धार्मिक रंग देण्याचा भरपूर प्रयत्न करण्यात आला आहे; त्यातच केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे हे सगळं करण्यास आणखीनच मोकळीक मिळाली. भाजपची मुस्लिम विरोधी विचारधारा आपल्याला माहीतच आहे. मुळात **भाजपच्या पाठीमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याची विचारधारा आहे जी या वातावरणाला कारणीभूत आहे. या प्रकरणात खोट्यानाट्या बातम्या देखील पसरवण्याचे काम चोख केले गेले, जेणेकरून संपूर्ण देशात हिंदू-मुस्लिम विवाद करून**

**प्रकरण दाबता येईल.**

याच दरम्यान भाजपच्या काही नेत्यांनी अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केली आहेत. भाजपचे केंद्रीय मंत्री संतोष गंगाराम म्हणतात की "त्या घटनेचा इतका बाऊ करण्याची गरज नाहीये. अशा घटना होतच राहतात"; भाजपचेच दुसरे नेते सुरेंद्रसिंह नुकतेच म्हणाले की "3 मुलांच्या आईवर बलात्कार होऊ शकतो का? हे वैज्ञानिक दृष्ट्या योग्य नाहीये" आणि भाजपचेच तिसरे एक नेते मनोहरलाल उंटवाल 'दिग्विजयसिंह' यांच्या पत्नीला 'आयटम' म्हणतात. यावरून आपल्या लक्षात आले पाहिजे की, भाजपच्या या नेत्यांची काय मानसिकता आहे आणि या अन्यायावर आधारित प्रचलित समाज व्यवस्थेत महिलांच्या सुरक्षा आणि सन्मानाची काय अवस्था आहे.

आपल्या देशात महिलांविरोधी वक्तव्य देण्यात यांसारखे घोर महिलाविरोधी मानसिकतेची नेते पुढाकार घेतात. त्यामध्ये भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते आघाडीवर असतात. यापैकी तर काही महिलांवर वाढत आणि होत असलेल्या अत्याचारांसाठी महिलांनाच जबाबदार धरतात. त्यासाठी हे टुकार नेते महिलांनाच सल्ले देत फिरतात की त्यांनी छोटे कपडे घालू नयेत, मुलींनी जीन्स वापरू नयेत, मोबाईल फोन वापरू नयेत, इत्यादी. याचं महत्वाचं कारण म्हणजे आपला समाजच पुरुषसत्ताक मानसिकतेचा समाज आहे. **एकीकडे "बेटी बचाव बेटी पढाव" च्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे घोर महिलाविरोधी वक्तव्य करायची.** याचे दुसरे कारण म्हणजे यांची विचारधाराच महिलाविरोधी आहे. आजकाल पंतप्रधान नरेंद्र मोदी मुलींबरोबर सेल्फी घेऊन महिलांना बरोबरीचा दर्जा देण्याचे नाटक करत फिरतात आणि दुसरीकडे हेच म्हणतात की, "मी गोळवलकरांद्वारे शिक्षित झालेला स्वयंसेवक आहे" (गोळवलकर राष्ट्रीय संघाचे दुसरे सरसंघचालक), ज्या गोळवलकरांचे म्हणणं होतं की संविधान म्हणून " मनुस्मृतीला " लागू केले पाहिजे. मनुस्मृती मध्ये महिला आणि दलित विरोधी खूप भयानक, अपमानित, अत्याचाराला समर्थन असलेले लिखाण लिहिले गेले आहे. उदाहरण म्हणून जर बघायला गेले तर त्यामध्ये लिहिले की, (1) एका लहान मुलीने, तरुण स्त्रीने, किंवा वृद्ध महिलेने कधीही स्वातंत्र्यपूर्वक काहीही करता कामा नये अगदी आपल्या घरात सुद्धा (2) दिवसा आणि रात्री एका स्त्रीला घरातील पुरुषांच्या अधीन राहिले पाहिजे आणि जर एखाद्या स्त्रीला शारीरिक सुखात संलग्न व्हायचे असेल तर तिने निश्चितच पुरुषाच्या नियंत्रणात राहिले पाहिजे. (3) तिचा बाप लहानपणी तिचे संरक्षण करतो, नवरा तारुण्यात तिची रक्षा करतो, आणि मुलगा म्हातारपणी तिची रक्षा करतो; एक स्त्री कधीही स्वातंत्र्याच्या लायक नसते. हे विचार आहेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आणि गोळवलकरांचे (ज्यांना आर.एस. एस. आणि भाजप वाले गुरुजी म्हणतात). हे विचार आपल्याला यांच्या नेत्यांकरवी नेहमी ऐकायला देखील मिळतात. या विचारधारेला मानणारा एक मोठा वर्ग वावरतोय आपल्या समाजात. अशा परिस्थितीत महिला आणि मुली कशा सुरक्षित राहतील?

कथुआ आणि उन्नावमध्ये बलात्कारांच्या समर्थनार्थ जी गर्दी गोळा केली होती ती अशाच घोर महिलाविरोधी, दलित तसेच मुस्लिम विरोधी विचारांनी सतत खतपाणी घालून तयार केली गेली आहे. (हे काम आर. एस. एस. 1925 पासून निरंतर करतेय). या गर्दीला कधी बलात्काऱ्यांना वाचवण्यासाठी हातात तिरंगा घेऊन रस्त्यावर उतरवले जाते. तर कधी हातात तलवारी घेऊन जय श्रीरामच्या घोषणेसह तुम्हाला आम्हाला जातीधर्माच्या नावाखाली कापायला सुद्धा उतरवले जाते. या गर्दीचा वापर करणारे अनेक नेते घोर महिलाविरोधी वृत्तीचे तसेच त्यांच्यावर अत्याचार करणारे अनेक दुशा:सन संसदेत आणि विधान मंडळात जाऊन बसले आहेत. यात भाजप आघाडीवर असला तरी जवळजवळ सर्वच मुख्य राजकीय पक्षांमध्ये असे नेते आहेत. त्याची नुकतीच एक आकडेवारी जाहीर झाली आहे. ‘असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स’ (ADR)या संस्थेने देशभरातील 1580 खासदार आणि आमदारांचे चारित्र्य पडताळून पाहण्याचे काम केले. यातील 48 लोकप्रतिनिधींविरोधात महिला अत्याचार प्रकरणी गुन्हे नोंद असल्याचे स्पष्ट झाले आहे. 45 आमदार आणि 3 खासदारांवर महिलांचे शोषण, बलात्कार, विनयभंग, अपहरण, महिलेवर विवाहासाठी दबाव आणून तिचा छळ करणे, घरगुती हिंसाचार आणि मानवी तस्करीप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पक्षनिहाय महिला अत्याचाराचे आरोप असलेल्या नेत्यांची संख्या पुढीलप्रमाणे: भाजप 12, शिवसेना 7, तृणमूल काँग्रेस 6, काँग्रेस 4, तेलुगु देसम पक्ष 5, बिजू जनता दल 4, अपक्ष 3, राजद 2, द्रमुक 2, आणि माकप 1. एवढेच नाही तर बड्या पक्षांनी महिला अत्याचारांचे गुन्हे नोंद असलेल्या 327 उमेदवारांना उमेदवारी दिल्याचे उघड झाले आहे. त्याचबरोबर 118 अपक्ष उमेदवारांविरोधात देखील महिला अत्याचार प्रकरणी गुन्ह्याची नोंद असल्याचे उघड झाले आहे. अशा परिस्थितीत कायद्यात बदल करून किंवा कितीही कडक शिक्षा अगदी कठोर शिक्षेची तरतूद केली तरी महिलाविरोधी अत्याचार रोखले जातील असे म्हणणे बालिशपणाचे आहे.

स्त्रियांविरोधात होणारे अत्याचारांची याहून अनेक कारणे आपल्या समाजात आणि व्यवस्थेत दडली आहेत. याचे पहिले कारण आपल्या समाजामध्ये लोकसंख्येच्या निम्मा हिस्सा असून देखील स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. कारण आपला समाज पुरुषसत्ताक समाज आहे. मुलगी जन्माला येऊ नये म्हणून तिला गर्भातच ठार मारले जाते. इथे स्त्रिया या "पायातली चप्पल आहेत" असे म्हणणाऱ्यांची कमी नाहीये. कधीकाळी आपल्या समाजात स्त्रियांना शिक्षणाचा

अधिकार नव्हता. मेल्यानंतर स्त्रीला सती जावे जावे लागत होते. त्यांचे 'केशवपन' केले जात होते. ज्या मानसिकतेमुळे हे केले जात होते त्या पुरुषप्रधान, सरंजामी मानसिकतेची बीजे अजुनही आपल्या समाजात-देशात आहेत हे विसरून चालणार नाही.

दुसरे कारण नफ्या-तोट्यावर वर चालणारी भांडवली व्यवस्था. या व्यवस्थेने स्त्रियांनासुद्धा खरेदी विक्री होणारी वस्तू बनवून टाकले आहे. जाहिरात-सिनेमांमधून हे आपल्याला सहज दिसते. **बॉडी स्प्रे किंवा पुरुषांच्या अंतर्वस्त्रांच्या जाहिरातीत स्त्रियांना अत्यंत घाणेरड्या पद्धतीने दाखवले जाते. यामध्ये त्या फक्त एक वस्तू म्हणून वापरल्या जातात.** आपल्याकडे अनेक स्त्रियादेखील महिलाविरोधी विचारांनी ग्रासित आहेत. या भांडवली व्यवस्थेत या ना त्या मार्गाने पैसा कमावला जातो. त्यातच अश्लीलता आणि हिंसक वृत्ती पसरवणे हा सुद्धा पैसा कमावण्याचा मार्ग बनला आहे आणि हा धंदा इतका मोठा आहे की तुम्ही कल्पनासुध्दा करु शकणार नाही. एका रिपोर्टनुसार शाळेतून शिक्षण संपवण्याच्या वयापर्यंत एक मुलगा सरासरी पडद्यावर 8,000 हत्या आणि 1,00,000 इतर हिंसक दृश्य बघतो. त्याने अठरा वर्षांचा होईपर्यंत 2,00,000 हिंसक दृश्य बघितलेले असतात. यामध्ये 40,000 खुनाची दृश्य आणि 8,000 महिलाविरोधी अपराधाची दृश्य सामील आहेत. एका दुसऱ्या रिपोर्टनुसार जगभरात इंटरनेटवर अश्लील सामग्री ' पोर्न ' व्यवसायाचा एकूण धंदा जवळजवळ 97 अब्ज डॉलर पर्यंत पोहचला आहे. 34% इंटरनेट पाहणारे सांगतात की, आमची इच्छा नसताना देखील आम्हाला 'पोर्न' वर आधारित जाहिरात बघावी लागते. एकूण डाऊनलोड होणाऱ्या सामग्रीतील 45 टक्के भाग हा अश्लील आणि पोर्न सामग्रीचा असतो. एक रिपोर्ट सांगतो की पॉर्नमुळे वैवाहिक संबंध बिघडण्याचे, जोडीदाराला धोका देण्याचे प्रमाण 300 टक्यांनी वाढले आहे. मग आता यावरुन आपल्याला लक्षात येईल की इतका कचरा आपल्या डोक्यात सतत ही व्यवस्था टाकत असताना महिलांवरील अत्याचार कमी होतील का? त्यात आता तर फेसबुक आणि व्हाट्सएप मुळे हा कचरा सहज पसरला जातोय. त्यामुळे महिलांना पुरुषसत्तेसोबतच भांडवली विचारांशी सुद्धा संघर्ष करावाच लागणार आहे.

एक म्हण आहे "जसे पेराल तसे उगवेल". या म्हणीप्रमाणे **ही भांडवली व्यवस्था निरंतर, अनेक मार्गाने, अशी मूल्ये आपल्या समाजात पेरते आहे की, ज्यामुळे आपण संवेदनहीन होण्याबरोबरच अमानवीकरणाकडे झपाट्याने मार्गक्रमण करत आहोत.** याची सुरुवात आपल्याकडे खऱ्या अर्थाने 1990-91 ला झाली. उदारीकरण आणि खासगीकरणाचे धोरण अवलंबल्यामुळे श्रीमंतांचा, उच्च-मध्यमवर्गाचा एक मोठा वर्ग उदयास आला. अचानक आलेल्या पैशामुळे आणि भांडवली व्यवस्थेतील घाणेरड्या संस्कृतीमुळे यातील मोठा हिस्सा लंपट झाला. यांना वाटते की पैशाच्या जोरावर काहीही विकत घेतले जाऊ शकते, लोकांना गंडवले जाऊ शकते, त्यांच्यावर अन्याय अत्याचार केला जाऊ शकतो. याबरोबरच ही व्यवस्था गरीब वर्गांमध्ये सुद्धा सांस्कृतिक पतनशिलतेचे विष सतत पेरत असते. त्याबरोबरच कायम असणारी बेरोजगारी, नशा, जुगार, सहज उपलब्ध होणारे अश्लील साहित्य, पॉर्न व्हिडिओ, तद्दन फालतू चित्रपट, गाणी, संगीत इत्यादींमुळे महिलाविरोधी-समाजविरोधी तत्वे या भांडवली व्यवस्थित सतत जन्म घेतच राहणार. म्हणून आपल्याला या व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठीचा विचार करण्यावाचून गत्यंतर नाही. नक्कीच व्यवस्था परिवर्तनाचा हा मार्ग खडतर आणि मोठा आहे. पण सुरवात कुठून ना कुठून करावीच लागणार आहे. त्याला पर्याय आजिबात नाही. त्यासाठी तरुण मुली, स्त्रियांनी या कामासाठी पुढे तर यावेच; सोबतच न्यायप्रिय तरुणांनी, पुरुषांनीदेखील खांद्याला खांदा लावून व्यवस्था परिवर्तनाचा झेंडा हाती घेऊन कामाला सुरुवात केली पाहिजे. त्याबरोबरच आपल्याला मिळून सर्व महिलांविरोधी अपराधांविरुद्ध, विचारांविरुद्ध, आवाज उठवावा लागेल. त्यासाठी एक लढाऊ संघटन उभे केले पाहिजे. एकजूटीच्या आणि संघर्षाच्या बळावर, सत्ताधारी आणि व्यवस्थेच्या ठेकेदारांना महिलाविरोधी अपराधांसंदर्भात गंभीरपणे विचार करण्यास भाग पाडण्याबरोबरच अपराध्यांना कठोरातील कठोर शिक्षा देण्यासाठी भाग पाडले पाहिजे आणि त्याचबरोबर या व्यवस्थेतील पुरुषसत्ताक मानसिकतेविरोधात तीव्र संघर्ष छेडला पाहिजे.

## डिजीटल माध्यमांमधून समाजाच्या नसांमध्ये भिनणारे द्वेषाचे विष

(पान 49 वरून)

बातम्या कमी असतात, अशाने या अल्गोरीदममुळे वामपंथी वेबसाइट्स आणि ब्लॉगचे खूप मोठे नुकसान झाले आहे कारण गूगल सर्च मध्ये या वेबसाइट्स शेवटी येवू लागल्या. यामुळे तो एक तांत्रिक प्रश्न नसून राजकीय प्रश्न आहे.

अशा फेक न्यूज विरुध्द प्रभावी मोहिमेसाठी आवश्यक आहे की त्यांचा परदाफाश करुन सर्वसामान्य जनतेसमोर हे आणलं पाहिजे. ज्याप्रकारे फेक न्यूज संघटित पध्दतीने पसरविल्या जातात त्याचप्रकारे त्याचा भंडाफोड सुध्दा संघटीत पध्दतीनेच केला जावू शकतो. हे काम क्रांतिकारी संघटनांचं आहे कारण 21 व्या शतकात इंटरनेट आणि सोशल मीडिया सुध्दा वर्ग संघर्षाचा महत्वाचा मुद्दा आहे. जगजाहीर आहे की, यासाठी सर्वतोपरी रचनात्मक माध्यमांमधून क्रांतिकारी संघटनांना सर्वसामान्य जनतेमध्ये सामाजिक आधार वाढविण्याची आवश्यकता आहे.

**अनुवाद: सतिश घोरपडे**

**मीडिया**

# फेक न्यूज: डिजीटल माध्यमांमधून समाजाच्या नसांमध्ये भिनणारे द्वेषाचे विष

✍ **आनंद**

**खोट्याचं खरं करण्यासाठी समाजामध्ये अफवा पसरवणे जगातील सर्वच फॅसिस्ट लोकांचा मुख्य राजकीय हेतू राहिलेला आहे.** आपल्या देशातील हिंदूत्ववादी फॅसिस्ट सुध्दा समाजाच्या नसा-नसांमधून अल्पसंख्याकांच्या विरुध्द द्वेषभावना पसरवणे व दंगली भडकवण्यामध्ये या हेतुचा पुरेपूर वापर करत आलेले आहेत. संघ परिवाराचे विजारधारी अफवाबाज पूर्वी तोंडी अफवा पसरवत, परंतु त्याची एक भौगोलिक सीमा असायची व ती जास्त वेळ चालत नसे. परंतु **मागील काही दशकांमध्ये झालेल्या माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीने संघाच्या अफवा तंत्रामध्ये नव-नवीन तांत्रिक बाबी जोडल्या गेल्या, ज्यामुळे अफवा पसरविणाच्या तंत्राने तमाम भौगोलिक व वेळेच्या सीमा ओलांडल्या आहेत आणि संपूर्ण भारतीय समाज अफवांच्या त्सुनामीच्या विळख्यात सापडला आहे.** अगोदर टेलिफोन, नंतर इंटरनेट आणि त्यानंतर सोशल मिडीया आणि स्मार्टफोन व व्हाट्सअपच्या वापरामुळे संघ परिवाराचे हे अफवातंत्र दिवसेंदिवस गतीने वाढत आहे. सोशल मीडिया आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून पसरविण्यात येणाऱ्या फोटो आणि व्हिडीओमुळे दंगली व सांप्रदायिक घटना तर घडत आहेतच, सोबतच सर्व समाजामध्ये विशेषत: अल्पसंख्याकांमध्ये एक भीतीचे वातावरण कायम ठेवण्यामध्ये या डीजीटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या विषारी सामुग्रीची खूप मोठी भूमिका राहिलेली आहे. या व्यतिरिक्त शासन आपला नाकर्तेपणा लपविण्यासाठी आणि केलेल्या कामाची वाहवा मिळविण्यासाठी खोट्या बातम्यांचा वापर करत आहे.

**इंटरनेट, सोशल मीडिया आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून समाजामध्ये खोट्या बातम्या पसरविण्याच्या घटना, ज्यांना फेक न्यूजच्या नावाने ओळखले जाते, जगभरात भयावह रुप धारण करत आहे.** अमेरिकेमध्ये मागील राष्ट्रपती निवडणूकीत ट्रंपच्या कार्यकर्त्यांनी या फेक न्यूजचा मोठ्या प्रमाणात वापर करत अप्रवासी, मुस्लिम व लॅटीन लोक आणि काळ्या लोकांच्या विरोधात घृणास्पद वातावरण बनविले, ज्याचा ट्रंपच्या विजयात सिंहाचा वाटा होता. याचप्रकारे युरोप खंडातील भरपुर देशांमध्ये सुध्दा अप्रवासियांच्या विरोधात घृणा पसरविण्यामध्ये फेक न्यूजचा चांगलाच वापर सुरु आहे. ब्रिटनमध्ये युरोपीय संघातून वेगळं होण्यासाठी झालेल्या जनमत चाचणी दरम्यान सुध्दा फेक न्यूजचा खुल्या प्रकारे वापर केला गेला. परंतु भारतात फेक न्यूजच्या घटना ज्याप्रकारे पसरत आहे तशी परिस्थिती क्वचितच अन्य कुठल्या देशात बघावयास मिळेल. याचे मुख्य कारण हे आहे की, **भारतामध्ये अधिकांश फेक न्यूज संघासारख्या केडर आधारित फॅसिस्ट संघटनांद्वारे संघटित मार्गाने पसरविल्या जात आहेत, ज्यांचा संपर्क देशातील कानाकोपऱ्यापर्यंत आहे.**

### फेक न्यूज द्वारे पसरविले जाते द्वेषाचे विष

राजकीय प्रचारासाठी (प्रपोगंडासाठी) माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यामध्ये भारतीय जनता पार्टीची आय.टी.सेल कुठल्याही अन्य पक्षाच्या तुलनेत सर्वात पुढे राहिलेली आहे. भाजपाच्या आय.टी.सेल शिवाय संघ परिवाराने ऑनलाईन ट्रोल्सची एक पूर्ण फौजच उभी केलेली आहे, जी खोट्या बातम्यांना फेसबुक, ट्वीट आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून काही क्षणात संपूर्ण देशात पसरविते. अशा खोट्या बातम्यांचा मुख्य स्त्रोत hindutva.info (हिंदुत्व डॉट इन्फो), dainikhindu.org (दैनिकहिंदू डॉट ओआरजी) आणि postcard.news (पोस्टकार्ड डॉट न्यूज) यांसारख्या वेबसाईट्स आहेत ज्या **नेहमी बातम्यांना मीठ मिर्ची लावून, त्यांचा संदर्भ तोडून आणि खऱ्यामध्ये खोटं मिसळवून, भडकावू व आकर्षक शीर्षकांचे लेख, फोटो आणि व्हिडीओ च्या माध्यमातून फेक न्यूज तयार करत असतात.** या वेबसाईट्सच्या माध्यमातून Support Indian Army (सपोर्ट इंडियन आर्मी), I Support Narendra Modi (आय सपोर्ट नरेंद्र मोदी), I Support Rohit Sardana (आय सपोर्ट रोहित सर्दाना) अशा नावांसारखे असंख्य फेसबुक पेज जोडलेले असतात, ज्यांच्या माध्यमातून रोज लाखोंच्या संख्येने लोक या वेबसाईट्सला भेट देतात. लक्ष्य देण्यासारखी गोष्ट म्हणजे अशा वेबसाईट्स चालविणारे आपल्या वेबसाईट्सवर जाहिराती लावून जोमात कमाई सुध्दा करत आहेत. **औपचारिक पध्दतीने ते भले ही कुठल्या संघटनेशी संलग्न नसू देत परंतु ते स्वतःला राष्ट्रवादी व मोदी समर्थक सांगत असतात.**

या व्यतिरिक्त ऑनलाईन ट्रोल्सची फौज ट्वीटर वरून सुध्दा कुठल्या ना कुठल्या मुद्याला संघटीत स्वरुपात ट्रेंड करतात. हे ट्रोल्स प्रगतीशील, धर्मनिरपेक्ष आणि डाव्या विचारधारेच्या लोकांना खुलेआम अश्लील शिव्या देत असतात, जीवे मारण्याच्या व महिलांना बलात्काराच्या धमक्या देण्यास सुध्दा घाबरत नाहीत. मजेशीर बाब ही आहे की, यातील

बऱ्याचशा ट्रोल्सना नरेंद्र मोदी फॉलो पण करतात आणि या ट्रोल्स सोबत चहापाणी सुध्दा घेतात. संबित पात्रा, शाइना एन.सी., परेश रावल, बाबुल सुप्रियो आणि कैलास विजयवर्गीय सारखे भाजपा नेते सुध्दा बऱ्याच वेळेस ट्वीटच्या माध्यमातून बेशरमपणे फेक न्यूज पसरवतांना रंगेहात पकडले गेले आहेत. एवढेच नव्हे तर अभिजीत, अनुपम खेर, विरेंद्र सेहवाग आणि गौतम गंभीर सारखे सेलिब्रिटी सुध्दा ट्रोल्स प्रमाणे आचरण करतांना दिसून आले आहेत. सर्वात धोक्याची बाब ही आहे की झी. न्यूज, रिपब्लिक टी.व्ही. व टाइम्स नाऊ सारखे विकाऊ टी.व्ही. चॅनेल्स सुध्दा बेशरमपणे फेक न्यूज प्रसारित करतात ज्यामुळे फेक न्यूज मुख्य बातमी बनते. वेबसाईट्स, ट्वीट आणि फेसबुक शिवाय फेक न्यूज पसरविण्याचे सर्वात मोठे माध्यम व्हाट्सअप आहे. खरं तर असं म्हटलं पाहिजे की, व्हाट्सअपच फेक न्यूज पसरविण्याचे सर्वात मोठे माध्यम आहे कारण जेथे वेबसाइट, फेसबुक आणि ट्वीटच्या माध्यमातून पसरविल्या जाणाऱ्या फेक न्यूज फक्त मोठ्या शहरांमधील मध्यमवर्गीय लोकांपर्यंतच मर्यादित राहतात तेथे व्हाट्सअपच्या माध्यमातून पसरविल्या जाणाऱ्या फेक न्यूज या निम्न मध्यम वर्ग व मजूर वर्ग आणि छोट्या छोट्या शहरांपासून ते थेट खेडी व वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहोचतात.

**एवढ्या तीव्र वेगाने का पसरत आहे फेक न्यूज?**

मागील काही वर्षामध्ये भारतात मोबाईल फोन व इंटरनेटचा प्रचार-प्रसार झालेला आपणास दिसून येत आहे. ट्रायच्या(भारताचे टेलीफोन नियामक प्राधिकरण) संदर्भानुसार भारतात यावेळी 1 अब्जपेक्षाही अधिक मोबाईल फोनचा वापर केला जातोय ज्यामध्ये स्मार्टफोनचीच संख्या 30 कोटी पेक्षाही जास्त आहे. एका सर्वेक्षणानुसार जून 2017 पर्यंत भारतात इंटरनेट वापरकर्त्यांचा आकडा 45 कोटीपेक्षाही पुढे गेला आहे. शहरी भारतातील जवळपास 45 कोटी लोकांमधून जवळपास 27 कोटी(60 टक्के) लोक इंटरनेटचा वापर करतात, तर ग्रामीण भारतात राहणाऱ्या जवळपास 90 कोटींमधून 16 कोटी (17 टक्के) लोक इंटरनेटचा वापर करतात. हे सर्वेक्षण असे सुध्दा सांगते की, शहरांमध्ये 77 टक्के इंटरनेट वापरकर्ते आणि खेड्यांमध्ये 92 टक्के वापरकर्ते इंटरनेट कनेक्शनसाठी मोबाईलचा वापर करतात कारण कॅम्प्यूटर, लॅपटॉप आणि आयपॅडच्या तुलनेत स्मार्टफोन स्वस्तात उपलब्ध होतो व आणि छोटी शहरे व खेड्यांमध्ये इंटरनेटची गती खूपच कमी असते. (स्त्रोतःhttp://www.Livemint.com/industry/QWzlOYEsfQJknXhC3HiuVi/Number-of-Internet-Users-in-India-could-cross-450-million-by-html)

वरील आकड्यांवरुन असे लक्षात येते की अलिकडील वर्षांमध्ये फेक न्यूजच्या घटना गतीने पसरण्याची कारणे काय आहेत व हे सुध्दा की, वेबसाइट, फेसबुक व ट्वीटच्या तुलनेत व्हाट्सअपची क्षमता जास्त का आहे. सद्य परिस्थितीमध्ये व्हाट्सअप वापरकर्त्यांची संख्या 16 कोटी, फेसबुक वापरकर्त्यांची संख्या 15 कोटी, आणि ट्वीटर वापरकर्त्यांची संख्या 2.2 कोटी आहे. रिलायंस जियो सारख्या कंपन्या बाजारात उतरल्यामुळे मोबाईल डेटाच्या दरांमध्ये झालेल्या कमालीच्या घसरणीमुळे फेक न्यूज पसरण्याचा वेग तीव्र गतीने वाढलेला आहे. एका अन्य सर्वेक्षणानुसार इंटरनेटचा वापर करणाऱ्यांमध्ये 41 टक्के लोक सोशल मीडियाला ऑनलाईन बातम्यांचा मुख्य स्त्रोत समजतात आणि 56टक्के लोक सोशल मिडीयाच्या माध्यमातून अनेक बातम्यांची देवाण-घेवाण करतात(तिवारी 2015). राजकीय स्थिरतेच्या कमतरतेमुळे लोक सोशल मिडीया व व्हाट्सअपवर प्राप्त बातम्यांना खरं समजतात व त्यामागील घृणास्पद फॅसिस्ट षडयंत्र त्यांना उमगत नाही. 2013 ची मुजफ्फरनगर दंगल, 2015 ला दादरीतील अखलाकची बेदम मारहाण करुन केलेली हत्या, 2016 च्या छपरा दंगली, 2017 ची बसीरहाट दंगल या सर्वांमध्ये सोशल मिडीया आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून पसरविल्या गेलेल्या फेक न्यूजची भूमिका खूप मोठी ठरली आहे.

**फेक न्यूजच्या या त्सूनामीचा सामना कशाप्रकारे केला जाऊ शकतो?**

तसं पाहिलं तर भारतात फेक न्यूजचा परदाफाश करण्यात AltNews (अल्ट न्यूज), SM Hoax Slayer(एस.एम. हॉक्स स्लेयर) आणि Boomlive (बूमलाईव्ह) यांसारख्या वेबसाइट्स महत्वाची जबाबदारी पार पाडत आहेत, परंतु त्यांची सीमा ही आहे की, त्यांची मजल महानगरांमधील उच्चभ्रू घटकांपर्यंतच आहे. या वेबसाइट्सच्या माध्मामतून फेक न्यूज पकडल्या जावून देखील त्या फेक न्यूज ने आपले काम पूर्ण केलेले असते कारण साधारण जनतेपर्यंत ही बाब पोहोचतच नाही की, जी बातमी ते वाचत आहेत ती खोटी आहे. गूगल आणि फेसबुक सारख्या कंपन्या फेक न्यूज पकडण्यासाठी काही अल्गोरीदम (संगणक प्रणाली) विकसित करत आहेत परंतु हे तांत्रिक समाधान फेक न्यूजशी दोन हात करण्यास पुरेसे नाही आहे कारण ही समस्या तांत्रिक नसून राजकीय आहे. गूगल द्वारे वापरल्या गेलेल्या एका अल्गोरीदमचा परिणाम हा झाला की, त्यामुळे डाव्या विचारांशी संबंधित वेबसाइट्सवर जाणाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. हे यामुळे घडलं कारण या एल्गोरीदम मध्ये कोणती बातमी अथवा लेखाची मुख्य प्रवाहातील माध्यमांशी तुलना करुन त्याची सत्यता पडताळून बघितली जात असे. परंतु मुख्य भांडवली प्रवाहातील माध्यमांमध्ये डाव्या विचारांशी संबंधित

**(पान 47 वर)**

## प्रासंगिक

# त्रिपुरा विधानसभा निवडणुकीचे निकाल आणि संसदीय डाव्यांचे संकट

✍ **कविता कृष्णपल्लवी**

त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत तीन दशकांपासून सत्तेत असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (सीपीएम) पराभवामुळे अनेक लोकांना मोठा धक्का बसला आहे; विशेषतः त्यांना, ज्यांना संसदीय डाव्यांकडून अजूनही खूप आशा आहेत; जे सतत हे दिवास्वप्न पाहत असतात की संसदीय डाव्या पार्ट्या आता पेटून उठतील, त्या आपल्या गाढझोपेतुन जाग्या होतील आणि स्वतः संघटीत एकजूट होऊन अथवा काँग्रेस सोबत आघाडी बनवून किंवा बिगर काँग्रेसी बुर्झ्वा गटांसोबत आघाडी बनवून हिंदुत्ववादी फॅसिझमच्या मोदी लाटेला कमीत कमी 2019 च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत तरी मागे ढकलतील.

त्रिपुराच्या निवडणुकीच्या निकालाचे ठोस विश्लेषण करण्याअगोदर त्या सर्व लोकांना आम्ही वारंवार सांगितलेली ही गोष्ट पुन्हा सांगू इच्छितो की फासिवादाची (फॅसिझम) विचारसरणी, तिचा आर्थिक आधार, तिच्या उगम आणि प्रभुत्वाची कारणं तसेच इटली आणि जर्मनी मध्ये फासिवादाच्या कालखंडाच्या इतिहासाविषयी मुबलक मार्क्सवादी साहित्य उपलब्ध आहे; त्यांनी त्याचा अभ्यास करावा. फासिवादाच्या लाटेला संसदीय निवडणुकांमध्ये पराजित करून मागे सारता येणे शक्य नाही. सत्तेमध्ये नसताना सुध्दा हा आपला नंगा नाच सुरूच ठेवेल हे भारताने सुध्दा पाहिले आहे. **फॅसिझम सर्वाधिक प्रतिक्रियावादी वित्तीय भांडवलाचा प्रतिनिधी आणि भांडवलशाहीच्या संकटाचा भांडवली उद्धारकर्ता असतो आणि त्याचे मुलभूत चारित्रिक वैशिष्ट्य हे असते की तो निम्न-बूर्झ्वा वर्गाची एक कट्टर प्रतिक्रियावादी चळवळ असतो ज्याला तळागाळापासून एक कॅडर आधारित रचना असलेले फॅसिस्ट संघटन संघटीत करीत असते.** तळागाळापासून कामगार वर्ग, सर्व कष्टकरी वर्ग आणि मध्यम वर्गाच्या प्रगतिशील घटकांचे एक रॅडिकल सामाजिक आंदोलन उभे करूनच, आणि कामगारांच्या लढाऊ एकजुटीद्वारेच याला पराभूत करता येऊ शकते.

दुसरी गोष्ट, **विसाव्या शतकाच्या तुलनेत आजचे वेगळेपण हे आहे की नवउदारवाद आणि भांडवलशाहीच्या व्यवस्थागत संकटाच्या या काळामध्ये फॅसिझम विरोधी आघाड्यांमध्ये बूर्झ्वा वर्गाचा कोणताही हिस्सा म्हणजे बुर्झ्वा वर्गाचा कोणताच पक्ष सहभागी होणार नाही.** भारताच्या संसदीय डाव्यांचा मुळात तोच ऐतिहासिक अपराध आहे, जो की 1920 आणि 1930 च्या दशकामध्ये युरोपिय सामाजिक लोकशाहीवादी पक्षांनी केला होता. मागील सहा-सात दशकांपासून हे पक्ष संसदीय निवडणुकांचा डावपेचात्मक (टॅक्टीकल) वापर करण्याऐवजी संसदीय राजकारणात बुडून राहिले आहेत; आणि फक्त आर्थिक लढाया लढत राहून कामगार वर्गाचे क्रांतिकारी राजकीय शिक्षण आणि राजकीय संघर्षाला पूर्णपणे सोडून दिले आहे. **तळागाळाच्या स्तरावरून वेगवेगळ्या लढाऊ सामाजिक चळवळी उभ्या करून सामान्य जनतेचा वर्गीय दृष्टीकोण आणि वर्गीय एकजूटीला विकसित करणे तर यांच्या उद्दिष्टांमध्ये कधी राहिलेच नाही.** अशातच नवउदारवादाच्या या काळात डाव्या विचारसरणीचे पक्ष जर संसदीय राजकारणात किनाऱ्यावर ढकलले जात असतील, तर त्याचे आश्चर्य आणि दुःख खोट्या आशावादाला बळी पडलेल्या त्याच लोकांना होईल जे मार्क्स-एंगल्स-लेनिन-माओ मार्क्सवाद आणि बर्नस्तीन-कौत्स्की-ख्रुश्चेव-देंग सीयाओ पिंग च्या फसव्या मार्क्सवादांमध्ये काही फरकच करू शकत नाहीत, म्हणजेच लेनिनच्या म्हणण्यानुसार ते मार्क्सवादाचे क-ख-ग सुद्धा जाणत नाहीत कारण ते मार्क्सवाद आणि संशोधनवादामध्ये काही फरकच करू शकत नाहीत.

विचार विहीन भावुकता आणि आदर्शवादाची अवस्था तर ही आहे की काही शिकले सवरलेले सुशिक्षित लोक हे पालुपद गाऊ लागले आहेत की जनता जर माणिक सरकार सारख्या आणि साधेपणाने व गरिबीत जीवन जगणाऱ्या स्वच्छ छबीच्या व्यक्तीला डावलून भाजपला सत्तेमध्ये आणत असतील तर ही जनता याच लायकीची आहे की तिने फॅसिस्टांचा कहर झेलून किंमत मोजावी. अरे भल्या माणसांनो, **राजकारणामध्ये गोष्टी एखाद्या पक्षाच्या नेत्याचा साधेपणा किंवा भ्रष्टाचार मुक्त जीवनातून नाहीत तर व्यक्ती व पक्षाच्या विचारधारेवरून, राजकारण आणि धोरणांवरून ठरत असतात.** गांधी आणि नेहरूंच्या काळातील बहुतेक काँग्रेसी नेते सुद्धा साधं जीवन जगत होते. आणीबाणीचे समर्थन करणारे भाकप नेते इंद्रजीत गुप्तासुद्धा अतिशय साधे जीवन जगत होते. आणखी मागे गेल्यास दिसेल की प्रुधो, बाकुनिन आणि व्हाईटलिंग सुद्धा अत्यंत गरिबीत आयुष्य जगायचे आणि मार्तोव, मार्तिनोव सारखे तमाम मेन्शेव्हिक नेतेसुद्धा भ्रष्टाचारी किंवा श्रीमंतांमध्ये जगणारे लोक नव्हते. हे त्यांच्या राजकारणावरून ठरायचे की ते क्रांतिकारी होते की कामगार वर्गाचे शत्रू. जर राजकारण नेत्यांच्या जगण्याचा पद्धतीवरूनच ठरत असतं तर तमाम राजनीतिशास्त्र आणि राजकीय अर्थशास्त्र समजून घेण्याची गरजच काय होती!

भावुकतावादी मार्क्सवादी, मार्क्सवाद तर काही अभ्यासत नाहीत, 'कॉमन सेन्स लॉजिक' वापरत राहतात. ते स्वतःला मार्क्सवादी म्हणवतात परंतु ते तॉलस्तॉयपंथी असतात.

दुसरी गोष्ट निवडणुकीमध्ये आतासुद्धा मोदीला निवडून दिल्याबद्दल जनतेला शिव्या घालणारे लोक जेव्हा निवडणुकीकडून मोठ्या निर्णयाची अपेक्षा ठेवतात, तेव्हा ते या निवडणुकांमध्ये भांडवलाची भूमिका आणि फॅसिस्टांच्या थापाबाजींच्या रेकॉर्डला सुद्धा जाणत नाहीत. ते या गोष्टीला समजून घेत नाहीत की जनतेला जर एखादे योग्य नेतृत्व योग्य राजकीय चेतना देऊन मुळ मुद्द्यांना योग्य पद्धतीने त्यांच्या निर्देशनास आणणार नसेल, तर भांडवली संकटाच्या कालखंडामध्ये ते अगदी सहजरित्या फॅसिस्टांच्या लोकरंजक घोषणा आणि फेटिश आणि मिथ्थ्या चेतनेच्या प्रभावाखाली येतात. सामाजिक लोकशाहीवादी आणि संसदीय डाव्यांकडून देण्यात येणारे पर्याय फॅसिस्टाच्या लोक रंजक घोषणांसमोर फिके वाटतात, विशेषतः तेव्हा, जेव्हा जनता त्यांना खूप मोठ्या कालावधीपासून पाहत आणि भोगत आहे. डाव्या बुद्धिजीवींची एक विशेषता म्हणजे ते नेहमीच किनाऱ्यावर उभे राहून बोलतात, आपल्या भूमिकेची कधीही कोणतीच चर्चा करत नाहीत आणि जनतेला बोल लावण्याची एकही संधी सोडत नाहीत. या दुखी आत्म्यांविषयी याशिवाय काय बोलावे की त्यांनी आता आपल्यासाठी नवीन जनता निवडावी.

त्रिपुरामध्ये डाव्यांच्या आघाडीच्या सरकारविषयी आणि माणिक सरकारविषयी भांडवली प्रसारमाध्यमांमध्ये ज्या बातम्या येत होत्या आणि सोशल मीडियावर वीस वर्षांपासून कोणत्याही गंभीर आव्हानाशिवाय स्वच्छ पारदर्शक सरकार चालविणाऱ्या माणिक सरकार बाबत डावे लोक जे काही लिहीत असत, त्यामध्ये त्रिपुराचे वास्तव चित्रण जवळपास नसायचेच. यामुळे डाव्या आघाडीच्या अशा वाईट पराभवामुळे लोकांना मोठा धक्का बसला. त्रिपुराच्या समाजाच्या अंतर्विरोधाच्या वास्तव परिस्थितीला समजून घेतल्याशिवाय नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या परिणामांना समजून घेता येणार नाही. परंतु त्याविषयी चर्चा करण्याअगोदर काही महत्त्वाच्या बाबींना आम्ही क्रमाने मांडू इच्छितो. गेल्या जवळपास तीन दशकांपासून **उत्तर पूर्वेकडील सर्वच राज्यांमध्ये आर.एस.एस. आपले मजबूत जाळे विणून काम करत आहे. उत्तर पुर्वेतील जनजातींना हिंदुत्वाच्या ओळखीशी जोडणे, जनजातींच्या आपापसातील संघर्षाला आणि केंद्र सरकारशी असलेल्या त्यांच्या संघर्षाला अस्मितेच्या राजकारणाचा आधार देत उत्पिडीत राष्ट्रीयतांच्या संघर्षाला वर्गसंघर्षाच्या राजकारणापासून तोडणे, आणि वैचारिक पातळीवर फॅसिस्ट राजकारणाच्या जवळ आणणे हीच संघाची रणनीती राहिलेली आहे.** ही रणनिती आता, रॅडिकल सशस्त्र संघर्षाच्या नेतृत्वाचे क्रमश: पतन आणि विभाजनामुळे निर्माण झालेल्या निराशेच्या अवकाशात जागा बनवून, यशस्वी होऊ लागली आहे. काँग्रेसच्या प्रदीर्घ शासनादरम्यान या भागातील जनता ज्या शोषण आणि दमनाची शिकार झाली, त्याचा सुद्धा संघ आणि भाजपने चांगलाच वापर करून घेतला. 2014 मध्ये केंद्रात सत्तारूढ झाल्यानंतर भाजपने त्रिपुरातून डाव्या आघाडीला उपटून फेकण्याच्या प्रकल्पावर विशेष जोर देत काम केले. संघाच्या स्वयंसेवकांशिवाय मोठ्या प्रमाणावर भाजपच्या कार्यकर्त्यांना तिथे पाठविण्यात आले. माकप नेतृत्वाला हे माहीत होते, परंतु जसे की सर्वच संसदीय पक्षांप्रमाणे सरकार चालवता चालवता पक्ष कार्यकर्त्यांच्या स्तरावर इतकी भ्रष्ट झाली आहे की यांची कॅडेर रचना सुद्धा कर्मकांडी, ढिली ढाली आणि मंद बनली आहे. दुसरीकडे भांडवली परिघात सुद्धा माकपने पांगळेपणाचा परिचय दिला आणि त्रिपुरीमधील जनजमातींमधील ज्या असंतोष आणि असुरक्षितेचा भाजप फायदा उचलत होता त्यांच्या समाधानासाठी कोणतेही महत्त्वाचे पाऊल उचलले नाही. त्यांना स्वतःवर जरा जास्तच भरवसा होता, ज्यामुळे त्यांनी कल्पनाही केली नाही की बहुमतातील डावी आघाडी 16 जागांवर येऊन धडकेल आणि 2 जागा मिळवणारी भाजप "इंडियन्स पीपल्स फ्रंट ऑफ त्रिपुरा" [आई.पी.एफ.टी] सोबत आघाडी बनवून 43 जागा मिळवेल. काही लोकांना या गोष्टीचे सुद्धा आश्चर्य वाटते की भाजप आणि माकपच्या मतांमध्ये फक्त शून्य पूर्णांक तीन टक्के फरक असताना जागांच्या बाबतीत एवढा मोठा फरक कसा काय? भाजपच्या स्वतःच्या 43 टक्के मतांसोबत आई.पी.एफ.टी च्या 7.5 टक्के टक्क्यांना जोडले आणि माकपच्या 42 टक्के मतांसोबत इतर डाव्या घटक पक्ष्यांच्या मतांच्या टक्केवारीला जोडले, तरीही दोघांच्या मधे 6 टक्क्यांच्या जवळपास फरक आहे. जनजाती बहुल प्रदेशांव्यतिरिक्त संपूर्ण राज्यात सुद्धा जाती-जमातींची लोकसंख्या ज्या प्रकारे विखुरलेली आहे, तिथे जर तिने एकजूट होऊन भाजपा आघाडीला मत दिले असेल तर जागांमध्ये एवढा मोठा फरक निर्माण होऊ शकला असता. एक कारण हे सुद्धा आहे की संघाच्या कार्यकर्त्यांनी घराघरापर्यंत पोहोचत बूथ-मॅनेजमेंट अतिशय व्यवस्थित केले होते जेव्हा की डाव्या आघाडीने याबाबतीत हलगर्जी दाखविली होती. फॅसिस्टांच्या चाल चरित्राकडे पाहता ई.व्ही. एम.घोटाळ्याचा आधार घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु या ब्रह्मास्त्राचा प्रभावी वापर ते मध्यप्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान, निवडणुकांमध्ये आणि 2019च्या लोकसभेच्या निवडणुकांत करतील याची शक्यता अधिक आहे. त्रिपुरामधील परिस्थिती तशीही त्यांच्याच बाजूची होती.

चला तर थोडीशी या परिस्थितीवर सुद्धा एक धावती नजर टाकूया.

1947 च्या अगोदर त्रिपुरा ब्रिटिश शासनाच्या आधिपत्याखालील एक राज्य होते. 1949 नंतर ते भारतात विलीन झाले, याचा एक विभाग, टिप्पेरा जिल्हा, पूर्व

पाकिस्तानमध्ये समाविष्ट झाला. तसे तर बंगाली जनता त्रिपुरामध्ये अगोदर पासून राहत होती, परंतु विभाजनाच्या काळापर्यंत बहुसंख्या स्थानिक जातींची होती. विभाजनानंतर पूर्व पाकिस्तानातून मोठ्या प्रमाणावर बंगाली शरणार्थी लोक त्रिपुरामध्ये येऊन स्थायिक झाले आणि स्थानिक जनजातींची लोकसंख्या अल्पमतात आली. 1971च्या बांगलादेश युद्धाच्या काळात आणि त्यानंतरसुध्दा बंगाली शरणार्थी लोक त्रिपुरामध्ये येत राहिले. आजची अवस्था ही आहे की त्रिपुराच्या एकूण लोकसंख्येपैकी केवळ 30 टक्केच स्थानिक रहिवाशी लोक उरले आहेत. अशा परिस्थितीमुळे स्थानिक लोकांच्या मनामध्ये असंतोष आणि असुरक्षितेची भावना 1950च्या दशकापासूनच खदखदायला लागली होती. इथे हे सांगणे सुद्धा गरजेचे आहे की 1947च्या अगोदरपासूनच त्रिपुरामध्ये कम्युनिस्ट विचारधारेचे अनेक स्थानिक पक्ष अस्तित्वात होते जे स्थानिक राजेशाही विरुद्ध आदिवासी लोकांना संघटित करत होते. परंतु स्वतंत्र भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाने या परिस्थितीचा काहीच लाभ घेतला नाही, कारण तेलंगणा संघर्षातील पराभवानंतर तो गुडघे टेकून पूर्णतः नतमस्तक होऊन संसदमार्गी झाला होता. फाळणीमुळे त्रिपुराचे सर्वात मोठे नुकसान झाले कारण तो उरलेल्या भारतापासून भू-राजकीय दृष्ट्या वेगळा पडला. तीन बाजूने तो बांग्लादेशाने (तत्कालीन पूर्व पाकिस्तान) वेढलेला होता. फक्त उत्तर-पूर्व आणि पूर्वेकडे आसाम आणि मेघालयाच्या सीमा येऊन त्रिपुराला जुळतात जेथून 2 राष्ट्रीय महामार्ग त्याला उरलेल्या देशाशी जोडतात. लुम्डींग (आसाम) पासून एक छोटा रेल्वे मार्ग त्रिपुरात जात होता, पण तोही राजधानी आगरताळा पर्यंत नाही तर फक्त धर्म नगरपर्यंत. या राजाच्या उपेक्षेचा अंदाज यावरून लावता येऊ शकतो की 2009 मध्ये पहिल्यांदाच आगरताळा पर्यंत रेल्वेमार्ग पोहोचला, आणि 2016 मध्ये त्याला रुंद (ब्रॉड गेज) बनवले गेले. फाळणीनंतर कलकत्ता ते आगरताळाचे अंतर 350 किमीवरून वाढून 1700 किमी झाले. अशा परिस्थितीमध्ये व्हायला हे पाहिजे होते की केंद्रातील सरकारने त्रिपुराच्या आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करावे, पण झाले याच्या एकदम उलटे. आज सुद्धा त्रिपुराची ही दशा आहे की तिथे एकही मोठा उद्योग नाही. फक्त विट भट्ट्या आहेत, चहाचे मळे आहेत, काही रबर प्लांट आहेत आणि थोडासा बांबू उगवला जातो. फक्त 27 टक्के जमिनच शेतीयोग्य आहे, ज्यापैकी 91% वर गव्हाची शेती केली जाते ती सुद्धा मागास पद्धतीने. उरलेल्या जमिनीवर ऊस, ज्यूट आणि डाळीचे पीक घेतले जाते. त्रिपुरा सरकारच्या आकडेवारीनुसार, उपभोग वितरण प्रणालीकडे पाहता राज्यातील 55 टक्के ग्रामीण जनता गरीबी रेषेखाली आयुष्य काढीत आहे. ही तर विडंबनाच आहे की 94 टक्के साक्षरतेसहित त्रिपुरा संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर आहे. यामुळे बेरोजगारीच्या प्रश्नाचे गांभीर्य सहज समजून घेता येऊ शकते. स्थानिक जनजातींची लोक शिक्षणाच्या बाबतीत मागे नाहीत, परंतु नोकऱ्यांच्याबाबतीत ते बंगाली लोकांपेक्षा अतिशय मागे आहेत. ज्या राज्यांमध्ये डाव्या आघाडीने 30 वर्षे शासन केले आहे तिथली अशी अवस्था असंख्य प्रश्न निर्माण करते. अजून एक गोष्ट ही की त्रिपुरामध्ये राज्य कर्मचारी अजूनही चौथ्या वेतन आयोगानुसार वेतन घेत होते, ज्याला भाजप सरकारने सरळ सातवे वेतन आयोग लागू करण्याची घोषणा केली ज्यामुळे सरकारी कर्मचारी सरळ भाजपच्या बाजूने गेले. हे तथ्य सुद्धा डाव्या आघाडीचा नाकर्तेपणाच दर्शवते.

अजून एक तथ्य सुद्धा उल्लेखनीय आहे. स्वातंत्र्यानंतरचे काँग्रेसी राज्य आणि मुलतः त्यांचीच धोरणे लागू करणाऱ्या डाव्या आघाडीच्या तीन दशकांच्या राज्याच्या परिणामी, त्रिपुरामध्ये जो मध्यमवर्ग उदयाला आला आहे, त्याची 'विकासाची' आकांक्षा आता डाव्या आघाडीच्या शासनात पूर्ण होत नव्हती. त्यामुळे भाजप दाखवत असलेल्या विकासाच्या गाजराकडे तो आकर्षित होणारच होता. अशीच स्थिती अगोदर बंगाल मध्येही दिसून आली होती.

त्रिपुरा 1972 पर्यंत एक केंद्र शासित प्रदेश होता. जानेवारी 1972 मध्ये त्याला मणिपुर आणि मेघालय सोबत पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला. राज्य बनण्या अगोदरपासूनच स्थानिक जनजातीय जनतेचा अलिप्ततावाद आणि असुरक्षितपणाची भावना असंतोषाच्या रूपामध्ये वाढीस लागली होती. त्रिपुराचा एकमेव भूमि सुधारणा कायदा "त्रिपुरा लँड रिव्हेन्यु अँड लँड रिफॉर्म ॲक्ट 1960" हा आहे. यानुसार आदिवासी लोकांची जमीन बिगर आदिवासी खरेदी करू शकत नाहीत, परंतु मोठ्या प्रमाणावर याचे उल्लंघन होत राहिले आणि निनावी हस्तांतरण होत राहिले. एकदा 1978 मध्ये डाव्या आघाडीच्या सरकारने आदिवासींची जमीन त्यांना परत मिळावी यासाठी प्रयत्न केला होता. परंतु निवडणुकीच्या डावपेचाच्या नादात बंगाली जनतेच्या दबावामुळे ते आपल्या मोहिमेला अधिक दूर पर्यंत घेऊन जाऊ शकले नाहीत. जनजातींमध्ये राष्ट्रीय उत्पिडनाची जाणीव करून देणारी आणखी एक घटना म्हणजे 1965 मध्ये बंगाली भाषेला सरकारी कारभाराची भाषा बनवण्याचा निर्णय. राज्याच्या लोकांपैकी 30 टक्के आदिवासी असलेली जनता 19 जाती-जमातींमध्ये विखुरलेली आहे, ज्यापैकी अधिकतर 'कोकबरोक' भाषा बोलतात. पहिल्यांदा 1979 मध्ये डाव्या आघाडीच्या सत्तेने 'कोकबरोक' भाषेला ओपचारिक मान्यता दिली; परंतु याने व्यावहारिक पातळीवर विशेष काही फरक पडला नाही. 1970च्या दशकामध्ये आदिवासी आणि बंगाली जनतेमध्ये संघर्षाची सुरुवात झाली होती. 1980 मध्ये "त्रिपुरा नॅशनल वोलेन्टीअर्स" आणि "आमरा बंगाली" संघटनांमधल्या संघर्षाने जातीय दंगलीचे स्वरूप धारण केले, ज्यामध्ये 800 लोक मारले गेले. या असंतोषाला

नियंत्रणात आणण्यासाठीच 1982 मध्ये "त्रिपुरा आदिवासी क्षेत्र स्वायत्त जिल्हा परिषदेची" स्थापना झाली जिला 1985 मध्ये काही आणखी अधिकार मिळाले. राज्यातील 68 टक्के क्षेत्र या परिषदांच्या अखत्यारित येते आणि यांना मर्यादित प्रशासकीय, विधीविषयक आणि न्यायिक अधिकार मिळालेले आहेत. यांना अधिक स्वायत्तता आणि अधिकार देण्याची मागणी सातत्याने होत राहिली आहे. त्रिपुरामध्ये '77 पर्यंत काँग्रेसची सत्ता होती नंतर '78 ते '88 पर्यंत आणि 1993 पासून 2018 पर्यंत डाव्या आघाडीची सत्ता राहिली आहे. विधानसभेच्या 60 पैकी एक तृतीयांश म्हणजे 20 आणि लोकसभेच्या दोन पैकी एक जागा आदिवासी जनतेसाठी राखीव आहे. परंतु आदिवासी जनतेची नेहमीची तक्रार राहिली आहे, की सर्वच गैर आदिवासी पक्ष असे काही दब्बू आणि लाचार आदिवासी उमेदवार निवडत असतात ज्यांना स्वतःचा असा काही आवाजच नसतो. 1990च्या दशकात एन. एल. एफ. टी. आणि ए. टी. टी. एफ. सारख्या संघटनांनी सशस्त्र विद्रोहाची सुरुवात केली. या दोन्ही गटात उच्छाद ज्यावेळी शिगेला पोहोचला होता तेव्हाच म्हणजे 16 फेब्रुवारी 1997 ला राज्यात आफ्स्पा कायदा लागू करण्यात आला. जून 2013 मध्ये याला 30 पोलिस ठाण्यांपर्यंत मर्यादित करण्यात आले आणि मे 2015 मध्ये पूर्णत: हटविण्यात आले.

त्रिपुराच्या आदिवासी जनतेचा असंतोष दीर्घकाळापासून एका उंच बिंदूवर जाऊन ठेपला आहे आणि मागील दशकातील सरकारी दमनापुढे हतबलतेच्या जाणीवेने एक अशी प्रतिक्रियेची मानसिकता जन्माला घातली आहे जिचा फायदा आज फॅसिस्ट उचलत आहेत. आदिवासी जनतेची चळवळ आज अलिप्ततावादी नाहीये. तिचा एक उग्र हिस्सा आहे जो तिप्रालँड नावाने वेगळ्या राज्याची मागणी करतो आहे. त्यांची पाठराखण 'इंडिजिनिअस पिपल्स फ्रंट ऑफ त्रिपुरा' करत आहे ज्यांच्यासोबत भाजपने आघाडी करून या निवडणुकांमध्ये 8 जागा मिळविल्या आहेत. दुसरा एक मवाळ गट आहे जो आदिवासी स्वायत्त जिल्हा परिषदांची स्वायत्तता वाढवण्याची आणि त्यांना 100% प्रत्यक्ष अनुदानाची मागणी करतो आहे. या प्रवाहाचे समर्थन 'आय. एन. पी. टी.' नावाचे संघटन प्रामुख्याने करते आहे. आता डाव्या आघाडीच्या पराभवांना सहजतेने समजून घेता येऊ शकते. **डाव्या आघाडीने दीर्घकाळापर्यंत शासन केलं परंतु एक बुर्झ्वा भांडवली सुधारणावादी पक्ष भांडवली लोकशाहीच्या कक्षेत राहून आर्थिक विकास आणि रोजगार निर्माणासाठी जेवढे काही करू शकत होता, तेवढे सुद्धा त्यांनी केले नाही.** भूमी सुधारणेला प्रभावीपणे राबवून आदिवासींच्या जमिन सुरक्षेसाठी कोणतेही निर्णायक पाऊल उचलले गेले नाहीत. स्वायत्त परिषदांचे अधिकार आणि स्वायत्तता वाढण्याच्या मागणीला सुद्धा अगदीच खोडून काढण्यात येत राहिले. कोकबरोक भाषा बघता बघता मृतप्राय झाली. डाव्या आघाडीने सुद्धा फुटीरतावादी गटांना निपटवण्यासाठी आफ्स्पा कायद्याचाच आधार घेतला आणि त्याला दीर्घ काळापर्यंत टिकवून ठेवले. आदिवासींमध्ये त्याची प्रतिमा एका बंगाली पार्टीची बनली. या परिस्थितीचा भाजपाने भरपूर फायदा उचलला. त्यांनी बंगाली आणि आदिवासी जनतेमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने प्रचार केला. शहरी बंगाली मध्यमवर्गाला त्यांनी धर्मवाद, अंधराष्ट्रवाद, आणि विकासाच्या लोकरंजक घोषणा देऊन आपल्या बाजूने उभे केले. दुसरीकडे आदिवासी जनतेच्या निराशेचा पूर्ण फायदा उचलत त्यांनी अस्मितावादी राजकारणाला बळ दिले आणि भरपूर तुष्टीकरण केले.

एकंदरी बोलायचे झाल्यास संसदीय डाव्यांचा दीर्घकाळाचा नाकर्तेपणा, यथास्थितीवाद आणि घाणेरड्या सामाजिक लोकशाही राजकारणाच्या कुकर्मांचेच हे फळ आहे की आज त्रिपुरामध्ये फॅसिस्टांना विजय मिळाला आहे. तुम्ही धोरणांविषयी बोलायचे सोडून माणिक सरकारच्या साधेपणा बाबत गप्पा मारत बसा, आणि डाव्या आघाडीच्या पराभवाबद्दल उर बडवत रहा. काँग्रेस विषयीच बोलायचे तर तिला या दुर्दशेला यायचेच होते. त्रिपुरामध्ये खूप कालावधीपासून काँग्रेस आणि भाजपची अघोषित आघाडी होती. भाजपाला जास्त प्रभावी पर्याय बनताना पाहून जर अधिकांश काँग्रेसी भाजपच्या होडीत चढले तर यामध्ये आश्चर्य करण्यासारखे काहीही नाही.

बंगाल आणि संपूर्ण देशाप्रमाणेच त्रिपुरामध्ये सुद्धा संसदीय राजकारणाचीच परिणीती उघडी पडली आहे. ही गोष्ट पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे की क्रांतिकारी डाव्या राजकारणाच्या पुनरुत्थानाशिवाय, सर्व कष्टकरी वर्गाची एक लढाऊ सामाजिक चळवळ उभी केल्याशिवाय, आणि सडकेवर त्यांच्याशी लढा देण्याची एक दीर्घकालिक तयारी केल्याशिवाय फॅसिस्टांना माघारी ढकलता येऊ शकत नाही.

**अनुवाद: प्रविण सोनवणे**



**निर्मम टीका**
**आणि स्वतंत्र विचार**
**हे क्रांतिकारक**
**विचारसरणीचे दोन**
**आवश्यक गुण आहेत.**

**शहीद भगतसिंह**

तत्त्वज्ञान

# गांधी - एक पुनर्मूल्यांकन

✍कात्यायनी

'जनसत्ता'च्या संपादकीय पानावर बराच काळ अगोदर सुधांशु रंजन यांनी 'महात्मा गांधी विरुद्ध चर्चिल' नावाच्या लेखात गांधींच्या ब्रह्मचर्याच्या प्रयोगांचा प्रश्न उपस्थित केला होता. लेखकाच्या मते, सामान्य लोकांच्या दृष्टीत विवादास्पद असूनही, 'गांधींचा हा प्रयोग अभूतपूर्व होता, ज्याचे महत्व सामान्य बुद्धीच्या माणसाला समजण्याजोगे नाही' आणि एक असा सत्यांश त्यांच्याजवळ होता, ज्याने त्यांना त्या उंचीवर नेऊन ठेवले होते.

वेद मेहतांपासून दयाशंकर शुक्ल 'सागर' सारखे लेखक त्यांच्या पुस्तकांमध्ये ज्या प्रकारची खळबळजनक, चटपटीत चर्चा करतात; निश्चितपणे, इतिहासाचा कोणीही जबाबदार अभ्यासक गांधींच्या ब्रह्मचर्य-प्रयोगांबद्दल तशा चर्चेत रस घेणार नाहीत. परंतु **कुठल्याही इतिहास पुरुषाच्या दृष्टिकोनामध्ये कुठल्याही प्रकारची अवैज्ञानिकता किंवा कुपमंडूकता असेल तर इतिहास आणि समाजाचेचे गंभीर अभ्यासक निश्चितपणे त्याची आलोचना करतील.**

ब्रह्मचर्य-प्रयोगांमागील ब्रह्मचर्याच्या शक्तीवर आणि केवळ व्यक्तीच नाही तर सबंध समाजावर त्याच्या पडणाऱ्या सकारात्मक प्रभावाबाबत गांधींना प्रबळ आस्था होती किंवा नाही इथे हा प्रश्नच नाहीये. गांधींच्या आस्थेमुळे त्यांच्या प्रयोगांच्या वस्तुगत प्रभावामध्ये कुठलाही फरक पडत नाही. **फरक ह्या गोष्टीने पडतो की त्यांच्या प्रयोगाचा आधार वैज्ञानिक होता की अवैज्ञानिक. मानवी शरीर आणि काम भावनेच्या उदयाबद्दल आजवर जितकाही आभ्यास झालेला आहे, त्यातून हेच सिद्ध होते की ब्रह्मचर्य आणि त्याची शक्ती हे धार्मिक मिथकीय थोतांड आहे. स्त्री-पुरुषांमध्ये आकर्षण आणि शारिरीक-संबंध अत्यंत स्वस्थ, सहज आणि विज्ञान-संमत असतात.** परंतु, निश्चितपणे ह्या संबंधांच्या सामाजिक नियमनामधून उद्भवलेले नैतिक पैलू सुद्धा समाजाच्या स्वस्थ-स्वाभाविक अस्तित्वासाठी आणि विकासासाठी तितकेच गरजेचे आहेत. समाज आणि मानवी-चेतना यांच्या विकासाबरोबरच ह्या सामाजिक नियमांचा आणि नैतिकतेचा सुद्धा विकास झालेला आहे. ह्या बद्दलचा अभ्यास नृतत्वशास्त्र, सामाजिक इतिहास आणि नीतिशास्त्र यांच्या परीघामध्ये मोठ्या प्रमाणात झाला आहे.

शारिरीक आकर्षणाच्या वैज्ञानिक कारणांची समज नसल्यामुळे आणि धार्मिक संस्कारांमुळे भयनिर्मित कुंठितावस्था, इत्यादी कारणांमुळे मागास देशांमधील बंदिस्त समाजातील स्त्री-पुरुषांची एक मोठी संख्या आपल्या चेतनेमध्ये, अवचेतनेमध्ये विभिन्न प्रकारच्या मानसिक व्याधी जोपासत संपूर्ण आयुष्य व्यतीत करते. तसेच अपराध-बोध आणि ग्लानी त्यांच्या व्यक्तित्वाच्या सर्जनशिलतेची धार बोथट करतात.

**गांधींचे व्यक्तिमत्व विराट होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्व आणि विचारांमधील अंतर्विरोध सुद्धा तितकेच खोल होते. दार्शनिक स्तरावर त्यांचे चिंतन रस्किन, थोरो और टोलस्टोय यांच्या विचारांच्या जमिनीवर उभे होते, परंतु ह्या विचारवंतांचा मानवतावादी यूटोपिया भारतीय समाजात लागू करत असताना गांधींनी हिंदू धर्मातील पारंपारिक कुपमंडूकता, अंधविश्वास आणि संकुचितपणाने त्यांना व्यापून टाकले.** ते स्वतःला सनातन धर्माचे अनुयायी मानत असत आणि आचारांनी एक उदारमतवादी हिंदू होते. ते चातुर्वर्ण्य व्यवस्थेला आदर्श रूप देऊन, तिला सामाजिक श्रम-विभाजनाच्या रुपात स्थापित करू इच्छित होते आणि त्यायोगे अस्पृश्यता समाप्त करू इच्छित होते. उघड आहे की हा एका उदार हिंदूचा यूटोपिया होता. व्यवहारत: धर्माच्या उदारीकरणाचा अगदी शुद्ध हेतूंनी केलेला प्रयत्न सुद्धा धर्माचा सामाजिक आधार आणि त्याची स्वीकारार्हता वाढवतो आणि प्रत्यक्षात आपल्या सामाजिक जीवनात धर्माचा हस्तक्षेप (मग कितीही उदार रुपामध्ये का असेना) जेव्हा वाढीस लागतो तेव्हा शेवटी धार्मिक प्रतिबंध, रूढी आणि संस्कार यांचा दबाव कठोर आणि कट्टर रूपातच समोर येतो. याच्या सर्वाधिक झळा शोषित-उत्पिडीत सामान्य जनता आणि स्त्रिया यांनाच बसतात. गांधी धर्मनिरपेक्षतेच्या ऐवजी सर्वधर्म समभावाबद्दल बोलत असत. कुठल्याही बहुधार्मिक समाजात सामाजिक-राजकीय परिघातून धर्माला जर पूर्णपणे वेगळे ठेवले नाही तर सर्वधर्म समभावाचा कितीही जप केला तरी, शेवटी बहुसंख्यांक धर्माचे वर्चस्ववादी रूपच समोर येईल आणि वस्तुगत पातळीवर धार्मिक बहुसंख्यांकवादाची जमीन तयार होईल.

गांधींच्या ग्राम-स्वराज्याची संकल्पना उत्पादनाच्या मागास साधनांच्या आधारे स्वावलंबी-स्वायत्त ग्रामीण अर्थव्यवस्थेचा यूटोपिया सादर करते, परंतु सामंती जमीनदारांकडून बळाच्या जोरावर जमिनी काढून घेण्याऐवजी, ते त्यांचे हृदय-परिवर्तन करण्याच्या मताचे होते. त्यामुळेच, एकीकडे मागास चेतना असलेली, धर्मभिरू आणि जमिनींचे मालक होण्याचे स्वप्न बघणारी काश्तकार शेतकऱ्यांची मोठी संख्या गांधींच्या मागे उभी राहिली. तर दुसरीकडे, शेतमजुरांच्या विद्रोहांच्या भीतीने गाळण उडालेल्या सामंतांना सुद्धा गांधींच्या यूटोपियाचा क्षणिक आधार वाटला आणि त्यामुळे गांधी सामंतांचा उघड

विरोध टाळण्यात सफल झाले. देशातील सामंत मोठ्या संख्येने काँग्रेस मध्ये सहभागी झाले, किंवा किमान त्यांनी काँग्रेसचा विरोध केला नाही, कारण त्यांना पूर्ण विश्वास होता की स्वातंत्र्य जर गांधींच्या नेतृत्वाखाली मिळाले तर त्यांच्या जमिनी जबरदस्ती हिसकावून घेण्यात येणार नाहीत आणि भूमी सुधार कार्यक्रम लागू जरी झाला तरी त्यांच्या हितसंबंधांची पुरेपूर काळजी घेतली जाईल.

**गांधी श्रम आणि भांडवलामधील अंतर्विरोध सोडवण्याच्या स्वाभाविक क्रांतिकारी प्रक्रियेचा स्वीकार करण्याऐवजी त्यांच्यामध्ये सामंजस्याचा सिद्धांत प्रस्तुत करत करत असत. ट्रस्टीशिपचा सिद्धांत भांडवलदारांचे मतपरिवर्तन करून त्यांना सामाजिक संपत्तीचे ट्रस्टी आणि कामगारांचे संरक्षक/पालक बनवणे हा होता.** ह्यावरून हे उघड आहे की गांधी वैचारिक पातळीवर फक्त अत्यंत उथळ प्रत्ययवादीच नव्हते तर गांधीना राजकीय अर्थशास्त्राचा गंधही नव्हता. मार्क्सवाद तर त्यांनी वाचलेलाच नव्हता (त्यामुळे **समाजवाद आणि साम्यवादावर त्यांनी जिथे-कुठे टीका केली आहे, ती अत्यंत उथळ अनुभववादी रुपात आहे**). ॲडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्या पारंपारिक बुर्झ्वा अर्थशास्त्राशी सुद्धा त्यांचा संबंध आलेला नव्हता. अमुर्त वैज्ञानिक अवधारणेपासून प्रस्थान करून आणि भांडवलशाहीला उत्पादन व्यवस्थेचे शाश्वत आणि प्राकृतिक सत्य मानूनही पारंपारिक बुर्झ्वा राजकीय अर्थशास्त्राची सगळ्यात मोठी कामगिरी होती - 'मूल्याच्या श्रम सिद्धांता'चा (लेबर थियरी ऑफ व्हॅल्यू) शोध. जर गांधींनी ह्याचे थोडे सुद्धा अध्ययन केले असते तर ट्रस्टीशिपच्या सिद्धांताचे प्रतिपादन त्यांनी कदापि केले नसते.

**गांधींना उत्पादक शक्तींचा निरंतर विकास आणि त्यानुसार उत्पादन-संबंधांमध्ये होणाऱ्या बदलांबरोबरच समाज परिवर्तनाच्या ऐतिहासिक वेगाची कुठलीही समज नव्हती.** भांडवलशाहीच्या सगळ्या शोकांतिकांसाठी गांधी उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी आणि क्रयवस्तूंचे उत्पादन (नफ्यासाठीचे उत्पादन) यांना जबाबदार मानण्याऐवजी कारखान्यांमधील उन्नत तंत्र, मशिन्स आणि व्यवस्थापनास जबाबदार मानत असत आणि ह्याचा पर्याय म्हणून छोट्या प्रमाणावर उत्पादन (हस्तकला, कुटिरोद्योग, ग्रामीण शेतकी अर्थव्यवस्था) घेण्यावर भर देत असत. हा त्यांच्या सिद्धान्तामधील आणि व्यवहारामधील महत्वाचा अंतर्विरोधच होता की भारतातील जे मोठे भांडवलदार काँग्रेस आणि गांधींच्या विविध संस्थांचे देणगीदार होते, त्यापैकी एकालाही ते छोट्या प्रमाणातील उद्योग-धंद्यांकडे वळवू शकले नाहीत. उलट गांधींच्या जीवन काळातच काँग्रेस समर्थक भारतीय भांडवलदारांच्या मालकीच्या मोठ्या उद्योगांचा विकास वेगाने झाला. तरीही, सिद्धांत आणि व्यवहारामधील ह्या अंतर्विरोधाकडे दुर्लक्ष करून आपण गांधींच्या ह्या आर्थिक चिंतनाची समीक्षा करूयात. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास उत्पादक शक्तींच्या निरंतर विकासाच्या नैसर्गिक प्रक्रियेचा भाग असतो, जी मानवी समाजाच्या सुरुवातीच्या काळापासून निरंतर चालू आहे. उत्पादन प्रक्रियेदरम्यान माणसे निश्चित अशा उत्पादन संबंधांनी बांधली जातात आणि हेच उत्पादन संबंध जेव्हा उत्पादक शक्तींच्या विकासाला खीळ घालू लागतात, तेव्हा उत्पादक शक्ती त्यांना नष्ट करून नवीन उत्पादन-संबंधाची निर्मिती करतात आणि त्याच बरोबर इतिहासाचे नवीन युग सुरु होते. इतिहासाच्या ह्याच स्वाभाविक गतीमधून सामंती-उत्पादन संबंध अस्तित्वात आले. भांडवलशाहीची खरी समस्या माणसाला सामुहिकपणे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यास सक्षम बनवणाऱ्या मशिन्स नाहीत. खरी समस्या उत्पादन आणि वितरणाचे ते संबंध आहेत ज्यांच्यामुळे **उत्पादन साधनांचे मालक सामाजिक उपयोग, निकड लक्षात न घेता नफा केंद्रस्थानी ठेऊन उत्पादन करतात, नवनवीन मशिन्सचा उपयोग केवळ उत्पादक वर्गाचे अधिकाधिक शोषण करण्यासाठी आणि जास्तीत जास्त वरकड मूल्य मिळवण्यासाठी करतात.** त्याच बरोबर नफ्याच्या शर्यतीत युद्ध आणि पर्यावरणाचा नाश सुद्धा करतात. पाणचक्की, चरखा ह्या मशिन्सच आहेत, पण फरक इतकाच आहे की त्या जुन्या काळातील मशिन्स आहेत. गांधी भांडवलशाहीची आंतरिक गती न समजू शकल्यामुळे मशिन्स आणि संचालन यांना भांडवलशाही मधील सबंध दुर्गुणांचे कारण समजून बसले आणि म्हणूनच, इतिहासाचे चक्र मागे फिरवण्याचा ते अट्टाहस करत. हा एक प्रतिक्रियावादी यूटोपिया होता. गांधींच्या अगोदर असाच यूटोपियन दृष्टीकोण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्विस अर्थशास्त्रज्ञ सिसमोंदी यांनी आणि त्यानंतर फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जोसेफ प्रूधों यांनी (गांधीपेक्षा अधिक स्पष्ट तर्कांसह) प्रस्तुत केला होता. त्यानंतर त्याच विचारांची नवीन आवृत्ती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रशियामध्ये नरोदवाद्यांनी प्रस्तुत केली. निम्न-भांडवली दृष्टीकोनातून भांडवलशाहीची समीक्षा करणारे सिसमोंदी हे आर्थिक विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये स्वच्छंदतावादाचे (रोमैण्टिसिजम) एक 'नमुनेदार' प्रतिनिधि होते. त्यांचे म्हणणे होते, की भांडवलशाही अंतर्गत कष्टकरी जनतेची बरबादी आणि आर्थिक संकट अपरिहार्य आहेत. **भांडवलशाहीच्या मुलभुत अंतर्विरोधांना आणि आंतरिक गतीला समजू न शकल्यामुळे, उपाय म्हणून ते छोट्या प्रमाणावरील उत्पादनाकडे वळण्याचा मार्ग सांगत असत आणि इतिहास चक्र उलटे फिरवण्याचा अट्टाहास धरीत असत. सिसमोंदी, प्रूधों आणि नरोदवाद्यांच्या विचारांची विस्तृत टीका मार्क्स-एंगेल्स, प्लेखानोव आणि लेनिनने प्रस्तुत केली होती.** निम्न-भांडवली राजकीय अर्थशास्त्राच्या ह्या प्रतिनिधींची अध्ययन पद्धती द्वैतवादी आणि सारसंग्रहवादी होती आणि दृष्टिकोण

प्रत्ययवादी होता. सामाजिक उत्पादन-प्रणालीची विकासाची ऐतिहासिक प्रक्रिया समजू न शकल्यामुळे हे अर्थशास्त्रज्ञ त्याचे कारण "चांगला" आणि "न्याय" यांसारख्या नैतिक आदर्शामध्ये शोधण्याचा प्रयत्न करत असत. त्यांच्या ह्या प्रतिक्रियावादी यूटोपियापेक्षा यूटोपियन समाजवाद्यांचा यूटोपिया प्रगतिशील होता, ज्याच्या मते कष्टकरी जनतेचा तिच्या श्रमाच्या उत्पादनावर संपूर्ण अधिकार आहे आणि ह्याच लक्ष्याच्या प्राप्तीसाठी सामाजिक व्यवस्थेची पुनर्बांधणी अनिवार्य आहे. गांधींचा यूटोपिया सिसमोंदी आणि प्रूधों यांच्या प्रतिक्रियावादी यूटोपियाचेच एक निकृष्ट भारतीय संस्करण होते. पुढे जाऊन, चरण सिंह यांनी त्यांच्या 'गांधीयन पाथ' आणि 'इकोनॉमिक नाइटमेयर ऑफ इंडिया' मध्ये हाच गांधीवादी यूटोपिया अधिक व्यवस्थितपणे प्रस्तुत केला. परंतु ते सुद्धा सिसमोंदी आणि नरोदवाद्यांनी दिलेल्या तर्कांच्या तसूभरसुद्धा पुढे जाऊ शकले नाहीत.

आता आपण गांधींच्या अहिंसेच्या तत्वज्ञानाकडे वळूयात. इतिहासातील एक तथ्य हे आहे की **नवीन सामाजिक व्यवस्थेच्या निर्मितीमध्ये बळप्रयोगाची भूमिका महत्वाची असते. हेराल्ड लास्कीच्या शब्दांचा आधार घेत म्हटले जाऊ शकते की प्रत्येक राजकीय-सामाजिक व्यवस्थेच्या परिवर्तनामध्ये हिंसा किंवा हिंसेचे तथ्य (फैक्ट ऑफ वॉयलेंस) अंतर्निहित असते. शासक वर्गाच्या हितसंबंधांना जपण्यासाठी प्रत्येक राज्यसत्ता सामाजिक-आर्थिक संरचना संचालित आणि नियंत्रित करते. सामाजिक-आर्थिक संरचना बदलण्याचे कार्य शोषित वर्ग बळाचा उपयोग करून आणि नवी राज्यसत्ता स्थापन करूनच करू शकतो.** गांधींच्या चिंतनामध्ये सामाजिक संरचना आणि राज्यसत्तेच्या वर्ग चरित्राची ऐतिहासिक समज नव्हती. त्यांचा अजून एक समज होता की जर सत्तेतील लोक त्यांच्या खाजगी जीवनाबरोबरच सार्वजनिक जीवनात काही निश्चित आदर्श अमलात आणतील तर आदर्श समाजाची निर्मिती केली जाऊ शकते. त्यांचे प्रत्ययवादी चिंतन समाज विकासाच्या सुनिश्चित वस्तुगत नियमांकडे दुर्लक्ष करते आणि अमूर्त नैतिक आदर्श व त्यांचे पालन करणाऱ्या व्यक्तींच्या आचरणातून समाजाला संचालित, नियंत्रित केले जाऊ शकते असे मानते आणि खाजगी जीवनातील व्याप व राजकीय जीवनातील सार्वजनिक व्याप यांमधील अंतर पूर्णपणे संपुष्टात आणते. गांधींचा इतिहासबोध मूलतः धार्मिक विश्व-दृष्टिकोणावर आधारलेला होता. त्यांचा विश्व दृष्टीकोन अमूर्त-निरपेक्ष नैतिक आदर्शांचे पालन करणाऱ्या नायकांना इतिहास निर्माण करणाऱ्या शक्तीच्या रुपात बघत असे. हेच कारण आहे की आपल्या आंतरिक तर्क आणि व्यवहारामध्ये त्यांचा अहिंसेचा सिद्धांत विविध अंतर्विरोधांच्या जाळ्यात गुरफटून जात असे. स्वतः गांधी ही गोष्ट मान्य करत असत की हिंसेचा अर्थ केवळ रक्तपात नसतो, कुठल्याही रूपातील दबाव आणि बळप्रयोग सुद्धा हिंसाच असते. अहिंसेचा सिद्धांत केवळ नैतिकता आणि हृदय-परिवर्तन हाच मार्ग सांगतो. गांधी सत्याग्रह आणि उपवास यांना यासाठीचेच माध्यम मानत असत. परंतु व्यवहारात गांधींचे राजकारण सर्वार्थाने 'तडजोड-दबाव-तडजोड' यांचेच राजकारण होते. गांधींच्या नेतृत्वाखालील कुठल्याही आंदोलनाने ब्रिटिशांना काही सवलती देण्यास भाग पाडले तर त्याचे कारण ब्रिटिशांचे हृदय-परिवर्तन किंवा नैतिक पराभव नव्हते. ते कारण होते संभावित देशव्यापी जन आंदोलनाची भीती. ब्रिटीशांचे हृदय-परिवर्तन झाले किंवा नैतिक पराभव झाला म्हणून ते हा देश सोडून गेले नाहीत, तर त्यामागे तात्कालिक जागतिक परिस्थिती आणि देशव्यापी उग्र जनांदोलनांचा दबाव असणे, हे कारण होते. वसाहतवादी देश हि गोष्ट समजून चुकले होते की जर भारतीय बुर्ज्वा वर्गाचा पक्ष असलेल्या काँग्रेस कडे सत्ता हस्तांतरित करून भारताला राजकीय स्वातंत्र्य दिले नाही तर त्यांना उग्र अशा जनक्रांतीचा सामना करावा लागेल.

भूतकाळात सुद्धा गांधींचा व्यवहार नेहमीच त्यांच्या अहिंसेच्या सिद्धांताच्या अनुरूप दिसत नाही. दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना गांधींनी ज्यावेळी बोअर युद्धामध्ये ब्रिटीश वसाहतवाद्यांना सक्रिय समर्थन दिले होते, त्यावेळी त्यांनी रस्किन आणि टोलस्टोय यांच्या प्रभावाखाली अहिंसेचे तत्वज्ञान स्वीकारले होते. **1906 मध्ये झुलु विद्रोह अत्यंत अमानुषपणे मोडून काढत असलेल्या वसाहतवाद्यांना सहकार्य करणे आणि "वसाहतीच्या संरक्षणामध्ये महत्वाची भूमिका निभावण्यासाठी" त्यांनी समस्त भारतीयांना आपली भूमिका पार पडण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या ह्या सक्रिय भुमिकेमुळेच वसाहतवादी शासक वर्गाने त्यांना 'सार्जेण्ट मेजर' या पदावर नियुक्त केले होते.** ह्या दोन्ही वेळी गांधींचा तर्क हा होता की असे करणे शासनाप्रती प्रजेचे नैतिक कर्तव्य आहे. त्यानंतर, 1920 मध्ये आपल्या आत्मकथेमध्ये झुलु विद्रोहामधील त्यांच्या भूमिकेवर पांघरून घालण्यासाठी गांधींनी लिहिले आहे - "झुलु लोकांबद्दल मला कुठलीही तक्रार नव्हती. त्यांनी कोणत्याही भारतीयाचे काहीही नुकसान केले नव्हते. माझ्या स्वतःच्या मनात 'विद्रोहा'बद्दल साशंकता होती". त्यांनी हा दावा सुद्धा केला आहे की, "माझे मन झुलु लोकांबरोबर होते". सत्तेप्रती निष्ठेला जनतेचे कर्तव्य मानणारा गांधींचा सिद्धांत जनतेकडून निवडून न आलेले सरकार असताना सुद्धा ह्या कर्तव्यपालनावर भर देत होता. ह्या बाबतीत लोकशाही बद्दलची गांधींची समाज नितांत बाळबोध होती. वॉल्टेअर, दिदेरो, रूसो, थॉमस पेन, बेंजामिन फ्रेंकलिन, वॉशिंग्टन, जेफर्सन आदींच्या राजकीय तत्वज्ञानाशी त्यांना काही देणेघेणे नव्हते. केवळ हेच नाही, तर नंतरच्या बऱ्याच घटना हे दाखवून देतात की **राज्यसत्तेप्रती नागरिकांच्या निष्ठेचा आपला हा सिद्धांत गांधी अहिंसेच्या सिद्धांतापेक्षा जास्त महत्वाचा मानत असत. पहिल्या**

**महायुद्धाच्या काळात त्यांनी ब्रिटीशांच्या युद्धकालीन प्रयत्नांचे निष्ठावान प्रजेच्या रुपात पूर्ण समर्थन केले, इथपर्यंत की 1918 मध्ये ब्रिटीशांच्या सहाय्यतेसाठी पैसा आणि सैन्य भरतीसाठी विविध भागांचा दौरा सुद्धा केला.** त्यानंतर दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर, जुलै 1940 मध्ये पुणे अधिवेशनामध्ये काँग्रेसने ह्या अटीवर ब्रिटीश युद्धप्रस्ताव मंजूर केला की युद्धानंतर भारताला स्वातंत्र्य देण्यात येईल. म्हणजेच, स्वातंत्र्याच्या अटीवर गांधी साम्राज्यवादी युद्धाच्या भीषण हिंसेमध्ये एका साम्राज्यवादी शक्तीच्या बाजूने उभे राहण्यास सुद्धा तयार होते. त्यानंतर सोविएत रशियाच्या जर्मनीवरील हल्ल्यानंतर युद्धाचे चित्र बदलले आणि जागतिक स्तरावरील अंतर्विरोधांवरून चुकीच्या पद्धतीने आपले कार्यभार ठरवत कम्युनिस्ट पक्षाने राष्ट्रीय मुक्ति संघर्ष युद्धकाळात स्थगित करण्याचा निर्णय घेतला. भारतीय बुर्जुआ वर्गाला सत्ता-प्राप्तीसाठी वसाहतवाद्यांवर निर्णायक दबाव आणण्याची हि निर्णायक संधी वाटली. त्यानंतर जुलै, 1942 मध्ये वर्धा येथील बैठकीत काँग्रेस कार्यसमितीने 'भारत छोडो आंदोलनाचा' प्रस्ताव पास केला. तेव्हा गांधींनी हि घोषणा केली की हे व्यापक असहकार आंदोलनाचे रूप घेण्याची शक्यता असलेले हे आंदोलन अहिंसेच्या मर्यादा सुद्धा ओलांडू शकते. 1942 च्या भारत छोडो आंदोलनाच्या दरम्यान कित्येक किरकोळ हिंसक घटना घडल्या, परंतु चौरीचौरा हत्याकांडानंतर सत्याग्रह थांबवण्याचा निर्णय घेणाऱ्या गांधींनी ह्यावेळी आंदोलन स्थगित केले नाही. ह्यातून हे अगदीच स्पष्ट आहे की अहिंसा हा गांधींसाठी सिद्धान्तापेक्षा रणनीतीचा प्रश्न होता. जन आंदोलनाच्या दरम्यान होणारी हिंसा नियंत्रित असेल आणि जर त्यामुळे राष्ट्रीय आंदोलनामधील काँग्रेसच्या वर्चस्वास धोका नसेल तर (कम्युनिस्टांचे आव्हान त्यावेळी समोर नव्हते), गांधींना हिंसेची काही विशेष तक्रार नव्हती.

आणखी एक गोष्ट लक्ष घेण्यासारखी आहे. गांधी प्रजा निष्ठेच्या सिद्धांताचा आधार घेऊन कित्येक वेळा शासक वर्गाच्या बाजूने उभे राहिले, परंतु क्रांतिकारी हिंसा त्यांना अजिबात मान्य नव्हती! गाँधी-आयर्विन करारादरम्यान भगतसिंग आणि सहकाऱ्यांची फाशी रद्द करण्यासाठी अनुकूल परिस्थिती असताना सुद्धा ब्रिटीशांवर त्यासाठीचा दबाव न बनवणे एक असे ऐतिहासिक तथ्य आहे, जे गांधींच्या राजकीय व्यवहाराबद्दल गंभीर प्रश्न उभे करते. जे गांधी क्रांतिकारकांच्या हिंसेचे अत्यंत कडवे टीकाकार होते, त्यांनी क्रांतीकारकांना फाशी देणाऱ्या शासक वर्गाच्या हिंसेविरुद्ध आंदोलन उभारणे तर दूरच, साधे निंदा करणारे वक्तव्य सुद्धा केले नाही. चंद्रसिंह गढ़वाली यांच्या नेतृत्वाखाली गढवाल रेजिमेंटने केलेल्या विद्रोहाची आणि 1946 च्या नौसैनिकांच्या विद्रोहाची त्यांनी अत्यंत कडव्या शब्दांत निंदा केली. त्यांच्या मते कामगारांचे संप हिंसक कारवाई होते आणि सुरुवातीपासून त्यांनी त्याला विरोध केला. पण तरीही गांधींना पाखंडी किंवा ढोंगी मानता येणार नाही. अहिंसेच्या सिद्धांतावर त्यांची गाढ श्रद्धा होती, परंतु राजकीय व्यवहारादरम्यान ह्याच बाबतीत त्यांच्यात सर्वाधिक अंतर्विरोध होते. जेव्हा निवड करण्याचा प्रसंग येत असे, तेव्हा ते अत्यंत कुशल व्यवहारवादी (Pragmatist) बुर्झ्वा राजकारण्यासारखे सिद्धांताच्या ऐवजी व्यावहारिकतेला प्राथमिकता देत असत. राजकारणाचे क्षेत्र हे ठोस व्यवहाराचे क्षेत्र असते. सिद्धांताचे अमूर्त अंतर्विरोध इथे अगदी स्पष्ट उठून दिसतात आणि विशेष वर्ग-हिताचा दबाव एखाद्या इतिहास-पुरुषाला सुद्धा अमूर्त आदर्शांना तिलांजली देण्यास भाग पाडतो. गांधी जर साहित्यकार असते तर ते भारताचे टॉलस्टॉय झाले असते. आणि टॉलस्टॉय जर भारतात जन्मून (आणि हिंदू म्हणून जन्मास आले असते) राजकीय क्षेत्रामध्ये असले असते, बहुतांशी, गांधी सारखे असते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये, पारंपारिक बुर्जुआ मानवतावाद राजकीय आणि समाज-जीवनात गांधींच्या मानवतावादाच्या रूपातच मूर्त होऊ शकत होता.

गांधींचे स्त्री विषयक विचार हिंदू धर्माच्या रुढी आणि पूर्वग्रह यांनी जखडलेले असे मानवतावादी विचार होते, जे शरीर-विज्ञान, मनोविज्ञान, नृतत्वशास्त्र आणि इतिहास यांबाबतच्या सबंध आधुनिक वैज्ञानिक स्थापनांपासून एकदम अपरिचित होते. घरगुती काम आणि पतीची सेवा यांना गांधी स्त्रियांची विशिष्ट जबाबदारी मानत आणि खाजगी आयुष्यामध्ये सुद्धा ते हि गोष्ट आचरणात आणत असत. ते नैसर्गिकरित्याच स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळे मानत असत. सामाजिक-राजकीय कार्यांमध्ये स्त्रियांची भागीदारी आणि स्त्री शिक्षण यांचे पुरस्कर्ते असूनही, ते स्त्रियांना नैसर्गिकरित्या पुरुषांच्या बरोबरीचे मानत नसत. स्त्रियांचे संरक्षण करणे पुरुषाची जबाबदारी आहे असे ते मानत. त्यांच्यासाठी स्त्री स्वाभाविकपणे पुरुषांच्या दयेची, करुणेची आणि संरक्षणाची अधिकारी होती. नैतिकता आणि यौन संबंध यांच्या बाबतीत गांधींच्या विचारांवर हिंदू धर्मातील रुढी आणि विक्टोरियन मूल्य-व्यवस्था यांचा प्रभाव होता. स्त्रियांमध्ये यौनिक, काम भावना असते हे त्यांना मान्य नव्हते. स्त्रियांचे सर्व सुख पुरुषांना सुख देण्यामध्ये निःहीत असते आणि त्या केवळ संतती प्रजननाचे आणि कामतृष्णापूर्तीचे साधन असतात. त्यामुळेच जास्तीत जास्त सूट देऊन सुद्धा म्हटलेच जाऊ शकते कि ते स्त्रियांना ब्रह्मचर्य-प्रयोगाचे 'निष्क्रीय (Passive)' अंग समजत असत. त्यांना ह्या गोष्टीची जाणीव सुद्धा नव्हती कि हि गोष्ट स्त्रियांचे इतके मानसिक खच्चीकरण करू शकते की त्यांचे पूर्ण आयुष्य आणि मनोजगत अस्तव्यस्थ आणि उध्वस्त होईल. निसंकोचपणे, गांधींच्या ह्या विचारांच्या, आचरणाच्यामागे त्यांच्या नेणीवेत उपस्थित काही जटिल यौन-ग्रंथीचा शोध लावला जाऊ

शकतो, ज्याची मुळे त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यामध्ये मिळू शकतात. परंतु हा मनोविज्ञानाचा विषय आहे आणि त्यावर कयास बांधणी होण्याचीच शक्यता जास्त आहे, जी गांधींच्या दार्शनिक-राजनीतिक-सामाजिक-नैतिक विचारांच्या आणि व्यवहाराच्या ऐतिहासिक मुल्यांकनामध्ये असंतुलन वा मनोगतता आणू शकते, त्यामुळे ह्याची इथे चर्चा करणे आम्ही उचित समजत नाही.

कुठल्याही समाजात कुठल्याही वर्गाची जशी जडण-घडण असते किंवा ताकत असते, इतिहास त्यांना तसाच वैचारिक-राजनीतिक प्रतिनिधि बहाल करतो. भारतीय बुर्जुआ वर्गाच्या जन्माची आणि विकासाची प्रक्रिया शेतीपासून कारागिरीमध्ये मॅन्युफॅक्चरिंगपर्यंतची यात्रा नव्हती, 'पुनर्जागरण-प्रबोधन-क्रांती' सारखी यात्रा नव्हती. भारतामध्ये भांडवलशाहीच्या नैसर्गिक विकासाचे बीज वसाहतवादाच्या 1740 पासून 1857 पर्यंतच्या प्रक्रियेमध्येच नष्ट झाले होते. वर्तमान भारतीय भांडवलशाही वसाहतवादी सामाजिक-आर्थिक संरचनेच्या उदरातून जन्मलेली आणि साम्राज्यवादी वैश्विक वातावरणामध्ये वयस्क झाली आहे. ह्या रुग्ण, जन्मजात विकलांग भांडवलशाहीने अत्यंत धूर्तपणे जुन्या रूढी, परंपरांशी जुळवून घेतले आणि जन संघर्षांचा दबाव आणि साम्राज्यवादी संकट आणि अंतर्विरोधांचा पुरेपूर उपयोग करून घेत, 'तडजोड-दबाव-तडजोड' ही रणनीती अमलात आणत राजकीय सत्ताप्राप्ती पर्यंतची यात्रा पूर्ण केली आहे. अशा वर्गाचे सिद्धांतकार दिदेरो, रूसो, व्होल्टेअर, थॉमस पेन आदींसारखे आणि राजकीय प्रतिनिधि वॉशिंग्टन, जेफर्सन, लिंकन आदींसारखे असूच शकत नाहीत. गांधी सारखे व्यक्तिमत्वच आपल्या समाजाचा सिद्धांतकार आणि राजकीय प्रतिनिधी असू शकतो. गांधींचे धार्मिक यूटोपियन आदर्श भारतीय जनमानसात सहज स्वीकार्य होऊ शकत होते. व्यापक जन समुदायास विदेशी सत्तेच्या विरुद्ध जागृत आणि संगठीत करण्यासाठीचे आवाहन घोषणा आणि नीती गांधींकडेच होती. त्याच बरोबर त्यांच्याकडे व्यावहारिक चातुर्य आणि 'आधिकारकता' सुद्धा होती, जिला वापरून ते जनसंघर्षाच्या उर्जेला बुर्झ्वा वर्ग हिताच्या चौकटीमध्ये बांधू शकले.


गांधी एका तत्वज्ञाच्या रुपात अपंग "भारतीय" बुर्जुआ मानवतावादाचे मूर्त रूप होते. ते बुर्झ्वा वर्गाचे सिद्धांतकार आणि नीती निर्माते होते आणि त्यापेक्षाही, ते बुर्झ्वा वर्गाच्या 'मास्टर स्ट्रॅटेजिस्ट' आणि 'मास्टर टॅक्टीशियन'च्या रुपात वेळोवेळी आपल्या उद्देशांच्या पूर्तीसाठी स्वतःच्या सैद्धांतिक निष्ठा बाजूला सारणारे एक अत्यंत निष्ठुर व्यवहारवादी (Pragmatist) व्यक्ती होते.

**अनुवाद: स्फुलिंग टीम**



बर्तोल्त ब्रेख्त

**सर्वात भिकार निरक्षर कुणाला म्हणावं तर राजकीय निरक्षराला. तो ऐकत नाही, बोलत नाही, राजकीय प्रक्रियेत सहभागी होत नाही. त्याला कळत नाही की जगण्याची किंमत, डाळीचे भाव, मासळीचे दर, पिठामिठाची किंमत, घरभाडं, जोड्यांची किंमत, औषधांच्या किमती सारं काही राजकीय निर्णयांवरून ठरतं. आपल्या राजकीय अजाणतेपणाचा त्याला अभिमान सुद्धा वाटतो आणि छाती फुगवून तो सांगत रहातो की मी राजकारणाचा द्वेष करतो. त्या राजकीय बेअक्कल माणसाला हे कळत नाही की त्याच्या राजकीय अज्ञानातूनच जन्माला येते वेश्या, बेवारस मूल, दरोडेखोर आणि सर्वात वाईट म्हणजे भ्रष्ट अधिकारी, शोषणकारी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे तळवेचाटू नोकर.**



हावर्ड जिन (प्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार आणि कार्यकर्ते)

**आपल्या समाजाविषयीचा टीकात्मक दृष्टीकोन जन्मताच आपल्यात नसतोच. आपल्या आयुष्यातील काही क्षण असे असतील (काही महीने वा वर्षे) जेंव्हा काही प्रश्न आपल्या समोर उभे राहिले असतील, ज्यांनी आपल्याला अचंबित केले असेल, ज्याच्या नंतर आपण खोलवर रूजलेल्या काही आस्था-मान्यतांवर प्रश्न उभे केले असतील, अशा मान्यता ज्या पारिवारिक पूर्वाग्रह, रूढीवादी शिक्षण, वृत्तपत्रे, रेडीयो वा टेलीव्हिजनच्या मार्गे मनात घर करून होत्या. यातून एक साधा निष्कर्ष निघतो की आपणा सर्वांवर एक महत्वाची जबाबदारी आहे की आपण लोकांसमोर अशी माहिति घेऊन जावी जी त्यांच्याकडे नाही, अशी माहिति जिच्यामध्ये, दीर्घकाळ चालत आलेल्या आपल्या विचारांवर पुनर्विचार करण्यासाठी बाध्य करण्याची, क्षमता असेल.**

## साहित्य

# कथा: करोडपती कसे असतात!!

✎ मॅक्सिम गॉर्की

संयुक्तराष्ट्र अमेरिकेच्या पोलाद, तेल सम्राट आणि इतर सम्राटांनी माझ्या विचारशक्तीला नेहमीच गुंगारा दिला आहे. मी विचारच करु शकत नाही, की एवढे सगळे पैसेवाले लोकं सामान्य नश्वर मनुष्य असू शकतील. मला नेहमीच वाटत आले आहे की त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे कमीत कमी तीन पोटं आणि दिडशे दातं असतील. मला विश्वास होता की प्रत्येक करोडपती सकाळी सहा वाजल्यापासून अगदी अर्ध्या रात्रीपर्यत खातंच राहत असेल आणि ते सुध्दा सर्वात महागडे जेवणच हादडत असेल, जसे बदके, टर्की कोंबड्या, छोटी डुकरे, लोण्यासोबत गाजर, मिठाई, केक आणि हर तऱ्हेचे चविष्ट पक्वान्न. रात्रीपर्यत त्याचे जबडे इतके थकत असतील की तो आपल्या निग्रो नोकरांना त्याच्यासाठी अन्न चावून बारीक करुन देण्याचा आदेश देत असेल, जेणे करुन त्याला सहज गिळता यावे. सरतेशेवटी जेव्हा तो खूप थकून जात असेल तेव्हा घामाने डबडबलेल्या त्याला त्याचे नोकर बिछान्यापर्यत उचलून नेत असतील. मग दुसऱ्या दिवशी आपली श्रमसाध्य दिनचर्या पुन्हा सुरु करण्यासाठी तो सकाळी पुन्हा सहा वाजता उठत असेल.

परंतु एवढया जबरदस्त मेहनतीनंतर सुध्दा तो त्याच्या संपत्तीवर मिळणाऱ्या व्याजापैकी अर्धेसुध्दा खर्च करु शकत नसेल.

निश्चितच हे एक अवघड जगणे होत असावे. पण करणार तरी काय? करोडपती होण्याचा फायदाच काय जर तुम्हाला इतर लोकांपेक्षा जास्त खाता येऊ शकणार नसेल तर?



मला वाटत होते, त्याची अंतर्वस्त्रे सुध्दा उत्कृष्ट नक्षीकामाने तयार केलेली असतील. त्याच्या बुटांच्या तळव्यांवर सोन्याचे खिळे ठोकलेले असतील आणि हॅटच्या ऐवजी तो हिऱ्यांनी तयार केलेली एखादी टोपी घालत असावा. त्याचे जॅकेट सर्वात महागडया मलमलीने बनवलेले असेल, ते कमीत कमी पन्नास मीटर लांब असेल आणि त्याच्यावर सोन्याची कमीत कमी तीनशे बटने लावलेली असतील. सुटटयांमध्ये तो एकावर एक आठ जॅकेट आणि सहा विजारी घालत असेल. हे खरे आहे की असे करणे खटकण्यासोबतच गैरसोईचे सुध्दा होत असावे पण एखादा करोडपती जो इतका श्रीमंत असेल, तो बाकीच्या इतर लोकांसारखे कपडे कसे काय घालू शकतो.

करोडपतीचे खिसे एका विशाल खड्ड्यासारखे असतील ज्यामध्ये तो संपूर्ण चर्च, संसदेची इमारत आणि इतर छोटया मोठया गरजेच्या गोष्टी ठेवू शकत असेल. परंतु एकीकडे मी विचार करत होतो की या महाशयांच्या पोटाची क्षमता एखादया मोठया समुद्री जहाजाच्या गोदामाइतकी असेल, तिथे मला या साहेबांच्या पायावर तंतोतंत येणाऱ्या विजारीची कल्पना करण्यात जरा अडचणच आली. याच्याही पलीकडे माझा विश्वास होता की, तो कमीतकमी एक वर्ग मैलापेक्षा बारीक आकाराच्या रजई खाली अजिबात झोपत नसेल. आणि जर तो तंबाखू चखळत असेल तर ती सुध्दा सर्वात उत्तम दर्जाची आणि एका वेळेला एक किंवा दोन पौंडापेक्षा कमी नसेल. आणि जर तो तपकीर ओढत असेल तर एका वेळेस एक पौंडापेक्षा कमी नसेल. पैसा स्वत:च स्वत:ला खर्चू पाहतो.

त्याची बोटे अद्भूत तऱ्हेने संवेदनशील असतील आणि त्यांच्यामध्ये आपल्या इच्छेनुसार लांब होण्याची जादुई ताकद असेल, उदाहरणादाखल तो सायबेरीयामध्ये अंकुरीत होत असणाऱ्या एका डॉलरवर न्यूयॉर्कमधून नजर ठेऊ शकत असेल आणि आपली जागा न सोडता बेरिंग स्ट्रेट पर्यंत हात लांबवून आपल्या आवडीचे फूल तोडू शकत असेल.

विचित्र म्हणजे एवढया सगळयानंतरही मी या गोष्टीची कल्पना नाही करु शकलो की या दैत्याचे डोके कसे असेल. वाटलं जणू ते मांस आणि हाडांचा असा गोळा असेल ज्याला फक्त प्रत्येक वस्तूतून सोने ओरबाडून घेण्याची प्रेरणा मिळत असावी. एकंदरीतच काय, की करोडपती लोकांविषयीची माझी प्रतिमा एका मर्यादेपर्यंत अस्पष्ट होती. थोडक्यात सांगायचे तर मला सर्वात अगोदर लांबलचक दोन हात दिसत असत. ज्यांनी पृथ्वीगोलास आपल्या कवेत घेतलेले आहे आणि त्याला आपल्या तोंडाच्या गुहेजवळ ओढून ठेवले आहे. तो आपल्या धरणीला शोषित व चावत आहे व त्याची हावरट लाळ तिच्यावर टपकत आहे. जणू काही तो तंदूरमध्ये भाजलेला स्वादिष्ट बटाटाच असावा.

तुम्ही त्याक्षणी माझ्या आश्चर्याची कल्पना करु शकाल जेव्हा मी एका करोडपतीला भेटलो आणि तो मला अतिशय सामान्य माणसासारखा दिसला.

एका खोलगट आरामखूर्चीमध्ये माझ्या समोर वाकलेला म्हातारा इसम बसला होता. त्याचे सुरकुतलेले गोरे हात

शांतपणे त्याच्या पोटावर धरलेले होते. त्याच्या लोंबणाऱ्या गालावर कोरलेली दाढी होती आणि त्याचा ओघळलेला खालचा ओठ त्याची सुंदर अशी बत्तीशी दाखवत होता, ज्याच्यातले काहीएक दात सोन्याचे होते. त्याचा रक्तहीन आणि पातळ वरचा ओठ त्याच्या दातांना चिकटलेला होता आणि जेव्हा तो बोलायचा तेव्हा त्याच्या वरच्या ओठाची थोडी सुध्दा हालचाल होत नव्हती. त्याच्या रंग उडालेल्या डोळयावर भुवयांचा थांगपत्ताही नव्हता आणि सूर्याखाली तापलेल्या त्याच्या डोक्यावर एक सुध्दा केस नव्हता. त्याला पाहिल्यावर असे वाटत होते की त्याच्या चेहऱ्यावर आणखी थोडी त्वचा असती तर बरे झाले असते. त्याचा लालबुंद आणि गतीहिन मऊ चेहरा नुकत्याच जन्मलेल्या बाळासारखा वाटत होता. हे ठरवणे अवघड होते की हे जनावर एवढयातच या जगात आले आहे की इथून जाण्याच्या तयारीत आहे.

त्याचा पेहराव सुध्दा एखादया सामान्य माणसासारखाच होता. त्याच्या अंगावरील सोने फक्त घडयाळ, अंगठी आणि दातापर्यंतच मर्यादित होते. सर्व मिळूनही अंदाजे ते अर्ध्या पौंडापेक्षा कमी होते. सामान्यत: तो युरोपातील एखादया राजेशाही घरातील जुन्या नोकरासारखा दिसत होता.

ज्या खोलीमध्ये तो मला भेटला तिच्यामध्ये सौंदर्याच्या व सुविधेच्या दृष्टीने काहीही उल्लेखनीय असे नव्हते. फर्निचर विशालकाय होते एवढेच काय ते बस.

त्याच्या फर्निचरकडे पाहून वाटायचे की कधी कधी हत्ती तेथे मुक्कामास येत असावा.

"काय तुम्ही… तुम्हीच… करोडपती आहात?" स्वत:च्या डोळयांवर अविश्वास व्यक्त करत मी विचारले.

"हो, हो " त्याने डोके हालवत उत्तर दिले.

मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवल्याचं नाटक केलं आणि निर्णय घेतला की त्याच्या थापांची त्याच वेळी परिक्षा घ्यावी.

"तुम्ही नाष्टयामध्ये किती मटन खाऊ शकता" मी विचारले.

"मी मटन खात नाही," त्याने जाहीर केले, "फक्त संत्र्याची एक फोड, एक अंडे आणि चहाचा छोटा कप."

लहान मुलांसारख्या त्याच्या डोळयांमध्ये अंधुकशा पाण्याच्या दोन मोठया थेंबासारखी चकाकी आली, ज्यात मला खोटेपणा अजिबात दिसत नव्हता

"चला ठीक आहे." मी साशंकपणे बोलणे सुरु केले. "मी तुम्हाला विनंती करतो कि तुम्ही मला प्रामाणिकपणे सांगावं की तुम्ही दिवसभरात किती वेळा जेवता?"

"दिवसातून दोन वेळा." त्याने थंडपणे उत्तर दिले. "न्याहरी आणि रात्रीचे जेवण माझ्यासाठी पुरेसे होते. रात्रीच्या जेवणात मी थोडेसे सूप, थोडेसे चिकन आणि थोडसं गोड खातो. एखादे फळ, एक कॉफी, एक सिगार…"

माझे आश्चर्य भोपळयासारखे वाढत होते. त्याने माझ्याकडे एखाद्या संताच्या नजरेने पाहिले. मी श्वास घ्यायला थांबलो आणि पुन्हा विचारायला सुरुवात केली.

"परंतु जर हे सत्य आहे तर तुम्ही तुमच्या पैशाचं काय करता?"

त्याने आपले खांदे जरा उचलले आणि त्याचे डोळे खोबणीमध्ये थोडा वेळ रेंगाळले आणि त्याने उत्तर दिले.

"मी त्यांचा उपयोग आणखी पैसे निर्माण करण्यासाठी करतो..."

"कशासाठी?"

"जेणेकरून मी अधिक पैसे तयार करु शकेल..."

"परंतु कशासाठी?" मी हट्टाने विचारले.

तो समोरील बाजूस वाकला आणि कोपरांना खूर्चीच्या बाजूंवर टेकवत जरा उत्सुकतेने विचारले.

"काय तुम्ही वेडे आहात?"

"काय तुम्ही वेडे आहात? " मी उलट उत्तर दिले.

म्हाताऱ्याने त्याचे डोके झुकवले आणि सोन्याच्या दातांमधून हळूहळू बोलायला सुरवात केली:

"तु खूपच मनोरंजक माणूस आहेस... मला आठवत नाही मी कधी तुझ्यासारख्या माणसाला भेटलो असेल..."

त्याने आपले डोके वर केले आणि आपले तोंड जवळजवळ कानांपर्यत रुंदावत शांतीपूर्वक माझे निरीक्षण करणे सुरु केले. त्याच्या शांत वर्तवणूकीला पाहून वाटत होते की तो स्वत:ला सामान्य व्यक्ती खचितच समजत होता. मी त्याच्या टायपिनवर मढवलेल्या छोटयाशा हिऱ्याला पाहिले. जर तो बूटाच्या टाचेइतका मोठा असता तर कदाचित मी समजू शकलो असतो मी कुठे बसलो आहे.

"मग स्वत:सोबत तुम्ही काय करता?"

"मी पैसे निर्माण करतो" आपले खांदे आणखी जास्त रुंदावत त्याने उत्तर दिले.

"म्हणजे तुम्ही नकली नोटांचा धंदा करता?" मी आनंदून बोललो, जणू काही मी रहस्यावरुन पडदा उठवणारच आहे. परंतु या वेळेला त्याला ऊचकी यायला सुरुवात झाली. त्याचे संपूर्ण धड हालायला लागले जणु एखादा अदृश्य हात त्याला गुदगुद्या करत होता. तो आपल्या डोळयांची जोर्जोरात उघडझाप करु लागला.

"हा तर खटयाळपणा आहे" शांत होत तो म्हणाला आणि माझ्याकडे एक आल्हाददायक नजर टाकली. "दया करून करुन मला आणखी काही विचारा" त्याने निमंत्रण देत म्हटले आणि काही कारणास्तव आपल्या गालांना थोडेसे फुगवले.

मी क्षणभर विचार केला आणि खंबीर आवाजात विचारले.

"आणि तुम्ही पैसा कसा निर्माण करता?"

"अरे हो! हे योग्य विचारणं झालं" त्याने होकारार्थी मान हालवली. "अतिशय सामान्य अशी गोष्ट आहे. मी रेल्वेचा मालक आहे. शेतकरी माल निर्माण करतात, मी त्यांचा माल बाजारात पोहोचवतो. फक्त एवढयाच गोष्टीचा हिशोब करावा लागतो की शेतकऱ्यासाठी फक्त एवढे पैसे सोडावेत की तो उपाशी रहायला नको आणि तुमच्यासाठी काम करत

रहावा. बाकीचे पैसे मी भाड्याच्या नावावर आपल्या खिशात टाकतो. फक्त एवढीशी गोष्ट आहे."

"आणि काय? शेतकरी याने समाधानी राहतात?"

"माझ्या मते सगळे नाही रहात" बालसुलभतेने तो बोलला. "परंतु असं म्हणतात ना, लोकं कधीच समाधानी होत नसतात. अशी वेडी माणसे तुम्हाला प्रत्येक ठिकाणी भेटतील जी फक्त तक्रार करत असतात..."

"तर मग, काय शासन तुम्हाला काही बोलत नाही?" आत्मविश्वास कमी असून देखील मी विचारले.

"सरकार?" त्याचा आवाज घुमला मग त्याने थोडा विचार करत आपल्या कपाळावर बोटे फिरवली. मग त्याने आपले डोके हालवले, जणू त्याला काही आठवलं :"बरं ...तुमचा अर्थ ते लोकं...जे वाशिंग्टन मध्ये बसतात? नाही, ते मला त्रास देत नाहीत. ती चांगली माणसं आहेत... त्यांच्यापैकी काही जण तर माझ्या क्लबचे सभासदसुद्धा आहेत. परंतु त्यांच्याशी जास्त भेटणे होत नाही...म्हणून कधी कधी मी त्यांच्याबाबत विसरुन जातो. नाही, ते मला त्रास देत नाहीत" त्याने त्याचे म्हणणे दुसऱ्यांदा परत मांडले आणि माझ्याकडे उत्सुकतेने पाहत विचारले:

"काय तुम्ही असे म्हणू इच्छिता की अशी सरकारे पण असतात जी लोकांना पैसा निर्माण करण्यापासून अडवत असतात?"

मला माझी निरागसता आणि त्याच्या बुध्दीमत्तेवर कीव आली.

"नाही," मी हळू आवाजात उत्तरलो. "माझ्या बोलण्याचा उद्देश हा नव्हता... म्हणजे सरकारने कधी कधी तरी या उघड उघड दरोड्यावर अंकुश ठेवला पाहिजे ना."

"आता पाहा." त्याने मध्येच थांबवले. "हा तर आदर्शवाद झाला. इथे हे सर्व चालत नाही. व्यक्तीगत कामांमध्ये हस्तक्षेप करण्याचा सरकारला काही एक अधिकार नाही."

त्याच्या लहान मुलांसारख्या बुद्धिमत्तेसमोर मी स्वत:ला खुपच खुजा अनुभवत होतो.

"परंतु जर एक व्यक्ती अनेक लोकांना उध्वस्त करत असेल तर काय ते व्यक्तीगत काम समजले जाईल?" मी विनम्रतेने विचारले.

"उध्दवस्त" डोळे विस्फारत त्याने उत्तर दयायला सुरुवात केली. "बरबादी चा अर्थ होतो जेव्हा मजूरीचे दर वाढणे किंवा संप होणे. पण आमच्याकडे प्रवासी माणसं आहेत. जे राजीखुशीने कमी मजूरीवर संपकऱ्यांच्या जागेवर काम करायला सुरुवात करतात. जेव्हा आपल्या राज्यात खुप सारे प्रवासी परप्रांतीय होतील, जे कमी पगारावर काम करतील आणि खुप साऱ्या वस्तू विकत घेतील तेव्हा सर्व काही व्यवस्थित होईल."

तो थोडासा उत्तेजित झाला होता आणि एक लहान मुल व म्हाताऱ्याच्या मिश्रणाहून अंमळ कमी भासत होता. त्याची नाजूक गोरी बोटे थरथरली आणि त्याचा रुक्ष आवाज माझ्या कानावर आदळू लागला:

"सरकार? वास्तविक पाहता हा मनोवेधक प्रश्न आहे. एक चांगले सरकार असणे महत्वाचे आहे. ज्याला या गोष्टीची काळजी असते की या देशामध्ये तेवढीच माणसे रहावीत जेवढयांची मला गरज आहे आणि त्यांनी तितकेच विकत घ्यावे जितकं मी विकू पाहतो; आणि कामगार तेवढेच असावेत की माझे काम कधी थांबू नये. पण त्याहून जास्त नाही! मग कोणी समाजवादी शिल्लक राहणार नाहीत आणि आंदोलनेही होणार नाहीत. आणि सरकारने जास्त कर सुध्दा आकारु नये. लोक जे देऊ करतील तेवढेच घ्यावे, याला मी म्हणतो चांगले सरकार."

"तो मूर्ख नाही, हा एक गर्भित ईशारा आहे, की त्याला त्याच्या महानतेचं भान आहे." मी विचार करत होतो. "या माणसाने खरोखर राजाच असले पाहिजे होतं"

"मला हवंय" तो स्थिर व विश्वासपूर्ण आवाजात बोलत गेला "की या देशात सूख शांती नांदो, सरकारने अनेक तत्ववेत्त्यांना भाडयाने ठेवले आहे जे प्रत्येक रविवारी कमीत कमी आठ तास लोकांना हेच शिकविण्यासाठी खर्च करतात की कायद्याचा सन्मान केला पाहिजे आणि जर तत्ववेत्यांकडून हे कार्य होत नसेल तर सरकार फौजेला पाचारण करते. पध्दत नाही, तर परिणाम जास्त महत्वाचा असतो. ग्राहक आणि कामगारांना कायद्याचा सन्मान करायला शिकविले पाहिजे, बस्स!" आपली बोटे चाळवत त्याने बोलणे पूर्ण केले.

"आणि धर्माबाबत तुमचा काय विचार आहे?" आता मी प्रश्न केला, खरतर त्याने त्याची राजकीय भूमिका अगोदरच स्पष्ट केली होती.

"बरं!" त्याने उत्साहाने आपले गुडघे थोपटले आणि पापण्या मिटत म्हणाला, "मी या बाबतीत खुपच चांगला विचार करतो. धर्म लोकांसाठी अत्यंत गरजेचा आहे, या गोष्टीवर माझा पूर्ण विश्वास आहे. खरं सांगू, मी स्वत:च प्रत्येक रविवारी चर्चमध्ये उपदेश करत असतो...अगदी खरं सांगतोय तुम्हाला."

"आणि तुम्ही आपल्या उपदेशात काय बोलता?" मी प्रश्न केला.

"ते सर्व जे एखादा खरा ख्रिस्ती चर्चमध्ये बोलू शकतो" त्याने खूपच भावुक होत उत्तर दिले. "बघा मी एका छोटया चर्चमध्ये भाषण देतो आणि गरीब लोकांना नेहमीच दयावाचक शब्दांची आणि पित्यासमान सल्ल्याची गरज असते... मी त्यांना सांगतो..."

"इसामसीह च्या मुलांनो! ईर्षेच्या सैतानाच्या लालसेपासून स्वत:ला वाचवा आणि दुनियादारीने भरलेल्या वस्तूंचा त्याग करा. या धरतीवर आयुष्य खुपच थोडे असते: फक्त चाळीसीच्या वयापर्यंत माणूस चांगला कामगार राहू शकतो. चाळीसच्या नंतर त्याला कारखान्यांमध्ये रोजगार मिळू शकत

नाही. आयुष्य थोडंसुध्दा सुरक्षित नाहीये. कामाच्या वेळी फक्त एक चुक आणि मशिन तुमच्या हाडांचा चुराडा करु शकते. डुलकी लागली आणि तुमची कथा समाप्त होऊ शकते. प्रत्येक पावलावर आजार आणि दुर्भाग्य कुत्यासारखं तुमचा पाठलाग करत असते. एक गरीब व्यक्ती एखादया उंच इमारतीवर उभ्या असलेल्या आंधळया व्यक्ती सारखी आहे. तो ज्या दिशेला जाईल स्वत:ला उध्वस्त करेल, जसे की जूडचा भाऊ देवदूत जेम्सने आपल्याला सांगितले आहे. बंधूनो, तुम्ही जगरहाटीच्या वस्तुंपासून स्वत:ला दूर ठेवले पाहिजे. उध्वस्त करणाऱ्या सैतानाचा कारनामा आहे. इसामसीहच्या आवडत्या बाळांनो, तुमचे साम्राज्य तुमच्या परमपित्याच्या साम्राज्याप्रमाणे आहे. ते स्वर्गात आहे. आणि जर तुमच्यात धैर्य असेल आणि तुम्ही आपल्या आयुष्याबदल तक्रार न करता, गोंधळून न जाता आयुष्य घालवाल, तर तो तुम्हाला त्याच्याजवळ बोलावेल आणि या पृथ्वीवरच्या कठीण परिश्रमाच्या परिणामी तुम्हाला देणगीच्या रुपात चिरकाल शांती देईन. हे जीवन तुमच्या आत्माच्या शुध्दीकरणासाठी दिले गेले आहे, आणि जितकं तुम्ही या आयुष्यात सहन कराल तितकचं जास्त सुख तुम्हाला लाभेल-जसे खुद्द संदेष्टया जूडने सांगितले आहे.”

त्याने छताकडे बोट दाखवले आणि थोडा वेळ विचार केल्यानंतर शांत आणि धीरगंभीर आवाजात बोलला:

“हो, माझ्या प्रिय बंधु-भगिनींनो, जर तुम्ही आपल्या शेजाऱ्यासाठी भलेही तो कोणीही असो, जर त्यागणार नसाल तर हे जीवन पोकळ आणि अतिशय सामान्य आहे. इर्षेच्या राक्षसासमोर तुमच्या मनांना समर्पित करु नका. कोणत्या गोष्टीची हाव बाळगाल? जीवनातील सूख फक्त भ्रमच असते; राक्षसाचे खेळणे जणू. आपण सर्व मारले जाणार. श्रीमंत आणि गरीब-राजा आणि कोळशाच्या खाणीत काम करणारे मजूर, बँकेत काम करणारे आणि रस्त्यावर झाडू मारणारे. असेही होऊ शकते की स्वर्गातील उपवनात तुम्ही राजे बनाल आणि राजा झाडू घेऊन रस्त्यातली पाने साफ करत असेल आणि तुम्ही खाल्लेल्या मिठाईचे तुकडे खात असेल. बंधूनो, इथे या जगामध्ये आशा करण्यासारखे काय आहे? पापाने बरबटलेल्या या दाट जंगलात जिथे आत्मा लहान मुलांसारखे पाप करीत असतो. प्रेम आणि विनम्रतेचा मार्ग निवडा आणि जे तुमच्या नशीबात येतेय ते सहन करा, आपल्या सहकाऱ्यांना प्रेम द्या, आणि त्यांनाही जे तुमचा अपमान करतात...”

त्याने परत डोळे मिटून घेतले आणि आपल्या आरामखूर्चीत आरामात झुलत बोलणे सुरु ठेवले:

“तुमच्यासमोर एखाद्याच्या गरीबीचा आणि दुसऱ्याच्या श्रीमंतीचा विरोधाभास दाखवणाऱ्या लोभाच्या त्या पापी भावनांकडे आणि लोकांच्या बोलण्याकडे थोडेही लक्ष देऊ नका. असे लोक सैतानाचे सहकारी असतात. आपल्या शेजाऱ्याशी ईर्षा बाळगण्यास देवाने तुम्हास मनाई केलेली आहे. श्रीमंत माणसेसुध्दा कंगाल असतात; प्रेमाच्या बाबतीत. इसामसीहचा भाऊ जूडने म्हटले होते, श्रीमंतावर प्रेम करा कारण ते ईश्वराचे आवडते आहेत. समानतेच्या गोष्टीवर आणि सैतानाच्या इतर बोलण्यावर थोडेही लक्ष देऊ नका. या धरतीवर समानता काय असते? तुम्ही तुमच्या ईश्वरासमोर एक दुसऱ्यासोबत आपल्या आत्माच्या शुध्दतेची बरोबरी केली पाहिजे. धैर्याने आपली अवस्था धारण करा आणि आज्ञा पालन केल्याने तुमचे दु:ख हलके होईल. ईश्वर तुमच्या सोबत आहे माझ्या मुलांनो, आणि तुम्हाला त्याच्याशिवाय कोणत्याच गोष्टीची आवश्यकता नाही.”

म्हातारा गप्प झाला आणि त्याने त्याच्या ओठांना ताणले. त्याचे सोन्याचे दात चमकले आणि तो विजयी मुद्रेने माझ्याकडे पाहू लागला.

“तुम्ही धर्माचा चांगलाच वापर केलात” मी म्हणालो.

“होय, अगदी बरोबर! मला त्याचे महत्व माहिती आहे.” तो म्हणाला.

“मी माझं म्हणणं पुन्हा एकदा मांडतो की गरीबांसाठी धर्म अत्यंत गरजेचा आहे. मला हे आवडतं. तो म्हणतो कि या पृथ्वीवरील सर्व वस्तू सैतानाच्या आहेत आणि हे मानवा जर तू आपल्या आत्म्याला वाचवू पाहतोस तर पृथ्वीवरील कोणत्याच वस्तूला स्पर्श करायची देखील लालसा बाळगू नकोस. जीवनातील सर्व सुखे तुला मरणानंतर भेटतील. स्वर्गातील प्रत्येक वस्तू तुझीच आहे. जेव्हा लोक या गोष्टीवर विश्वास ठेवतात, तेव्हा त्यांना काबूत ठेवणं सोपं जाते. हो. धर्म एका चिकट वंगणासारखं काम करतो आणि जीवनाच्या यंत्राला आपण हे वंगण सतत घालत राहिलो तर सारे भाग व्यवस्थित काम करत राहतात आणि यंत्र चालविणाऱ्यासाठी सोपं होतं.”

“हा माणूस खराखुरा राजाच आहे” मी निर्णय दिला.

...

“कदाचित तुम्ही विज्ञानाविषयी काही सांगू इच्छिता?” मी शांतपणे प्रश्न विचारला.

“विज्ञान?” त्याने एक बोट छताकडे दाखविले. मग त्याने आपले घडयाळ बाहेर काढले वेळ पाहिली आणि त्याच्या साखळीला आपल्या बोटावर फिरवत त्याला हवेत झोकून दिले. मग त्याने सुस्कारा टाकत बोलणे सुरु केले:

“विज्ञान... होय मला माहितीये. पुस्तके. जर ती अमेरिकेविषयी चांगले विचार मांडत असतील तर ते उपयुक्त आहे. मला वाटते की हे कवी लोक जी पुस्तकं बिस्तकं लिहीतात, ते खुपच कमी पैसे कमावतात. अशा देशामध्ये जिथे जो तो आपापल्या कामात व्यस्त आहे तिथे पुस्तकं वाचण्यासाठीचा वेळ कुणाकडेच नाही... हां!, हे लेखक लोक रागावतात कि कोणीच त्यांची पुस्तकं विकत घेत

नाहीत. शासनाने लेखकांना व्यवस्थित पैसे दिले पाहिजेत. चांगलं खाणारा पिणारा माणूस नेहमी आनंदी आणि दयाळू होत असतो. जर अमेरिकेविषयी पुस्तके खरोखर गरजेची असतील तर चांगल्या लेखकांना पगारावर ठेवले पाहिजे आणि अमेरिकेच्या गरजेची पुस्तके निर्माण केली पाहिजे... आणि काय."

"विज्ञानाची तुमची परिभाषा खूपच संकुचित आहे." मी विचार करत बोललो.

त्याने डोळे झाकले आणि विचारात हरवून गेला, मग डोळे उघडून खंबीरपणे बोलू लागला:

"हो,हो...प्राध्यापक आणि तत्वज्ञ..." ते सुध्दा विज्ञान असते. मला माहितीये, प्राध्यापक, सुईण, दाताचे डॉक्टर हे सगळे. वकील, डॉक्टर, इंजिनिअर. बरं, बरं. ते सर्व आवश्यक आहे. चांगल्या विज्ञानाने वाईट गोष्टी कधीही शिकविल्या नाही पाहिजेत. पण माझ्या मुलीच्या शिक्षकाने मला सांगितले होते, की सामाजिक विज्ञान पण काही तरी भानगड असते. पण बोलणं मला काही समजलं नाही...माझ्या विचारानुसार हे नुकसानकारक आहे. एक समाजशास्त्रज्ञ चांगल्या विज्ञानाची निर्मिती करु शकत नाही. त्याचं विज्ञानाशी काही घेणे देणे नसते. एडीसन जे बनवत आहे तसं विज्ञान उपयुक्त आहे. फोनोग्राफ आणि सिनेमा हे उपयोगी आहे. परंतु विज्ञानाची एवढी सगळी पुस्तके? ही तर हद्दच झाली. लोकांनी ती पुस्तके नाही वाचली पाहिजेत जी त्यांच्या डोक्यामध्ये प्रश्न निर्माण करतील. या पृथ्वीवर सर्व काही तसेच आहे जसे ते असायला पाहिजे आणि त्याला पुस्तकांच्या माध्यमातून विस्कळीत नाही केले पाहिजे."

मी उभा राहिलो.

"बरं, तर तुम्ही निघालात?"

"हो," मी म्हणालो "आता मी जाताच आहे तर कदाचित तुम्ही मला सांगू शकता, करोडपती असण्याचा अर्थ काय आहे?

त्याला ऊचक्या यायला लागल्या आणि तो आपले पाय आपटू लागला. कदाचित ही त्याची हसण्याची पध्दत होती.

"ही एक सवय आहे." त्याचा श्वास परतल्यावर तो मोठ्याने बोलला.

"सवय काय असते?" मी प्रश्न केला.

"करोडपती होणे...एक सवय असते भाऊ."

काही वेळ विचार केल्यानंतर मी माझा शेवटचा प्रश्न विचारला:

"तर तुम्ही समजता की सगळे टुकार, नशेखोर आणि करोडपती एकसारखेच असतात?"

हे बोलणं त्याला टोचलं असावं. त्याचे डोळे विस्फारले गेले आणि रागाने त्यांना हिरवे केले.

"मला वाटतेय की तुमचं संगोपन चांगल्या संस्कारात नाही झालेलं" त्याने रागात म्हटले.

"नमस्ते!" मी म्हटले.

तो सन्मानपूर्वक मला पडवीपर्यत सोडवायला आला आणि पायऱ्यांवरील आपल्या बुटांकडे पहात उभा राहिला. त्याच्या घरासमोर एक लॉन होता. ज्यावर व्यवस्थित कापलेले दाट गवत होते. मी हा विचार करत चालत होतो की बरं झालं या माणसाला मला पुन्हा कधी नाही भेटावे लागणार. तेवढयात मला पाठीमागून आवाज आला.

"ऐका!" मी वळालो, तो तिथेच उभा होता आणि मला पाहत होता

"काय युरोपात गरजेपेक्षा जास्त राजे आहेत" त्याने हळू हळू विचारले.

"जर तुम्ही माझे मत विचाराल तर आम्हाला त्यापैकी एकाची सुध्दा गरज नाही." मी उत्तर दिले.

तो एका बाजूला झाला आणि तिथेच थुंकला.

"मी स्वत:साठी दोन एक राजांना पगारावर ठेवण्याचा विचार करतोय." तो म्हणाला "तुमचा काय विचार आहे?"

"परंतु कशाकरीता?"

"खुप मजा येईल. मी त्यांना आदेश देईल कि त्यांनी येथे बॉक्सिंग करुन दाखववावी..."

त्याने लॉनकडे इशारा केला आणि विचारपूस करण्याच्या तऱ्हेने बोलला. "दर दिवशी एक ते दीड वाजेपर्यत. कसे राहील? दुपारच्या जेवणानंतर काही काळ कलेसोबत वेळ घालविणे चांगले राहील...खुपच मस्त."

तो प्रामाणिकपणे बोलत होता आणि मला वाटले कि आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी तो काहीही करु शकतो.

"पण या कामासाठी राजेच का?"

"कारण आजपर्यत याबाबतीत कोणी विचारच नाही केला" त्याने समजावले.

"परंतु राजांना तर स्वत: इतरांना आदेश द्यायची सवय लागलेली असते." एवढे बोलून मी निघालो.

"ऐका तरी" त्याने मला परत हाक मारली. मी परत थांबलो. आपल्या खिश्यामध्ये हात घालून तो अजूनही तेथेच उभा होता. त्याचा चेहऱ्यावर कोणत्या तरी स्वप्नाचा भाव दिसत होता.

त्याने आपले ओठ हालवले जणू काही चघळत असावा आणि हळूच बोलला:

"तीन महिन्यासाठी दोन राजांना एक ते दीड वाजेपर्यत बॉक्सिंग करवून घ्यायला तुमच्या अंदाजाने किती खर्च येईल."


**अनुवाद: प्रविण सोनवणे**

वारसा

# वाचनालयांची संस्कृती - कष्टकऱ्यांच्या आणि नफेखोरांच्या शासनामधील फरक

✍मानव

**एखाद्या समाजाच्या सांस्कृतिक स्तराचा अंदाज तेथील सांस्कृतिक केंद्रांच्या अवस्थेला पाहूनही लावता येऊ शकतो. अशाच केंद्रांपैकी एक आहे वाचनालय.** सोवियत युनियन मध्ये क्रांतिकारक काळात वाचनालये आणि पुस्तकांच्या संस्कृतीला खुपच प्रोत्साहित करण्यात आले. सोवियत युनियन मध्ये सर्व प्रकारच्या वाचनालयांची संख्या (सरकारी वाचनालये, सामूहिक-शेतांवरील, ट्रेड युनियन संस्थांमधील, लहान मुलांच्या अन्य विभागांमधील) संख्या 1935 मध्ये 1,15,542 होती ज्यामध्ये एकूण पुस्तकांची संख्या जवळपास 30 कोटी (29,88,95,000) होती. 1954 पर्यंत ही संख्या वाढून 3,88,127 वाचनालये झाली होती ज्यामध्ये एकूण जवळपास 117 कोटींपेक्षा जास्त ( 1,17,07,72,000) पुस्तके होती. आणि असे नव्हते की वाचनालये फक्त रशियामध्ये होती, तर भौगोलिक स्तरावर आणि लोकसंख्येच्या स्तरावर सुद्धा सोवियत युनियनच्या सर्व भागांमध्ये ज्यात कमी विकसित भाग सुद्धा सामील होते (जसे अझरबैजान, तुर्कमेनिस्तान, उज़्बेकिस्तान असे आशियाई भाग) तेथेही त्या प्रमाणात वाचनालये वाटलेली होती.



सोवियत युनियन मध्ये वाचनाच्या संस्कृतीचा अंदाज यावरूनही लावला जाऊ शकतो की साल 1955 मध्ये फक्त सरकारी वाचनालयांमध्ये वाचनाऱ्यांची संख्या 3,97,36,000 म्हणजे जवळपास 4 कोटी होती. 1954 मध्ये सोवियत युनियन मध्ये असलेल्या एकूण वाचनालयांपैकी सरकारी वाचनालयांचे प्रमाण 40% पेक्षा कमी होते. इतर प्रकारची सुद्धा वाचनालये होती (जी खाजगी नसून सरकारीच होती, फक्त त्यांवर नियंत्रण सरळ सरकारचे नसून संबंधित संस्थांचे होते). सोवियत युनियनची लोकसंख्या 1959 साली 20 कोटी पेक्षा थोडी जास्त होती. तर, एकूण वाचनालयांपैकी 40% पेक्षा कमी असलेल्या सरकारी वाचनालयांमध्ये जवळपास 4 कोटी वाचक होते. इतर वाचनालयांच्या वाचकांची संख्या जोडली तर सोवियत युनियनमधील वाचनाच्या संस्कृतीच्या व्याप्तीचा अंदाज येऊ शकतो.


याची तुलना जर आपण भारताशी केली तर या दोन्ही देशांमधील तरतूदींमधील फरक लक्षात येईल. शासकीय आकडेवारी उपलब्ध नसली (हा सुद्धा सरकारच्या दुर्लक्षाचाच पुरावा आहे) तरी इतर स्रोतांच्या मते भारतात एकूण सरकारी वाचनालयांची संख्या 50,000 ते 70,000 आहे. हा आकडा सोवियत युनियनच्या (1959च्या लोकसंख्येनुसार) 6 पट जास्त लोकसंख्या असूनही , निम्माच आहे (सोवियत युनियनच्या 1955 च्या आकड्यानुसार). भारतातील या वाचनालयांची वाटणी सुद्धा असमानच आहे - उदाहरणार्थ 20 कोटी लोकसंख्येच्या उत्तरप्रदेशात फक्त 75 सरकारी वाचनालये आहेत (उत्तरप्रदेश सरकार नवीन पुस्तके घेण्यासाठी फक्त 2 कोटी रुपये दरवर्षी खर्च करते) उलट 7 कोटी लोकसंख्या असलेल्या तामिळनाडू मध्ये वाचनालयांची संख्या 4,000च्या वर आहे. भारतात यावेळी सरकार वाचनालयांवर प्रति व्यक्ती फक्त 7 पैसे खर्च करत आहे.

शेवटी इतका फरक का? एक असा देश जिथे 1917 मध्ये क्रांतीअगोदर 83% लोक अशिक्षित होते तो फक्त 3 दशकांमध्ये जगातील सर्वात लिहिणारा-वाचणारा देश का बनला आणि भारत ज्याला स्वतंत्र होऊन 70 वर्षे झालीत तेथे वाचनाची संस्कृती फारच कमी आहे?

**फरक आहे दोन्ही देशांच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थांचा. फरक आहे भारतातील भांडवलशाही आणि क्रांतिकारी सोवियत युनियन मधील समाजवादाचा.**


**अनुवाद: अभिजित**


# ऐरण प्रकाशना कडून तरुणांसाठी काही महत्वाची पुस्तके






















- **देशातील महान क्रांतिकारकांच्या विचारांना जाणून घ्या आणि इतरांना सुद्धा जाणून घेण्यात मदत करा**
- **रजिस्टर्ड पोस्टा सहित एकूण पोस्टाचा खर्चः रु. 150**
- **शुल्क खालील नंबर वर पेटीएम करावे आणि आपला पत्ता मेसेज करावाः 9892808704**
- **इतर एखाद्या माध्यमातून शुल्क द्यायचे असल्यास वरील नंबर वर संपर्क करावा (शक्य असल्यास व्हॉट्सएप करावे)**

## जनचेतना
### महाराष्ट्र

https://www.facebook.com/janchetnamh/

# संपवा भांडवलाचे राज्य!
# लढा आणि निर्माण करा लोकस्वराज्य!!



आम्ही भांडवली संसदीय लोकशाहीची खर्चिक धोकेबाजी, लूटतंत्र आणि दमनतंत्रास मुळापासून नाकारतो. आम्ही पंचायत राजचा कपटपूर्ण सरकारी तमाशासुद्धा मुळापासून नाकारतो. काळाच्या गर्भात आज महत्त्वपूर्ण बदलांची बीजे अंकुरत आहेत. पर्याय निर्माण करण्यासाठी त्यांनाच पुढे यावे लागेल जे नाडले जात आहेत, लुटले जात आहेत आणि आवाज उठवताच चिरडले जात आहेत. या व्यवस्थेत ज्यांचे काहीच भविष्य नाही त्यांनाच पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी पुढे यावे लागेल.

साम्राज्यवाद आणि भांडवलशाहीचा एक एक दिवस आपल्याला जड जातो आहे. ही घुसमट, ही दुर्गंधी आता जिवंत माणसाच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे. आपल्याला उठावे लागेल आणि आपल्या जिवंत असण्याचा पुरावा द्यावा लागेल, अन्यथा येणाऱ्या पिढ्यांना इतिहास काय सांगेल की आपण काय करत होतो जेव्हा देश ज्वालामुखीच्या तोंडावर उभा होता, दुर्दशेच्या नरककुंडात होरपळत होता?

हेच कारण आहे की आम्ही जागतिक भांडवलशाहीशी नालबद्ध भांडवली व्यवस्था नष्ट करून एकूण समाजाच्या आर्थिक आधाराची आणि वरच्या संरचनेची न्याय आणि समतेच्या तत्त्वावर पुनर्रचना करण्यासाठी लोकस्वराज्याची घोषणा देत आहोत. या घोषणेचा अर्थ आहे – उत्पादन, शासन आणि समाजाच्या संपूर्ण संरचनेवर उत्पादन करणाऱ्या सामाजिक वर्गाचा ताबा असेल, निर्णयाचा संपूर्ण अधिकार त्यांच्या हाती असेल. या घोषणेचे सारतत्त्व आहे – संपूर्ण सत्ता कष्टकऱ्यांच्या हाती!

... परिवर्तनेच्छुक विद्यार्थी–युवकांना नव्याने आपल्या क्रांतिकारी संघटना आणि झुंजार संघर्ष संघटित करावे लागतील आणि त्यांना कष्टकऱ्यांच्या सघर्षाशी जोडावे लागेल. त्यांना भगतसिंहांचा संदेश स्मरून क्रांतीचा संदेश कारखान्यांपर्यंत आणि शेतीवाडीपर्यंत घेऊन जावा लागेल. क्रांतिकारी बुद्धिजीवींना एका नव्या सर्वहारा पुनर्जागरणाचे आणि प्रबोधनाचे कार्यभार पूर्ण करण्याच्या कामी स्वत:ला झोकून द्यावे लागेल. अर्धी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांच्या भागीदारीवाचून कोणतेही सामाजिक परिवर्तन शक्य नाही. कष्टकरी, विद्यार्थी–युवक, बुद्धिजीवी या सर्वच आघाड्यांवर स्त्रियांची भागीदारी वाढविणे ही यशाची मूलभूत शर्त आहे. त्याचबरोबर स्त्री आंदोलनाला कुलीन मध्यमवर्गीय वर्तुळाच्या, एन.जी.ओ.मार्गी सुधारणावादी चिखलातून आणि निष्क्रिय, चर्चावादी, अस्मितावादी वैचारिक संभ्रमांच्या दलदलीतून बाहेर काढून त्याला झुंजार, संघर्षशील आणि व्यवस्था–परिवर्तनवादी दिशा द्यावी लागेल.

**बिगुल मजदूर दस्ता, नौजवान भारत सभा,**

**दिशा विद्यार्थी संघटना आणि स्त्री मुक्ति लीग**

**तर्फे चालविल्या जाणाऱ्या**

## 'क्रांतिकारी लोकस्वराज्य अभियान'तर्फे प्रसिद्ध

संपर्क : रूम न. 204, बिल्डिंग न. 7बी, हीरानंदानी, लल्लुभाई कम्पाउंड, मानखुर्द, मुंबई – 400043
फोन : 9619039793, 9145332849 ईमेल – naubhas@gmail.com